भारत-इतिहास-संशोधक-मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ६९

ऐतिहासिक संकीर्ण निबंध खंड २ रा

BHĀRATA ITIHĀSA SAMSHODHAKA MANDALA

Quarterly

June—September 1947.

[Vol. XXVIII ; Nos. 109-110]

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

वर्ष २८ वें] त्रैमासिक [अंक १-२

(१०९-११०)

१८६९ आषाढ--आश्विन

श. १८६९ इ. १९४७

हें त्रैमासिक मुंबई इलाख्यांतील प्राथमिक व दुय्यम शाळा आणि शैक्षणिक (Training) संस्था, मध्यप्रांत व सिंध यांतील हायस्कुलें व नॉर्मल् स्कुलें यांसाठीं मंजूर आहे.

वार्षिक वर्गणी रु. ४ ट. ह. वगैरे निराळें. फुटकळ अंक १॥ रुपया

Annual Subscription Rs. 4. Postage &c. Extra. Each No. Re. 1-8.

Printed by Mr. Vitthal Hari Barve at the Aryabhushan Press, House No. 915/1 Shivaji-Nagar, Poona City and published by C. G. Karve, Secretary, B. I. S. Mandal, at 313A Sadashiv Peth, Poona 2, India.

शिवचरित्र कार्यालयाचे शिवचरित्रविषयक ग्रंथ

ह्या तीनहि ग्रंथांत इंग्रजी, डच, पोर्तुगीज, फारसी तसेंच संस्कृत, कानडी, हिंदी ह्या भाषांतील श. १३४८ ते श. १६०४ (इ. १६८२ एप्रील) अखेरपर्यंत पत्रांचा राजकीयदृष्ट्या विस्तृतपणें मराठींत काढलेला सारांश दिलेला आहे. अर्थातच मराठी पत्रें ह्यांत घेतलेलीं आहेत हें सांगणें नको. इ. १९३७ पर्यंत जेवढीं ह्या ७८ भागांमधून इतस्ततः पत्रें म्हणून प्रसिद्ध झालीं त्यांचा सारांश कालानुक्रमानें ह्या भागांतून प्रसिद्ध झाला आहे. पत्रें व तीं कालानुक्रमानें लावलेलीं असण ह्याहून इतिहासअभ्यासकास दुसरी महत्त्वाची गोष्ट नाहीं. अशीं पत्रें ह्या तिन्ही भागांत अंदाजें तीन सहस्र आलीं आहेत. शिवाय तिसऱ्या भागांत अकबर, जहांगीर, शहाजहान, औरंगजेब ह्या बादशहाच्या कारकीर्दीचीं **जुलूस-वर्षें** म्हणजे त्यांच्या कारकीर्दीच्या प्रत्येक वर्षाचा प्रारंभकाल मुसलमानी व इंग्रजी वर्ष, महिना, तारीख असा दिला आहे. ह्या सर्वांपेक्षां **शिवकालीन शकावली** पृष्ठें सुमारें १५० दिली आहे. पृष्ठसंख्या ९७०. किं. भाग १, २; प्रत्येकी रु. ३॥, भाग ३ रु. २॥.

शिवचरित्र निबंधावली—ह्या ग्रंथांत श्री. द. वि. आपटे, प्रो. पटवर्धन, प्रो. कुंभारे, प्रो. देशपांडे, प्रो. ओतुरकर, श्री. दि. वि. काळे, श्री. शं. ना. जोशी, श्री. वा. सि. बेंद्रे, रा. सा. गं. के. देशपांडे ह्यांचे मुख्यतः तत्कालीन पत्रांचे आधारें शिवचरित्रांतील प्रसंगावर लिहिलेले निबंध आले आहेत. पृ. ४१२, किं रु. ३॥

शिवाजी निबंधावली भाग १—ह्या ग्रंथांत प्रो. काणे, प्रो. पेंडसे, श्री. रा. राजोपाध्ये, प्रो. सरनौस, श्री. य. खु. देशपांडे, श्री. चा. आ. देशप्रभू पेडणेकर, श्री. ज. स. करंदीकर, म. म. गौरीशंकर ओझा, प्रो. दांडेकर, चें. प्रो. पुणतांबेकर, श्री. भट, श्री. शि. का. ओक-धार ह्यांचे शिवकालीन संस्कृति व धर्म गागाभट्ट, शिवाजीची कौटुंबिक माहिती, राजनीति, संतांची कामगिरी, शिवजन्मदिनानिर्णय, श्रीसमर्थ रामदास, शिवकालीन विदर्भ, शिवाजीचे कुलोपाध्याय, (शिवकालीन सिंहस्थ निजामशाही व आदलशाही सुलतान परिशिष्ट) इत्यादि निबंध आले आहेत. पृ. ३००, किं. रु. ३॥

शिवाजी निबंधावली भा. २ मध्यें प्रो. आगा हैदर हसन-अलनामा, दा. वि. गोखले-शिवकालीन प्रवासी पिटर डेला व्हॅले, प्रो. कलकर्णी-शिवकालीन भाषा, प्रो. देशपांडे-मोडी लिपी, श्री. चिं. वि. वैद्य- मराठ्याच्या ९६ कुळांच्या याद्या, मराठे व रजपूत; श्री. ग. ह. खरे-शिवकालीन राजपत्रलेखन, श्री. बेंद्रे जंजिरेकर शिद्दी, श्री. मा. ह. घोरपडे-शिवाजी व तत्कालीन मराठे प्रतिस्पर्धी, श्री. शि. ग. पवार-शिवकालीन ज्योतिर्गणित; प्रो. भानू-प्रतापगड युद्ध, प्रो. माटे-शिवकालीन समाजस्थिति; प्रो. पोतदार-अणाजी दत्तो वंशावळ हे निबंध आले असून प्रो. भूयान (गोहत्ती)-'आसामी ऐ. साधन व शिवाजी महाराज,' प्रो. श्रीनिवासचार्य (मद्रास)-शिवाजीची दक्षिणेकडील स्वारीची भूमिका, रा. ब. डॉ. अयंगार (मद्रास) दक्षिणेंतील मराठी सत्तेचा उदय, प्रो रामचंद्र दीक्षितार (मद्रास) शिवाजीविषयीं कांहीं नवीन साधनें, प्रो. वर्मा-मुहमदनामा हे लेख इंग्रजींत आले आहेत. पृ. ३००; किं. रु. ३.

निवेदन

त्रैमासिकाचा प्रस्तुत अंक मंडळांत वेळोवेळीं वाचल्या गेलेल्या निबंधांचा खंड दुसरा म्हणून काढण्यांत आला आहे. निबंधांचे मराठी व इंग्रजी असे दोन विभाग करण्यांत आले असून प्राचीन साधनांना प्रामुख्य दिलेलें आढळून येईल.

मराठी निबंधांत प्राध्यापक वा. वि. मिराशी ह्यांनीं सातारा जिल्ह्यांत चवथ्या पांचव्या शतकाचे प्रारंभीं राष्ट्रकूटांची एक स्वतंत्र शाखा "मानपूरचे राष्ट्रकूट" म्हणून ३-४ शतकांपर्यंत राज्य करीत होती असा नवीनच पुरावा साधार दिला आहे. तसेंच वऱ्हाडांत नांदगांव येथें यादव कृष्ण याचा एक नवीन शिलालेख त्यांना आढळून आला याचेंही वाचन दिलें आहे. श्रीमंत आबासाहेब मुजुमदार यांना पेशवाईतील दोन शिलालेख अहमदनगर जवळ हिंगणगांव येथें मिळाले त्यांचेंही वाचन येथें प्रथमच प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

श्री. चितळे ह्यांचा पुरंदरच्या कोळ्यांवरील निबंध महत्त्वाचा आहे. त्यांनीं ह्या प्रकरणाचें समालोचन तर केलेंच आहे; परंतु दोन नवीन पत्रें उजेडांत आणून या विषयावरील विचारास नवीन चालना दिली आहे. केवळ साहित्य म्हणून नुसतीं पत्रें छापण्यापेक्षां अशा तऱ्हेचा एकेक प्रकरणवार घेतलेला आढावा वाचकांस अधिक रुचेल असा विश्वास वाटतो.

गांवगाडा हें प्रकरण त्यांतील हक्काच्या शाबितीच्या दृष्टीनें अधिक गंतागुंतीचें व समाजव्यवस्थेबरोबर बदलणारें आहे. 'चौगुला' वतनासंबंधींच्या आपल्या विस्तृत लेखांत मंडळांतील संशोधक श्री. शंकरराव जोशी ह्यांनीं कागदपत्रांचे आधारें ह्या वतनासंबंधीचे हक्क कोणते याची चर्चा केली आहे.

इंग्रजी लेखांत प्राध्यापक गोडे यांनीं "चष्म्याचा इतिहास" ह्या अभिनव विषयावर निबंध लिहून इ. स. १५०० ते १८०० ह्या काळांतले अनेक उल्लेख दाखवून दिले आहेत. संयुक्त प्रांतांत सुमारें २५ वर्षांपूर्वी ग्रामीण उद्योगधंद्याची पहाणी करण्यांत आली होती त्यावेळीं कित्यक ठिकाणीं स्फटिकाचे दगडापासून चष्म्याच्या कांचा तयार करणारे देशी कारागीर आढळून आले होते व कमीअधिक प्रमाणांत हा धंदा अजूनही तिकडे चालतो. अर्थात् विलायती कांचांच्या आयातीमुळें व सूक्ष्मतेची जोड नसल्यामुळें आतां हा धंदा बहुतेक बसून गेल्यासारखाच आहे.

श्री. य. रा. गुप्ते ह्यांनीं छत्रपतींच्या मुद्रेविषयींच्या आपल्या लेखांत सभासद बखरीच्या एका प्रतींतील उल्लेखावरून श्रीशिवछत्रपतींच्या राज्यारोहण प्रसंगीं कवींद्र

परमानंद ह्यांनीं रचलेला एक श्लोक आपल्या मुद्रेसाठीं उपयोजिला होता असा नवीनच मुद्दा उपस्थित केला आहे. तूर्त अशी मुद्रा असलेला एकही कागद संशोध-कांपुढें नाहीं. परंतु अज्ञात माहिती उजेडांत घेऊन संशोधकांना त्याचा उपयोग व्हावा हाच हेतू हा लेख छापण्यांत आहे. अधिक शोध व्हावयास पाहिजे हेंच खरें !

इंदूर म्युझियमचे क्यूरेटर श्री. डिसकळकर ह्यांचा होळकरी नाण्यांवरचा लेख महत्त्वपूर्ण आहे. जुन्या ज्ञात नाण्यांचा परामर्ष घेऊन त्यांनीं एकदोन **नवीन नाणींही** ह्या लेखांत समाविष्ट केलीं आहेत नाण्यांवरील लेखांत त्यांचीं प्रतिमापत्रें देणें अत्यावश्यक असतें परंतु हीं प्रतिमापत्रें हातीं न आल्यामुळें दण्याचें जमलें नाहीं.

कोल्हापूरचे प्रिन्सिपॉल डॉ. अप्पासाहेब पवार ह्यांनीं रामचंद्रपंत अमात्यांच्या आयुष्यांतील एका प्रसंगावर कागदपत्रांचा फेरविचार करून कांहीं विचार नव्यानेंच पुढें मांडले आहेत.

याप्रमाणें विविध विषयांवरील जुनें नवें साहित्य या खंडांत ग्रथित केलें आहे. ह्या साहित्याचा उपयोग संशोधकांस खचित होईल असा भरंवसा वाटतो. मंडळाचे संग्रहीं अजून जीं अमोलिक साधनें पडून आहेत त्यांतून अशाच प्रकारचे एकदोन खंड सहज काढतां येतील अशी उमेद वाटते. अडचण फक्त आर्थिक परिस्थिती-संबंधी व सध्यांच्या मुद्रणनियंत्रणासंबंधी आहे.

भारत इतिहास सं. मंडळाची त्रैवार्षिक निवडणूक होऊन त्यांत नवीन मंडळी बरीच आली आहेत. त्यांच्या पदाधिकाऱ्यांचीं नांवें मंडळवृत्त पृष्ठ १०।११ वर दिलीं आहेत. या नव्या मंडळींच्या सहकार्यानें मंडळाचें काम वाढीस लागेल याविषयीं शंका नाहीं.

× × × × ×

ता. १५ ऑगष्ट १९४७ रोजीं सत्तांतर होऊन आता आपलेंच सरकार स्थापन झालें आहे. देशांतील सद्यःस्थितीकडे पाहून संशोधनादि कार्यांकडे लक्ष्य वेधणें तूर्त कठिणच दिसतें. पण असा विश्वास आहे कीं, मंडळाच्या कार्यांकडे यथावकाश ह्या सरकारचेंही लक्ष्य वेधलें जाईल व त्या दृष्टीनें प्रांतिक व मध्यवर्ती सरकारकडे प्रयत्न सुरू आहेत.

× × × × ×

गतवर्षी श्री. ग. ह. खरे यांचा "हिंगणे–दप्तर भाग पहिला" वाचकांना सादर केला होता. यावर्षी त्याचा दुसरा भाग प्रसिद्ध करतां येईल अशी उमेद आहे.

× × × × ×

मंडळाचे एक चिटणिस डॉ. मो. ग. दीक्षित आणि मंडळाचे सभासद श्री. य. न. केळकर व श्री. ग. ना. जोशी ह्यांच्या संपादकत्वाखालीं केवळ इतिहास विषयास वाहिलेलें "पराग" ह्या नांवाचें मासिक निघालें आहे. त्याचा पहिला अंक आमच्याकडे आला आहे. यांतील बहुतेक सर्व लेख मंडळांतील सभासदांचेच आहेत हें विशेष आहे. किरकोळ मुद्रणदोष सोडले तर पहिला अंक भरीव आहे. व सर्वसामान्य वाचकांचे हातीं इतिहास मनोरंजकपणें देणें हें ह्या मासिकाचें ध्येय सहज साध्य होण्यासारखें आहे. आम्ही या मासिकाचें स्वागत करतों.

मंडळामार्फत अशा तऱ्हेच्या प्रयत्नाची पूर्वतयारी १९३७ सालीं झाली होती. पण अनेक कारणांमुळें तें जमलें नाहीं.

× × × × ×

पेशवे दप्तरांत संशोधकांस अधिक वाव मिळावा व त्यांच्या अडचणी दूर व्हाव्या म्हणून सरकारच्या दप्तराचे नवे अधिकारी नुकतेच मंडळांत आले होते. सभा भरवून त्यांनीं संशोधकांचें म्हणणें व तक्रारी सहानुभूतिपूर्वक ऐकून घेतल्या.

ऐतिहासिक संकीर्ण निबंध खंड २

अनुक्रमणिका

ऐतिहासिक संकीर्ण निबंध-खंड २

१ मानपूरचे राष्ट्रकूट


[महामहोपाध्याय प्रिन्सिपाल **वा. वि. मिराशी**, उमरावती]

बदामीच्या* **चालुक्यांच्या** राजवटीनंतर ज्याचें साम्राज्य महाराष्ट्रांत प्रस्थापित झालें तें **राष्ट्रकूट** घराणें इतिहासांत सुविख्यात आहे. याचे कोरीव लेख इ. स. च्या आठव्या शतकापासूनचे सांपडले आहेत. पण हें घराणें त्या शतकांतच प्रथम उदयास आलें किंवा त्याआधींही त्याची पूर्वपीठिका सांपडते हा प्रश्न अद्यापि अनिर्णीतच आहे. अलीकडे सांपडलेल्या कांहीं कोरीव लेखांवरून या प्रश्नावर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखांत केला आहे.

आतांपर्यंत या पूर्व-राष्ट्रकूटवंशाचे (Early Rāshṭrakūṭa Dynasty) तीन ताम्रपट सांपडले आहेत. त्यांपैकीं पहिला डॉ. भाऊ दाजी यांच्या संग्रहांत होता. तो भगवानलाल इंद्रजी यांनीं रॉयल् एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या जर्नल्मध्यें (पृ. १६, पु. ८८ इ.) प्रकाशित केला आहे. त्यांत या वंशाला **राष्ट्रकूट** म्हटलें आहे. हा ताम्रपट मूळचा कोठला याविषयीं माहिती मिळत नाहीं. तथापि त्यांत **अभिमन्यु** नामक राजानें **उंडिकवाटिका** हा गांव, दान दिल्याचें नमूद असल्यानें त्याला ' उंडिकवाटिका ताम्रपट ' म्हणतात. दुसरा ताम्रपट कोल्हापूरजवळच्या एका खेड्यांत सांपडला; तो कोल्हापूरचे प्रो. कुंदनगार यांचे मार्फत म्हैसूर संस्थानच्या पुराणवस्तु संशोधन खात्याचे प्रमुख डॉ. कृष्ण यांचेकडे गेला व तो त्यांनीं आपल्या खात्याच्या सन १९२९ च्या वार्षिक रिपोर्टांत (पृ. १९७ इ) त्याच्या छापांसहित प्रकाशित केला आहे. या ताम्रपटांत **पांडरंगपल्ली** नामक गांव **अविधेय** नामक राजानें दिल्याचा उल्लेख आहे म्हणून त्याला पाण्डरंगपल्ली ताम्रपट नांव मिळालें आहे. तिसरा ताम्रपट पोर्तुगाल गोव्यांतील सिरोदा या गांवीं सांपडला आहे; तो रा. ब. कृष्णमाचार्लू यांनीं एपिग्राफिया इंडिका (पु. २४, पृ. १४३ इ.) मध्यें प्रसिद्ध केला आहे यांत **देवराज** नामक राजानें कांहीं गांव दिल्याचा निर्देश आहे. प्राप्तिस्थानावरून यास सिरोदा ताम्रपट म्हणतात. या तीन ताम्रपटांवरून आपणांस या राजाची खालील वंशावळ तयार करतां येते–

---

* संमेलन ३१ वें. श. १८६६–१९४४.



उंडिकवाटिका ताम्रपटांत या वंशाला राष्ट्रकूट असें स्पष्ट म्हटलें आहे. **पांडरंगपल्ली** ताम्रपटांत या वंशाचें नांव आलें नाहीं. सिरोदा ताम्रपटांत '**चंद्रपुराद् गोमिनां देवराजवचनात्**' असा आरंभींच निर्देश आला आहे. याचे दोन अर्थ संभवतात. 'गोमिनां याचा संबंध 'चंद्रपुरात्' याशीं लावल्यास गोमींच्या चंद्रपुराहून असा अर्थ होईल; 'देवराजवचनात्' याच्याशीं तें पद जोडलें तर देवराज हा गोमिवंशांत उत्पन्न झाला होता असा अर्थ निघेल. हा सिरोदा ताम्रपट सर्वांत अगोदरचा असल्यानें त्यावेळीं या वंशाचें नांव '**गोमिन्**' असून पुढें तें **राष्ट्रकूट** झालें असण्याचाही संभव आहे. राष्ट्रकूटांच्या कांहीं ताम्रपटांत त्या वंशाचें '**तुङ्ग**' असें नांव आलें आहे. 'गोमिन्' व 'तुङ्ग' या दोन्ही नांवांचा अर्थ 'पूज्य', 'महनीय' असा होतो. तें कसेंही असलें तरी देवराज नृपतीच्या तीनही ताम्रपटांतील वर्णनांत विशिष्ट साम्य असल्यानें तो **राष्ट्रकूट** वंशांतील होता यांत संशय नाहीं.

या ताम्रपटांत कोणत्याही शकाचा उपयोग केलेला नाहीं. दोन ताम्रपटांत त्या त्या राजांच्या राज्यारंभापासूनचीं वर्षे दिलीं आहेत. तिसऱ्या ताम्रपटांत तर तसाही निर्देश नाहीं. त्यामुळें या राजांचा काळ ताम्रपटांच्या अक्षरवटिकेवरून ठरविला पाहिजे. तीनही ताम्रपटांच्या संपादकांच्या मतें या ताम्रपटांचा काळ चौथे–पांचवें शतक हा असावा.

आतां हे राजे कोठें राज्य करीत होते याचा विचार करूं. डॉ. भाऊ दाजींना उंडिकवाटिका ताम्रपट नक्की कोठें मिळाला तें माहीत नाहीं; पण तो मुंबई प्रांतांतच कोठेंतरी सांपडला असावा. इतर दोन ताम्रपट तर कोल्हापूर संस्थान व गोवें प्रांत यांत मिळाले आहेत. यामुळें हें घराणें **दक्षिण महाराष्ट्रांत** राज्य करीत होतें असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. पाण्डरंगपल्ली ताम्रपटांत या वंशाचा मूळ पुरुष **मानाङ्क** याला '**श्रीमत्कुन्तलानां प्रशासिता**' असें म्हटलें आहे. डॉ. कृष्ण यांनीं या ठिकाणीं 'सात्कुन्त धरा नः प्र ई सिता' असें कांहींतरी वाचून व सात्कुन्त

* देवराजाच्या ह्या आजवर अज्ञात असलेल्या थोरल्या पुत्राचें नांव आतां ज्ञात झालें आहे. तें नांव माणराज=विभुराज हें होय. पहा–डॉ. मो. गं. दीक्षित संपादित 'महाराष्ट्रांतील कांहीं प्राचीन ताम्रपट व शिलालेख' भा. इ. सं. मं. स्वी. ग्रं. क्र. ६७ पृ. ५-६

म्हणजे सातपुडा असा शोध लावून हें घराणें वऱ्हाड–मध्यप्रांतांत राज्य करीत होतें असें म्हटलें आहे, तें चूक आहे. वर दिलेल्या शुद्ध वाचनावरून **मानाङ्क** हा **कुन्तल** देशावर राज्य करीत होता. यांत संशय नाहीं. कुन्तल देशांत **कृष्णा नदीचें** खोरें व त्याच्या दक्षिणेचा **कर्नाटक** प्रदेश याचा समावेश होत असे. ' विख्यातकृष्ण-वर्णे तैलस्नेहोपलब्धसरलत्वे । कुन्तलविषये नितरां विराजते मल्लिकामोदः ॥ ' हा उत्तर चालुक्यांच्या नीलगुंद ताम्रपटांत तैलपाचा नातु **जयसिंह** ऊर्फ **मल्लिकामोद** याविषयीं आलेला श्लेषपूर्ण सुंदर श्लोक पहा. यांत कुन्तलदेशांत **कृष्णवर्णा** किंवा **कृष्णा** ही प्रसिद्ध नदी वाहते, असा स्पष्ट निर्देश आहे. पाण्डरंगपल्ली ताम्रपटांत अने नदीच्या तीरावर **काम्यक** व **जावल** या वाड्यांसहित **पांडरंगपल्ली** गांव दिला असल्याचा निर्देश आहे. डॉ. कृष्ण यांना नदीचें नांव व गांवांचीं नांवें बरोबर रीतीनें वाचतां आलीं नाहींत. यांतील **अने** नदी ही कृष्णा नदीस मिळणारी **येण्णा** किंवा **वेणा** नदी असावी. **जावल** तर **जावळीचें** प्राचीन रूप दिसतें. **काम्यक** गांव जवळपास सांपडतें काय पाहिलें पाहिजे. तथापि एवढ्या निर्देशावरून **सातारा** जिल्हा राष्ट्रकूट नृपति मानाङ्काच्या राज्यांत अन्तर्भूत होता हें दिसून येईल.

उंडिकावाटिका ताम्रपटांत मानाङ्काचा पणतू **अभिमन्यु** हा **मानपुरीं** असतांना त्यानें तें दान केलें असें म्हटलें आहे. हें **मानपुर मानाङ्क** राजानें आपल्या नांवें स्थापून राजधानी केलेलें दिसतें व तें कित्येक पिढ्या या वंशाची राजधानी होतें. त्यामुळें या राष्ट्रकूटांस **मानपूरचे राष्ट्रकूट** म्हणण्यास हरकत नाहीं. हें **मानपुर** सातारा जिल्ह्यांतील **माणगंगा** नदीच्या तीरावरील **माण-**गांव असावें. या ताम्रपटांत **अभिमन्यु** राजानें **पेठपंगरकच्या 'दक्षिण शिव'** देवास **उंडिकवाटिका** गांव दिल्याचा निर्देश आहे. डॉ. फ्लीटनें हें दक्षिण शिवाचें देवालय मध्यप्रांताच्या होशंगाबाद जिल्ह्यांतील महादेव-पर्वतराजीवरील प्राचीन देवालय असावें असें म्हटलें होतें, पण तेंही बरोबर दिसत नाहीं या ताम्रपटाचें नक्की प्राप्तिस्थान माहीत नसल्यानें डॉ. फ्लीटला त्यांत निर्दिष्ट केलेल्या स्थळांचा बरोबर पत्ता लागला नव्हता. महादेवाच्या देवळाकरितां इतकें दूर जावयास नको. सातारा जिल्ह्यांत सह्याद्रीच्या शिखरांवर अनेक ठिकाणीं प्राचीन काळापासून पवित्र गणलेलीं शिवालयें आहेत. त्यांपैकींच हें एक असावें. **पेठ पंगरकाचा** नक्की पत्ता अद्यापि लागला नाहीं.

शिरोदा ताम्रपटांत जीं गांवें निर्दिष्ट केलीं आहेत तीं **गोवेंसाष्टी** या भागांत सांपडतांत असें त्या ताम्रपटाच्या संपादकांचें ह्मणणें आहे.

वरील विवेचनावरून हा प्राचीन राष्ट्रकूट वंश इ. स. च्या चौथ्या शतकांत **सातारा** जिल्ह्यांतील **मानपूर** या गांवीं राज्य करीत होता. त्याच्या अंमलाखालीं **दक्षिणकोंकण** व कृष्णा नदीच्या दक्षिणेचा **महाराष्ट्र** व **कर्णाटक** प्रांत हा

मुलूख होता व त्याला **कुन्तलाधिपति** म्हणत असत हें दिसून येईल. आतां या वंशाविषयीं आणखी काय माहिती मिळते तें पाहूं.

इ. स. च्या चौथ्या पांचव्या शतकांत **उत्तर कोंकण, दक्षिण गुजराथ** व **उत्तर महाराष्ट्र** या प्रांतांत प्रथम **आभीर** व नंतर **त्रैकूटक** वंशाचें राज्य होतें. **विदर्भप्रांत वाकाटकांच्या** अंमलाखालीं होता. वाकाटक साम्राज्याचा संस्थापक प्रथम **प्रवरसेन** याच्या अंमलाखालीं **नर्मदा** व **तुंगभद्रा** या नद्यांमधील दक्षिण हिंदुस्थानांतील मध्यभागचा विस्तृत प्रदेश होता असें दिसतें. प्रवरसेनाच्या निधनानंतर त्याच्या चार मुलांमध्यें त्याच्या साम्राज्याची वाटणी झाली असें पुराणांतील उल्लेखांवरून दिसतें. ज्येष्ठ पातीची राजधानी प्रथम नागपूरजवळचें **नन्दिवर्धन** व नंतर **प्रवरपुर** होती व तिच्या अंमलाखालीं **उत्तरविदर्भ प्रांत** होता. त्यानंतर दुसऱ्या मुलाची राजधानी **वत्सगुल्म** (सध्यांचें अकोला जिल्ह्यांतील **वाशीम**) असून त्याचें राज्य **दक्षिण विदर्भ** प्रांतावर पसरलें होतें. त्यानंतरच्या दोन मुलांमध्यें **गोदावरीच्या दक्षिणेचा** मुलुख असावा. पहिल्या दोन मुलांच्या वंशजांचे शिलालेख व ताम्रपट अनुक्रमें **उत्तर** व **दक्षिण** विदर्भांत (यांत **मध्यप्रांताच्या** व **हैद्राबाद संस्थानच्या मराठी जिल्ह्यांचाही** समावेश होतो) सांपडले आहेत. पण बाकीच्या दोन मुलांचे लेख कोठेही अद्यापि सांपडले नाहींत. कदाचित् या दोन मुलांचें राज्य लौकरच नष्ट झालें असावें व त्याचें मुख्य कारण या मानपुरच्या राष्ट्रकूट घराण्याचा उदय हें असावें असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

पांडरंगपल्ली ताम्रपटांत मानाङ्क राजानें **अश्मक** व **विदर्भ** प्रांत जिंकले होते, असा उल्लेख आहे. **अजंठ्याच्या** १६ नं. च्या **लेण्यांतील** लेखांत प्रवरसेनाचा नातू **विन्ध्यसेन** यानें **कुन्तलाधिपतीचा** पराभव केला होता असें वर्णन आलें आहे. मानपुरचे राष्ट्रकूट व वत्सगुल्माचे वाकाटक यांचीं राज्यें परस्परांस लागून होतीं तेव्हां त्यांच्यामध्यें असें खटक्याचें प्रसंग वरचेवर उद्भवत असले तर आश्चर्य नाहीं. एखादी लढाई अनिर्णीत राहिली म्हणजे दोन्ही पक्ष विजयावर हक्क सांगतात तसें याही प्रसंगीं झालें असल्यास मानाङ्क व विन्ध्यसेन हे समकालीन ठरतील. **विन्ध्यसेनाचा काल** अदमासें इ. स. ३६० ते ४०० असा ठरविला आहे तोच मानाङ्काचा मानल्यास हें राष्ट्रकूट घराणें इ. स. च्या चौथ्या शतकाच्या अखेरीस उदयास आलें असें म्हणतां येईल.

मानाङ्काचा मुलगा **देवराज** हा पांचव्या शतकाच्या आरंभीं गादीवर आला. त्यावेळीं उत्तर हिंदुस्थानांत **द्वितीयचंद्रगुप्त–विक्रमादित्य** याचें विशाल साम्राज्य होतें. याची मुलगी **प्रभावतीगुप्ता** वाकाटकांच्या ज्येष्ठ पातीच्या **द्वितीय**

रुद्रसेन नामक राजास दिली होती. लग्न झाल्यावर तो लौकरच कालवश झाल्यानें प्रभावतीगुप्ता आपल्या अल्पवयस्क मुलाच्या नांवानें राज्यकारभार पहात असे. तिला मदत करण्याकरितां चंद्रगुप्तानें आपले विश्वासू अधिकारी व मुत्सद्दी विदर्भांत पाठविले होते. या प्रसंगानें कविकुलगुरु **कालिदास** हाही नन्दिवर्धनगांवीं आला होता व त्यानें राजधानीजवळच्या **रामगिरीवर** आपलें सुंदर मेघदूत काव्य रचलें हें मीं इतरत्र दाखविलें आहे. या **कालिदासाला कुन्तलेशाच्या दरबारीं वकील** म्हणून पाठविलें होतें असें **भोजाचा शृंगारप्रकाश, राजशेखराची काव्यमीमांसा, क्षेमेन्द्राची औचित्यविचारचर्चा** इत्यादि संस्कृत ग्रंथांतील निर्देशावरून दिसतें. **उज्जैनीस** परत गेल्यावर **कुन्तलेश** काय करतो. असें चन्द्रगुप्तानें विचारतांच कालिदासानें त्याला खालील श्लोकांत उत्तर दिलें --

असकलहसितत्वात्क्षालितानीव कान्त्या
मुकुलिननयनत्वाद्व्यक्तकर्णोत्पलानि ।
पिबति मधुसुगन्धीन्याननानि प्रियाणां
त्वयि विनिहितभारः कुन्तलानामधीशः ॥

याचा भावार्थ ' कुन्तलेश, तुझ्यावर, म्हणजे विक्रमादित्यावर, राज्यकारभाराचा भार टाकून स्वतः सुंदर स्त्रियांशीं रममाण होण्यांत काळ घालवित आहे ' असा आहे. विक्रमादित्यानेंही त्याच श्लोकाच्या द्वितीयार्धात थोडा फरक करून

' पिबतु मधुसुगन्धीन्याननानि प्रियाणां
मयि विनिहितभारः कुन्तलानामधीशः ॥

' मजवर राज्याचा भार टाकून कुन्तलेश सुखोपभोगांत रममाण होवो ' असें उत्तर दिलें. हा **कुन्तलेश** कोण याचा बरोबर पत्ता अद्याप लागला नव्हता. वाकाटकांच्या दरबारीं गुप्तांचें प्रस्थ त्या काळीं होतें असा स्पष्ट पुरावा असल्यानें कित्येक संशोधकांनीं वाकाटकांसच कुन्तलेश म्हटलें असावें असें अनुमान केलें होतें व व त्याचाच अनुवाद प्रस्तुत लेखकानें दहा वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या आपल्या 'कालिदास' ग्रंथांत केला होता. पण आतां या मानपूरच्या कुन्तलाधिपति राष्ट्रकूटांचा शोध लागल्यामुळें चन्द्रगुप्ताचा वकील म्हणून कालिदास या राष्ट्रकूटांच्या दरबारीं राहिला असावा असें दिसतें. हा **कुन्तलेश** राष्ट्रकूटवंशी मानाङ्काचा मुलगा देवराज असावा. वर उल्लेखिलेल्या तीनही ताम्रपटांत याला देवराज इंद्राची उपमा दिली आहे कदाचित् इन्द्राप्रमाणें हाही विषयासक्त असावा.

गुप्त सम्राट **द्वितीय चन्द्रगुप्त-विक्रमादित्य** याचा आश्रय वाकाटक व राष्ट्रकूट या दोघांनाही असल्यामुळें या दोन राजवंशांमध्यें स्नेहसंबंध उत्पन्न झाला तर नवल नाहीं. चन्द्रगुप्ताची मुलगी प्रभावतीगुप्ता हिचा नातू वाकाटक नृपति **नरेन्द्रसेन**

याचा विवाह कुन्तलाधिपतीची कन्या **अज्झितभट्टारिका** हिच्याशीं झाल्याचें वाकाटकांच्या ताम्रपटावरून दिसतें. तीही मानपूरच्या राष्ट्रकूट वंशांतली असावी. याप्रमाणें महाराष्ट्राच्या या दोन राजवंशांत प्रेम व संबंध कांहीं काळपर्यंत तरी वाढत गेले असावे.

यानंतर वत्सगुल्माधिपति वाकाटकनृपति **हरिषेण** हा उदयास आला. हा मोठा महत्वाकांक्षी व बलाढ्य राजा होऊन गेला. यानें पूर्वेस दक्षिण कोसल, आन्ध्र व कलिंग; उत्तरेस अवन्ति, पश्चिमेस लाट व त्रिकूट या देशांवर ही स्वाऱ्या केल्या होत्या. यानें कुन्तल देशावर स्वारी करून त्याच्या राजाचा पराजय केल्याचा उल्लेख अजंठ्याच्या लेखांत आहे.

तथापि या पराजयामुळें हें राष्ट्रकूट घराणें नामशेष झालेलें दिसत नाहीं. उलट हरिषेणानंतर वाकाटकवंशाची इतिश्री झाल्यामुळें त्याचें सामर्थ्य वाढलें असावें. बेळगांव जिल्ह्यांतील **गोकाक** या गांवीं राष्ट्रकूटनृपति **देज्जमहाराज** याच्या काळचा एक ताम्रपट सांपडला आहे. त्यांतील उल्लेखावरून तो, इ. स. ५३२–३३ या वर्षी दिला असावा. (एपिग्राफिया इंडिका पु. २१ पृ. २८९ पहा.) हा **देज्जमहाराज** उपरिनिर्दिष्ट **अभिमन्यूचा** वंशज दिसतो. तसेंच कांहीं वर्षांपूर्वी श्री. य. रा. गुप्ते यांस सातारा जिल्ह्यांतील खानापुरास एक अपूर्ण ताम्रपट मिळाला होता. त्यावर त्यांनीं मंडळांत वाचलेलें टिप्पण मंडळाच्या त्रैमासिकांत (पु. ८, पृ. १६३) छापलें आहे. या ताम्रपटाचा पहिला पत्रा अद्यापि न मिळाल्यामुळें तो कोणत्या राजवंशाचा हें सांगतां येत नाहीं. तथापि अक्षरवटिकेवरून तो इ. स. च्या सहाव्या शतकांतील असावा असें श्री. गुप्ते यांचें मत आहे. या ताम्रपटांत **माधववर्म्यानें** दोन ब्राह्मणांच्या **कृष्णवेण्णाच्या** आग्नेय-दक्षिण दिशेस असलेलें **रेट्टूरक** गांव दान दिल्याचा उल्लेख आहे. हें रेट्टूरक **रेठरें बुद्रुक** असून तें निर्दिष्ट दिशेस आहे हें श्री. गुप्ते यांनीं दाखविलें आहे. हा **माधववर्मन्** कोणत्या वंशांतील याचा अद्यापपर्यंत पत्ता लागला नव्हता. पण राष्ट्रकूटांच्या त्याच काळाच्या व सातारा–कोल्हापूर–गोवा या भागांत सांपडलेल्या उपरिनिर्दिष्ट तीन ताम्रपटांवरून तो **राष्ट्रकूटच** असावा असें अनुमान करण्यास हरकत दिसत नाहीं.

माधववर्म्यानंतरच्या राष्ट्रकूटांचा पत्ता लागला नाहीं. तथापि सुप्रसिद्ध चालुक्य सम्राट् द्वितीय **पुलकेशी** यानें आपल्या चुलत्याचा पराभव करून **बदामीची** गादी हस्तगत केली. त्या वेळीं चालुक्यांच्या राज्यांत सर्वत्र बंडाळी माजली होती. त्या आणीबाणीच्या प्रसंगाचा फायदा घेऊन **आप्पायिक** व **गोविंद** या दोन राजांनीं **भीमरथी उर्फ भीमा नदीच्या** उत्तरेच्या प्रदेशावर स्वारी केली होती.

त्यांपैकीं गोविंदाला आपल्या बाजूला वळवून पुलकेशीनें आप्यायिकाचा पराभव केला असें इ. स. ६३४ च्या **ऐहोळे ताम्रपटांत** ह्मटलें आहे. हा **गोविंद राष्ट्रकूट** असावा असें डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकरांनीं अनुमान केलें होतें. कारण राष्ट्रकूटवंशांत गोविंद् नांवाचे चार पांच राजे होऊन गेले. महाराष्ट्रांत इ. स. च्या चौथ्या ते सहाव्या शतकापर्यंत राष्ट्रकूट राजे राज्य करीत होते याविषयीं पुरावा डॉ. भांडारकरांच्या वेळीं मुळींच उपलब्ध नव्हता. पण त्यानंतर प्रकाशित झालेल्या लेखांवरून डॉ. भांडारकरांचें अनुमान बरोबर ठरत आहे.

ऐहोळे ताम्रपटांत पुढें ह्मटलें आहे कीं या **गोविंदाला पुलकेशीवर** केलेल्या उपकाराचें फळ लागलीच मिळालें. तें कसें तें **रविकीर्ति** कवीनें त्या लेखांत सांगितलें नाहीं. कदाचित् **आप्यायिकाचा** पराभव करून मिळालेल्या लुटीचा किंवा प्रदेशाचा कांहीं भाग पुलकेशीनें गोविंदास दिला असावा. पण त्याच्या वंशजाना पुलकेशीनें दाक्षिण महाराष्ट्रांत राज्य करूं दिलेलें दिसत नाहीं. कारण पुलकेशीच्या **विष्णुवर्धन** नामक भावाचा **सातान्यास** एक ताम्रपट मिळाला आहे, त्यांत **भीमाकांठचें** गांव दान दिल्याचा उल्लेख आहे. त्यावरून **पुलकेशीनें दक्षिण महाराष्ट्र** आपल्या साम्राज्यांत अंतर्भूत केला होता असें स्पष्ट दिसतें.

यानंतर **राष्ट्रकूट** राजे **वऱ्हाडांत** राज्य करतांना दिसतात. त्यांची राजधानी **अचलपूर** (वऱ्हाडच्या उमरावती जिल्ह्यांतील **एलिचपूर**) या नांवानें अद्यापि विद्यमान आहे मध्यप्रांताच्या बेतूल जिल्ह्यांत **तिवरखेड** येथें राष्ट्रकूटवंशी **नन्दराजाचा** इ. स. ६३१ चा एक ताम्रपट मिळाला आहे; त्यावरून तो इ. स. ६३० ते ६५० पर्यंत राज्य करीत होता असें दिसतें. या ताम्रपटांत **दुर्गराज गोविंदराज – स्वामिकराज – नन्नराज** अशी वंशावळ दिसते. नन्नराजाचा आजा गोविंदराज हा इ. स. ५९० ते ६१० पर्यंत राज्य करीत असावा. तेव्हां हा गोविंदराज पुलकेशीचा समकालीन होता यांत संशय नाहीं. तो व ऐहोळे लेखांत उल्लेखिलेला पुलकेशीचा सहाय्यक गोविंद हे एकच असावे. यावरून सहज कल्पना येते कीं **पुलकेशीनें गोविंदास** किंवा त्याच्या मुलास **विदर्भाचें राज्य** दिलें असावें. पुलकेशीच्या कारकीर्दीच्या आरंभीं उत्तर कोंकण, विदर्भ व गुजराथ या प्रांतावर **कलचूरींचें** साम्राज्य होतें. कलचूरि नृप **बुद्धराज** याचा पराभव करून पुलकेशीनें हे प्रांत आपल्या राज्यास जोडले. त्यामुळें तो त्या तीन महाराष्ट्रांचा अधिपति झाला; असें ऐहोळे लेखांत म्हटलें आहे. आपल्या विस्तृत साम्राज्यांतील प्रांतांवर त्यानें आपलें नातेवाईक व विश्वासु सरदार प्रांताधिपति म्हणून नेमलेले दिसतात. तेव्हां आपल्यावर उपकार करणाऱ्या राष्ट्रकूटवंशी गोविंदराजास किंवा त्याच्या

स्वामिराज नामक मुलास विदर्भाचें संपन्न राज्य आपला मांडलिक म्हणून पुलकेशीनें दिलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

यानंतरचा राष्ट्रकूट वंशाचा सविस्तर इतिहास डॉ. अळतेकर यांनीं आपल्या पुस्तकांत दिला आहे. राष्ट्रकूटांच्या पूर्वपीठिकेविषयीं माहिती त्यांच्या पुस्तकांत साधनाभावीं दिली नव्हती, ती उणीव भरून काढण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखांत केला आहे.

---

२ नांदगांव येथील कृष्णदेव यादवाच्या काळचा शक ११७७ चा शिलालेख

(महामहोपाध्याय प्रिन्सिपाल वा. वि. मिराशी)

हा* शिलालेख प्रथम कै. रायबहादूर हिरालाल यांनीं प्रकाशांत आणला. ' मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील कोरीव लेखांची यादी ' या त्यांच्या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तींत या लेखाचा अंतर्भाव केला आहे. पण त्याची माहिती त्यांनीं अत्यंत संक्षेपानें दिली आहे. कांहीं वर्षांपूर्वी हिंदुस्थान सरकारचे गव्हर्मेंट एपिग्राफिस्ट डॉ. छाबरा यांनीं या लेखाचा छाप घेऊन मजकडे वाचनार्थ पाठविला. यादव घराण्याविषयीं महाराष्ट्रास जिव्हाळा वाटत असल्यामुळें त्यावरील टिप्पण मंडळाच्या वार्षिक संमेलनाच्या प्रसंगीं वाचीत आहें.

नांदगांव हें खेडें वऱ्हाडांत अमरावतीच्या ईशान्येस २० मैलांवर वसलें आहे. गांवाबाहेर एका टेकडीवर **खंडेश्वर,** देवी व नरसिंह या तीन देवतांचें मिळून एक समान सभामंडप असलेलें देवालय आहे. या देवालयाच्या बाहेरच्या भिंतीवर प्रस्तुत शिलालेख कोरला आहे. उमरावती जिल्हा गॅझेटियरमध्यें या देवळाचें संक्षिप्त वर्णन दिलें आहे. हें देऊळ हेमाडपंती आहे असें म्हणतात. म्हणजे रामदेवराव यादव नृपतीचा प्रधान हेमाद्रि किंवा हेमाडपंत यानें प्रचलित केलेल्या शिल्पपद्धतीचें तें आहे अशी लोकांची समजूत आहे, पण गॅझेटियरमधील लेखकाच्या मतें तें फार तर दोनशें वर्षांचें जुनें असावें. या प्रश्नाचा पुढें विचार करूं.

प्रस्तुत लेख सहा ओळींचा असून त्यानें २ फूट ५ इं. रुंद व ९ इं. उंच इतकी जागा व्यापिली आहे. ज्या दगडावर हा लेख कोरला आहे तो प्रथम गुळगुळीत केला नव्हता. शिवाय आज कित्येक शतकें उन्हापावसांत असल्यामुळें तो बराच खराब

---

* संमेलन ३४ श. १८६९-१९४७.

झाला आहे. कांहीं अक्षरें निश्चितपणें वाचतां येत नाहींत. तथापि एकंदरींत लेखां-तील मजकुराविषयीं संशय राहत नाहीं.

लेखाच्या आरंभींचा भाग संस्कृतांत असून नंतरचा मराठींत आहे. भाषेच्या बाबतींत लक्षांत ठेवावयाची गोष्ट म्हणजे 'ख' बद्दल 'ष' चा उपयोग केला आहे. उदाहरणार्थ लाषोलीए (लाखोलीए) पहा. ही पद्धत यादवकालीन इतर लेखांतही आढळते. **रामटेकचा रामदेवराव** यादवाच्या काळचा शिलालेख (सरदेसाई स्मारकग्रंथ, पृ. ११५-१३४) पहा. तसेंच 'वडवा' या शब्दाचा उपयोगही पाहाण्यासारखा आहे. सध्यां बडवा याचा अर्थ देवळांतील पुजारी असा आहे. पण यादवकालीं त्याला यापेक्षां व्यापक अर्थ असे. **पुरुषोत्तमपुरी** येथें सांपडलेल्या रामदेवरावाच्या काळच्या ताम्रपटांत 'फुलवडुए' हा शब्द राजाचा 'पुष्परचनाध्यक्ष' या अर्थी आला आहे. हा शब्द महानुभावांच्या शिशुपालवध या ग्रंथांतहि आढळतो.

प्रस्तुत लेख श्रीमत्प्रौढप्रतापचक्रवर्ती **श्रीकान्हिरदेव** याच्या काळचा आहे. या राजाच्या वंशाचा यांत निर्देश नाहीं. तथापि 'प्रौढ प्रताप चक्रवर्ती' हें बिरुद प्राचीनकाळीं यादववंशी राजांनींच धारण केलें होतें. तेव्हा हा लेख **देवगिरीच्या कृष्णदेवराव यादवाच्या** काळचा आहे यांत शंका नाहीं. कान्हिर हे 'कृष्ण' या संस्कृत नांवाचें अपभ्रष्ट रूप आहे. या नांवाचे कान्हर, कान्ह, कन्हार, कन्धार असे इतरही अप-भ्रंश कोरीव लेखांत येतात. प्रस्तुत लेख शक ११७७ आनंद संवत्सरीं कोरला होता. या लेखांत महिना, तिथि, वार किंवा नक्षत्र दिलें नसल्यामुळें या कालाचा पडताळा पाहणें शक्य नाहीं. तथापि वर्तमान शक ११७७ ला आनंद संवत्सर येतो. यावरून या लेखाच्या प्रमाणतेविषयीं संशय राहत नाहीं. सामान्यतः कोरीव लेखांत शकवर्ष गत व संवत्सर वर्तमान असतात. प्रस्तुत लेखांत दोन्ही वर्तमान आहेत, हें विशेष आहे. या शकवर्षी ख्रिस्ती शकाचें वर्ष १२५५-५६ हें येतें. यावरून हा लेख जवळ जवळ सातशें वर्षांपूर्वीचा आहे हें दिसून येईल.

सन १२५५-५६ हें वर्ष **कृष्णदेव यादवाच्या** कारकीर्दींत पडतें. कोरीव लेखांवरून या राजानें इ. स. १२४७ पासून १२६० पर्यंत राज्य केलें, असें आतां निश्चित झालें आहे. या राजाचा दुसरा एक लेख चांदा जिल्ह्यांतील **मार्कंडी** या गांवीं आहे व तो डॉ. यशवंत खुशाल देशपांडे यांनीं मंडळाच्या त्रैमासिकांत छापला आहे. यादव राजे हे मूळचे देवगिरीचे. तथापि त्यांनीं कृष्णदेवाचा आजा **सिंघण** याच्या कारकीर्दींतच वऱ्हाड जिंकून आपल्या राज्याला जोडला होता. बुलढाणा जिल्ह्यांतील **अंबडापूर** येथें सिंघणाच्या काळचा एक शिलालेख आहे तो मीं एपिग्राफिया इंडिका (पुस्तक

२१, पृ. १२७-२८) मध्यें छापला आहे. सिंघणाचा सेनापति **खोलेश्वर** हा आपल्या **आंबे**गांवच्या शिलालेखांत **वरदा** (वर्धा) व **पयोष्णी** (पूर्णा) या नद्यांच्या तीरावर अग्रहार दिल्याचें व देवळें बांधल्याचें सांगतो. मागें उल्लेखिलेल्या पुरुषोत्तमपुरी ताम्रपटांत कृष्णदेवानें **कोसल** देशाच्या (म्हणजे सध्यांच्या छत्तीसगडच्या) राजास त्रस्त केल्याचें वर्णन आहे. तेव्हां कृष्णाच्या काळचे लेख मध्यप्रांत वऱ्हाडच्या उमरावती व चांदा जिल्ह्यांत सांपडले तर त्यांत आश्चर्य नाहीं.

या लेखाचा उद्देश कांहीं लोकांनीं **खंडेश्वराच्या** देवळांत लाखोली किंवा लक्ष फुलें देवाला वाहाण्याकरितां गद्याण नामक नाणीं दिलीं हें नमूद करण्याचा आहे. यांत दहा लोकांचीं नांवें आलीं आहेत. पैकीं पहिल्या नऊ जणांनीं एका लाखोलीकरितां व दहाव्यानें दोन लाखोलींकरितां व्यवस्था केली होती.

गद्याण किंवा गदियाण हें लहानसें सोन्याचें नाणें महाराष्ट्रांत प्रचलित होतें. शक ९३० च्या **खारेपाटण**च्या लेखांत परदेशाहून येणाऱ्या प्रत्येक जहाजावर एक सुवर्ण गद्याण शुल्क किंवा कस्टम् डयूटी म्हणून शिलाहारवंश **रट्ट** राजानें **शैव** आचार्यास दान दिल्याचा उल्लेख आहे. किट्टेल साहेबास कर्नाटकांत बेल्लारी व मैसूर येथें एक फार्दिंगच्या वजनाचीं सोन्याचीं नाणीं प्रचलित असलेलीं दिसलीं. तीं येथें विवाक्षित असावीं. भास्कराचार्यांच्या लीलावतींत गद्यानकाचें वजन पुढीलप्रमाणें दिलें आहे.

तुल्या यवाभ्यां कथितात्र गुञ्जा वल्लस्त्रिगुञ्जो धरणञ्च तेऽष्टौ ।
गद्यानकस्तद्द्वयमिन्द्रतुल्यैर्वल्लैस्तथैको धटकः प्रदिष्टः ॥

यावरून गद्याणक हें ४८ गुंजा वजनाचें किंवा अधेलीच्या वजनाचें सोन्याचें नाणें होतें हें दिसून येईल.

प्राचीन काळीं देवतांच्या पूजेनिमित्त अशी व्यवस्था करण्याची पद्धत होती. **पंढरपूरच्या चौऱ्यायशी**च्या लेखांत अशा प्रकारें फुलें, तुळशी, वगैरे करितां गद्याण दिल्याचा उल्लेख आहे. हे पैसे कोणा स्थानिक पेढीवर ठेवून त्याच्या व्याजांतून फुलादिकांची व्यवस्था केली जात असे, असें चौऱ्यायशीच्या लेखावरून दिसतें.

प्रस्तुत लेखावरून नांदगांवचें देवालय यादवकालीन आहे हें दिसून येईल. तें हेमाडपंती पद्धतीचें आहे. या शिल्पपद्धतींत मोठमोठ्या दगडांचा उपयोग चुन्याशिवाय केलेला असतो. हेमाद्रिपंडितानें लंकेहून ही शिल्पपद्धती व मोडी लिपी आणिली अशी आख्यायिका आहे. तथापि प्रस्तुत लेखावरून ती शिल्पपद्धती हेमाद्रीनें प्रथम प्रचालित केली असें दिसत नाहीं. कारण तो कृष्णदेवाचा बंधु **महादेव** याच्या काळीं उदयास आला. तो महादेव व रामदेवराव यांचा प्रधानमंत्री होता. त्याच्या अगोदरच ही शिल्पपद्धती प्रचलित होती असें दिसून येईल.

शिलालेखाचें वाचन

ओळ

१ ओं स्वस्ति [:*] श्री सकु ११७७ आनंदसंवत्सरे अद्येह श्रीमत्प्रौढप्रतापचक्रवर्ति श्रीका–

२ न्हिरदेवविजयराज्ये तत्पादपद्मोपजीवी समस्तभरभारनिरूपित श्रीपांचो–

३ लिनि.....तन्निरूपिवितद्रवीडी वडवो श्रीसोमदेवदत्त लाषौलिए ग वडउ पं १॥

४ डितें दत्त लाषौए ग १ [।*] आसुगिनायकें दत्त लाषौलीए[1] ग १ [।*] ढों

५ ढिए दत्त लाषौलिए ग १ [।*] भोपतिनायकें दत्त लाषौए ग [।*] धनैएं दत्त लाषौलिए ग १ [।*]

६ [ना] गैएं [द] त्त लाषौए ग [।*] प्रति (?) श्रीठाकुरें दत्त लाषौलिए ग १ [।*] ढोढडदाऊ दत्त द्वि लाषौए [।*]

---

३ हिंगणगांव (जखणगांव) येथील शिलालेख

श्री. सर. गं. ना. मुजूमदार, पुणें

जिल्हा अहमदनगर, ता. नगर पैकीं मौजे **हिंगणगांव**–जखणगांव हें गांव अहमदनगरपासून पश्चिमेस सुमारें सात मैलांवर आहे. येथें **सोमेश्वर** महादेवाचें एक देवालय व बारव आहे. या दोन्ही जागीं शिलालेख आहेत. ते पुढें दिले आहेत. अहमदनगरच्या गॅझेटीयरमध्यें या शिलालेखांचा उल्लेख नाहीं व इतरत्रहि आढळले नाहींत. म्हणून ते आपणापुढें मांडीत आहे. ग्वाल्हेर दरबारीं **मुळे** हे एक सरदार होते. त्यांचें मूळ गांव हिंगणगांव हें होतें. म्हणून तेथेंच त्यांनीं आपलीं स्मारकें या देवालय व बारव रूपानें करून ठेवलेलीं आहेत. या मुळे–घराण्याचा एक मोठा वाडा होता परंतु तो हल्लीं अगदीं पडीक आहे.

{ शक १६८९ श्रावण शु. ५
{ इ. स. १७६७ जुलै ३१

(१) सोमेश्वर देवालयावरील शिलालेख

श्रीसोमेश्वरचरणी तत्पर वि (–)
ठल हरि मुळे मौजे हिंगणगांव
जखणगांव निरंतर शक १६८९
श्रावणशुद्ध ५ समाप्तमस्तु
सण ११७७

---

१ लाखोली (लक्ष फुलां) करितां गद्यानक १. याप्रमाणें पुढेंही समजावें.

(२) बारवेवरील शिलालेख

{ श. १६६४ मार्ग. शु, ७
{ इ. १७४२ नोव्हें. २३

श्रीसिद्धेश्वर चरणी तत्प
र वीठल हरी मुळे मौजे हीं
गणगांव सके १६६४ नंदन
नामसंवत्सरे मार्गेश्वर शुद्ध
७ तद्दीन वापी समाप्त ११५२

ह्या लेखांत आलेल्या कालोल्लेखाविषयीं प्रश्न आहे. १६६४ शकाला दुंदुभि हें नांव येतें. पण लेखांत नंदन दिलें आहे. दोन्ही संवत्सरनामांत तीस वर्षांचें अंतर आहे. लेखाच्या शेवटीं ११५२ हा आंकडा दिला आहे. तो फसलीचा मानल्यास शक १६६४ हा आंकडा बरोबर जमतो. येथें फसली व शकांक जमेस धरून हा काल दिला आहे.

या लेखावरून प्रथम बारव व नंतर सोमेश्वर देवालय हीं बांधलीं हें उघड आहे. बारव ही यांच्या इनाम जमिनींत आहे[1].

---

४ घर, दार व खटलें

[श्री. गोविंद कृष्ण मोडक, पुणें.]

हे वरील तीन शब्द आपण वारंवार योजितों. यांच्या व्युत्पत्तीचा विचार पुढें केला आहे[2].

घर—हा शब्द संस्कृत गृह-वरून आला आहे. गृह हा शब्द ग्रह्-पासून निघाला असावा. ग्रह-'घेणें' यावरून 'अनेक वस्तू आपणांमध्यें घेतें तें' गृह असा अर्थ निष्पन्न होतो. गृह-चें रूपांतर घर असेंही संस्कृतांत आढळतें. घर हा शब्द अपभ्रंशांत सर्रहा गृह या अर्थी योजितात. यावरून संस्कृतांत त्याचा प्रवेश प्राकृतां-तून झाला असावा. या संबंधांत लक्षणीय कीं संस्कृतांत गृह न. लिं. आहे; तर घर हा कोशांत पुल्लिंगी आढळतो (आपटे कोश).

---

१ संमेलन ३४ वें. श. १८६९-१९४७.
२ वाढदिवस ३२ वा. श. १८६४-१९४२.

दार--हा शब्द **द्वार**-वरून आला आहे. स्वतः**द्वार** हा द्वि-अरर वरून आलेला दिसतो. अरर-चा अर्थ दाराची फळी असा आहे. अर्थात् द्वार हा शब्द मूलतः 'दोन बाजूंस असलेल्या फळ्या मिळून बनलेला एक दरवाजा' अशा अर्थानें प्रवृत्त झालेला दिसता. याचें पूर्ण रूप आरंभीं **द्व्ररर** व पुढें **द्वार**, द्वार्, असें झालेलें दिसतें. यांतील द्वार-मधील व्-चा लोप होऊन दार हा मराठींत आला आहे आणि द्-चा लोप होऊन वार अथवा बार, व त्यापासून बारी हा हिंदी शब्द बनलेला दिसतो. मराठी दर-चा मूल अथ (सामान्य) दरवाजा असा होत असून, 'घर-दार' अशा ठिकाणीं म्हणजे पूर्वस्थित घर-च्या साहचर्यानें, घराचा बाह्यभाग, घराचें परूस, परिसर असा होतो. तेव्हां घर-दार या शब्दांचा अर्थ 'घर व त्याच्या भोंवतालचें आवार' असा होतो.

दार असा ही संस्कृतांत शब्द आहे. त्याचा अर्थ **स्त्री** असा आहे. यामुळें येथें पुढील शंकेचा विचार प्राप्त होतो. **शंका**—घर-च्या पुढें योजिलेला दार हा शब्द स्त्रीवाचक समजावा. **उत्तर** (क) तुमचें घरदार कोठें आहे? या प्रश्नांत दार-चा अर्थ स्त्री संभाव्य नाहीं; कारण घरापेक्षां स्त्रीला महत्त्व अधिक असल्यामुळें, येथील प्रश्नांत दार हा शब्द स्त्रीवाचक असल्यास तो प्रथम आला पाहिजे. अर्थात् तसा नसल्यानें त्याचा अर्थ स्त्री असा घेतां येत नाहीं. (ख) पुढील मुलींच्या ओवींत दार-चा अर्थ परूस असाच होतो, हें उघड आहे. ती ओंवी—

नवरा पाहूं आले, काय पाहतां घर- दार।
नवरा आहे प्रथमवर, दादा राया ॥

(ग) घरीं-दारीं कंसाला कृष्णच दिसत होता. यांत दार-चा अर्थ स्त्री असा शक्यच नाहीं. (घ) घर-दार विकणें, घरा-दारावर नांगर फिरणें, इत्यादि शब्दयोगांमध्येंही दारचा अर्थ स्त्री संभवत नाहीं. (ङ) हिंदीमध्यें घर-बार असा शब्द योजितात. यांत बार हा अवयव उघड-उघड द्वार-पासूनच आला आहे. अर्थात् घर-चे पुढें द्वार या अर्थींच बार-चा उपयोग होत असल्यानें, या साम्यानें मराठींतही घरदार यांतील उत्तरावयव द्वार-पासूनच आलेला मानणें योग्य आहे. सारांश, घर-शीं सहचरित दार हा शब्द स्त्रीवाचक दार-तत्सम नसून, तो द्वार-पासून साधलेला आहे.

खटलें—हा शब्द मराठींत स्त्री-वाचक असून न. लिं. आहे. अशीच स्थिति संस्कृतांत कलत्र-ची आहे. म्हणजे लिंग व अर्थ या दोन्हींमध्यें खटलें-चें कलत्र-शीं साम्य आहे. तेव्हां कलत्र हें त्याचें मूळ असेल काय? अशी शंका मनांत येते. या शब्दांच्या रूपांकडे पाहतां हे शब्द जनक-जन्य दिसतात. कलत्र मधील (१) क-चा ख होऊन आणि (२) लत्र यांतील अक्षरांची उलटापालट होऊन आणि (३) इतर किरकोळ विकार होऊन कलत्र-पासून खटलें येणें, व्युत्पत्तिदृष्ट्या नियमा-

नुसारीच आहे. अर्थात् अशा रीतीनें अर्थ, लिंग आणि घटकाक्षरें यांच्या साम्यानें कलत्र-पासून खटलें हा शब्द तद्भव सिद्ध होतो. यांतील रूप-विकारांस पुढील उदाहरणांनीं सशास्त्रता येते. कूट–**खोटें** यांत क-चा ख झाला आहे. उत्-सृप् पासून आलेल्या उसप या शब्दाचें **उपस** हें रूप होण्यांत अक्षर-विपर्यय स्पष्ट आहे. असाच प्रकार प्रस्तुतांतही आहे. सारांश, खटलें हा शब्द कलत्र-वरून साधणें सर्वथा सशास्त्र ठरतें.

खटलें-ची वरील व्युत्पत्ति सुचविल्याबद्दल प्रा. रामभाऊ केळकर यांचा मी आभारी आहें.

---

५ पुरंदरच्या कोळीप्रकरणावर नवा प्रकाश

श्री. वि. सि. चितळे, एम्. ए., बी. टी., टी. डी., (लंडन), पुणें

रा. कृष्णाजीपंत पुरंदरे यांनीं आपलें 'पुरंदरे दप्तर, भाग ३' प्रसिद्ध केल्यापासून पुरंदरच्या कोळ्यांच्या दंग्यासंबंधीं बराच वाद माजला. त्यासंबंधीं लिहितांना श्री. पुरंदरे लिहितात, "बाहेरून क्षुल्लक भासणारें, पण ज्याच्या आंत विशिष्ट कारस्थान खेळत राहिल्यानें जें परिणामाच्या दृष्टीनें महत्त्वाचें गणलें जातें," असें हें प्रकरण आहे (पु. द. ३ प्रस्तावना पान ४१). "पुरंदरच्या कोळ्यांचा दंगा यदृच्छेनें घडला नसून, ती गोष्ट पूर्वसंकेतानुरूप, विवक्षित ध्येय पुढें ठेवूनच सिद्ध झाली असल्यानें हा प्रसंग एक ऐतिहासिक चर्चेचा विषय होऊन बसला आहे." सर्वसाधारणपणें अशी टीका त्यांनीं केली असती तरी हरकत नव्हती; परंतु त्यांच्या या टीकेचा स्पष्ट रोख रघुनाथराव, आबा पुरंदरे व सखाराम बापू यांना उचलून धरून पेशवा माधवराव व त्याचें साहाय्यक यांच्या माथीं राजकारणाचें सर्व खापर फोडण्याचा आहे. असें म्हणण्याचें कारण त्यांच्याच शब्दांत सांगणें योग्य होईल. ते म्हणतात, "आम्हीं आपलें प्रतिपादन ज्या विशिष्ट मुद्याला धरून चालविलें आहे, त्याशीं तर या प्रसंगाचा अगदीं जिव्हाळ्याचा संबंध येऊन पोंचतो...... स्वतः पेशवे शपथपूर्वक या कृत्याशीं आपला संबंध नाहीं, असें म्हणत असतां आम्ही ती गोष्ट राजकारणी समजून पेशव्यानें ही गोष्ट सान्याकरवीं जाणून बुजून केली असें म्हणतों (पु. द. ३ प्रस्ता. पान ४४). तेव्हां रा. पुरंदरे यांचा सर्व रोख माधवराव पेशव्यावर आहे हें ह्यावरून सिद्ध होत आहे. परंतु ही वस्तुस्थिति खरी नसून या प्रकरणीं मुख्य **सूत्रधार रघुनाथराव दादाच** होता व त्यानें आपला 'पुस्तपन्हा कोणास कळो न देता आत येक व बाहेर जाहिराणा एक दर्शविला होता,' असा आमचा दावा आहे. हें कसें तें सांगण्यापूर्वीं पुरंदरच्या कोळी प्रकरणाचा उद्भव कसा झाला हें आपण प्रथम थोडक्यांत पाहूं.

घोडनदीच्या लढाईनंतर माधवराव पेशवा चुलत्याच्या स्वाधीन झाला. तेव्हां आपला पूर्ण विजय झालासें पाहून रघुनाथरावानें आपल्या मदतनिसांस बक्षिसें वाटण्याचा अपूर्व सोहाळा उरकून घेतला. त्यावेळीं दादानें किल्ले **पुरंदर** राजश्री **आबा पुरंदरे** व **सखाराम बापू** यांचे निसबतीस दिला. परंतु ही नवी नेमणूक लोकांस फारशी प्रिय वाटली नाहीं. राक्षसभुवनच्या लढाईनंतर ' आम्हां पेक्षां अधिक जहाले ' असा जाहिराणा करून रघुनाथरावानें सर्व कारभार पुतण्याच्या हवालीं केला व तो **नाशिकला** जाऊन राहिला. त्याच सुमारास **माधवराव कर्नाटकच्या** स्वारीवर निघून गेला. याच वेळीं **पुरंदरच्या कोळीप्रकरणास** सुरुवात होऊन त्याचे संबंधीं सर्वत्र चर्चा होऊं लागली.

पुरंदरच्या किल्ल्याचा ताबा आपल्याकडे आल्यावर **आबा पुरंदऱ्यानें** प्रथम गडावरील **जुन्या कोळयांस** रजा देऊन त्यांच्या जागीं नवीं माणसें नेमलीं. जुने कोळी कांहीं गडबड–सडबड करितील म्हणून पुरंदराभोवतीं चौक्या ठेवून दिल्या, सासवडीं ' पाईचें माणूस ' दोनचार हजार ठेवून दिले व "**पुरंदरभोवते गांव** होते तेथें ताकीद करून ते वोस करविले, बाजार भरूं नये अशी ताकीद केली व आपुण खास वाड्याबाहेर जात नाहीं, वाड्याचा बंदोबस्त करितात." (खंड १४, ८०) ज्यांनीं आपल्या पिढयान्–पिढ्या पुरंदर किल्ला व त्याच्या आसमंतातील पंचक्रोशी ह्यांच्या संरक्षणार्थ खर्च केल्या, त्या कोळ्यांस ही व्यवस्था आवडणें शक्यच नव्हते. ' कोणे मजकुरावरी आमचेविशींचा संदेह त्यास (आबास) निर्माण होऊन किल्ल्याचे चाकरीवरून आम्हास दूर केलें व आमचे जीवाचें संकट आम्हांस पडलें ' (पे. द. १९, ३२) असें त्यांस वाटूं लागलें, व कांहीं झालें तरी आपलें पूर्वापारचें वतन परत मिळावावयाचेंच असा त्यांनीं निश्चय केला. याच सुमारास **आबा** पुरंदरे **नाशिकास दादाला** भेटण्याकरितां गेला होता. त्या संधीचा फायदा घेऊन ता. ७ मे १७६४, वैशाख शुद्ध षष्ठीस, 'घर शाकारावयाचे निमित्य करून च्यारसे माणूस गडावर गेले आणि वाघाची पारत निघाली ऐसी बाजी करून कबरदस्ती करून सदरेवर चालून आले युध्य फार जाले; पुरंधर घेतल्यावर पाचवे रोजीं रुद्रमाळ घेतली ' (पु. द. ३, ३४). अशा रीतीनें **कोळयांनीं दंगा** करून पुरंदरचा ताबा मिळविला, व **आबा पुरंदऱ्याचा** गडावरील अंमल उठवून लावून कोळ्यांनीं सर्वत्र आपला अंमल बसविला. ही सर्व घटना नाशिकास आबा पुरंदऱ्याला कळल्यावर तो टाकोटाक सासवडास आला; त्याच वेळीं विसाजी केशव **साने** या नांवाचा गृहस्थ कोळ्यांच्या बोलावण्यावरून गडावर गेला व गडावरील सर्व व्यवस्था पाहूं लागला. ही सर्व घटना पाहून आबा पुरंदऱ्यास मात्र वाईट वाटणें शक्य आहे.

विसाजी केशव साने हा या बनावाचा मुख्य सूत्रधार होता, असा रा. पुरंदरे यांचा ठाम सिद्धांत आहे; परंतु त्या बाबतींत आमचा मतभेद आहे.

विसाजी केशव हा आबा पुरंदऱ्याचा भाऊ **धोंडोपंत पुरंदरे** याचा कारकून होता. धोंडोपंत पुरंदऱ्यानें गेले दोनतीन वर्षांपूर्वीच विसाजी केशवाला आपल्या नोकरींतून दूर केलें होतें. **आबा व आप्पा पुरंदरे** या भावाभावांचें ठीक नव्हतेंच. अशा स्थितींतच **आप्पानें आबाचा** काटा काढण्याकरितां विसाजी केशवाला अंतस्थरीतीनें मध्यस्थी केलें व त्याच्या करवीं हा कोळ्यांचा दंगा उभा केला, असा कोणाचा दावा असल्यास तो रास्त नाहीं. साऱ्याला पुरंदरची खडान्‌खडा माहिती होती, कोळ्यांचाही त्याच्यावर विश्वास होता; परंतु यामुळें तो धोंडोपंत व पेशवा माधवराव यांचा अंतस्थ मदतनीस बनला व त्यानें हा बनाव घडवून आणला याला सबळ पुरावा काय? कोळ्यांनीं त्याला दंग्यानंतर वर नेला तो **रघुनाथरावाच्या** चिथावणीनें कशावरून नाहीं? आम्हाला तर अशी शंका येते कीं, आबाच्या ताब्यांत पुरंदर किल्ला दिला ही आपण चूक केली असें **दादास** एकसारखें वाटत होतें व म्हणून त्यानें **विसाजी केशवाला** आपलासा करून त्याच्याकरवीं हा दंगा उभा केला. **आपा पुरंदऱ्यानें** तर असें शफतपूर्वक सांगितलें कीं 'आम्ही जर त्याजला पत्र किंवा जबानी सांगितलें आसेल कीं आबाचा किल्ला घेणें तर आम्हास तुमच्या गल्या (ची) शफत असे' (पु. द. ३, ३३). इतकेंच नव्हे तर **साऱ्या-**संबंधीं धोंडोपंत पुढें लिहितो; 'तुम्ही त्याजकडे विस्वास सहसा न धरणें, तुम्हास हरयेक मोहाचा प्रकार लिहून पाठवितील आगर आ(प)ण कुकर्म केले याला सामील कोणी... असावा यास्तव तुम्हास लिा तर तुम्ही सहसा ते गोष्टीवर न जाणें." (किता). जुन्या धन्याचें साऱ्याला हें उत्तम सर्टिफिकिट आहे. असल्या मनुष्याला **धोंडोपंत** हातीं धरील असें वाटत नाहीं. अशा तऱ्हेचें अन्यायाचें वर्तन तूं कां केलेंस असें साऱ्यास विचारतां त्या बहाद्दरानें बिनदिक्कत सांगितलें कीं, "**श्रीमंताचे** आज्ञेवरून घेतला" (पु. द. ३, ३२). यावरून साने माधवरावाचाच हस्तक होता हें पूर्णाशानें सिद्ध होत नाहीं; कारण **श्रीमंत** म्हणजे दादासाहेब असेंही होऊं शकतें. नाना फडणिसानें गोविंद शिवराम खाजगीवाल्यास ता. ८ जूनच्या पत्रांत असें स्पष्टच लिहिलें आहे कीं 'श्रीमंतांची आज्ञा नसतां मध्येंच लबाडी करून श्रीमंतांचें (माधवराव पेशव्याचें) नांव करून पुरंदर किल्ला घेतला' (खंड १४, ७२). यावरून **विसाजी केशव** हा **दादांचाच हस्तक** बनला होता, माधवरावाचा नाहीं, हाच कयास बरोबर ठरतो. मात्र साऱ्याच्या या आगळिकीबद्दल बिचाऱ्या **धोंडोपंताला** मात्र विनाकारण त्रास सहन करावा लागला. कारण, पेशव्यानें त्याचा सरंजाम जप्त केला (पु. द. ३, ३७). याला कारणही बहुधा रघुनाथरावच असावा. कारण त्याला 'आंत एक व बाहेर एक असा जाहिराणा' करावयाचा असल्यानें त्यानें पुरण्यास तसा हुकूम अंतस्थरीतीनें पाठविला असावा.

पुरंदरचा किल्ला दंगा करून कोळ्यांनीं आपल्या ताब्यांत घेतला ही गोष्ट

कर्नाटकच्या स्वारींत असतां माधवरावाच्या कानीं गेली. तेव्हां त्यानें **चिंतो विठ्ठलास** ता २० मे १७६४ रोजीं पत्र लिहून कळविलें कीं, 'पुरंधरचे जुने लोकांनीं आमचें नांव पुढें करून दग्यानें किल्ला घेतला म्हणोन परस्परें वर्तमान विदित जालें. त्यास हे गोष्ट आम्हांस किमपि ठाऊक नसतां मधीं लबाडी करून कर्म केलें. त्याचे पारिपत्याविशीं तीर्थरूपांस लिहिलें आहे. तुम्हीही विनंति करून लबाडी केली त्यांचें पारिपत्य करविणें. वडिलांच्या चित्तांत संशय न ये तें करणें' (खंड १३, ८२). यावरूनही या कृत्यांत **माधवरावाचा** बिलकूल हात नव्हता हेंच सिद्ध होतें. इतकें असूनही सर्वत्र आवई उठली कीं पूर्वसंकेतानें हें सर्व प्रकरण उद्भवलें. ती गोष्ट पूर्वसंकेतानुरूपच झाली अशी स्वारींत **नाना पुरंदऱ्याकडेहि** पत्रें गेलीं. तेव्हां त्यानें एकदां नव्हे दोनदां असें ठासून लिहिलें कीं, 'येथील संकेतानें हा प्रकार किमपि न जाहला. **कोळीबेरड** स्थाई कदीम तिशा वर्षांचे चाकर त्यांस दूर करून अन्नास यजित केलें यासाठीं त्यानीं दावा पाहून हें कर्म केलें. येथील मर्जीत एक मर्जीवरच कायम आहे. वरकड दुष्ट लोक नाना प्रकारें तेथें विकल्प आणून देतील तरी इलाज नाहीं. परंतु सत्य गोष्ट अशी आहे" (खंड १४, ७४) व (खंड १४, ४८) "हा प्रकार येथून संकेतानें जाहला नाहीं हें प्रमाण आहे. कोळीबेरड बाहेर घातले. कोठें त्यास थारा नाहींशी जाहाली. याजकरितां त्याणीं किल्ला घेतला. त्यांचें लक्ष उभयतां श्रीमंताखेरीज दुसरे ठाई नाहीं, असें आहे. याखेरीज विपरीत भाव आणणार आणतील तर इलाज नाहीं." नाना पुरंदऱ्यासारख्या मुरलेल्या मुत्सद्याचा हा पुरावा एकतर्फी आहे असें मानणें फार धोक्याचें ठरेल. मग या कामीं माधवरावाचा हात होता असें कसें म्हणावें? उलट **सखारामबापूस** ही हकीकत कळल्यावर त्यानें उलट **नाना पुरंदऱ्यावरच** सर्व आळ घेतला हेंही आश्चर्य करण्यासारखें नाहीं काय? (खंड १४, ८०) याच वेळीं खुद्द विसाजी केशवानें **थोरले श्रीमंत** यांस (म्हणजे दादासाहेबांस) विनंतिपत्र व कच्चें वर्तमान लिहून पाठविलें होतें. त्यावरून "धनी मेहरबान होऊन सेवकांस कौल सादर केला तो ताईतांत घालून हृदयीं धरिला" (खंड १४, ३०). यावरून **रघुनाथरावानें आबास** दूर लोटून सान्यासच कवटाळिलें असें सिद्ध होत नाहीं काय? आणि मग थोरल्या श्रीमंतांचा संकेत ठरला, तो त्यांनीं सान्यास कळविला व त्याप्रमाणें तो त्यानें पार पाडला यांत विशेषसें काय झालें? मग यांत पूर्वसंकेत दादाचा कीं माधवरावाचा हें सूज्ञांस सांगण्याची आवश्यकताच राहात नाहीं. असें असूनही **रघुनाथरावानें विसाजी केशवाचा** सूड उगविण्यास कमी केलें नाहीं. एकीकडे कौल देऊन 'मागें राजश्री **राजाराम गोविंद श्रीमंतीं** आमच्या (सान्याच्या) पारपत्यास रवाना केलें. त्यांनीं येऊन प्रज्यांस पीडा बहुत केली. गडकरियाचे कबिले कितेक धरिले, बायकापोरें यांस मारहाण करून चोळणे घालविलें, पोरें सराट्यांवर टाकिलीं. कितेक नागवणा घेऊन सोडविलीं, गीर्दनवाईचे गांव

लुटून जाळून उध्वस्त केले, वीसपंचवीस जुझें झुंजले. इतकेंही सोसून आजिपर्यंत धण्याच्या पत्रावर खुशाल होते........सासवडचे फौजेनें होते गांव ते जाळिले आणखींहि जाळितात. पुढें काय करतील तें न कळे. तस्मात् धन्यानें कौल दिल्हा आणि प्रस्तुत अवरूपा दिसती यावरून अपूर्व वाटलें; कां कीं .... धन्याचा कौल असतां कालादिकांचेही भय नसावें आणि धनीच दुसरी गोष्ट बोलतात हेंच अपूर्व आहे." (खंड १४, ३०). ह्या **विसाजी** केशवाच्या पत्रावरून **रघुनाथरावाचें** वर्तन 'दाखवावयाचे' दांत निराळे व खावयाचे दांत निराळे याच मासल्याचें होतें हेंच सिद्ध होतें. अर्थात् खरा सूत्रधार माधवराव पेशवा, विसाजी केशव साने कीं स्वतः रघुनाथराव हें निराळे स्पष्ट शब्दांत सांगितलेंच पाहिजे असें नाहीं. शिवाय, माधवराव देशीं आल्यावर पुरंदरच्या कोळ्यांशीं जो करार झाला त्यामध्यें '**विसाजी केशव** किल्यावर आल्यामुळें सरकार जागा जतन झाली; पुढें साहेबास शरण येऊन जागा हवाली केली. शहाणपणास येकनिष्ठेस अंतर केलें नाहीं. यास्तव किले पुरंदरची सबनिसाकडील फडणिसाची आसामी त्यांचेकडे नेहमीं करार करून यावी ...... विसाजी केशव साने यांचा खोतीचा गांव मौजे **कोतळक** ताा वेलहा सुभा दाभोल येथील मनसुबी खोतीची आहे. ती त्याच्याकडे करार करावे' अशीं दोन कलमें आहेत (पे. द. १९,३२). हीं कलमें कोणी घातली ? विसाजी केशव हाच मूळ सूत्रधार अशी जर राघोबाची बालंबाल खात्री होती तर, त्यानें या कलमांस हरकत घेऊन, विसाजीस अद्दल घडेल अशी शिक्षा त्यानें खात्रीनें केली असती. निदान, तशी त्यानें निकड लावली असती तर माधवरावानें आपलाच हेका खात्रीनें चालविला नसता. चुलत्याच्या सल्ल्याप्रमाणें तो खात्रीनें वागला असतां. नुसत्या संशयावरून ज्या पेशव्यानें धोंडोपंत पुरंद्र्याचा सरंजाम जप्त केला, त्यानें विसाजी केशवासारख्या माणसाच्या घरादारावरून नांगर फिरवून त्यास देशोधडीस लावण्यास कमी केलें नसतें. पण या कामीं रघुनाथराव गप्प बसला. यावरूनच विसाजी केशव याला सामील करून घेऊन व त्याला पुढें करून रघुनाथरावानें आपला कार्यभाग साधून घेतला व तो स्वतः नामानिराळा राहिला हेंच सिद्ध होत नाहीं काय ?

पुरंदरच्या कोळ्यांनीं दंगा करून तेथें आपला अंमल त्यांनीं सुरू केला. तेव्हां **रघुनाथरावानें** आकसताळेपणा करून रागाचें मोठें अवडंबर माजविलें. मी केलेली व्यवस्था कोळ्यांनीं दंगा करून बिघडवून टाकिली, तेव्हां त्यांचा पक्का बंदोबस्त केलाच पाहिजे असा त्यानें दृढ निश्चय केला असें दिसतें. 'श्रीमंत **दादासाहेबांचे** मनांत कितेक प्रकारें संशय वाढत चालिले. पुढें बखेडा मातबर व्हावा असेंही डौल दिसतात. त्यास तुम्हीं तेथें आहा. संशयाची निवृत्ति वरचेवर करून राखीत जावे' असें **नाना फडणिस नाशिकास गोविंदराव तात्यास** लिहितो (खंड १४।७२). यावरून रघुनाथरावानें केवढें अवडंबर माजविलें असेल याची सहज कल्पना येते. रघुनाथ-

रावानें ताबडतोब पुरंदरच्या दंगखोर कोळ्यांस नाशिकास बोलावून घेऊन सर्व प्रकरणाची शहानिशा करण्याचा आव आणला. त्याप्रमाणें **कोळी नाशिकास** गेले, त्यांनीं आपली सर्व बाजू दादासाहेबास पूर्णपणें समजावून सांगितली व आपल्याकडे कांहीं एक गुन्हा नाहीं हें सर्व त्यांनीं त्यांस स्वच्छपणें सिद्ध करून दिलें. इतकें झाल्यावर दादासाहेबांचा त्यांच्यावरील राग एकदम नाहींसा झाल्यासारखा दिसतो. कारण त्या सर्व प्रकरणाची छाननी झाल्यावर रघुनाथरावानें कोळ्यांस त्यांचा गुन्हा पूर्णपणें माफ केला. तो आपल्या पत्रांत लिहितो ' ज्या गोष्टी न म्हणाव्या तुम्हीं कबूल न कराव्या त्या गोष्टीचें इमान तुम्हाजवळ राजश्री **आबा** पुरंदरे मागूं लागले तुम्ही कबूल न केले म्हणोन तुम्हासी आकस करून खालीं घालविलें व दुसरे लोक किल्ल्यावर चढविलें. तेव्हां कलेल तसे करून तुम्हास जागा हस्तगत करणें जरूर जाली. म्हणोन तुम्ही केली. त्यामुळें खूनखराब्या जाल्या व बगर हुकूम कितेक वर्तणुका घडल्या त्यास तुम्ही सरकारचें पहिल्यापासून येकनिष्ट इमानी व पुढें आज्ञेप्रमाणें वर्तणूक करणार हे जाणोन तुम्हावर कृपा करून सर्व केल्या गोष्टी तुम्हास माफ केल्या आसेत.'- (पु. द. ३, ३९). यावरून दादाचें मनोगत पूर्णपणें कळून येतें. कोळ्यांना उखडून टाकण्यास तयार झालेला रघुनाथराव त्यांची बाजू ऐकतांच इतका खूष होतो कीं त्यास सर्व गुन्ह्यांची माफी करून त्यांस पूर्वीच्या ठिकाणींच स्थापण्यासाठीं सिद्ध होतो. मग त्यानें हा निवाडा करण्याचा सर्व फार्स कोणाकरितां केला? आपल्या प्रेरणेनेंच व इच्छेनुरूपच सर्व गोष्टी घडल्या आहेत तर, त्याबद्दल सान्याला अगर कोळ्यांना शिक्षा कशाकरितां, अशा विचारानेंच त्यानें या सर्व गोष्टी केल्या नसतील कशावरून?

आणि इतकें करूनहि **दादासाहेब** स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं **आबा पुरंदऱ्या**सही आपली बाजू समजावून देण्याकरितां **नाशिकास** बोलाविलें होतें; परंतु तो शहाणा, सर्व प्रकार त्याच्या पूर्ण परिचयाचा; आपण नाशिकास गेलो, व आपण आपली बाजू कितीही रंगवून दादासमोर मांडिली तरी कोणताही फायदा होणार नाहीं, हें त्या मुत्सद्यानें पूर्णपणें ओळखिलें होतें. त्यामुळें तो नाशिकास दादाकडे गेलाच नाहीं. उगाच हात दाखवून अवलक्षण करा कशाला? त्यापेक्षां जशा गोष्टी घडतील तशा त्या पहाव्या हाच त्याचा कटाक्ष होता असें दिसतें. तसें पाहिलें तर **आबा पुरंदरे** हा **दादासाहेबांच्या** पक्षाचा, दादासाहेब व आबा पुरंदरे यांचा अगदीं निकटचा स्नेह, आबावर दादांची बहाल मर्जी, हें सर्व जगाला पूर्णपणें माहीत, असें असतांही आबा, दादा बोलावीत असतांही, नाशिकास गेला नाहीं, यांतील इंगित काय? तो तेथें गेला असता तर दादाला त्यानें आपली बाजू समजाऊन देऊन आपल्यावर कोळ्यांनीं व विसाजी केशव साने यानें कसा बेअब्रूचा प्रसंग ओढवून आणला हें त्याला सिद्ध करतां आलें असतें. पण त्या बाबतींत त्याची खात्री नव्हती. दादाचा कल कोणाकडे झुकतो आहे हें त्यानें पूर्णपणें ओळखलें होतें व अशा स्थि-

तींत आपण जर नाशिकास गेलों तर आपल्यासारखा निकाल दादासाहेब देतीलच अशी त्याला आशा वाटत नव्हती. शिवाय, या सर्व प्रकरणाच्या बुडाशीं खुद्द **दादासाहेबच** आहेत हें ओळखल्याशिवाय तो कसा राहिला असेल? परंतु आपण बोलावूनही आपला स्नेही म्हणविणारा आबा पुरंदरे नाशिकास आला नाहीं यामुळें दादालाही राग येणें साहजिक होतें. स्नेही झाला तरी आबा कांहीं झालें तरी नोकरच.' यामुळें दादाही त्याच्यावर संतापला, चिडला व त्याच्यावर त्यानें शिक्षेचें हत्यार उपसलें. परंतु या कामीं **बापू** आपल्याला मदत करतील अशी **आबाची**ही बळकट आशा होती. '**पुरंदर** गेल्यानें आपला दुर्लौकिक होत आहे, नव्हे, झाला आहे. वडिलांनीं मिळविलें तितकें सर्वस्व गेलें. त्यांत बाहेरील मोगलानें अथवा दुसऱ्या कोणी किल्ला घेतला असतां तरी नाकर्तेपणा आबाकडे आला असता. परंतु घरांतील फितुरीमुळें किल्ला गेला व '**खावंदाचे** कृत्रिम त्यांत.' तेव्हां त्याचें धाबेंच दणाणलें व त्याच्या मनानें धास्त खाल्ली. दादा आपली बाजू उचलून धरितील, **बापू**ही आपल्याला मदत करितील अशी जी त्याची आशा तीही जमिनदोस्त झाली. यामुळें आपलें काळें तोंड दादासाहेबास कशास दाखवावें; याच एका विचारानें तो गेला नाहीं असें नसून "**दादासाहेबांनीं** (आपली) ममता सोडून द्रव्याचा लोभ धरून कंसाच्या (त्रिंबकरावमामा पेठे यांच्या) सांगितल्यावरून प्रथम राजकारणें केलीं, लोका (कडून) पैका गोरगरिबाचा घेणार व किल्ला सरकारांत घेणार. तेव्हां तेथें श्रीमंतापाशीं तोंड खालें करून जावें येसी कल्पना आबाच्या चित्तांत येऊन जात नाहीं." हें पत्र **चिंतो अनंतानें**, म्हणजे दादाच्या दुसऱ्या एका जीवश्चकंठश्च स्नेह्यानें धारवाडच्या स्वारींतून लिहिलें असून तें अप्रसिद्ध असल्यानें पुढें दिलें आहे. यावरून **आबाच्या** जीवाची किती कालवाकालव होत होती व **दादासाहेबांनीं** पुरंदर किल्ला घेण्याचे बाबतींत कसकशी राजकारणें चालविलीं होतीं याची माहिती मिळते. एकूण **दादासाहे**बच मूळ सूत्रचालक होता हेंही आबानें ओळखिलें होतें व म्हणूनच तो त्याच्या भेटीस गेला नाहीं हेंहि सिद्ध होतें.

पुरंदर किल्ल्याच्या प्रकरणांत कोणी कोणी काय काय प्रकार केले यांची माहिती दादासाहेबास कळल्यावर त्यानें ती माहिती आपल्या पुतण्यास कर्नाटकच्या स्वारींत कळविली. पुरंदरचे कोळीहि कांहीं स्वस्थ नव्हते. तेही माधवरावास भेटण्यास गेले. त्यांनींही सर्व वस्तुस्थिति पेशव्यास कळविली. "आम्ही पुरातन वतनदार असल्यानें आबानें आम्हास दूर करावयास नको होतें. त्यामुळें आम्ही अन्नास मोताद झालो व उपासी मरूं लागलो तेव्हां आम्हांस दुसरा इलाजच नव्हता." अशी त्यांनीं आपली बाजू त्याच्यापुढें मांडिली व आम्हांस माफी करून 'खर्चास पैसे यावे, अशीही विनंती केली. **माधवरावानें** 'सध्यां आम्ही स्वारींत असल्यानें या गोष्टींचा निकाल करतां येत नाहीं. परंतु आबास सांगूं व तुमची सोय, पुण्यास

आल्यावर, सर्व चौकशी करून देऊं,' असें त्यांस आश्वासन देऊन व त्यांस कांहीं खर्चास देऊन पुण्यास पाठवून दिले. या एकंदर प्रकारावरून माधवरावानें खरी वस्तुस्थिति काय आहे तें कळविण्याकरितां चुलत्यास पत्रें लिहिलीं. दादानींही उत्तरें लिहून पुतण्याची खातरजमा करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यावरून पेशव्याची खात्री पटेना. तेव्हां त्यानें या एकंदर प्रकरणांत **विसाजी केशव** साने याचा हात किती, त्यानें किल्ला घेतला तो तुमच्या आज्ञेनें घेतला किंवा नाहीं, आज्ञेशिवाय घेतला असला तर त्याचें पारिपत्य करणें किती आगत्याचें व जरूरीचें आहे वगैरे बाबतींत त्यानें **राघोबास** पत्र लिहून उत्तरें मागविलीं. त्याचें हें पत्र अजून प्रकाशित झालेलें नाहीं. तें नुकतेंच आम्हांस रायरीकरांचें दप्तर चाळीत असतां सांपडलें. तेव्हां तें जसेच्या तसेंच प्रथम पुढें ठेवतों. हें पत्र ता. २४ जुन १७६४ चें असून माधवरावानें **कोपलहून** आपल्या चुलत्यास लिहिलेलें आहे. तें पत्र असें—

श्री { श. १६८६ ज्येष्ठ वद्य १
{ इ. १७६४ जून २४

तीर्थस्वरूप राजश्री **दादासाहेब** वडिलांचे सेवेसी

आपत्ये **माधवरायाने** चरणांवरी मस्तक ठेवून सा। नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता। छ २३ जिल्हेज मुकाम नजीक **कोपल** येथें वडिलांचे आसीर्वादेंकरून सुखरूप असो विशेष वडिली पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला अर्थ सविस्तर कळों आला **धोंडो मल्हार** याजकडील कारकुनानें किला घेतला तेव्हां धोंडोबाचे संदर्भानें घेतला यांत संशये नाहीं ते आपणाजवळ आहेत आपणांस पुसून घेतला किंवा ने पुसतां घेतला हें कळत नाहीं न पुसतां घेतला म्हणावा तरी आपण त्यांस फजित करीत नाहीं पुसून घेतला म्हणावा तरी आपण शपतपूर्वक लिहिलें त्यांस तथ्य वर्तमान काय असेल तें लिहून पाठविणें जर आपले आज्ञेसिवाय किला घेतला असिला तर परिछिन त्यास नजरबंद करून किला आबाचे हवाला करावा जर आपण आज्ञा केली असिली तरी आम्हांसी तरी रुत्रीम करूं नये म्हणून आज्ञा केली ऐसीयांस जाला मजकूर पूर्वी शपथपूर्वक सेवेसी लिहून पाठविलाच आहे कचे वर्तमान वडिलास कळावे त्यांस प्रथमता बेरड रुष्णातीरीं आले त्याणीं कित्येक आपले हालहवाल सांगितलें आम्हीं पुरातन वतनदार बहुता दिवसाचे वतनी चाकर असतां आबांनीं आम्हांस दूर केलें पोटास पावेनासें जाहालें उपासी मरतो त्यांवरून आम्ही त्यांस सांगितलें कीं आम्ही प्रस्तुत मसलतसीर आहो तूर्त तुम्हीं घरास जाणें स्वारीहून आल्यावर आबास सांगून तुमची सोये करून देऊं प्रस्तुत **सखारामपंत** येथें आहेत. त्यांस सांगता सोये निघाली तरी काढितो त्यास ते बोलिलें कीं **बापूस** कळल्यास **आबास** कळेल ते आम्हांस मारितील

डोकीं मारावयास चुकणार नाहींत याप्रमाणें कितेक हरद्र सांगितले व कांहीं पोटास मागितलें त्यावरून त्यास खर्चास च्यारसे रुपये दिल्हे इतका प्रकार मात्र जाहाला याचें कारण हेंच कीं जुने पुरातन लोक दुसरेकडे जातील याजकरतां आशेस लाऊन ठेविले किला घ्यावयाची वार्ता किमपि त्यांची नाहीं धोंडोबाचें कारकुनानें किला घेतला यामुळें त्यांसहि पुसिलें ते बोललें कीं आम्ही त्यांस किला घ्यावयास सांगितला नाहीं म्हणून शपथ वाहिली आमचा दस्तयेवज निघाल्यास पारपत्य करावें कारकुनानें त्यांस काय समजाविलें काय केलें हें आपणांस ठाऊक नाहीं दुसरे कारकून आमचा किल्यावर गेला तेव्हां आमचें सांगितलें कोणास प्रमाण वाटणार नाहीं आतां चितास येईल ते करावे याप्रो ते बोलतात प्रथमता याचा कारकून किल्यावरी गेला हें वर्तमान आम्हांस कलतांच यांस आम्ही दरबार मना केला व पुढें विसिष्ट कांहीं करावें त्यांस येथें **सखारामपन्तांनी** सांगितलें कीं, तूर्त आब्रू घेवूं नये आबरु राखोन विचारे विचारे आपले कार्य करावे व आपलेही आज्ञेचा मार्ग पाहावा आज्ञा येईल तसे करावे खालीं पत्रांत नजरबंद करावे म्हणून आज्ञा आली त्यावरून उतमप्रकारे पारपत्य करावे हाच मनसबा केला परंतु सखारामपंत बोलले कीं किला कोठें जाणार आहे महिना दोन महिने अधिक आगले लागले तरी लागतील परंतु मनसुब्यानें काम करावें दरबार मना जालाच आहे तेव्हां नजरबंद दाखल आहेतच मातबर माणसास यापेक्षां अधिक काय पाहिजे त्यावरून थोरले पारपत्य तूर्त राहिलें आहे गरमनरम समजून त्याजपासूनच हे गोष्ट जाली असली तरी विचारावरी येतील लबाडीच करून न आइकत तरी उसीर लागणार नाहीं याचा कारकुन किल्लयावरी गेला तेव्हां याजकडे मुद्दा लागलासा दिसतो त्यास कचा मजकूर वडिलांस कलावा यास्तव लिहिला असे सारांश वडिलांचे मर्जीपेक्षां दुसरें आम्हांस अधिक वाटावें तर कृत्रीम करावें त्यांस वडिलांचे मर्जीसीच मजला दरकार आहे श्रेयस्कर कल्याण माझें त्यांतच आहे हें मजला पुरतें समजलें आहे मी कृत्रीम वडिलासी सर्वात्मना करणार नाहीं. किला हस्तगत करावयाचे प्रकार केले आहेत व पुढेही रोजबरोज तेच विवंचनेंत आहे किला घेवून आबाचे हवाला करावा हाच निश्चय आहे वडिलांनी तिकडून पुस्तपना होईल तो करावा किला आम्हीच घेतला देवूं न देवू येविसीं बहुतांस संदेह आहे त्याचा परिहार सांगितल्यानें निशा पडत नाहीं किला हस्तगत होवून हवाला होईल तेव्हां खरें वाटेल तसा कांहीं वडिलांचा प्रकार नाहीं वडिलांस जे मी लिहीन ते वडिलांस मात्र लटकें वाटणार नाहीं व मीहि लटकें सर्वथा लिहिणार नाहीं येविसी माझी खातरजमा आहे जाहाले वर्तमान कचे सखारामपंतास सांगितलेंच आहे **धोंडोबाचे** व **धाबा सरनाईक** याचें गांव देसी असतील व वतन असेल ते कुल जफ्त करावे *सेवेसी श्रुत होय हे *विज्ञापना

* अक्षरें भिन्न.

या पत्राला **दादासाहेबानीं** काय उत्तर दिलें हें समजावयाला कांहीं मार्ग नाहीं; परंतु विसाजी केशवाचा हात या प्रकरणाच्या बुडाशीं किती होता, आबाची चूक काय झाली, सर्व प्रकरणाची चौकशी करून पुरंदरचे कोळी कसे धुतल्या तांदुळासारखे स्वच्छ व शुद्ध होते, त्यांस आपण कशी माफी केली व किल्ला सरकारच्या ताब्यांत ठेवूं, **आबाच्या** स्वाधीन करणार नाहीं, वगैरे गोष्टी त्यानें पुतण्यास खात्रीनें कळविल्या असल्या पाहिजेत. एवढेंच नव्हे तर, त्यानें आपल्या पुतण्यास असेंही कळविलें कीं, "आम्ही कोलियांस कौल दिल्हा आहे त्यापों तुम्ही आपला देणें." यावरून रघुनाथरावानें आपल्या पुतण्यासही आपल्या बाजूस कसें वळवून घेतलें हें यावरून सहज सिद्ध होतें. शिवाय हें व असल्या तऱ्हेचीं आलेलीं पत्रें माधवरावानें आपला कारभारी सखारामबापू बोकील यांसही दाखविलीं नाहींत किंवा अशींअशीं पत्रें दादासाहेबांच्या कडून आलीं आहेत असेंही त्यानें त्यास सांगितलें नाहीं. यावरून माधवरावानें या बाबतींत आपल्या चुलत्यावर किती विश्वास टाकला होता व त्याला तो किती जपत होता हें लक्षांत धरण्यासारखें आहे. वरील अर्थाचें पत्रही अप्रकाशित आहे. तेंही जसेंच्या तसें पुढें मांडणें जरूर आहे. तें पत्र पुण्याचे सरदार श्री. बाळासाहेब पारसनीस यांच्या संग्रहांत आम्हांस सांपडलें. हें पत्र ता. २३ ऑक्टोबर १७६४ चें असून दादाच्या पक्षांतील एका विश्वासू माणसानें—बहुधा **चिंतोपंत देवस्थळी** यानें आपल्या पुण्याच्या स्नेह्याला लिहिलेलें आहे: हें पत्र पूर्ण सापडलेलें नाहीं, कारण त्याचा दुसरा बंद गहाळच झालेला आहे; परंतु पुरंदरच्या कोळी-दंग्यासंबंधाचा सर्व मजकूर त्यांत पूर्णत्वानें आहे. धारवाडहून लिहिलेलें हें पत्र असें:—

{ श. १६८६, आश्विन व. १२
{ इ. १७६४ ऑक्टोबर २३

श्रीमंत राजश्री **चिंतोपंतदादा** स्वामीचें सेवेसी साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ २६ रबिलाकर सोमवार मु॥ धारवाड स्वा(मी)चे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष स्वामीकडील पत्रें छ ६ शुद्ध ९ रा।कर व छ १० रा। कर आश्विन शुध १३ व छ १२ रा।कर शुध १५ मु॥ **पंचवटी** पैसी तिनी पत्रें छ १४ रबिलाकर आश्विन वा। १ रविवार घटिका रात्रीस पावली सविस्तर अर्थ ध्यानांत आला श्रीमंत राजश्री **बापूंनीं** सारीं पत्रें वाचून पाहिलीं. **श्रीमंताचे** स्वदस्तुरचीं पत्रें आली त्यापासून थोडासा संतोष जाहला; परंतु राजश्री **आबा** जाईनात म्हणून श्रीमंतांची मर्जी क्रूर आहे त्यासी आबाचे लेकुरपण आथवा आरवाली सोसणें श्रीमंतावाचून कोण आहे येके दिवसीच ते कृपा करतील हे **बापूही** समजले आहे(त) परंतु रागें मात्र भरावें तथापि **पुरंदरामुळें** दुर्लौकिक आबाचा जाहला आहे वडिलांनीं जे मिळविले तितके सर्वस्व गेले त्यांत बाहेरील मोगलानें आथवा आणखी कोणी किला घेतल

असता तरी आबाकडे नाकर्तेपणा येते घरांतील फितुरीमुळें किला गेला व **खावंदाचें** कृत्रिम त्यांत तेव्हां कांहींच इलाज चालत नाहीं म्हणून येक श्रीमंत राजश्री दादासाहेबाचा मात्र आश्रय मागून होते तो त्याणींही **आबासाहेबाची** ममता सोडून द्रव्याचा लोभ धरून कंसाच्या सांगितल्यावरून प्रथम राजकारणें केलीं लोका (कड़न)... पैका गरीबागुरबाचा घेणार व किला सरकारांत घेणार तेव्हां तेथें श्रीमंतापासी तोंड खाले करून जावे येसी कल्पना **आबाच्या** चित्तांत येऊन जात नाहीं त्याहीमध्यें आबासाहेब तेथें जाते तरी श्रीमंतास याचीच ममता लागती, परभारें राजकारणें न होतीं हेंही खरें परंतु श्रीमंत राजश्री **आबासाहेबावर** व श्रीमंत राजश्री **बापूवरी श्रीमंतांची** पूर्व कृपा हे जघन्य प्रिथवीवर स्वराज्यांत व परराज्यांत असतां श्रीमंत द्रव्याचा लोभ धरून उभयतांचा दुर्लौकिक करतात व गरीबगुरिबाचें द्रव्य घेणार याजमुळें आपली मंडळी गडबडली होती स्वदस्तुरचीं पत्रें आलीं त्यापासून थोडीसी स्वस्ता जाहली तथापि कंसानीं श्रीमंतांचें पत्र **श्रीमंत राजश्री रावसाहेबास आले कीं आम्ही कोलियास कौल दिल्हा त्याप्रमाणें तुम्ही आपला देणें** यैसे वर्तमान येथें ऐकतो श्रीमंतांनीं पत्रें कांहीं **बापूस** दाखविलीं नाहींत सांगितलीं नाहींत सांगितलें असतें तरी **बापू** नको अथवा या हें कांहींच न म्हणते परंतु **खावंदच** चाकरासी कृत्रिम करूं लागल्यावरी इतबारे इमाने चाकरी केल्याचें काय फल याकरितां **बापू** व सर्व मंडळी उदास थोडीसी आहे तथापि बाहेर उदासता कोणीही दाखवीत नाहींत लक्षही टाकीत नाहींत येविसी निशा असो यावी सर्व समजले आहेत व चाकरी कोणे प्रकारे करितात परभारें कलेल आथवा श्रीमंत तेथें आलियावरी चवकंसीही करितील तेव्हां निदर्शनासही येईल. ... (पुढील मजकूर गहाळ आहे.)

या पत्रावरून खालील गोष्टी उघड होतात. पुरंदरच्या कोळ्यांचा दंगा माधवरावनिर्मित नसून तो रघुनाथरावनिर्मित होता. रघुनाथरावानें आबा पुरंदऱ्याकडे दिलेला पुरंदर किल्ला सरकारांत घेण्याचा राजकारणी डाव टाकला व तो यशस्वी करून दाखविला. या कामीं दादानें माधवरावालाही पूर्णपणें आपलासा करून घेऊन आंत येक व बाहेर जाहिराणा येक दर्शविण्यास सांगितलें व पेशव्यानें त्याप्रमाणें चोख वर्तन केलें. **विसाजी केशव साने** हा रघुनाथरावाच्या शिकवणुकीनेंच पुढारला व ' थोरले श्रीमंतांचा ' आश्रय मिळाल्यामुळेंच तोही या प्रकरणांत फंदफितुरी करण्यास सिद्ध झाला. **रघुनाथरावानेंच** कृत्रिम करण्यास सुरवात केल्यानें त्याच्या बाजूची सर्व मंडळी गडबडली व त्यास ' अंदरकी बात ' माहीत असूनही त्यांनीं ' नरो वा कुंजरो वा ' असें म्हणून कानावर हात ठेविले. नाहीतर सखाराम **बापूसारखा** चाणाक्ष मुत्सद्दी, स्वतःचा स्वार्थ बाजूस सारून, या प्रकरणीं **इतका मुग्ध** राहिलाच नसता; व **धोंडोपंत** पुरंदऱ्यावर शिक्षेचें हत्यार उपसण्यास पेशवा तयार असतांही त्यानें त्याचें निवारण केलें नसतें.

आतां प्रश्न असा उरतो कीं, माधवरावानें या प्रकरणांत दादाचाच पाठपुरावा कां केला; **घोडनदीच्या** लढाईनंतर रघुनाथराव सर्वाधिकारी झाला व त्यानें त्यावेळीं जो बक्षीससमारंभ उरकून घेतला त्यावेळीं आबा पुरंदऱ्याकडे पुरंदरचा किल्ला दिला ही गोष्ट इतरांप्रमाणेंच **माधवरावालाही** पसंत नव्हती. परंतु चुलत्याशीं नुकताच संधि झालेला असल्यानें माधवराव त्यावेळीं कांहींच बोलला नाहीं. व ' वडिल ' जी गोष्ट करितील त्याला तो ' हो हो ' म्हणत गेला. पुढें मागें पुरंदर किल्ला सरकारांत घेण्याची कल्पना त्याच्या मनांत त्यावेळीं तरी नव्हती हें खास. परंतु पुढें पुढें माधवरावाच्या कारभारची घडी जसजशी बसत चालली तसतशी त्याच्या सल्लागारांनीं पुरंदर किल्ला सरकारांत घेण्याबद्दलचा सल्ला त्याला दिला असावा. ही गोष्ट माधवरावास जरी पटली असली तरी ती करण्यास तो फारसा उत्सुक नव्हतासें दिसतें. कारण ' वडिलास दुखवूं नये ' असेंच त्याचें सर्व धोरण होतें. आणि त्याचें हें धोरण त्यानें **रघुनाथरावाला** लिहिलेल्या पत्रांत अगदीं स्पष्ट केलें आहे. तो लिहितो, ' मजला आपण वडील असतां दौलतेची व कर्जाची व नांवलवकिकाची किमपि चिंता वाटत नाहीं. वडिल जें करणें तें करितीलच ऐसें मानून निश्चिंत आहे. नाहीं तरी सरदार डोईजड व पत कोठेंच राहिली नाहीं. कोण्हासी चाकरीकरितां नेट धरून बोललियास वडिलास विपरीत प्रदर्शन करून तत्काळच घरांत पेच पाडून राहिली तीही दौलत बुडवावयास सिद्धच आहेत........ दौलतीचा बंदोबस्त करणार वडील समर्थ आहेत, कांहीं चिंता नाहीं. आम्ही आज्ञेप्रमाणें वर्तावें, सेवा करावी यांतच इहलोक–परलोक आहे. पुढें वाडिलास जसें कर्तव्य करणें असेल त्याप्रमाणें सूचना लिहावी." (खंड १४, ५६) यावरून पेशवा आपल्या चुलत्यास कसा तळहाताच्या फोडाप्रमाणें जपत होता हेंच सिद्ध होत नाहीं काय ! कर्नाटकच्या स्वारींत असतां पुरंदरच्या कोळ्यांनीं दंगा केला ही गोष्ट **माधवरावास** कळल्याबरोबर त्यानें **चिंतो विठ्ठलास** लिहिलें ' हे गोष्ट आम्हास किमपि ठाऊक नसतां मधीं लबाडी करून कर्म केलें, त्यांचें पारपत्याविशीं तीर्थरूपांस लिहिलें आहे.' (खंड १३, ८२) असें प्रांजलपणें लिहिणारा माधवराव हें सर्व प्रकरण आपल्या चुलत्यानें हातीं घेतलें आहे व त्याचा न्याय तो निःपक्षपातीपणानें देईल अशी त्याची खात्री होती. हें प्रकरण आपल्यामुळें उत्पन्न झालेलें नाहीं; तसा चुलता कदाचित् संशय घेईल तर तो विनाकारण होय, असेंही पेशव्यानें आपल्या आईस लिहिलें होतें (खरे ४३४) व तशा प्रकारचा निर्वाळा त्यानें आपल्या स्वारींत असणाऱ्या चुलत्याच्या पक्षाच्या लोकांस दिलाही होता व त्यामुळें ते सर्व स्वस्थचित्त होते. (खरे ४३५ व ४४८) अशा तऱ्हेची सर्व वस्तुस्थिति असतां रघुनाथरावानें सर्व कच्चें वर्तमान पेशव्यास कळविलें; त्याच्या मनाचा व धोरणाचा थांगपत्ता समजून घेतला व त्याला **त्रिंबकराव**मामाच्या करवीं लिहून कळविलें कीं, ' आम्हि कोलियांस कौल दिल्हा तसा तुम्ही देणें.' हें लिहून येतांच चुलत्याच्या सर्व धोरणाचा

मथितार्थ माधवरावासारख्या शाहण्या पेशव्याच्या ध्यानांत येण्यास फारसा अवधि लागला नाहीं. ही गोष्ट षट्कर्णी झाली तर बरी नव्हे असेंही त्यानें हेरलें व इतर अनेक राजकीय गोष्टींची **सखाराम बापू** वगैरे मुत्सद्यांशीं उघड उघड चर्चा करणारा पेशवा, चुलत्याचा असा इषारा मिळतांच बापूशीं पुरंदरच्या बाबतींत एक चकार शब्दही बोलला नाहीं किंवा त्यानें रघुनाथरावाचें वरील पत्र त्याला वाचावयासही दिलें नाहीं. या बाबतींत गुप्तता ठेवणेंच इष्ट होय असें त्यानें आपल्या मनाशीं ठरविलें व सर्व भार चुलत्यावर टाकून तो स्वस्थ बसला. एकदां एकाकडे एक काम सोपवून दिल्यावर व तेंही आपल्या चुलत्याकडे सोपवून दिल्यावर, त्यांत ढवळाढवळ करून त्याचा विचका करणारा माधवराव नसल्यानें 'वडिलीं केलें तेंच योग्य' असें समजूनच सर्व गोष्टींची त्यानें गुप्तता राखिली व पुढें स्वारींतून परत आल्यावर दादाच्या सल्याप्रमाणेंच त्यानें त्यांच्याशीं करार केला. यांत पेशव्यानें दोन गोष्टी साधल्या. एक म्हणजे दादाच्या म्हणण्याला मान तुकवून त्यानें असें दाखवून दिलें कीं चुलता व मी एक आहोंत. यामुळें राज्याचा आब राहून त्याची प्रतिष्ठा वाढली, एकांस एक व दुसऱ्यास दुसरें असें सांगून व मध्यें लुडबुड करून स्वतःचा स्वार्थ साधणाऱ्यांस धास्त उत्पन्न केली व चुलत्याबरोबरच त्यानें आपली प्रतिष्ठाही वाढविली. दुसरें असें कीं, पुरंदर किल्ला स्वतः दादास व आबासही न दुखवितां अनायासें सरकारांत स्वाधीन झाला. नाहींतर तो किल्ला त्याची कितीही इच्छा असती तरी, वरील दोघांस दुखविल्याखेरीज, सरकारच्या ताब्यांत कधींच आला नसता. या दृष्टीनें त्याचा हा एक राजकारणी डाव होता असें एक वेळ म्हटलें असतां चालेल; परंतु पुरंदर किल्ला कोळ्यांस व विसाजी केशव साने यांस फितूर करून त्यानें सरकारांत घेतला तो पेशव्याचा एक राजकारणी डाव होता हें म्हणणें फारसें टिकत नाहीं. कारण उपलब्ध सर्व पुरावा या सिद्धांताच्या उलट आहे.

अशा तऱ्हेनें पेशव्यानें दादाचा मान राखण्याकरितां त्याच्या बेताबद्दल गुप्तता राखून त्याची परिस्फुटता केली नाहीं. हें ज्यांस समजलं नाहीं, त्यांनीं माधवरावास या जाळ्यांत अडकविण्याचा प्रयत्न करून त्यास थोडाफार दोषही दिलेला दिसतो. त्यांचें म्हणणें असें कीं, श्रीमंतांनीं सर्व चौकशी केल्यावर दोघांसही सर्व गोष्टींचा खुलासा स्वतः पत्रें लिहून करणेंच इष्ट होतें. त्या कामीं दिरंगाई झाल्यानें "संदेहानें संदेह होऊन एवढा लाभ हातचा जातो. या गोष्टीविशीं जशी पा तशी निशा करून दोन्ही चिठ्या मात्र घेऊन पा" (खंड १४, ६८). आतां ही टीका करणारास रघुनाथरावाच्या कटांतील 'अंदरकी बात' माहिती नव्हती व माधवरावानें गुप्तता कां राखिली त्याचें मर्महीं अशा टीकाकारास समजणें शक्य नव्हतें. अर्थात् तें कारण कोणासही न उमग-

त्यानेंच रघुनाथरावाला **नारो कृष्ण दरवे** यास पत्रीं लिहून कळवितां आलें कीं "आमचा पुस्तपन्हा आहेसा कोणासही न कळों देतां जसें चिरंजिवांनीं पुरंदरचे आत एक व बाहेर जाहिराणा एक दर्शविला होता तसें करावें." (पे. द. १९, ५२) **दादाच्या** उपदेशांतील प्रत्येक शब्द महत्त्वाचा व त्याच्या खोल मनाचा ठाव सहज समजेल असा आहे. त्या उपदेशांत त्यानें निःसंदिग्धपणें दाखविलें कीं पुरंदर प्रकरणीं (१) आमचा पुस्तपन्हा होता (२) तो आहेसा माधवरावानें कोणासही कळूं दिला नाहीं व (३) मी सांगितल्याप्रमाणेंच त्यानें आंत एक व बाहेर एक असा जाहिराणा केला. इतका उघड उघड कबुलीजबाब दादानें क्वचितच दिला असेल ! असा हा निखालस कबुलीजबाब असतां दादाला भोळा सांब समजून त्याला पुरंदर-प्रकरणीं निर्दोषी समजून माधवरावाच्या आंगींच 'राजकारणाचा डाव होता' असा दोष चिकटविणें म्हणजे चोराला सोडून संन्याशालाच फाशी देण्यासारखें होणार आहे. तात्पर्य, इतकेंच कीं, पुरंदर प्रकरण हा एक राजकारणी डाव होता हें सत्य होय; परंतु त्याचा मुख्य सूत्रधार माधवराव किंवा विसाजी केशव नसून **रघुनाथराव** हेंच होय.

रघुनाथरावानें तरी हा राजकारणी डाव, आबा पुरंदऱ्यासारख्या आपल्या जिवलग मदतनिसास दुखवून, कां टाकला ? या प्रश्नाचें उत्तर वाटतें तितकें सोपें नाहीं. प्रथम हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, रघुनाथराव पुरंदर किल्ला आबाच्याकडे सोपविण्यास तयार नव्हता. त्याला तो किल्ला आपल्याकडेच ठेवावयाचा होता. पुरंदर किल्ल्याचें महत्त्व तो पुरेपूर ओळखून होता. असें असतां त्यानें तो किल्ला आबा पुरंदऱ्याकडे सुखासुखी दिला काय ? याचें उत्तर नाहीं असेंच द्यावें लागतें. **सखारामबापूनें** भीड घातली कीं, पुरंदर किल्ला आबाकडे सोपवावा आणि त्यावेळीं बापूची भीड मोडून स्वतःचेंच घोडें पुढें दामटण्याइतका मनाचा खंबीरपणा दादाच्या आंगीं नव्हता. पुतण्याच्या हातची सत्ता आपल्या हातीं येण्याचे कामीं बापूनें रघुनाथरावाला कसकशी मदत केली, त्यानें कोणकोणत्या उलाढाली केल्या, कोणते डावपेच त्यानें लढविले व शेवटीं यश मिळवून त्यानें माधवरावास कसें शरण येण्यास लाविलें हें रघुनाथराव ओळखून होता. अशा आपल्या निकटवर्ती साहाय्यकर्त्या मुत्सद्याची भीड मोडणें त्यास मुष्किलीचें झालें व म्हणूनच त्यानें बापूच्या सांगण्यावरून पुरंदर किल्ला आबाच्या स्वाधीन केला. परंतु पुतण्याबरोबर **बापू** कर्नाटकाच्या स्वारीवर निघून गेल्याबरोबर दादानें आपला हेतु साध्य करून घेण्यास सुरुवात केली. त्यानें आबास **नाशिकास** बोलावून घेतले व त्याच्या गैरहजेरींत विसाजी केशव सान्यास पुढें करून सर्व बार भरला व कोळ्यांस दंग्याचे कामीं सर्व प्रकारें साहाय्य करून पुरंदर किल्ला काबीज केला. पुढें आबाजी सासवडीं गेल्यावर दादानें सर्व गोष्टींचा न्याय-निवाडा केल्याचा निव्वळ फार्स केला व **विसाजी केशव** व कोळी यांस अभयाचा

कौल दिला व तसें करण्याचें आपल्या पुतण्यास बजावून ठेविलें. असा बनाव केल्यानें दादाच या कटाच्या मुळाशीं आहे हें कोणासही कळणें शक्य झालें नाहीं. अशा तऱ्हेनें कट यशस्वी झाला पण त्याचा जो मुख्य हेतु--म्हणजे पुरंदर आपल्या हातीं ठेवणें—तो मात्र तितकासा साधला असें दिसत नाहीं. पुढें मागें पुतण्याशीं दोन हात खेळण्याचा प्रसंग आल्यास दादास पुरंदर पाहिजे होता. आबाच्या ताब्यांत म्हणजे त्याच्या एका पक्षपाती गृहस्थाच्या ताब्यांत–पुरंदर असणें म्हणजे तो त्याच्याच ताब्यांत होता असें सकृद्दर्शनी वाटतें. पण वस्तुस्थिति थोडी निराळी होती. माधवराव धूर्त होता हें रघुनाथरावानें ओळखिलें होतें. तेव्हां तो धूर्त पेशवा आबाला वश करून घेऊन सर्वच डाव उलटवावयाचा! तेव्हां दादानेंच तो डाव खेळला व आबाकडचा किल्ला काढून तो सरकारांत ठेवून घेतला. त्याचें चुकलें–किंवा माधरावानें हुकविलें असें समजा--इतकेंच कीं पुरंदर किल्ला त्याच्या हातीं न राहतां तो पेशव्याच्या ताब्यांत गेला!

या सर्व गोष्टींचा अर्थ इतकाच कीं पुरंदरप्रकरण यदृच्छेनें घडलें नसून, तें पूर्व-संकेतानें विवक्षित ध्येय पुढें ठेवूनच सिद्ध झालें. मात्र या राजकारणी कटाच्या मुळाशीं माधवराव नसून त्याचा चुलता **रघुनाथरावच** होता हें निखालस सत्य-नव्या पुराव्यानें सिद्ध होत आहे.

---

६ तांडव गणपति


[लेखक-कै. **ल. ना. जोशी**, पुणें.]

जारण, मारण व उच्चाटन या अथर्ववेदीय ' कृत्या ' शाखापैकींच– ' तांडव-नृत्य गणपति ' हें एक प्रकरण असून, त्याचा संबंध श्रीमंत दादासाहेब रघुनाथराव पेशवे यांच्याशीं असल्यानें या विषयाची माहिती सांगतों.

श्रीमंत राघोबादादा साहेब पेशवे यांचीं जी जन्मकुंडली मला इतर कांहीं कुंड-ल्यांसमवेत मेणवली दप्तरांत उपलब्ध झाली आहे ती अशीः—

श्रीशालिवाहन शक १६५६ (सन १७३४) आनंदनामसंवत्सरे श्रावण शुद्ध १३ गुरुवार सूर्योदयात् गत घ. ४२ प. १० इत्यादि, मकर राशी–जन्मस्थान माहुली.

रघुनाथराव दादासाहेब यांची जन्मकुंडली:—



ही कुंडली आजपर्यंत कोठेंच प्रसिद्ध झालेली नाहीं. फक्त दादासाहेबांचा जन्म-शक, तिथि आणि जन्मस्थान एवढ्याच गोष्टी प्रसिद्ध झालेल्या आहेत आणि त्या वरील कुंडलीशीं जुळत्या आहेत. मात्र या कुंडलीचें फलित काय आहे तें ज्योतिष्यांनीं वर्तवून सांगावें म्हणूनच ही कुंडली मुद्दाम येथें दिली आहे. ज्या स्थळीं मला ही कुंडली मिळाली तें स्थळ विश्वसनीय म्हणजे नाना फडणविसांचें मेणवलीचें दप्तर हें आहे. शिवाय त्या दप्तरांतल्या आणिक ज्या कांहीं कुंडल्या आहेत, त्यांच्याशीं प्रसिद्ध असलेल्या, किंचित् फरकानें पूर्णपणें जमतहि आहेत. यास्तव कुंडलीविषयीं अविश्वसनीयता वाटत नाहीं. या शिवाय दादासाहेबांचें चरित्र प्रसिद्धच आहे. त्याच्याशीं या कुंडलीचा कसा काय मेळ बसतो, एवढेंच काम होरागणितज्ञांचें आहे व तें ते करतील अशी मला आशा आहे.

रघुनाथराव दादासाहेब पेशवे हे जरी शूर पुरुष होते असें म्हणावयाचें तरी त्यांचा स्वभाव फार भोळा होता. ते अत्यंत द्रव्यनाशक होते. कपटपटु आणि तोंडपुजे स्वार्थी लोक त्यांना भावी थोरपणाचें प्रलोभन दाखवून त्यांच्याकडून पैका उकळीत. दादांचा स्वभाव स्तुतिप्रिय असल्यानें आणि त्यांच्या अंगीं दूरदृष्टि नसल्यानें त्यांची नेहमीं पैशाची तंगी होई. राज्यकर्त्याला आवश्यक असणारा जो पात्रापात्रविचार तो त्यांच्या अंगीं बिलकुल नव्हता. राज्य कारभार करणाऱ्याला मनुष्याचा प्रकृति-स्वभाव ओळखण्याची कला व योग्य वेळीं योग्य विचारानें वागण्याची त्यांच्या अंगीं पात्रता हीं नव्हती. त्यामुळेंच ते स्ववचननिष्ठ नव्हते. ते राज्याचे पूर्ण अभिमानी होते, पण स्वार्थी लोकांच्या संगतीनें ते वागत. त्यांचे सल्लागार घरफोडे आणि स्वार्थसाधु असल्यानें व त्यांना स्वतःला विचारपूर्वक वागण्याचा सराव नसल्यानें ते अखेरीस दीनावस्थेंत जाऊन पोंचले. स्वपराक्रमापेक्षां मंत्रतंत्र—जादुटोणे यांवरच त्यांचा भार फार असे. मंत्रतंत्रानेंच

आपली महत्त्वाकांक्षा सिद्धीस जाईल असा त्यांचा मानसिक विकास होता. नानासाहेब आणि भाऊसाहेब ह्यात होते तोंपर्यंत फाजील महत्वाकांक्षेच्या नादीं ते लागले नाहींत. हे दोघे होते तोंपर्यंत त्यांचा एकट्याचा अव्यवस्थित असा अफाट खर्च भागविला जात होता. त्यांच्या पश्चात् त्या गोष्टीला बराच आळा पडल्यानें, त्यांच्या मनांत वाटणीची कल्पना त्यांच्या सल्लागारांनी भरवून दिली आणि त्या दोघांच्या पश्चात्, घरांत आपणच काय ते आतां सर्वश्रेष्ठ उरलों आहोंत, ह्या अभिमानानें त्यांचें मस्तक त्रस्त झालें. आपली इच्छा व आपली महत्वाकांक्षा तृप्त करून घेण्यासाठीं ते मंत्रतंत्राचे प्रयोग अधिक तीव्रतेनें करूं लागले. ते मूळचे स्वतः सूर्योपासक होते. रोज प्रातःकाळीं ते जळजळीत पाण्याचे एकशेंआठ अर्घ्य सूर्याला देत असत, त्यामुळें त्यांच्या करपल्लवांची आंतील अंगें, दोन्ही तळहात काळे ठिक्कर पडलेले होते. पण त्यांचे तोंडपुजे लोक तें औदार्याचें, दातृत्वाचें लक्षण असल्याचें त्यांना सांगून त्यांचें समाधान करीत. थोरल्या माधवरावांच्या हयातींत दादासाहेबांचीं तांत्रिक अनुष्ठानें विशेष जोरांत आलीं नव्हतीं. पण त्यांच्या पश्चात् नारायणराव पेशवेपदावर आल्यानंतर, तीं विशेष जोरांत सुरूं झालीं. सखारामबापूंना आपण पेशव्यांचे पेशवे व्हावे अशी फार दिवसांची लालसा होती. ती पूर्ण करून घेण्यास राघोबावांचून इतर कोणी पेशवा असण्यानें भागण्याजोगें नव्हतें. म्हणून त्यानीं राघोबाच्या मनांत स्वतः पेशवा होण्याची महत्वाकांक्षा उत्पन्न केली व ती पार पाडण्यास राघोबा एखाद्या उत्तम मांत्रिकाचा शोध करूं लागला. मराठेशाहीच्या दुर्दैवानें तशा प्रकारचा एक कोत्रकर या आडनांवाचा म्हैसूर प्रांतांतला ब्राह्मण भेटला व त्यानें दादासाहेबाला तांडवनृत्यगणपतीचें अनुष्ठान करण्यास सांगितलें व त्या अनुष्ठानाकरितां एक गणपतीची पत्र्यावर कोरलेली प्रतिमा देऊन अनुष्ठानाची माहिती सांगितली. याबद्दल दादासाहेबांनीं त्या ब्राह्मणाला मुठानदीच्या कांठीं शेखसल्याच्या शेजारीं पुण्यास एक सुंदर दुमजली हवेली नवी बांधवन राहण्यास दिली. ती हवेली आतां जरी नव्या लॉइड पुरांत गडप झाली आहे, तरी तिच्यांत लाकडावर किती सुंदर नक्षीकाम केलें होतें त्याची साक्ष म्हणून कांहीं उत्कृष्ट नमुने प्रदर्शनगृहांत मुद्दाम सरकारनें राखून ठेविले आहेत. ते फारच प्रेक्षणीय आहेत.

कोत्रकर मांत्रिकानें दादासाहेबांना जी तांडवनृत्यगणपतीची प्रतिमा, उपासनापूर्वक अनुष्ठान करण्यास दिली ती दीडदोन विती लांबीरुंदीच्या पंचधातूच्या जाडसर पत्र्यावर गणपति तांडव करतो आहे अशा स्वरूपाची कोरलेली आहे. नारायणराव पेशव्यांचा खून झाला त्यावेळीं दादासाहेब ह्याच अनुष्ठानांत गुंतलेले होते. स्वतःस पेशवाई मिळावी म्हणून दादासाहेबांनीं हें अनुष्ठान सुरू केलें होतें. हें त्यांचें अनुष्ठान चालू असतांच नारायणरावांचा खून झाला; आणि आपण उपासना करीत असलेल्या तांडवनृत्य गणपतीच्या अनुष्ठानानेंच ही जारणमारणोच्चाटनाची सिद्धी प्राप्त झाली

अशी राघोबाची समजूत होऊन गेली. नंतर तो गणपति बाजूला राहून राघोबांनीं पेशवेपद धारण केलें. सखारामबापूला दादासाहेब आपला शागीर्द म्हणत, पण तेच त्याचे उलटपक्षीं शागीर्द बनले. त्यांना आपला कारभारी नेमण्याचें त्यांनीं ठरविलें. परंतु इतर मुत्सद्यांचा जो कट झाला होता, त्यांतला वडीलकीचा मान त्यांना मिळाल्यानें व दादासाहेबांचें पेशवेपद टिकाऊन धरण्याची धूर्ततेची बुद्धि त्याच्या अंगीं असल्यानें त्यानें ती गोष्ट नाकारल्यासारखीच केली. ह्या भानगडींत सखाराम हरि गुप्ते ह्या नांवाचे एक अंबेगांवकर प्रभु गृहस्थ त्यांचे सल्लागार म्हणून पुढें आले. पण यापुढें त्यानंतर घडलेल्या इतर ऐतिहासिक गोष्टींची हकीकत सांगायाची नसून केवळ तांडवनृत्य गणपतीचीच हकीकत पुढें काय झाली तें सांगतों.

पेशवाईपद धारण करून दादासाहेब स्वारीवर निघून गेल्यावर त्यांच्या शिष्यवर्गांत जो एक शेडाणीकर नांवाचा शिष्य मागें राहिला त्यानें ती गणपतीची प्रतिमा लांबिवली व आपल्या शेडाणी गांवांतल्या एका पिंपळाच्या झाडाखालीं नेऊन ठेविली. पुढें कांहीं दिवसांनीं तेथून तो गणपती जो अदृश्य झाला तो साताऱ्यास एका ब्राह्मणाच्या घरीं असलेला उघडकीस आला. यावरून तो गणपति त्याच ब्राह्मणानें महत्त्वाकांक्षेस बळी पडून साताऱ्यास शेडाणीहून आणला असावा, अशी लोकांची समजूत झाली. पुढें सुमारें चाळीस पन्नास वर्षांपूर्वी साताऱ्याचे प्रसिद्ध गोडबोलेशास्त्री संन्याशी स्वामी यांच्या स्वप्नांत तो गणपती गेला. हे गोडबोले स्वामी राजश्री कामत या आडनांवाच्या एका सारस्वत ब्राह्मण गृहस्थाचे गुरु असल्यानें त्यानीं त्या गणपतीचा शोध करण्यास सांगितलें. राजश्री वामनराव कामत यांनीं शोध करून तो गणपति एका जुनाट विहिरींत टाकून दिला असल्याची माहिती मिळविली, तो विहिरींतून बाहेर काढण्याच स्वामींना दोनदां दृष्टांत झाला; त्यामुळें तो बाहेर काढण्याची शिष्य कामत यांना त्यांनीं निकड लाविली. परंतु तो जेथें जातो तेथें त्या घराण्याचें निःसंतान करतो अशी बातमी लागल्याची हकीकत कामतांना जरी सांगितली, तरी त्यानीं त्यांच्याकडून तो हट्टानें विहिरींतून बाहेर काढविला व त्याची रोज आपले घरीं पूजा करण्यास सांगितलें. गुरूची आज्ञा प्रमाण मानून वामनराव कामतांनीं तो गणपति विहिरींतून काढवून आपल्या घरीं आणिला व त्याची पूजाअर्चा सुरू केली. पूजाअर्चा सुरू झाल्यापासून वामनरावांच्या कुटुंबांतील माणसें एकामागून एक अशीं पांच सहा वर्षांत खलास होऊन, शेवटीं एकटे वामनराव कामतच शिल्लक राहिले व तेहि चारपांच वर्षांपूर्वी कैलासवासी झाले. त्यांच्या मागें त्यांच्याच घरांत राहात असलेल्या एका वृद्ध सारस्वत स्त्रीनें त्या गणपतीची पूजा करण्याचा क्रम सुरू ठेविला आहे. वामनराव कामतांचा निर्वंश झाला., तसा आणखीहि कांहींचा झाल्याची वदंता आहे. कामतांचें घर

साताऱ्यास शनिवार पेठेंत असून, त्यांच्या घराच्या ओसरीवरील एका भिंतीच्या कोनाड्यांत ही तांडवगणपतीची मूर्ति ठेविलेली आहे.[१]

एकंदरीत काय कीं, गाणपत्य असून त्यांच्या एका कुभक्तानें गणपतीच्या सेवेचा उपयोग दुष्कार्यासाठीं केल्यानेंच राघोबादादांच्या आयुष्याचें पर्यवसान तांडवनृत्यांतच शेवटीं झालें व शूरवीर दुर्दैवी ठरला.

---

[१]ह्या मूर्तीविषयीं सातारा येथील ज्ञानवृद्ध व सज्जन श्री. कृ. के. कोल्हटकर ह्यांस विचारितां त्यांनीं कामत यांचे घराचा पत्तामुद्धा काढला व कळविलें कीं, ही तांडवनृत्य गणेशाची मूर्ति पत्र्यावर कोरलेली नसून पितळेची व फूट दीडफूट उंचीची आहे. फुटक्या तळ्याच्या दक्षिणेस माटे–राममंदिरासमोर, कामत यांचें घर होतें. कामत ह्यांच्या गुरुभगिनी ताई चिपळूणकर ह्यांनीं ब्राह्मणाकरवीं त्या मूर्तीची सांप्रत पूजा चालू ठेविली आहे. ही मूर्ति पुण्याहून वाईस, नंतर साताऱ्यास, नंतर चिंचवड पुनः सातारा अशीं ह्या मूर्तीचीं स्थलांतरें झालीं. बाकी मूर्तीचा लौकिक जो वर आला आहे तो बरोबर आहे. श्री. कोल्हटकर यांचें त्यांनीं ही माहिती कळविली ह्याबद्दल अत्यंत आभारी आहों.

७ चौगुला

(श्री. शंकर नारायण वत्सजोशी, वांईकर)

[1] पाटिलकी संबंधानें व [2] देशमुखी संबंधानें मागें मीं कांहीं विचार मांडले; आज चौगुलकीविषयीं कांहीं माहिती देण्याचें योजिलें आहे.

आतांपर्यंत निरनिराळ्या कोशग्रंथांतून—शब्दकोश, ज्ञानकोश, व्युपत्तिकोश—किंवा इतिहासग्रंथांतून अथवा खेडेगांवासंबंधीं माहिती देणाऱ्या ग्रंथांतून चौगुल्या-संबंधी माहिती आली आहे. पण ती केवळ शब्दार्थ सांगण्यापुरती आहे. क्वचित् कोठें त्याची गत वा चालू परिस्थिति त्रोटकपणें सांगितली आहे म्हणजे केवळ शब्दार्थां-पेक्षां कांहीं ओळींनीं अधिक, अशी माहिती आली आहे. पण चौगुल्याच्या वेतनाबद्दल किंवा वतनाबद्दल, गांवकीबद्दल, गांवकींतील त्याच्या स्थानाबद्दल, तसेंच त्याच्या कामाबद्दल साधार व त्यांतल्या त्यांत स्वतंत्र तो विषय असें समजून कोणीं कोठें सविस्तर अशी चर्चा केलेली मला आढळली नाहीं. जी थोडी माहिती आली आहे, तीहि परस्पर विसंगत आहे.

डफ (१८२६), मोल्स्वर्थ कोश (१८५७), गांवगाडा–अत्रे कृत (१९१५), ज्ञानकोश (१९२४–२५), शब्दकोश (१९३४) इ. ग्रंथांतून जी माहिती आहे तींत डफ व डफचा अनुवाद करणारे आणि गांवगाडा व त्याचा अनुवाद करणारे असे सामान्यतः दोन प्रकार दिसतात. 'चौगुला' ह्या शब्दापुढें (ज्ञा. को. भा. १३) डफवरून माहिती दिली आहे (च २१८–२१९) आणि 'अलुती बलुती' ह्या शब्दापुढें (ज्ञा. को. भा. ७ अ ५२७) गांवगाड्यावरून माहिती सांगतांना चौगुल्याबद्दलहि कांहीं ओळी दिल्या आहेत. डफचें लिहिणें अपुरें, फार थोडें, त्रोटक आहे, पण इतिहासाला धरून आहे; आणि गांव–गाड्यांतील माहिती चालू वाहिवाटीची ओळख चांगली पटवून देणारी असली तरी तींत इतिहास फारच कमी आहे, नाहींच म्हटलें तरी चालेल! आणि जो थोडासा आहे तो चुकीचा आहे. गांवगाड्याची भाषा शुद्ध मराठी व अतिशय चटकदार आहे हें खरें;

---

१ त्रै० वर्ष १३ अं. २. २ त्रै० व २४ अं. २ = ऐ. सं. नि. भा. १ पृ. ५९ ते ७४.

पण तींत ठिकठिकाणीं इतिहासविषयक ज्या संज्ञा उलगडून दाखविल्या आहेत व त्या दृष्टीनें जें विवेचन केलें आहे तें बहुतेक चूक आहे. ह्यां संबंधींचीं कांहीं उदाहरणें पहा. सरंजाम व जहागीर ह्यांतील फरक सांगतांना अत्रे म्हणतात, 'मुसलमानांनीं दिलेल्या इनामांना जागीर किंवा जहागीर म्हणत व मराठ्यांनीं दिलेल्या इनामांना सरंजाम म्हणत' पृ. ३९. हे दोन्ही चूक आहे. विशेष विवेचन नको. पृ. ४३ वर देशाधिकारी संज्ञेची फोड त्यांनीं केली आहे. 'जमेदार, दरकदार व प्रांतवतनदार ह्यांना बहुमानार्थी देशाधिकारी म्हणण्याचा संप्रदाय असे.' वस्तुतः असा संप्रदाय मुळींच नव्हता. देशाधिकारी हा वतनदार नाहीं; तो सरकारनें नेमलेला सुभ्यावरील अंमलदार आहे व म्हणून त्यास सुभेदार म्हणत. सुभेदार ह्या फारसी शब्दाला मराठींत देशाधिकारी ही संज्ञा योजिलेली आहे इतकेंच. ह्यांत बहुमान वगैरेचा कांहीं संबंध नाहीं. जमीदार व दरकदार हे तर अगदींच भिन्न आहेत व त्यांना देशाधिकारी मुळींच म्हणत नसत. 'बाजे वतनदार' ह्या शब्दांबद्दलहि असेंच लिहिलें आहे पृ. ४५. 'बाज म्हणजे संपादन केलेला, गुणी, जसे तालीमबाज.' वस्तुतः 'बाजे' म्ह० इतर; मुख्याहून दुसरे ते, अवांतर, वरकड, गौण. बाजे लोक, बाजे मरातब, बाजे वतनदार इ. इ. पृ. ४९ वर वेठबेगार ह्यांतील बेगार ह्या शब्दाचा अर्थ दिला आहे. कलां किंवा विशेषसें ध्यान नको त्यांना बेगार म्हणतात. सोनार व पोतदार ह्याविषयीं लिहिलें आहे. पूर्वी टांकसाळी नव्हत्या. सबब खरे खोटें नाणें ओळखणें कठीण पडे. हें ध्यानांत आणून गांवानें सरकारी आणि खाजगी देण्यातलें नाणें पारखण्याला व जिम्मा घेण्याला सोनार उभा केला व त्याच्या हुद्याला पोतदार नांव ठेविलें पृ. ५२. पोतदार हा सर्वत्र सोनारच असे असें नाहीं. तात्पर्य, अशा पुष्कळच चुका इतिहास दृष्टीनें पाहतां त्या ग्रंथांत आढळतात. भाषेच्या दृष्टीनें चटकदार असलेलें लिखाण ऐतिहासिक दृष्टीनें तितकें उपयोगी व खरें ठरेलच असें नाहीं व हें आजहि आढळतेंच.

असो; चौगुल्याबद्दल लिहितांना असेंच चुकीचें व विसंगत लिहिणें गांवगाड्यांत आलेलें आहे. पृ. १३–१४ वर कारू नारू म्हणजे बलुतेदार व अलुतेदार, ह्यासंबंधींचें विवेचन चालूं असतां 'चौगुला हा बलुतेदार आहे व सामान्यतः तो तिसऱ्या किंवा दुसऱ्या ओळीचा म्हणजे थोरली, मधली व धाकटी ह्यांपैकीं तिसऱ्या म्ह० धाकट्या वा मधल्या रांगेचा बलुतेदार आहे; असें सुचविलें आहे आणि पुढें पृ. ५०–५१ वर गांवमुकादमानी ह्या प्रकरणांत 'गांवगाड्याचा हरकाम्या महार खरा; पण जातिभेदामुळें त्याला चावडी चढतां येत नसे. त्यामुळें शिवाशिवीच्या कामांत चौगुला हा पाटीलकुलकर्ण्यांचा तैनाती झाला. त्याचीं कामें चावडीची झाडलोट, गांवच्या दप्तराची ठेवरेव, दिवाणी, मुलकी, फौजदारी वगैरे कामासंबंधानें लोक चावडीवर बोला-

चणें आणि तेथें पाटील कुलकर्णी सांगतील तें खिजमतीचें काम करणें ' इत्यादि तपशील दिला आहे. नगर जिल्ह्यांतील अकोल्याचा दाखला देऊन, गांवीं आलेल्या कोण्या मोठ्या माणसासाठीं स्वयंपाकाची भांडीकुंडी जमविणें व पुढें तीं उटणें म्ह० उजळणें म्हणजे घासणें हीं कामें चौगुल्याचीं होत, असें म्हटलें आहे.

इतिहासांतील तर नाहींच व चालू वस्तुस्थितीहि केवळ अशी नाहीं. बहुशः प्रत्येक गांवचावडींत एखादा देव असे व त्यामुळें महार चावडी चढत नसे. पण ज्या चावडींत असें नाहीं तेथील चावडींत, चावडी भरण्याच्या आधीं म्ह. गांवलोक, गांवसना, गांव-बैठक भरण्याच्या आधीं, निरगुडीच्या चार फांद्या घेऊन झाडण्याचें काम आजहि महार करतो. आणि चावडी म्ह. गावगोत जमून सभा भरल्यावर मात्र तो चावडीच्या बाहेर किंवा चावडीच्या निमपडवींतच उभा राहतो. जातीभेदामुळें पाटलानें चौगुला हा तैनातीस धरला असें मुळींच नाहीं.

आतां इतिहाससाधनाच्या आधारें काय आढळतें तें पाहूं. चौगुला हा अलुत्यांत नाहींच, पण बलुतेदारांतहि नाहीं; तो गांवकामगार व मुख्य वतनदारांतील एक आहे; आणि गांववसाहातीच्या वेळेपासूनचा पाटलाचा तो हस्तक आहे. चौगुल्यासंबंधीचे उल्लेख शक १२६० व शक १३७० पासूनचे आढळतात. मात्र हे उल्लेख बखरग्रंथांतील आहेत. आणि पत्रादिसाधन-ग्रंथांतील उल्लेख शक १४०० पासून आढळतात.

चौगुला हा शब्द निवळ मराठी, देशी दिसतो. हा फारसी शब्द नाहीं. संस्कृतहि नाहीं. राजव्यवहार कोशांत पुढील श्लोक आला आहे.

> चौगुला ग्रामणी प्रोक्तो ग्रामरक्षस्तु कोतवाल्।
> कुलकर्णी ग्रामलेखी स्यात् पाटीलो ग्रामगोपकः॥ ३३२ ॥

ह्या श्लोकांत कोतवाल आणि पाटील ह्याला ग्रामरक्षक व ग्रामगोपकः हे समानार्थीच शब्द सांगितले आहेत. पैकीं कोतवाल म्ह. ग्रामरक्षक हें बरोबर आहे. पण कोतवाल ह्या हुद्याचा अंमलदार खेडेगांवाला नाहीं. शब्द ह्या दृष्टीनें कोतवाल ह्याला ग्रामरक्षक हा प्रतिशब्द दिला आहे तो बरोबर आहे. खेडेगांवासंबंधीचेच तेवढे शब्द ह्या श्लोकांत सांगितले असले पाहिजेत असें नाहीं. कोतवाल हा निराळा शब्द कोशकर्त्यांच्या ध्यानीं आला व तो त्यानें ह्या श्लोकांत सांगितला इतकेंच हें खरें, कीं, बाकीचे तीन शब्द खेडेगांवासंबंधीचे आहेत व त्या दृष्टीनें कोतवाल हा ही खेडेगांवाचाच वाटण्याचा संभव. ग्रामरक्षक ह्या दृष्टीनें ' जागल्या ' हा खेडेगांवाचा कोतवाल होईल. असो. मुख्य गोष्ट कीं, पाटला

ह्याला जो ग्रामगोपकः शब्द सांगितला तो तितका योग्य नाहीं. उलट ग्रामणी व ग्रामगोपकः ह्यांत श्रेष्ठ कोण हें पाहिलें तर 'ग्रामणी' हाच ग्रामगोपक पेक्षां उच्चार्थाचा वाचक ठरेल. नुसतें गांवाचें रक्षण करणें हेंच काम करणारापेक्षां गांवचा पुढाईत गांवचा नेता जो, तो अधिक श्रेष्ठ, व त्याचा वाचक जो ग्रामणी शब्द तो चौगुला ह्या शब्दाचा प्रतिशब्द म्हणून दिला आहे हें लक्ष्यांत घेण्याजोगें आहे. आणि सांगण्यासारखी गोष्ट कीं, एक काल व एक प्रांत विभाग असा होताहि, कीं, तेव्हां तेथें चौगुला हाच पाटलापेक्षांहि सर्व श्रेष्ठ म्हणून असे. ती हकीकत पुढें देतच आहे. सध्यां केवळ शब्दार्थाच्या दृष्टीनें पाहावयाचें आहे. अमरकोशांत पाटील-वाचक शब्द नाहीं किंवा आहे तो ग्रामणी अथवा ग्रामाधिप हाच आहे. ग्रामणीचा तिसरा एक अर्थ तेथें दिला आहे (नापित) तो प्रस्तुत लक्ष्यांत घेण्याचें कारण नाहीं. चौगुला शब्दाला ग्रामणी हा जो प्रति शब्द रा. व्य. को. त दिला आहे तो बहुवचनयुक्त म्ह. ग्रामण्यः ह्या पदानें बृहदारण्यकोपनिषदांत चवथ्या अध्यायाच्या तृतीय ब्राह्मणाच्या परिसमाप्तींत दोन वेळ आला आहे. 'ब्रह्म व आत्मा ह्यावर राजाचें रूपक करून राजाची ये-जा होत असली म्हणजे, भाष्यकार आचार्य म्हणतात, हे ग्रामण्यः हे ग्रामनेतारः असे असे वागतात. असो. प्रस्तुत एवढेंच ध्यानांत घ्यावयाचें कीं, चौगुला हा एकवेळ पाटलाहून श्रेष्ठ होता व हें राजव्यवहारकोशाप्रमाणें आणि महिकावती बखरींतील पुढें दिलेल्या उल्लेखावरून दिसून येतें.

चौगुला शब्दाच्या दोन व्युत्पत्ती संभवतात. चौगुला, चवघला, चौघुला, असाहि हा शब्द वापरतांना आढळतो. ह्याचें पूर्वीचें रूप चौकुला असें असावें. आणि ह्या शब्दांतील चौ व कुल ह्या दोन पदांपैकीं क चा ग होऊन चौगुल, चौगुला असा शब्द झाला. कुल-शब्दाचा अर्थ 'हलद्वयेन यावती भूमिर्वाह्यते तत्कुलं इति वदंति' असा कुल्लूकभट्टांनीं म. स्मृ. तील 'दशी कुलं तु भुंजीत विंशी पंच कुलानि च। ग्रामं ग्रामशताध्यक्षः सहस्राधिपतिः पुरम्'। ह्या (अ. ७ श्लोक ११९) श्लोकाची टीका सांगतांना दिला आहे. ह्यावरून प्रथम सहा बैलीं दोन नांगरांनीं जी भूमि वाहिली म्हणजे कसली जात असे त्या पिकाऊ भूमीचा वाचक हा शब्द होता; पुढें तोच कुल-शब्द ती जमीन कसणाऱ्या व्यक्तीला लक्षणेनें योजण्यांत आला. आणि मग शेत कसणारीं अमक्या गांवांत इतकीं कुळें आहेत; कुळभरणा पाहिजे; कुळवार कमी आहे इत्यादि प्रयोग रूढ झाले. कुल- पट, कुलकर्णी ह्यांतील; कुल-पद ह्याच अर्थानें आलेलें आहे. इतिहासकालांत चौगुल्यासंबंधीचे जे उल्लेख कागदपत्रांतून येतात ते पाहिले तर, चौगुला हा पाटलाचा सहाय्यक आहे असें म्हणावें लागेल. म्हणजे येथें पाटील श्रेष्ठ, चौगुला कनिष्ठ असें झालें. गांव वसाहत करतांना म्हणजे गांव-शिवार लागवडीस आणतांना ज्या ह्या सहाय्यकानें वर म्हटल्याप्रमाणें चार कुळें चाळागिलीं

म्हणजे तितकी भूमि नांगरून वहितीला आणिली, तो चौकुल, चौगुला झाला; अथवा मूळची जी थोडी जमीन होती तींनच इतर पड जमीन वहितीला आणून भर घालून ती ज्यानें चौगुणित केली तो चौगुला होय. पहिल्या व्युत्पत्तींत क–चा ग झाला आणि दुसऱ्या व्युत्पत्तींत इ त – चा लोप होऊन ण – चा ल झाला आहे. हे दोन्ही वर्णबदल व्याकरणमान्य आहेत. असो; अशा प्रकारें चौगुला संज्ञेची व्युत्पत्ति संभाव्य वाटते. कालदृष्ट्या आधींचा म्हणून चौगुल्याचा निर्देश जेथें आला आहे, म्हणजे महिकावती बखरींत, तेथें चवघला असें त्याचें रूप आलें आहे व ह्याच्याच सारखा दुसरा अधिकारी 'देसला' म्हणून तेथें दिला आहे. ही बखर बाळबोधींत लिहिलेली आहे. मोडींत नाहीं. म्हणजे क – चा ला वाचण्याचा संभव नाहीं. 'देसक' असाहि शब्द कागदपत्रांतून येतो. पण येथें देसला असाच शब्द आहे. पहिला देसला नंतर चवघला असा क्रम बखरींत आला आहे. ला हें शेवटचें अक्षर दोहोंत एकसारखें आलें आहे तरी पहिल्यांतील ला हा प्रत्यय होऊं शकेल, दुसऱ्याची संभाव्य व्युत्पत्ती वर सुचविलीच आहे.

चौगुला हा शब्द ऐ. कागदपत्रांतून क्वचित चौ ह्या संक्षेपानें येतो. व हेंच संक्षिप्तरूप चौधरी ह्यादि शब्दाचें आहे. तेव्हां सामान्यतः पाटील ह्या शब्दाशीं जोडून जेव्हां हा संक्षेप लिहिलेला असेल तेव्हां त्याचें वाचन चौगुला असें करावयाचें आणि शेटे महाजन किंवा पेठ बाजार ह्यांशीं संबंध म्हणून हा संक्षेप आलेला असेल तेथें तो चौधरी ह्या शब्दाचा दर्शक आहे असें समजावयाचें. देशावर–खानदेश, उत्तर हिंदुस्थान ह्या बाजूस–चौधरी, कानूनगो हे अधिकारी फार मोठे आहेत. त्यांतील चौधरी हे इकडल्याहून वेगळे आहेत.

चौगुला हा पाटलाप्रमाणें हुद्दा, अधिकार सांगणारा शब्द आहे. तो बव्हंशानें महाराष्ट्रांत मराठा ज्ञातींतील आहे. तरीहि पाटलाप्रमाणेंच इतर ज्ञातींतीलहि घराणीं चौगुले असल्याचें आढळतें. शिवरे गांवीं शिंपी चौगुले आहेत; दाभोळ हर्णैकडे ब्राह्मण चौगुले आहेत. मावळांत एका गांवीं केळकर घराणें चौगुलकी करणारें असल्याचें आमच्या संशोधक मित्रांनीं सांगितलें. कोकणात अविंध म्ह. मुसलमानहि ह्या हक्काचा अंमल सांगणारे आहेत. माळीहि चौगुले आहेत. असे असले तरी, चौगुला हा महाराष्ट्रांत मुख्यतः मराठा आहे.

'जथे चौगुले' असेंहि लिहिलेलें आढळतें सं. २० ले. ३०. सुपें येथील, पाटिलकींतील वडीलकी कोणाची ह्याबद्दल तंटा लागला. तेव्हां ज्यांच्या ज्यांच्या सडीसाक्षी म्हणजे जुने दाखलेपुरावे व संमती मागविल्या त्यांचा उल्लेख, समस्त भाऊ, जथे माळी, जथे गोलाड, जथे चौगुले असा केला आहे. जथे चौगुले म्ह० निरनिराळ्या गांवांतील मिळून अनेक चौगुले मंडळी.

चौगुला ह्या शब्दाचा वर म्हटल्याप्रमाणें जुना उल्लेख महिकावतींत येतो व तेथें तो अमरकोशकारांच्या सांगण्याप्रमाणें किंवा रा. व्य. कोशांत आल्याप्रमाणें ग्रामाधिप, ग्रामश्रेष्ठ ह्या दर्जानें येतो. उत्तर कोंकणच्या बाजूचा माहीम, मरोल, ठाणें इ. हा भाग प्रतापबिंबानें जेव्हां शिलाहारांपासून घेतला व त्याची पुनर्वसाहत केली, तेव्हां म्ह. सुमारें श. ११६३ मध्यें, मरोळ येथें, रखमाजीराव सोमवंशी देसला; आणि मालाड येथें गंगाधरराव देसला असे अधिकारी योजिले. त्याच वेळीं शेषवंशी यांस चौगुलेपद दिलें. प्रतापबिंबानंतर महीदेव, त्या नंतर केशवदेव हा सत्ताधीश झाला; आणि तेव्हांचा वृत्तांत अधिक दिला आहे. त्या वृत्तांतांत, मरोळकर देसला यास ९०० फद्यांची वृत्ति नंतर चौगुल्यास ५०० फद्यांची वृत्ति आणि म्हातरे, साहाणे त्यांसहि ४०० व ३०० फद्यांची वृत्ति दिली, असा तपशील दिला आहे. असाच तपशील मालाड स्थापण्याचा हि दिला आहे व तेथेंहि १००० फद्या देसल्यास, तर लगेच चौगुल्यास ६०० फद्या* दिल्या, असें म्हटलें आहे. त्यानंतर कांहीं वर्षांनीं कोंकणांत सर्वत्र तुर्काण प्रवर्तमान झालें. त्यांशीं नागरशा हा लढून कांहीं प्रांत सोडवूं लागला. ह्या सर्व धालमेलींत ज्यांना हाताशीं घेतले, त्यांचा गौरव केला व देश स्थीरस्थावर राखला. त्यासंबंधानें ह्या बखरींत बरीच विस्तृत हकिकत तिसऱ्या व चवथ्या अध्यायांत दिली आहे. ही सर्व हकीकत शक १४६० पर्यंतची आहे. त्यांत जीं 'नावाणिक' अशीं कुलें दिलीं आहेत. त्यांत प्रथमच म्हटलें आहे (पृ. ३४) कीं, 'देशा आलिया कुळांस वृत्ति दीधल्या' सूर्यवंशी राज्यधामी माहिमी स्थापिले। शेषवंशी सिंदे कुळें ९ नव, त्यासी चवघले मुख्य करोन दिधले॥, ह्यापुढें चवघले ४; व ह्यांचीं धारपूरकर बाळकोजी पहिला, दुसरा विठोजी गव्हाणकर, तिसरा थेवखंडकर व चवथा पाचघऱ्या, अशीं नांवें दिलीं आहेत. येथें बखरलेखकासंबंधानें सांगावयाची गोष्ट अशी कीं, लेखकास क्रमानें म्हटलें म्हणजे आधीं देसले म्हणजे देशमुख कोण तें सांगावयाचें होतें. पण लिहिण्याच्या भरांत न कळत चवघले किंवा चौघले हे आधीं लिहिले गेले व हें लक्षांत येतांच चवघल्यानंतर देसल्यांचा मोघम उल्लेख लगेच केला व तेथें म्हटलें 'याउपरांत यशवंतराव सोमवंशी रखमाजीराव देसले २७ कुळींचे, व या खालते चौघले' असें सांगून नवापैकीं राहिलेले चौगुले पुनः सांगितलें. ह्या हकीकतींत पाटेलांचा मुळींच निर्देश नाहीं असें नाहीं. पण तो चवघल्यानंतर आहे. देसाये किंवा देसले, नंतर चवघले, नंतर चौधरी नंतर म्हातरे नंतर साहाणे नंतर पाटील, हवालदार इ. म्हणजे चवघलेनंतर चौथे पाटील सांगितले आहेत. व 'येणेप्रमाणें वृत्ति दिधल्या, सिरपाव जाले, बैसकार सर्वांसी दिधला, देसायांसी मुलुख विचारला' इ. इ. वृत्त तेथें आलें आहे.

---

* फद्या = दोन पैसे.

ह्यावरून उत्तरकोकणांत श. ११९० ते १४०० पर्यंत देसायांच्या खालोखाल चौघुले असत. येथेंच एके ठिकाणीं म्हटलें आहे ' एकेका देसल्याकडे ४ चवघले. ' म्हणजे देशमुखानंतर चौगुल्याचा मान आहे. दुसरी एक गोष्ट येथें दिसून येते ती ही कीं, चौगुल्याप्रमाणें पाटील हेंहि शेषवशींच सांगितले आहेत व त्यांस चवघल्या- इतकीच ६०० अथवा ५०० फद्यांची वृत्ति मिळाली आहे. तात्पर्य, प्रथम चौगुले हे पाटलापेक्षां श्रेष्ठ, पण पुढें पाटील व चौगुले, बखरींत समसमान म्हणून सांगितले आहेत.

आतां प्रत्यक्ष कागदपत्रांत चौगुल्यासंबंधीचे जे उल्लेख आढळतात त्यांतील कांहीं लक्ष्यांत घेऊं. चौगुल्यांत चौगुला म्हणजे गांवचौगुला, देशचौगुला व जातचौगुला असे तीन प्रकार सांगितले आहेत. पैकीं गांवचौगुल्याचे, म्हणजे नुसते चौगुला ह्याच हुद्यानें सांगितलेले उल्लेख फार आहेत. देशचौगुल्याचे उल्लेख त्या मानानें कमी आहेत. कालदृष्ट्या पाहिलें असतां मिळालेल्या उल्लेखांत देशचौगुल्याचाच उल्लेख आधींचा सांपडतो शि. च. सा. ले. १ हा शक १४९४ मधील महजर आहे. परगणे खटावमधील अथर्ववेदी देशकुलकर्णी गांवकुलकर्णी ह्यांमध्यें कलह लागला असतां त्याच्या निर्णयार्थ २१ गांवची देसक मंडळी बोलाविली होती ह्यांत काजी, पेसवे, मुजुमदार, कानोजी राजे इ. राजनागरिक मंडळी असून देसकांत देसाईण तुकाई म्हणून आहे व त्यानंतर लखमनाक देसचौगुला हा आहे. व त्यानंतर मोकदम व बलुते बसले आहेत. ह्या ठिकाणीं मोकदम म्हणजे पाटील ह्यांच्या वरचा मान चौगुल्याचा असला तरी हा चौगुला देश-चौगुला आहे हें लक्ष्यांत घेतलें पाहिजे. ह्यावरून नुसत्या चौगुल्याचें स्थान गांवकींत कोणतें तें ध्यानीं यावयाचें नाहीं. कन्हाडचे साळोखे डुबल हे देशचौगुले आहेत (संशोधक–धुळें, ऐ. ले. चर्चा भा. २ पृ. २०–२१).

वर महिकावतींच्या बखरींतील चौगुल्याविषयींच्या उल्लेखांबद्दल सांगितलें त्यांत देसल्याच्या खालोखाल जो चौगुल्याचा उल्लेख आला आहे तो नुसता चवघले असा आहे. देश–चौगुला नाहीं. तो तसा मानणेंहि इष्ट नाहीं. जर मानले तर त्यापुढील पाटील, म्हातरे, हवालदार ह्यांचेहि उल्लेख सुटेच आले आहेत तेहि तसे मानावे लागतील व तें तर शक्य नाहीं.

बखरींत जसे देसले नंतर चवघले सांगितले; तसे पत्रादि कागदांत सांगितलें नाहीं. पत्रांतून देसचौगुला असेल तर वरील उल्लेखाप्रमाणें गावपाटला आधीं त्याची नोंद येईल; पण एरव्हीं मोकदमानंतर म्हणजे पाटलानंतरच चौगुलेव्यक्तींचे निर्देश सर्वभर आलेले आहेत.

लोकसभेंतील व राजदरबारचे गांवकामदार सांगतांना चौगुल्याच्या उल्लेखाचा क्रम मोकदम, चौगुले, बलुतेदार असा[1] सामान्यतः येतो. त्यांतच शेटेमहाजन त्यांचा निर्देश करणें झाला तर तो चौगुल्यानंतर करण्यांत येतो.[2] कान्होजी आंगरे यांनें चाकणची देशमुखी व पाटिलकीहि विकत घेतली. त्याच चाकण परगण्यांतील पिंपरी बुद्रुक ह्या गांवचीहि पाटिलकी कान्होजीनें श. १६४८ (इ. १७२६) मध्यें खरेदी केली. त्या खरेदीपत्रावर त्या वेळीं गांवच्या पाटलांच्या फक्त सह्यासाक्षी झाल्या. पण गांवगनाचे पाटील आणि खुद्द त्या गांवचे चौगुले व बलुतेदार त्यांच्या साक्षी तेव्हां झाल्या नाहींत. त्याकरतां तेंच खरेदीखत पुनः लिहून त्यावर राहिले त्यांच्या संमतीदर्शक साक्षी घेतल्या. त्यांत त्याच म्ह० पिंपरी गांवच्याच चौगुल्यांच्या साक्षीपासून प्रारंभ केला आहे. तेथें त्या गांवच्या पाटलाचा निर्देश नाहीं. तात्पर्य, चौगुल्याच्या साक्षीची अशी अवश्यकता असल्याचें दिसून येतें व त्याच्या उल्लेखाचा क्रम गांवकामदारांत पाटलानंतर लगेच आहे.

एकदां चौगुल्याचा निर्देश बलुतेदारानंतर केला गेला. पण त्याच पत्रांत पुढें बलुतेदारापूर्वीं तो शब्द लिहून त्याचें योग्य स्थान तेथेंच दर्शीन केलें आहे. देशचौगुल्याचा उल्लेख मात्र गांवपाटलाच्या आधीं येतो व तें सरळच आहे. शिवसा २. ले. २०३.

असेंच एकदां छत्रपति शाहू महाराजांनीं मसूरची देशमुखी जगदळ्याची अप्रतांना स्वतःकडे ठेवण्याचा मानस धरला होता. पण ती, सेनापति धनाजी जाधवरावांच्या आग्रहामुळें यादवांना दिली तथापि असें करणेंहि केवळ जोरावरीचें; ह्यांत पंचगत म्ह. पंचाईन म्ह. न्याय नाहीं; हें जाणून सर्व गोतांनीं मिळून जगदळ्यांची देशमुखी असल्याचा महजर करून दिला. त्या महजरावर फक्त देशमूख, देशकुलकर्णी, गांवोगांवचे पाटील–कुलकर्णी ह्यांच्याच नोंदी व साक्षी आहेत. ह्यांत बलुतेदार मुळींच नाहींत. अशांत दोन चौगुल्यांची साक्ष निशाणी नांगर करून आली आहे.*

खं. १५ ले. १३ हें पाटिलकीचें क्रयपत्र आहे. त्या पत्रावर चौगुल्यांचीं दोन नांवें दिलीं असून त्यांची निशाणी नांगर न सांगता काठी सांगितली आहे. काठी ही निशाणी दोघांची संभवते. एक जमीन मोजण्याची काठी व दुसरी महाराची. पैकीं शेतजमीन मोजणीची काठी ही येथें लक्षांत घ्यावयाची आहे. म्ह. चौगुल्याचें हें एक काम आहे.

---

१ सनदापत्रें पृ. १७ ले. १२, ४९; शि. च. सा. १ ले. ४१, ४९; शक १८३४ इ. वृ. पृ. ५६; शि. च. सा. २ ले. २२५; खं. १५ ले. ३३, ४८; पुरं. द. १ ले. ७६; चंद्र. १ ले. ८ इ. इ. २ पे. द. ३१ ले. ५१, ९२; खं. १३ ले. १०३ मध्यें साके- गावच्यां 'अडाण व बलुतेदार' यांची यादी आली आहे त्यांत चौगुला नाहीं. * खंड. १५. ले ५९.

एकदां तर असें झालें कीं, पुणें परगण्यांतील कविठे ह्या गांवाचा जानोजी वेवगे ह्याजकडे चौगुलकीही होती आणि पाटिलकीही होती. पण ह्या दोन्ही वतनांचीं कामें करणें त्याच्या बापास = कनकोजीस – अंमळ जड जाऊं लागलें असावें; व म्हणून कनकोजीनें आपल्या मोकदमीच्या कामाकरतां रामोजी सिपारेकर हा 'जेवणाईत करून' म्हणजे पदरीं सहाय्यक म्हणून ठेवला. पुढें ह्या रामोजीस पाटिलकीचा लोभ उत्पन्न झाला व त्यानें तें वतन आपलेंच व्हावें ह्यासाठीं 'कनकोजीस मारा करून ठार केलें.' आणि पाटीलकीकरतां ह्या वेवगे घराण्यानें पुनः नांवहि घेऊं नये म्हणून सर्व प्रकारें त्याची दुर्दशा केली; त्याचीं गुरेंढोरें घेतलीं, त्याची वस्तभाव लुटली असा छळ आरंभिला. ह्यावेळीं जानोजी तर लहान मूल. पुढें जानोजी जेव्हां मोठा झाला व आपली पाटीलकी हस्तगत करण्याचा यत्न करूं लागला. तेव्हां आपल्यास ह्या कामीं कोणी पाठीराखे ऐसा असावा; म्हणून त्यानें भोसले घराण्यांतील दसोजी विठोजीस आपलें निमें चौगुलकीचें वतन हक्कमान-पानांसह करार करून दिलें. त्या करारपत्रांत भोसल्याला जानोजीनें असें लिहून दिलें कीं, गोतांत वाद सांगोन मला माझी मोकदमी हातास आली म्हणजे ती तुला (भोसल्यास) द्यावी आणि मग मी आपली चौगुलकी समुदी खावी. म्हणजे येथें पाटिलकी पेक्षां चौगुलकी श्रेष्ठ असें व्यवहारदृष्ट्या ठरतें. नाहींतर दोन्ही वतनें एकाकडे असतांना गुमास्त्याकरवीं पाटिलकीचें काम व स्वतः चौगुलेपण चालवावयाचें व शेवटीं देऊन टाकतांनाहि चौगुलपण स्वतःकडे ठेऊन पाटिलकी द्यावयाची; असें केलें नसतें. खं. १५ ले. ३८१

वाल्ह्याचा सोन ठाकूर हा मोठा तोलाचा व पथकदार सरदार व पुढें जहागीरदार झाला. पण तो आपल्या चौगुलकीविषयीं आपुलकी दाखवीत असतांना वाल्हे बस विल्या पासूनचा संबंध दर्शित करीत आहे. पुं. भा. ३ ले. १९३.

श. १६६० च्या आषाढ वद्य ५ ला पुणें गांवाची शांत केली. ह्या गांवशांतीच्या पद्धतींत एक नियम असा कीं, गांवाच्या बलुतेदार मांगानें डोक्यावर पेढियाची घागर घेऊन गांवाभोंवतीं टोणग्यासह फेरा घालावयाचा. ह्यावेळीं महार म्हणाले कीं ही घागर आम्ही फिरवणार. त्या वेळीं चिमाजी आपाच्या कानावर हें भांडण घालून पुढें जमीनदार व गांवकरी यांनीं तें मिटविलें व मांगाचाच हक्क खरा असा निर्णय झाला. त्या निर्णयपत्रावर पाटलांच्या सह्यांत चौगुल्याचा निर्देश आहे. पे. द. २७ ले. ३७९.

चौगुले व्यक्तींचीं नांवें पाहिलीं असतां चौगुला व चौधरी कांहीं ठिकाणीं एकच होत, असें त्या नांवांवरून म्हणतां येईल. कळसेटी बिन रामसेटी गुठाळा चौगुला, नाइकर्जी बिन सेट्याजी कापिरे चौगुला, भिकाजी बिन एसाजी जकाते चौगुला, हीं नांवें व्यापारांतील व पेठकरी मंडळींतील वाटतात. पहिलें नांव निंब (पर. वाई) येथील सदानंद मठाकडे अर्धा चाहूर जमिनीचा फाळा व इतर हक दिले त्या वृत्तिपत्रांत आलें असून, ह्या मठास जे इतर हक्क दिले आहेत त्यांत आगंतनिर्गत म्हणजे बाजारपेठेंतील येणाऱ्या जाणाऱ्या मालावरील कर दिला आहे. अर्थात् पाटलामध्यें ह्या कळसेटी रामसेटीचें नांव चौगुले आडनांव लावून आलें. तरी तें शेतीकडील अधिकारी म्हणून आलें असें म्हणण्यापेक्षां व्यापारी अधिकारी म्हणून आलें असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. दुसरेंहि नांव कोल्हापूरचे ग्रामोपाध्ये कोण म्हणून चाललेल्या भांडणाच्या निर्णयप्रसंगीं जी ब्रह्मसभा व महाजनसभा झाली त्यांतील मंडळींपैकीं म्हणून आलें आहे. अर्थात् तेंहि शेटेमहाजनाबरोबर म्हणजे पेठकरी अधिकारी म्हणून आहे. पण एक नांव असें गमतीचें आलें आहे कीं, चौगुला व चौधरी हे दोन्हीं एकच, एवढेंच नव्हे तर पाटीलहि तोच समजावा म्हणजे हे तिन्ही एकच होत, हें सांगणारें तें नांव आहे. चाकणचे कचेश्वर भट ब्रह्मे उपाध्ये ह्यांना, दर गांवास टका शाही एक व धान्य मण एक, असें इनाम, त्यांनीं अनुष्ठान केलें व पाऊस पडला म्हणून दिलें आहे. हें इनामपत्र सर्व चाकण परगण्याच्या देशमुख देशपांडे पाटील इत्यादि लोकाधिकारी मंडळींनीं दिलें पाहिजे व तसें तें आहे. त्यांत पिंपळगांवचे 'मोकदम' ह्या शीर्षकाखालीं 'अंकुसपा वा रामाजी चौधरी' असें नांव दिलें आहे, म्हणजे उद्दिष्ट व्यक्तीचें नांव सांगतांना त्याला 'पाटील' म्हणून म्हटलें आणि तें नांव पूर्ण करण्याकरतां त्याच्या बापाच्या नांवाचा निर्देश केला तो 'चौधरी' म्हणून केला व हा चौधरी पुत्र पाटील, मोकदम ह्या मथळ्याखालीं नमूद केला. म्हणजे येथें पाटील हाच मोकदम व चौधरीहि आहे असें म्हणतां येईल. वस्तुतः चौगुला, चौधरी व पाटील हे गांवकामगार तिन्ही वेगवेगळे आहेत. व त्यांतील चौधरी हा पेठेशीं संबद्ध आहे. गांव जर लहान असेल तर पाटीलच चौगुला, चौधरी व अवटीहि असेल. सिकरापूर येथें नवी पेठ बसविण्याच्या महजरावर अवजी बिन कृष्णजी सासवडा चौगुला व अवटी, असें नांव आलें आहे. येथें अवटीपणाचें—मापें, वजनें तपासण्याचें—काम चौगुल्याकडेच आल्याचें दिसतें. पहा पे. द. ३१ ले. १७८. पण बाजार पेठ जर मोठी असेल, म्हणजे बाजार नित्याचा व मोठा म्हणून आठवड्याचा चांगला

भरत असेल तर चौधरी, मोकीम, शेटे महाजन, अवटी, ढालदार, बिडवई, जोशी इत्यादि पेठेचे अधिकारी स्वतंत्र असणें अवश्य व रूढ आहे. पण अशी स्वतंत्र पेठ जेथें नाहीं तेथें पाटीलच चौगुला, चौधरी व अवटी असणें संभवनीय आहे. तसें शिक्रापूरचें असेल.

One episode in the life of Ramachandra Panta Amatya is practically still unknown. What was his attitude towards Shahu when the latter came down into the Deccan and started a war with Tarabai? Was he wavering or steadfast in his services to Shivaji II? Did he have any share in the revolution which occurred in Kolhapur in 1714 and on account of which Tarabai and her son were deposed and Sambhaji was seated on the throne? These are rather big questions and they cannot be satisfactorily answered till adequate material is made available. Merely an attempt is made here and tentative answers are suggested mainly in the light of some new evidence.

Rao Bahadur Sardesai takes the view that Ramachandra Panta maintained a neutral attitude during the "suicidal" wars[1] between Shahu and Tarabai. As regards the revolution in Kolhapur, no one has so far suggested that Ramachandra Panta had had anything to do with it. Let us discuss these two questions mainly in the light of some new material which I have been able to collect.

Rao Bahadur Sardesai believes that though Ramachandra Panta sympathised with the cause of Shahu he still stuck to the party of Tarabai.[2] That Ramachandra Panta remained on the side of Tarabai, is quite true. But was he all loyal? It is surprising that Rao Bahadur Sardesai has

१. " सारांश ताराबाई व शाहू यांजमध्यें उघड युद्ध जुंपलें तेव्हां त्या आत्मघातकी उद्योगांत आपण भाग न घेणें बरें असा शहाणपणाचा निश्चय पंतानें मनाशीं ठरविला आणि तोच अखेर पावेतों चालविला "

Marathi Riyasat, New ed., *Rajaram* p. 156.

2 *Idem* p. 154.

not fully utilised the document to which he has alluded in his book[3]. It is a singularly important document because it contains the terms offered by Ramachandra Panta and Shahu's reply to them. Ramachandra Panta asks for several things on his own behalf and on behalf of some others, and Shahu accepts all those terms if Ramachandra Panta would go over to him. As this document is not known to many, I have reproduced it in Appendix No. 1 to this article.

Why was this document ever drawn? Can any one who reads it take the view that Ramachandra Panta either kept himself aloof in the wars between Shahu and Tarabai or steadfastly and loyally stuck to the side of Tarabai? Ramachandra Panta, obviously with a view to desert Tarabai and join Shahu makes certain demands which are accepted by Shahu. "Everything", writes Shahu in his own hand, "shall be done as is mentioned in this paper. There shall be no default. We shall act our part when you join us. We take an oath that we shall do what we have promised".[4] A document containing such solemn declarations cannot be lightly treated. It shows that the negotiations between Shahu and Ramachandra Pandita had arrived at a decisive stage and that Ramachandra Panta was expected to go over to Shahu. The first step in the betrayal was taken by Ramachandra Pandita; but, then, why did he not actually desert Tarabai?

In the absence of some conclusive evidence it is not possible to give a complete answer to this question. Yet another equally important document, which is reproduced in Appendix No. 2 to this article, will provide an acceptable answer. This is a grant by Shivaji II to Ramachandra Panta Amatya. A comparison between what Ramachandra Panta had asked from Shahu and what he got from Shivaji

3 *Idem* pp. 155–56.

4 See Appendix No. 1; last few sentences are all in Shahu's own handwriting.

would be most illuminating. It is true that the two documents are not perfectly identical in respect of their contents. But any one who reads them can at once see the marked similarity between the two. The main purport of both is the same, and it can be said that what Ramachandra Panta would have got from Shahu was given to him by Shivaji II.

It is easy to show that Shivaji's grant came after the proposed grant of Shahu. Shahu's writing (Appendix No. 1) bears no date. But from internal evidence it is easy to see that it was issued before Nov. 1713. Among the demands of Ramachandra Panta, there is one which relates to some army leaders among whom is given the name of "Balaji Vishvanatha." Balaji was made Peshwa on Nov. 17, 1713. Since he is, in this document, described merely as "Balaji Vishwanath" it is permissible to conclude that the document was drawn before his appointment as Peshwa. One may even hazard the guess that the negotiations may have ultimately ended in nothing because of the fact that Shahu made Balaji his Peshwa. What, otherwise, would be the meaning of the following demand made by Ramachandra Panta? "I occupy", he says, "the high position of Hukumatpanah. I should be allowed to enjoy that high position and I should have the power and authority to supervise and control the government."[5] It appears that even after joining Shahu Ramachandra Panta wished to hold that supreme and superior position which he had enjoyed in the preceding two decades. Shahu appears to have consented to this request. But the preferment of such an able person as Balaji Vishwanath must have deterred Ramachandra Pant from fulfilling his engagement. This is only a surmise and even if it is proved to be baseless it will not affect our main conclusion. Since Shivaji's grant is dated Aug. 1, 1714, and since the negotiations between Shahu and Ramachandra

---

५, "आम्ही मान्यपुरुष हुकमतपन्हा आहो ते बालपणाचे सर्व कारभार आम्ही वडीलपण करूं" See Appendix No. 1.

Panta are of an earlier period, and since the contents of the two documents are strikingly identical, one can draw the conclusion that, because Ramachandra Panta got from Shivaji what he asked for, from Shahu he did not have any occasion to change sides. One even suspects that the fear of Ramachandra Panta's desertion may have goaded Shivaji II to make the grant of Aug. 1, 1714.

But did Ramachandra Panta remain perfectly loyal at least after this grant ? A political revolution occurred in Kolhapur about the end of August or beginning of Septem- ber, 1714, that is, soon after the date of the above mentioned grant. Tarabai and her son were deposed from power and Sambhaji was seated on the throne. This event in the history of the Marathas is still shrouded in a complete mystery. What were the causes of this revolution ? Who were mainly responsible for it ? These and many other questions still remain unanswered. What we are concerned with here, is the part which Ramachandra Panta may have played on this occasion. It is difficult to assume that a person of his position and importance did, or could, remain a mere spectator of the events. Many things suggest that he might have played such a part by which he won the favour of the new king. For one thing, the revolution did not disturb his official position. He continued to function as Amatya Hukumatpanah even under Sambhaji. Some grants, oo, were made to him and to his relatives.[6] But more mportant than this circumstantial evidence is an indirect re- erence to what Ramachandra Panta must have done at the ime of the revolution. It is a Portuguese letter written by he Viceroy of Goa to "*Ramchandra Pandit Amatya, subject f Sambhaji*", on Dec. 11, 1714.[7] The Viceroy says that

6 See *Bavada Daftar*. Vol. 1. P. 166. Seq., and Vol. 2, . 219, Seq.

7 *Arquivo Portugues Oriental*, Tomo I, Volume III, Parte II, etter No. 89.

he should have congratulated Ramachandra Panta and sent some presents to him. He then refers to the helpless condition in which the Queen-Mother (Tarabai) had found herself in the past, and hopes that the new government may be more energetic than the old.

The description of Ramchandra Pandit as a "subject of Sambhaji," the necessity of congratulating him, and the disparagement of Tarabai's government all make clear that Ramachandra Panta was complimented for the part he played in the recent revolution. One feels, therefore, that Ramachandra Panta must have associated himself with the forces of revolution in 1714.

It must, however, be emphasized that the conclusions arrived at in this article are only of a tentative character, because there is no direct, adequate and unquestionable evidence in the light of which all the points discussed here can be finally decided.

APPENDIX No. I

शाहूची सनद

श्री १/२

यादी दस्त तुम्ही लिहून पाठविल्याप्रमाणें मान्य केली असे—

सचनिश्या किलांच्या

१ पनाला	१ मांच पद्ममावली (ती)
१ प्रसीधगड	१ प्रचंडगड
१ भूदरगड	१ वंदनगड
१ विजयदुर्ग	१ सजनगड
१ सिंधदुर्ग	१ व्याघ्रगड
वतनी	१ वसंतगड
१ रत्नागिरी	१ प्रचीतगड
रामगड	१ महीमतगड
६	८

कारखानिश्या किलांच्या

१ कुलाबा	१ पावनगड
१ सिंधेदुर्ग	१ वर्धनगड

१किलांच्या सरदाऱ्या द्याव्या
वसन्तगड–मोगे ऊद्धव १
प्रतापगडी ठेवणे तो आम्ही ठेऊं
वर्धनगड १ मुदरगड १
सारंगगड १ पांडवगड १
मुलकी सुभेदार आम्ही आपले
निसबतीचे ज्यास देऊं ते चालवावे

लष्करच्या मजमा आमचें निसब-तीच्या करार कराव्या——

शेनापती १ सर लष्कर १ हिंदूराऊ घोरपडे १ संताजी पांडरा कुसो मलहार १ बाळाजी विश्वनाथ १ विज्यापूर प्रांतीची सरदारीचा सरंजाम रा। मोरे-श्वर राऊ यांच्या नांवे चालत आहे तो व फुटगांव त्याच्या सरंजामाचें आहेत ते चालवावे. या खेरीज बाबतीचे सुभे जमावाकडे दिल्हे आहेत ते चालवावे

सुभा खाटाव १ सुभा माण १ सुभा मिरज १ फुटगांव कोकण प्रांते
१ करवुडे ता। हातखंबे
१ निवडे ता। सैतवडे
२

ईनाम गांव आहेत ते चालवावे
राशिवडे गांव संताजी चव्हाण यांसि
घरांत साडी वाइगणी ता। पांवस १
चोळीस १ मौजे वेतोसी ता।
शेलोली चिरंजीव हातखांबे रामराऊ-
बाजीरावास १ बाबाजी बाबाजी
नरगुंदे कर १
यासी रंगमहरचा
एक गांव दोनी हजार
लारी कनाल दस्ताचा
घ्यावा १

जाउली १ प्रा कऱ्हाड १ प्रा
दाभोल १ सुभा मिरज १ बाला
घाट १ सुभा खटाव १ सुभा वांई १
प्रांत हुकेरी १ सुभा राजापूर १
प्रा पनाला १ संगमेस्वरचा हवाला १
दौलताबाद १ सातारा १
वतने चालत आहेत त्याची पत्रें
करून घ्यावी
सरदेशमुखी ता आर्जीरे देशकुलकर्णी
ता सालसी १ ता खारेपाटण ?
सदरहू वतने चालत आहेत त्यांची
पत्रें करून घ्यावी याखेरीज सावोत्रा
राज्यातील वतन करून घ्यावे
नरगुंद प्रांतीचे किले व कोट देखील
कोपळ आमचे निा आहे ते चालवावे.
सरदारी आपाजी सुरोस द्यावी १
आरमार आमचे निा आहे ते चालवावे
विजयदूर्ग आमचे रत्नागिरीस किलांचे
खासा आरमार १ आरमार आहे ते खेरीज
गुराच सीवाडा करून धोंडो भास्करा
२ ५ कडील होते ते देवावे १
जिल्हा आपणाकडे द्यावा
घाट प्रांत प्रांत कोकण सुभे

१ जाऊली	
१ व्याघ्रगड	१ सुभा दाभोल
१ वांई	१ ता संगमेस्वर
१ सातारा	१ सुभा राजापूर
१ कऱ्हाड	१ सुभा कुडाळ
१ मलकापूर	१ सुभा बांदे
१ पनाला	१ सुभा फोंडे
१ तारले	१ सुभा लाडवाडी
१ कोल्हापूर	१ सीवेस्वर
१ मिरज	१ अ.कोलद्दत्तो
	८

चिरंजीव राजश्री बाजीरावांच्या
नांवें मजमू देऊन बहुमाने चालवावे
आम्ही मान्य पुरुष हुकमतपन्हा
आहो ते चालवावे सर्व कारभार
आम्ही वडीलपणे करू मजमूचा
धंदा व जिल्हा मजमूचे निा चिरं-
जीव बाजीराव चालवितील त्यास
मजमूच्या नावे ऐवज पन्नास हजार
रुपयांचा व खासा आमचे खासगी
खर्चास पन्नास हजार रुपये येकून
(एक) लाख रुपयांची बेगमी
करून घ्यावी त्यास जे गांव
आम्हाकडे आहेत ते वजा करून
उरला ऐवज नेमून द्या १
वेंकटाच्यार्य यांचे बाप कानेर
(कोनेर) भट हे बहुत थोर ब्राह्मण
होते त्यास इनाम गांव मौजे
येकसर प्रां वाई आहे तो करार
करावा १
वेंकटराऊ कृष्ण यांकडे आमचे
जमेतीची घोडी आहेत त्याचा
संरजाम त्या प्रा आहे तो करार
करावा १
मुलकी मामल्यास मुतालीक
पहिल्यापासून आहेत ते चालवावे
कोकणांत एक ठेवावा लागतो व
वरघाटे येक ठेवावा लागतो त्या
प्रा करार करावा
१ रामराव बाबजी
१ श्रीनिवास सिवदेऊ
२

१ बिज्यापूर
१ आजीरे
१ पलीकडे तह्द तुंगभद्र
१ खटाऊ
१ माण
१ प्रांत परांडे
१ प्रा॥ बालाघाट
१ बेदर प्रांत
―――
१८

गांव मुकासे चालत होते ते करार करून चालवावे

कि॥ गाव खासा
१ वामोरी ता॥ राहुरी
१ का॥ नारायेणगांव
१ खांडाळे ता॥ कडेवलीत
१ तादली ता॥ गजणगाऊ वतन इनाम आहे
१ बेदेगाव ता॥ कन्हेदणर
१ वडथ ता॥ कन्हेदणर
१ दाबुरडी ता॥ नगर
१ कुलादावी ता॥ दहीगाव
१ कुसुबी ता॥ भेसे
१ का॥ मेसे
१ का॥ केडवे
१ का॥ वाई
१ पावसाल प्रांत वाई

कि॥ गाव खासा
१ सावगांव का॥ हुकेरी
२ धणगर
१ पांचगणी
१ नादु
―――
२
६ प्रांत पन्हाळा
१ पेठ
१ आईतकडे लोकचे
१ हातकणगले
१ आळप
१ दरेली ता॥ बोरगाव
१ कोताळी ता॥ बारगाव
―――
६
६ प्रांत मलकापूर
१ आंबर्डे
१ सीराळे
१ का॥ मलकापूर
―――
२

कि॥ कोकण प्रांत
६ सुमा दाभोल
१ नादगाव
१ नीवली
१ पालवण
१ कलबुसी
१ आडरे
१ गोवल
―――
६
६ ता॥ संगमेस्वर
१ मुरबांड (बुरवाड) १
१ तुरर
१ कडवई
१ सारद
१ कलबस्त
१ कुरधोडे
―――
६
२ ता॥ देवरुख
१ का॥ देवरुख
१ मुरादपूर

कि॥ कोकण प्रांत
४ ता॥ सोंदल
१ डोंगर
१ कन्हेरी
१ आंगले
१ मोरोसी
―――
४
२ ता॥ खारापाटण
१ तीथवली
१ दीगस
―――
२ का॥ प्रभावली
३ ता॥ नेबर
१ किसचा
१ पुसाले
१ कोतवडे
―――
३
४ ता॥ लांजे
१ हर्चे
१ भडे

३ प्रांत कऱ्हाड
१ तांबवे
१ वेहे
१ नाणे घोल
३

२ ता वारूण
१ दुखावडी
१ चादोली
२

२ ता हरचीरी
१ सोमेस्वर
१ का दोपरी
४ बंदर

१ खावडी
१ गाव्हाणे
४
१४
२६ तेरीज
४०

तेरीज
५१ वरघाट
४० कोकणप्रांत
९१

४ प्रांत तारले
१ हिरवडे
१ कुरकुली
१ धामणवाडी
१ संगरूल
४

१ बावती करसे गांवीच्या
६
१ त्रिपुडी ता पावचा
१ कोकीसरे ता मरली
४ प्रा बालाघाट
१ मोहु
१ खावसवाडी
१ हेटकूर
१ तलवडे
४

२ ता पावस
१ गोलय
१ कोलबे दो
इा सरदेसाई
४ ता हातखांबे
१ ऐसाडे
१ नीवसा
१ केले
१ माजगारू
४

१ दाभोल ता आजीरे
४ सुभा कोल्हापूर
१ कोगे
१ नंदगाऊ
१ नागाव
१ ईसफुर्ली
४
२५
२६ तेरीज २६
५१

१ सीरदवाड प्रां हुकेरी
१ हेरवाड प्रां हुकेरी
१ पाली ता कापसी
२ शेलोली ता खानापूर
१ मेघोली
१ वेगरूल
२

४ ता राजापूर
१ आडिवरे
१ नावे रा नारो नीलकंठ
१ गोटणे हरनीवडे
१ कलसोली
४
२६

किा गाव कारकुनाचे व लोकाचे आहेत ते चालवावे

तेरीज
९१ खासा
६५ कारकुन व लोक
१५६

४२ कोकण प्रांते
२३ वरघाट प्रांते
६५

येणेप्रमाणें मान्य करून हें पत्र सादर केलें आहे याप्रमाणें बिलाकुसूर तुमचे चालवू यास अंतर सर्वथी नाहीं * लिहल्या प्रमान वर्तनूक केली जाईल यास आतराय न होय तुमी आलीयावं चालऊ यास आतर करू तर आम्हा सपत अस.

मर्यादेयं
वीराजते

* " येथून " अक्षर शाहूचें.

APPENDIX No. 2

धाकट्या शिवाजीची सनद

{ श. १६३६ श्रावण शु. २
{ इ. १७१४ आगष्ट १

स्वास्ति श्रीराज्याभिषेक शके ४१ जयनाम संवत्सरे श्रावण शुद्ध द्वितीया इंदुवासरे* क्षत्री कुलावतंस श्रीराजा शिव छत्रपती स्वामी यानीं समस्त राजकीय धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित हुकुमत पन्हा यासीं आज्ञा केली ऐशी जे तुम्ही किले प्रसिद्धगडचे मुकामीं एकनिष्ठपणें स्वामींचे आज्ञेप्रमाणें सेवा करून राज्याभिवृद्धी केली ते समईं साहेबाजवळ तुम्ही अर्ज केला त्या प्रमाणें तुमचें चालवणें हें स्वामीस अवश्यक जाणून शफतपूर्वक वचन देऊन तुमचा हुद्दा व जिल्हा मामला वतनें गांव व मुकासे वरघांट व तळघाट कोकण करार केले असे बि तपशील

जिल्हा बाबती सुभेहाय

बाबतीचे सुभे कर्याती
१ सुभा पन्हाळा
१ सुभा कऱ्हाड
१ सुभा मिरज
१ सुभा कोल्हापूर
१ सुभा तारळे
१ सुभा आजरे
१ सुभा हुकेरी
१ सुभा बेळगांव
१ सुभा कुडाळ
———
९

विजापूरचा सरंजाम राजश्री माधवराव त्रिंबक याजकडे होता तो दूर करून तुम्ही अर्ज केला त्यावरून तुमच्या पुत्राचें नांवें करार केला असे देखील मुकाशे गांव कलम १

किल्ले नरगुंद व नवलगुंद व किल्ले रामदुर्ग येथील सरंजाम व गांव मुकासे...पथके पेसजी पासून तुम्हांकडे आहेत त्याप्रमाणें देखील किल्ले तुम्हांकडे करार केले असत कलम १

* खरे जंत्रींत रविवार आहे.

सदरहूपैकीं कदीम खासगीची
खेडीं आहेत तीं वजा करून
बाबतीचा ऐवज घेत जाणें
जिल्हे निसबत जकातीचे
बाबतींत व सर जकातीचा
ऐवज घेत जाणें कलम १

सरदेशमुखी ता। खारापाटण यासीं
इनामगांव
१ मौजे पोंबुर्ले
१ मौजे कोकीसरे
२

देशकुलकर्णी ता। आजरे यासी
इनाम गांव
१ मौजे वझरें
१ मौजे मुरुडे
२

तर्फ सोनवळें प्रांत कल्याण भिवंडी येथील देशमुखीचें वतन पुरातन तुमचे आहे हक लवाजिमा व शेते व बागाइत असतील तीं करार आहेत यासि वतनास गांव इनाम
१ मौजे सोनवळें
१ मौजे भादाणें
२

कसबा कऱ्हाड येथील कुलकर्ण हरी दामाजीबदल तुमचें आहे तें तुम्ही आपलें अनभवीत जाणें हक व शेतें पुरातन तुमचीं असतील तीं घेणें करार असे

साळशी माहालाचा दाहिजा पेसजी पासून तुम्हांकडे चालत आहे त्याप्रमाणें करार कलम १

सरदेशमुखी ता। साळशी यासीं
इनाम गांव
१ मौजे चिंदर
१ मौजे त्रिंबक
२

नाडगोंडी तर्फ तारळे व कोल्हापूर यासी
इनाम गांव
१ मौजे धामणवाडी तर्फ तारळें
१ मौजे गोकूळ शिरगांव तर्फ कोल्हापूर
२

मौजे तांदळी प्रांत करडे रांजणगाव येथील कुलकर्ण व जोतीष पुरातन तुमचें त्यास साहेबी रुपाळू होऊन मौजे मजकूर तुम्हास इनाम करून दिला असे पुत्रपौत्रीं अनभऊन असणें

इनाम गांव व मुकासे

इनाम गांव
१ मौजे राशिवडे आरळे
१ मौजे सावगांव कर्यात सांवगांव

मुकासे गांव
१ मौजे दाभोल ता। आजरे
१ मौजे भडगांव प्रांत कागल

१ मौजे हातकलंगडे ता। आळते
१ मौजे पाल ता। कापशी
१ मौजे दिगवले तर्फ साळसी
१ मौजे मुरादपूर ता। देवरुख
१ मौजे शेळोली ता। खानापूर
२ ता। संगमेश्वर
१ मौजे कडवे
१ मौजे बुरंबाड
१ कसबा नेवरें

१ मौजे कोतवडे
१ मौजे जरगी ता।
असंडोली नाडगोंडीस इनाम
१ मौजे तिथवली ता। खारेपाटण
१ मौजे बागवडे
१ मौजे उपळें रामनाथाचे
ता। रातांजन प्रांत
परंडे सौ। द्वारकाबाई यांस

१५

निसबत बारगाव
२ रा। संताजी चव्हाण
१ मांढरे तर्फ आरळे
१ मौजे वाईंगणी इनाम
१ मौजे साकरी तर्फ असंडोली
धनाजी नाईक घाटगे मुकासा

१ मौजे पाल ता।
नि। कानो पाध्ये इनाम
२ राजश्री हरि सावंत यास इनाम

१ मौजे सिरदवाड प्रांत कागल
१ मौजे वटेगांव प्रांत शिरोळ
१ मौजे कुंभोज
१ मौजे अकलखोप
१ मौजे नंदगांव ता। हवेली
४ तर्फ साळसी
१ मौजे फोंडे
१ मौजे हरकूल खुर्द
२ मौजे आसिये
१ मौजे मठ

४
३ ता। संगमेश्वर
१ मौजे तुरट
१ मौजे सरद
१ मौजे तुरधोंडे

३
२ ता। हरचिरी
१ कसबा
१ सोमेश्वर

२

१ मौजे तेरणी

११

खानवलकर यांचा सरंजाम व इनाम गांव व मुकासेबद्दल सनद प्रा। करार कलम १
तुमचे निसबत कारकून व भट ब्राह्मण यांस गांव व इनामवृत्ती दिल्या आहेत बद्दल सनद त्याप्रमाणें करार कलम १

१ मौजे उपळें
१ मौजे तारल
२ राजश्री यादवराव काटे यास इनाम
१ मौजे बसरंगे
१ मौजे हदवडे
१ मेघोली तर्फ खानापूर
राजश्री यशवंतराव गणेश
१ मौजे पडसाळ ता। तारळें
१ हशमाकडे करार

११

सदरहूखेरीज साळसी तर्फेस बाजे हशमाचे मुकासे व गांव इनाम तुमचे निसबतदार साटम व मिरवडेकर व तरदळेकर राणे व बाजे हशम यांस चालत आहेत. त्याबदल सनद प्रमाणें करार कलम १

तुमचे निसबतीचे हुद्दे व मामले व सबनिशा व कारखानिशा गडोगडच्या दिल्या आहेत बदल सनद त्या प्रमाणें करार कलम १

तुम्ही राजपंत श्रमसाहस करून गडकिले मुलुख सोडवला तो तुमचे निसबतीनें करार करून स्वामी चालवितील अंतर होणार नाहीं

येणें प्रमाणें जिल्हा मामला वतनें गांव व इनाम गांव मुकासे व जकाती सरजकाती तुम्हांकडे करार केलें असत तर तुम्ही या प्रमाणें अनभऊन स्वामीची सेवा एकनिष्ठेने करून आपला मजुरा करून घेणें स्वामी तुमचे दिवसें दिवस उर्जीत करून चालवितील जाणिजे * बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा (शिक्का)

मंडळवृत्त

शक १८६९ चैत्र ते भाद्रपद शु. १५ अखेर नवीन सभासद यादी

स. क्र.	सभासद नांव	गांव	वर्ग
२४०४	श्री. शरद् परशुराम जोग	पुणें २	वा. व. ४
२४०५	,, रावसा. रामजी सावळाराम काटे	पुणें २	,,
२४०६	,, निळकंठ चिंतामण जोशी	,,	,,
२४०७	,, यशवंत विनायक नामजोशी	,,	,,
२४०८	G. Narayan Rao	Bangalore	,,
२४०९	डॉ. गणेश यशवंत वाटवे	गदग	वा. व. २
२४१०	श्री. शिवराम भिकाजी मोघे	पुणें २	वा. व ४
२४११	डॉ. दत्तात्रय वासुदेव चाफेकर	गदग	वा. व. २
२४१२	श्री. प्रभाकर लक्ष्मण सासवडकर	पुणें २	वा. व. ४
२४१३	,, डोव्हिड गोपाळराव गायकवाड	पुणें १	,,
२४१४	,, गंगाधर बाळकृष्ण वाड	पुणें २	,,
२४१५	,, बाळकृष्ण मोरेश्वर कानिटकर	पुणें ५	आजीव वर्ग ४
२४१६	,, सावळाराम बाळाजी कुचल	मुंबई १६	वा. व. ४
२४१७	,, श्रीनिवास तम्मणाचार्य कट्टी	ग्वाल्हेर	,,
२४१८	,, मुकुंद शंकर नवाथे	पुणें २	,,
२४१९	,, रामचंद्र अनंत गोखले	,,	,,
२४२०	,, विनायक वामन गोडसे	,,	,,
२४२१	,, सखाराम विनायक सहस्रबुद्धे	,,	,,
२४२२	,, परशुराम विठ्ठल प्रतिनिधी	,,	,,
२४२३	सौ. सुमती दत्तात्रय मुळे	,,	,,
२४२४	प्रि. श्रीराम शर्मा (दयानंद अँग्लो वै. कॉ)	सोलापूर	आजीव वर्ग ४

पाक्षिकसभा

श. १८६९ चैत्र ते श्रावण ह्या अवधींत संमेलन व वाढदिवस सोडून तीन पाक्षिक सभा झाल्या त्यांत वाचलेले निबंध—

पा. स.	निबंध लेखक	निबंध
१	श्री. ग. रा. वाळिंबे	१ जंजिरा-सिद्दीसंबंधी एक पत्र.
,,	श्री. शं. ना. जोशी	२ मानवडची पाटिलकी.
,,	श्री. ग. ह. खरे	३ हिंगणे दफ्तरांतील कांहीं नवीं पत्रें.
२	श्री. अं. ब. वालावलकर	४ वालावली देवस्थानचा जाबता.
,,	,,	५ इ. स. १८२० मधील पित्रे यांचे पावतीपत्र.
,,	श्री. चिं. ल. नगरकर.	६ अहमदनगर येथील भिस्त बागेंतील लकड माहाल.
,,	श्री. चिं. ग. कर्वे	७ पंताजी शिवदेवांचीं कांहीं पत्रें.
,,	श्री. रु. वा. पुरंदरे	८ पेणकर ब्राह्मणांचा अधिक प्रसंग.
,,	श्री. शं. ना. जोशी	९ देहूकर तुकाराम संस्थानचे कागद.
,,	श्री. ग. ह. खरे	१० नेमाजी सिंद्याविषयीं एक फार्सी पत्र.
३	श्री. ग. रा. वाळिंबे	११ जंजिरेकडील महत्त्वाचा पत्रव्यवहार
,,	श्री. र. रु. पाटणकर	१२ ताम्रानुशासनम्
,,	श्री. शं. ना. जोशी	१३ असवलेकर जोसकुलकर्णी यांजकडील सनदा.
,,	श्री. चिं. ग. कर्वे	१४ स. माधवराव यांचे बहुरूपी-बद्दल पत्र.
,,	श्री. ग. ह. खरे	१५ पेशवे दप्तरांतील कांहीं नवीन पत्रें.

पुणें–नगर संशोधन पाक्षिकसभा

शक १८६९ चैत्र ते श्रावण ह्या पांच महिन्यांत पुढीलप्रमाणें सभा होऊन निबंधवाचन झालें.

न. सं. पास.	लेखक	लेख
१	कै. ल. ना. जोशी	१ कसब्याचा गणपति.
,,	चिं. ग. कर्वे	२ दातार घराणें व देवीची स्थापना -पाटणकर.
,,	शं. ना. जोशी	३ तुळशीबागकरांकडील कांहीं कागद.
,,	वि. त्र्यं. गुण्ये	४ जाती–चौकशीप्रकरणीं पुण्यांतील ब्राह्मणांची यादी.
२	कै. ल. ना. जोशी	५ अक्षत समारंभ.
,,	डॉ. मो. ग. दीक्षित	६ पुण्यांतील एक प्राचीन मृण्मय मूर्ति -प्रदर्शन.
,,	चिं. ग. कर्वे.	७ तुळशीबागवाले दप्तरांतील पत्रें.

चौतिसावें वार्षिक संमेलन : कार्यक्रम

दिवस १ ला, शक १८६९ ज्येष्ठ शु. ९ बुधवार दि. २८–५–४७

सकाळ ८॥–१०॥

चिटणीसः—श्री. चिं. ग. कर्वे–स्वागत व प्रास्ताविक भाषण.

कार्याध्यक्षः—म. म. द. प्रा. वा. पोतदार–गेल्या सालांतील ऐतिहासिक सभासंमेलनांचा व कार्याचा आढावा.

निबंधवाचन—

श्री. ग. ह. खरे– १ तुलादान.

श्री. य. रा. गुप्ते– २ Shivaji the Great's Seal, bearing the verse composed by Kavindra Paramanand, at the time of his coronation.

डॉ. रा. ग. हर्षे– ३ पासपोर्ट आणि कर्फ्यू यांचे ऐतिहासिक उल्लेख.

प्रा. प. कृ. गोडे– ४ The Mounted bowman on Indian battle fields from the invasion of Alexander (B. C. 326) to the battle of Panipat (1761 A. D.)

श्री. शं. ल. वैद्य– ५ वऱ्हाडांतील गांवाहिशेब व त्यांतील शकामितिबद्दल शंका.

दुपारीं ५–६

प्रि. वि. वा. मिराशी उमरावती– ६ नांदगांव येथील कृष्णदेव यादवांच्या काळचा शिलालेख शक ११७७.

श्री. द. वा. डिसकळकर– ७ होळकरी नाणीं.

श्री. सर. गं. ना. मुजुमदार– ८ हिंगणगांव (नगर) येथील शिलालेख.

व्याख्यान–प्रा. श्री. कृ. देव– हिंदुस्थानचा इतिहास व कालगणना.

दिवस २ रा, ज्येष्ठ शु. १० गुरुवार ता. २९ मे १९४७

सकाळ ८॥–१०॥, निबंधवाचन

प्रा. प. कृ. गोडे– ९ History of Rose, Rose-Water and Attar of Roses (between B. C. & A. D. 1850).

श्री. चिं. ग. कर्वे– १० ऋग्वेदांतील सुभाषितें–श्री. य. रा. दाते यांचा लेख.

डॉ. मो. गं. दीक्षित– ११ सांगली म्यूझियममधील कृष्णदेवराय (विजयनगर) ताम्रपट शक १४४३

प्रदर्शन— श्री. दि. गं. केळकर यांच्या राजासंग्रहांतील पेशव्यांचीं चित्रें.

दुपार ५–६॥

प्रा. रा. वि. ओतुरकर १२ पानशे यांजकडील कांहीं ऐतिहासिक कागद.

श्री. मो. रा. जोशी (धुळें)–१३ अंताजी माणकेश्वर यांचें स्वभाववर्णन.

श्री. वि. त्र्यं. गुण्ये– १४ पेशवे–दप्तर व मराठ्यांच्या सामाजिक इतिहासाचें संशोधन.

श्री. वि. सि. चितळे- १५ पुरंदर कोळी प्रकरणावर नवा प्रकाश.
श्री. चिं. ग. कर्वे- १६ कबजींचें आज्ञापत्र.
व्याख्यान-श्री. ग. ह. खरे- मातृका-गणाविषयीं माहिती.

दिवस ३ रा, ज्येष्ठ शु. ११ शुक्रवार ता. ३० मे १९४७

सकाळ ८॥-१०॥

श्री. गो. कृ. मोडक- १७ (१) ज्ञानेश्वरी पाठांतील जांवई शोध.
प्रा. प. कृ. गोडे- १८ The History of the Spectacles in India between A. D. 1500 and 1800.
श्री. शं. ना. जोशी- १९ चौगुला
श्री. ल. ना. जोशी- रागाचीं चित्र-प्रदर्शन

दुपार ५॥

श्री. य. रा. गुप्ते- २० The last Peshwa's family, his descendants and his heirs.
श्री. ब. मो. पुरंदरे- २१ घोडनदी-कुकडीची लढाई.
श्री. खाडीलकर- समर्थांनीं कृष्णातीर कां निवडलें ? चर्चा.
समारोप—प्रा. पोतदार

सदतिसावा वाढदिवस

शक १८६९ आषाढ शुा १ दि. १९।६।४७ गुरुवार

कार्यक्रम

सकाळीं ७॥-८॥-मंगलवादन

८॥-१०॥

प्रास्ताविक भाषण— चिटणीस–चिं. ग. कर्वे
कार्याध्यक्षांचें भाषण— म. म. प्रा. द. वा. पोतदार

निबंधवाचन

म. म. प्रा. द. वा. पोतदार– १ समर्थ नव्हे परमानंदच
डॉ. रा. ग. हर्षे— २ नवरस नारायणाचें शल्यपर्व
प्रा. प. कृ. गोडे— ३ Some Notes on the History of चन्दन (Sandal) in General and of श्वेतचन्दन (White Sandal) in particular—Between B. C. 500 and A. D. 1900.
श्री. ग. ह. खरे— ४ पेशवे-दप्तरांतील कांहीं फार्सी पत्रें
श्री. वि. त्र्यं. गुण्ये— ५ इ. १७८३ खोतीचें निवाडपत्र (शिवर्णे)
श्री. य. रा. गुप्ते— ६ Gajendra-Moksha as Depicted in the Gupta Temple at Deogarh (Dist. Jhansi)

प्रदर्शन—चित्रित रामायण तबक, दीपपंजर, सुमनचंबु (श्री. सतारवाला)

सायंकाळीं ५–८

श्री. शं. ल. वैद्य— ७ ऐ. कागद मिळवून लावण्यात येणाऱ्या अडचणी
श्री शं. वा. जोशी— ८ श्रीकृष्णाचे सद्‌गुरु कोण ?
श्री. य. ग. फफे— ९ छंदोभंग टाळण्याचे भागवतांतील कांहीं उपाय.

व्याख्यान—
श्री. रा. वि. पटवर्धन— शकपूर्वकालीन कांहीं संस्कृत ग्रंथांचा काल,

[साधारणसभा–ता. २९।६।४७ रविवारीं सकाळीं ८॥ वाजतां वार्षिक साधारण सभा पूर्व सूचनेनुसार झाली.

मंडळ ग्रंथालय

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणार
आवळसकर शां. वि.	आंग्रे-कालीन अष्टागर	शां. वि. आवळसकर
गव्हर्नमेंट ऑफ मद्रास	आनंद रंगा पिले डायरी	
"	भाग ७ वा १७३६-१७६१ (एप्रिल १७५० ते एप्रिल १७५१	
"	भाग ८ वा (मे १७५१ ते डिसें. १७-५३)	
"	भाग ९ वा (सप्टें. १७५४ ते डिसें. १७५५	
"	भाग १० वा (जाने. १७५६ ते जून १७५७)	
"	भाग ११ वा (जुलै १७५७ ते डिसें. १७५९	
"	भाग १२ वा (जाने. १७६० ते जाने. १७६१)	
गव्हर्नमेंट ऑफ इंडिया	एक्झिबिशन ऑफ दि एशिआटिक आर्ट ॲन्ड ऑर्कऑलॉजी	देणगी म. म. द. वा. पोतदार
अन्नमलाईनगर युनिव्हर्सिटी	प्रोसिडिंग्ज् ऑफ दि इंढियन हिस्ट्री काँग्रेस ९ वें अधिवेशन	देणगी
ओतूरकर रा. वि.	वीर मराठ्यांचा इतिहास	ग्रंथकार
ओरिएंटल बुक एजन्सी	कॅटलॉग ऑफ इंडॉलॉजिकल बुक्स् १९३०-४६	देणगी
कर्नाटक युनिफिकेशन लीग	केस फॉर युनिफिकेशन ऑफ कर्नाटक	देणगी म. म. प्रा. द. वा. पोतदार
कर्न इन्स्टिट्यूट	ॲन्यूअल बिब्लीओग्राफी ऑफ इंडियन ऑर्क्यालॉजी १९३८-३९	मोबदला
कुंटे विष्णु केशव	राव रामचंद्रराव भाऊसाहेब रेशिमवाले यांचें इंग्रजी चरित्र (म. म. प्रा. द. वा. पोतदार मराठीत)	देणगी
गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे	व्हिलेज हँडबुक	खरेदी
गोडे पी. के.	थर्टी इयर्स ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च ऑर बिब्लिओग्रफी	ग्रंथकार

चाफेकर डॉ. द. वा.	श्रीशिवराज्याभिषेक (एक अंकी नाटक) पुरंदरची फिर्याद	ग्रंथकार
"	चाकण किल्ला (एक अंकी नाटिका)	"
"		"
चितळे वि. सि.	ब्रिटिशांचा इतिहास. खंड १ ला; खंड. २ रा. पूर्वार्ध. खंड २ रा. उत्तरार्ध	ग्रंथकार
जोशी न. स.	महाराष्ट्रांतील पहिला लिंगायतसंत शांतीलिंगकृत कर्णहंस	संपादकाकडून
दाते य. रा. व कर्वे चिं. ग.	डॉक्टर केतकरांचें सांन्निध्य	चिं. ग. कर्वे
दीक्षित डॉ. मो. गं.	महाराष्ट्रांतील कांहीं प्राचीन ताम्रपट व शिलालेख	स्वीयग्रंथमाला
देशमूख इंदुमती व डॉ. चक्रधर धरणीधर	मेहेरबाबा यांचे अध्यात्मपर लेख व संदेश	ग्रंथकार
वेहेरे एन्. के.	मराठा रिनायसन्स	देणगी म. म. राजवाडे संशोधन मंडळ
भट भा. वा.	राजवाडे चरित्र	
भा. इ. सं. मंडळ पुणें	ऐतिहासिक संकीर्ण साहित्यखंड ७ वा	स्वीयग्रंथमाला
"	पुणें नगरसंशोधन वृत्तखंड ३ रा.	"
भावे वा. कृ.	मुसलमान पूर्वकालीन महाराष्ट्र	खरेदी
वैदिक संशोधन मंडळ	ऋग्वेद संहिता ९ व १० मंडलें	देणगी
श्री. आबासाहेब मुजुमदार सत्कार मंडळ पुणें	श्री. स. आबासाहेब मुजुमदार गौरव ग्रंथ	"
रा. ब. सरदेसाई गो. स.	न्यू हिस्ट्री ऑफ मराठाज्	देणगी
सेक्रेटरी हिस्ट्री कॉन्फरन्स हैद्राबाद	प्रोसिडिंगज् ऑफ दि डेक्कन हिस्ट्री कॉन्फरन्स हैद्राबाद फर्स्ट सेशन	ग्रंथकार
हर्षे डॉ. रा. ग.	ज्ञानदेवी	देणगी ग्रंथकार

मंडळभेट

शिक्षण संस्थाः-सेवासदन ट्रे. कॉ. पुणें, भारत इं. स्कूल ई ३ रा, स. प. कॉलेज इंटर वर्ग विद्यार्थिनी पुणें, हा विद्यार्थीवर्ग मंडळकार्य जाणण्यास व प्रदर्शन पाहण्यास आला असतां त्यांस श्री. शं. ना. जोशी व श्री. ग. ह. खरे ह्यांनीं माहिती दिली व प्रदर्शन दाखविलें.

ह्याशिवाय श्री. वांईकर–नागपूर, म. बा. आपटे–मुंबई, श्री. गणपती शास्त्री द्रेबार –काशी, श्री. रा. न. गोवासदार, रा. मा. गो हस्तक–रायपूर चांदा, श्री. वा. व. गोगटे–पुणें, श्री. कुंटे–भिंवडी, श्री. दे. गो. लांडगे–नागपूर, सौ. माणिकताई घाटे –बिलासपूर, श्री. फाटक-वकील-पांढरकवडा, श्री. न. रु. आचार्य–अकोला; श्री. गपचूप–पुणें, श्री. कन्हयालाल नगीनदास तर्फानिया–मुंबई व आफ्रिका; श्री. मा. वा. जोशी–मोहाडी, इत्यादि मंडळी मंडळ पाहून गेली.

प्रचार—श्री. शं. ना. जोशी हे गदग, लक्कडगी, हुबळी, बदामी, औंध, चिपळूण, गोवळकोट, परशराम, महाड–रायगड, देहू ह्या ठिकाणीं शिवोत्सव वगैरे निमित्तानें गेले असतां इतिहाससाधनें व सभासद मिळविणेचें काम केलें.

संतोषोद्गार

आज भा. इ. सं. मंदिरमे आकर अत्यन्त प्रसन्नता हुई। यह संस्था अपने गौरवपूर्ण इतिहासको वास्तविक रूपमे जनता के सन्मुख रखनेका बड़ा महत्वपूर्ण कार्य कर रही है। यहां आकर व्यक्ति भारतीय गतवैभव का थोड़ासा अनुमान पा सकता ह। इस प्रकारके कार्य की कितनी अधिक अवश्यकता है इसका अनुभव प्रत्येक भारतीय संस्कृती प्रेमीकरना है। यह संस्था अधिक से अधिक उपकारी हो सके यही प्रार्थना है।

नरेन्द्रजित्सिंह
कानपूर

ता. १९।३।४७

गोवर्धनदास व्ही. दयाळ

I was very happy to be shown round the Bharata Itihasa Sanshodhaka Mandala. I had seen the institution years ago as a student in Poona; but this visit in the instructive company of Mahamahopadhyaya Prof. D. V. Potdar enabled one to derive for more benefit from the perusal of the paintings and exhibits than the previous visits. The Society has done pioneering work in the field of Indian history and particularly Maratha history. It has had no lack of enthusiastic and scholarly interest; however like other worthy enterprises in Maharashtra it has suffered from shortage of funds. The time has now come when the Govt. should undertake responsibility for work of this sort and not leave it to the necessarily inadequate resourees and energies of a private body. When this comes to be, the collection of records and articles made by this Society would provide a most valuable nucleus. In the meantime however the Society is for space and accommodation and deserves every assistance to these ends.

Poona
10-8-47

Sd. S. G. BARVE
Collector, Poona Dist.

भारत इतिहास संशोधक मंडळाचे नवे पदाधिकारी

अध्यक्षः—श्रीमंत राजे माळोजीराव मुधोजीराव उर्फ नानासाहेब नाईक निंबाळकर, अधिपति संस्थान फलटण

उपाध्यक्ष—श्रीमंत राजे भावानराव श्रीनिवासराव उर्फ बाळासाहेब पंडीत पंत-प्रतिनिधी, बी. ए., अधिपति, संस्थान औंध

श्रीमंत राजे रघुनाथराव शंकरराव उर्फ बाबासाहेब पंतसचीव के. सी. आय., अधिपति संस्थान भोर.

श्रीमंत राजेश्री चंद्रशेखर गोविंद आगाशे, बी. ए., एलएल. बी., पुणें २.

कार्याध्यक्षः—महामहोपाध्याय प्राध्यापक दत्तो वामन पोतदार, बी. ए.

खजिनदारः—श्री. धोंडो कृष्ण साठे, बी. एससी., बी. ए.

चिटणीसः—श्री. चिंतामण गणेश कर्वे, बी. ए., प्रा. राजाराम विनायक ओतूरकर, एम. ए., डॉ. मोरेश्वर गंगाधर दीक्षित. पीएच्. डी,

सभासदः— प्रि. जगन्नाथ रघुनाथ घारपुरे, एम्. ए., एल्एल्. बी., लॉ कॉलेज, पुणें.

श्री. सरदार, गंगाधर नारायणराव मुजुमदार, सी. आय. ई.

श्रीमंत पांडुरंग केशव शिराळकर, कऱ्हाड

श्री. जनार्दन सखाराम करंदीकर, बी. ए., एल्एल्. बी.,

श्री. दिनकर गंगाधर केळकर,

प्रा. नरहर रघुनाथ फाटक, बी. ए., मुंबई

श्री. विठ्ठल त्र्यंबक गुणे. एम्. ए.

श्रीमंत शेठ गोपाळलाल मुकुंदलाल पित्ती, एम्. ए.

श्री. विश्वनाथ त्रंबक शेट्ये, बी. ए., एलएल. बी.,

डॉ. विश्वनाथ गोविंद दिघे, एम, ए. पीएच्. डी., मुंबई

भारत इतिहास संशोधक मंडळाची इतिहास शिक्षण समिती

दिनांक २४ ऑगस्ट पासून या समितीचें कार्य सुरू झालें. इतिहास संशोधन नि अध्यापन यांची सांगड घालण्यासाठीं तज्ज्ञांचीं व्याख्यानें करण्यांत आलीं. ऐतिहासिक माहितींतील शंकास्थानांची नोंद करण्याच्या दृष्टीनें अेक पत्रक तयार करून तें अनेक शाळांकडे पाठविण्यांत आलें आहे. या वर्षांत पुढीलप्रमाणें व्याख्यानें समितीकरवीं झालीं.

व्याख्यानें दिल्याबद्दल समिती वक्त्यांची आभारी आहे. पुढें त्यांचीं नांवें आणि विषय दिलेले आहेत.

दिवस	वक्ते	[विषय]
दिनांक २१ सप्टेंबर १९४६ —	प्रा. त्र्यं. शं शेजवलकर	[पानपत]
दिनांक १२ आटोबर —	श्री. शं. ना. जोशी	[चंद्रराव मोरे याचा खून, छ. संभाजीच्या मृत्यूची जागा, कल्याण सुभेदाराची सून कैद केली गेली काय ?, शिवजन्मतिथि].

दिनांक ३० नोव्हेंबर — श्री. कृ. वा. पुरंदरे [राजारामाला गादी-वर बसविण्याची योजना, शिवाजीची कीं त्याच्या मृत्यूची ?]

दिनांक ७ डिसेंबर — प्रा. रा. वि. ओतूरकर [हिंदुस्थानच्या इतिहासांत मराठ्यांचें स्थान].

दिनांक १४ डिसेंबर — प्रा. कृ. भा. बाबर [महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास].

दिनांक ११ जानेवारी १९४७ प्रा. भा. वि. काळे [अजिंठ्याची संस्कृति इपिडियास्कोपच्या सहाय्यानें].

दिनांक ८ फेब्रवारी — श्री. कृ. व. पुरंदरे [श्री शिवाजीमहाराजांना लिहिता वाचतां येत होतें काय ?]

दि. १५ मार्च १९४७ श्री. ग. ह. खरे [ऐतिहासिक क्रमिक पुस्तकांतील दोष.]

दिनांक ५ ऑगस्ट — डॉ. मो. गं. दीक्षित, क्युरेटर, डे. कॉ. रि. इन्स्टिट्यूट [सिंधु संस्कृति. सचित्र].

या व्याख्यानास नागरिक नि प्राथमिक शिक्षक यांची चांगली उपस्थित होती.

शं. दा. चितळे
के. त्र्यं. कवडे
चिटणीस.

मुंबईच्या विद्यापीठाच्या ' युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अॅन्ड सोशिऑलॉजी ' या अंगभूत संस्थेच्या रौप्य महोत्सवाचा कार्यक्रम ता. २० सप्टेंबर १९४७ रोजीं सुरू झाला. तन्निमित्तानें एक प्रदर्शन उघडण्यांत आलें. त्यांत हिंदी जीवनांतील अर्थशास्त्रीय विषयांचे सुमारें २०० आलेख लावले होते. तद्वत् समाजशास्त्रांतील एक अंग जे भक्तिप्रवणता तन्निदर्शक सुमारें १००० मूर्ति मांडण्यांत आल्या होत्या. त्यांत उपासना, देश, काल यामुळें उत्पन्न होणारें वैचित्र्य भरपूर होतें. या अंगाचें काम करण्यासाठीं संस्थेचे प्रमुख प्रो. वकील व समाजशास्त्राचे उपाध्यापक डॉ. थूथी यांच्या विनंतीवरून श्री. खरे यांस मुंबईस पाठविलें होतें. केलेल्या मदतीविषयीं प्रो.वकील यानीं साभार निर्देश केला आहे.

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ–स्वीय–ग्रंथमाला

* हा ग्रंथ मुंबई सरकारच्या प्राथमिक व दुय्यम शाळांच्या पुस्तकालयासाठीं मंजूर. ‡ हा शैक्षणिक (training) संस्था व शिक्षकग्रंथालयें यांसाठीं मंजूर.

१ अहवाल (शके १८३२) ३
२ ,, (शके १८३३) ५
३ सुवंत विचार(कै.वि.का.राजवाडे)१०
४ वार्षिक इतिवृत्त (शके १८३४) ५
५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (कै.वि.का.राजवाडे)१।८
*६ प्रथम संमेलन वृत्त(शके १८३५)०।२
*७ वार्षिक इतिवृत्त (शके १८३५) ६
*८ द्वितीय संमेलन वृत्त (शके १८३६)३
*९ वार्षिक इतिवृत्त (शके १८३६) ३
*१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० (शिवकालीन घराणीं) ३
*११ वार्षिक इतिवृत्त (शके १८३७) ६
*१२ तृतीय संमेलन वृत्त(शके १८३७)३
*१३ मुकुंद–महाभाष्य (संस्कृत) ०८
*१४ ग्रंथराज (दासोपंत) ०८
*१५ स्फुट प्रकरणें भाग १ ला ०।२
*१६ स्फुट प्रकरणें भाग २ रा ०।२
***मंडळ–त्रैमासिक** प्रत्येक पुस्तक ३
*१७ वार्षिक इतिवृत्त (शके १८३८) ३
१८ चतुर्थ-संमेलन-वृत्त (शके १८३८)३
*१९ राजवाडे-खंड-स्थलसूची ४
*२० पंचम संमेलन-वृत्त (शके १८३९)३
२२ चंद्रचूड–दप्तर–कला १ ३
२३ महाराष्ट्र–सारस्वत (संपलें) १०
२४ षष्ठ संमेलन-वृत्त (१८४०) ४
२५ सप्तम संमेलन-वृत्त (१८४१) ३
२६ संशोधकाची छोटी जंत्री ०४
२७ प्रदर्शन परिचय ०४
*२८ फारसी पत्रव्यवहार ५
२९ फार्सी–मराठी कोश ४
३० शिवचरित्रसाहित्य खंड १ ला १।८
३१ Historical Miscellany १
३२ पुरंदरे-दप्तर भाग १ ४
३३ शिवचरित्रसाहित्य खं. २ रा ४
३४ द. मध्ययु. इ. साधनें खं. १ २
३५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खं. १, २
३६ राजाराम–चरितम् १।८
३७ मंडळांतील नाणीं १
‡३८ शिवचरित्रसाहित्य खंड ४ १।८
३९ गोवळकोंड्याची कुत्बशाही रु. ४
‡४० ऐतिहासिक फारसी साहित्य रु.१।८
‡४१ द० मध्ययुगीन इ. सा. खंड. २
‡४२ ऐतिहासिक संकीर्ण सा.खंड२ १।८
४३ मंडळ चित्र ग्रंथ चित्रें २० ०८
४४ शिवकालीन पत्रसारसंग्रह खं.३ २॥
‡४५ विजयनगर स्मारकग्रंथ ४
‡४६ ऐतिहासिक फारसी सा.खंड२ १।८
४७ शिवचरित्रसाहित्य खं. ६ १।८
‡४८ मराठी सत्तेचा उत्तरविस्तार०।२
४९ शिवचरित्रवृत्तसंग्रह कानडा १
५० शिवचरित्रसाहित्य खंड ७ १।८
‡५१ ऐतिहासिक फार्सी साहित्य ३ १।८
५२ } शिवचरित्रवृत्तसंग्रह २ व ३
‡५३ } खंड: फार्सी विभाग प्रत्येकीं १।४
५४ पुणें नगर संशोधन–वृत्त खंड १ कि.१
५४ अ ऐ. सं. सा. खं. ३ ३
५५ शिवचरित्रसाहित्य खंड ८ १।८
५५ अ शि. च. सा. खं. ५ ३॥
५६ ऐ. संकीर्ण साहित्य खंड ४ २
५७ ऐ.संकीर्ण वाङ्मय साहि.खं. १ किं.१।८
५८ शिवकालीन दंडनीति–किं. ३
५९ पुणें नगरसंशोधन वृत्त खं. २ किं.१।८
६० ऐ. संकीर्ण निबंध खंड १ किं. १।८
६१ ऐ. संकीर्ण साहित्य खंड ५ १।८
६२ शिवचरित्र साहित्य खंड ९ १।८
६३ हिंगणे दप्तर १ ला खंड ३
६४ ऐ. सं. सा. खं. ६ १।८
६५ ऐ. सं. निबंध ३ २
६६ पुणें नगरसंशोधनवृत्त खं. ३ किं. १।८
६७ महाराष्ट्रांतील ताम्र-शिलालेख किं ३
६८ सं. साहित्य खं. ७ रु. २

टीप–ट. ह. व बंगी, व्ही. पी. वगैरे खर्च निराळा पडेल. ‡ हा ग्रंथ त्रैमासिकांत भागशः प्रसिद्ध झाला आहे. ४०–४२, ४६, ४८, ५१, ५३ स्वतंत्रहि मिळतात.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-पुरस्कृत-ग्रंथमाला

(१) मठगांवचा शिलालेख पृ. २४३—कै. रा. ब. चांदोरकर. रु. २ व रु. १०१४
(२) पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् पृ ५०—कै. स. म. दिवेकर. रु. ०१० व ०८
(३) श्री शिवभारत मूळ व मराठी भाषांतर—पृ. ५८९ मूल्य रु. ६ व ५०१२
(४) शिवचरित्रप्रदीप पृ.३२५—कागदी व कापडी. रु. ३॥ व ४ आणि रु. ३। व ३।‍=
(५) हिंदी शिल्पशास्त्र भाग १ ला. पृ. २००—कै.रा. सा. रु.वि.वझे रु.३ व रु.२
(६) शिवकालीन जंत्री शके १५५१—१६५० पृ. २००—कै. ग. स. खरे रु. ५॥=
(७) साधन—चिकित्सा पृ. ३२०—वा. सि. बेन्द्रे. रु. ३॥ व रु. ३
(८) ऐतिहासिक पोवाडे पृ. ६१५—य. न. केळकर. रु.३ व रु. २॥
(९) वाठारकर निंबाळकर-इतिहास पृ. ३०० रु. १॥ व १०३०३
(१०) मुतेश—आख्यान (०१२ व ०१०) (११) कऱ्हाड, (श्री. य. रा. गुप्ते, बी.ए). ०८
(१२) ऐतिहासिक प्रस्तावना पृ. ६००—कै. वि. का. राजवाडे रु.३ व २०६ ०६
(१३) राजवाडे यांचे संकीर्ण निबंध (पृ. २९१ श्री.शं. ना. जोशी रु. २ रु.१॥
(१४) राजवाडे संकीर्ण निबंध भाग ३ रा. पृ.२८० श्री. शं. ना.जोशी २ व १०१४
(१७) पुरंदरे—दप्तर, भाग २ रा. उत्तर पेशवाईतील पत्रव्यवहार रु. ३ व रु. २॥
(१८) The Escape of Shivaji from Agra रावसो देशपांडे—रु.३ व २॥
(१९) लोककथा, पुस्तक १ लें शं. ग. दाते कापडी, कागदी रु.१॥ व रु.१, १। व ०१४
(२०) पानसे घराण्याचा इतिहास कै. रा. ब. पानसे रु. ३ व रु. २॥
(२१) कै. वासुदेवशास्त्री खरे—चरित्र श्री. दा. मो. भट रु. २॥ व रु.२।=
(२२) लोककथा भाग२ रा. पृ.८०—श्री. शं.ग. दाते रु.१०८ व १०४ व १०४ व ०१४
(२३) संपूर्ण भूषण पृ. २३०—श्री. रा. गो. काटे—रु. १०८ व १०४
(२४) शिवचरित्रसाहित्य खंड ३ रा शं.ना.जोशी व ग.ह.खरे पृ.२८२—रु.३ व रु.२०८
(२५) राजधानी रायगड पृ. १६४—श्री. वि. वा. जोशी रु. १ व ०१२
(२६) Shivaji pp. 410-C. V. Vaidya Rs. 3 and Rs. 2-8-0
(२७) आळंदी पृ. २०—श्री. ग. ह. खरे ०२
(२८) मठगांवचा शिलालेख : कुडाळप्रांतेतिहास पृ.१६५ वाळावलकर रु. १०२ व ०१२
(२९) पुरंदरे दप्तर भाग ३ रा पृ. २५०—श्री. रु. वा. पुरंदरे ३ रु. व रु. २०८
(३०) मध्वमुनीश्वराची कविता पृ. २५८—श्री. कै. प्र. त्र्यं. गुच्ची ३ व २०८
(३१) मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमा पृ. ९०—श्री. वि. गो. दिघे रु. १ व ०१२
(३२) वेदस्तुति आणि स्फुट कविता कृष्णदयार्णवकृत—किं.०१२ व ०१०
(३३) ज्ञानप्रदीप पृ. १२५—प्रो. द. वा. पोतदार रु. १ व ०१२
(३४) पेशवाईच्या सावलींत पृ. ४००—श्री. ना. गो. चापेकर किं. रु.४ व ३.
(३५) मूर्तिविज्ञान श्री. ग. ह. खरे—पृ. २५०, ९४ चित्रें; मूल्य रु. ३०८ व ३
(३६) आठल्ये घराण्याचा इतिहास—वि. वा. आठल्ये पृ. ४४० ३॥—३.
(३७) किल्ले पुरंदर रु. वा. पुरंदरे किं. १ व ०१४
(३८) किल्ले विशाळगड पं. बा. शिरवळकर पृ. ९३ किं. १ व ०१२
(३९) श्रीशिवकाव्य प्र.—ह. वा. भावे, शं. ना. जोशी पृ. २६६—रु. २॥ व २
(४०) गुण्ये घराण्याचा इतिहास वि. त्र्यं. गुणे किं. रु. १०
(४१, ४२) वैद्य दप्तर खंड १ व पुरवणी. शं. ल. वैद्य २॥ व ३ रु.
(४३) खेड (जि पुणें) वर्णन (य. रा. गुप्ते) ०८

BHĀRATA ITIHĀSA SAṀSHODHAKA MAṆḌALA

POONA

Vol. XXVIII] Quarterly [No. 3-4

(111-112)

January-April 1948

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

वर्ष २८ वें]

त्रैमासिक

[अंक ३-४

(१११-११२)

१८६९-७० पौष-चैत्र

श. १८६९-७०] [सन १९४८

वार्षिक वर्गणी रु. ३ ट. हं. वगैरे निराळें फुटकळ अंकास १॥

Annual Subscription Rs. 3 Postage &c. Extra. Each No. Rs. 1-8

☞ बदललेला पत्ता अगत्य कळवावा.

हें त्रैमासिक मुंबई इलाख्यांतील प्राथमिक व दुय्यम शाळा आणि शैक्षणिक (Training) संस्था व मध्यप्रांतांतील हायस्कुलें व नॉर्मल स्कुलें व शिंघ यांसाठीं मंजूर आहे.

Printed by Messrs J. G. Joshi Janardan Sadashiv Ltd. Press, 394 Sadashiv, Poona 2 and Published by C. G. Karve, Hon. Secretary, B. I. S. Mandal, at 313A Sadashiv Peth, Poona 2, India.

प्रारंभादाखल

आंगरेकालीन पत्रव्यवहाराचा हा खंड भा. इ. सं. मंडळाचे द्वारें प्रसिद्ध होत आहे. आंगऱ्यांच्या इतिहासाचा एक साधनग्रंथ ' आंगरेकालीन अष्टागर ' गतवर्षी प्रसिद्ध झाला; त्यास हा खंड पोषक होईल असा विश्वास वाटतो.

प्रस्तुत पुस्तकांतील बहुतेक पत्रें चौलच्या अधिकारी दप्तरांतील आहेत. अगदीं मोजकीं ४।६ पत्रें अलीबागचे रा. केशवलाल मोदी यांजकडील असून, १।२ रा. एम्. जी. कुळकर्णी यांजकडील आहेत. हीं पत्रें प्रसिद्ध करण्यास अनुमति दिल्याबद्दल रा. अधिकारी, रा. मोदी व रा. कुळकर्णी यांचा आभारी आहें.

आंगऱ्यांचा इतिहास म्हणजे स्वतंत्र हिंदुस्थानच्या सागरी सत्तेचें यथातथ्य भव्य वृत्त, असें समीकरण मांडून जर कोणी या पुस्तकाकडे पाहूं जाईल, तर त्यास निराश व्हावें लागेल. या पुस्तकांत मारमारी अगर युद्धविषयक हालचालींचीं, बातम्यांचीं पत्रें अत्यल्प आहेत. पण, आंगरेकालीन अनेक सामाजिक प्रश्न कसे सोडविले गेले, याचें दिग्दर्शन येथें बरेंच होईल.

आरंभींचे १५ लेख इ. स. १५०० पासूनच्या अनेकविध रीतिरिवाजांची, उत्सवांची माहिती देत आहेत. अनेक गावांस नवीं नावें कशीं प्राप्त झालीं, मुख्य धंदा जो शेती त्याचे प्रगतीस पोषक असे कोणते ठळक प्रयत्न झाले, यांबद्दल पुष्कळ माहिती या पुस्तकांत सांपडेल. कुळकर्णी वतनाचा अष्टागरांतील इतिहास थोडक्यांत, पण योग्य शब्दांत ले. ३ मध्यें आढळेल. पोर्तुगीजांनीं रेवदंडा व कोर्लई हीं ठिकाणें आपल्या ताब्यांत आणल्यानंतर तेथें कोणती परिस्थिति उत्पन्न झाली, याची बरीच हकीकत १ ल्याच लेखांत व आणखी कांहीं लेखांत आढळेल. चौलचे वतनदार देसाई, देशकुलकर्णी व अधिकारी यांचे शिवाजीशीं आलेले गोड अगर कडु संबंध १ ल्याच लेखांत निर्दिष्ट झाले आहेत. चौलची देशमुखी पेशव्यांनीं अखेर कशी विकत घेतली, याबद्दलची हकीकत येथें व ले. ८८ वर भरपूर आली आहे. अधिकारी घराण्यांतील अनेक पुरुषांनीं छत्रपति पेशवे व आंगरे यांची एकनिष्ठपणें सेवा केली; त्याची यादी व चाकरीचें स्वरूप ले. ४ मध्यें दृष्टोत्पत्तीस येईल. थोडक्यांत असें म्हणतां येईल, कीं प्रस्तुत पुस्कांतील १ ते १५ पर्यंतचे लेख सामाजिक व आर्थिक इतिहासाच्यां दृष्टीनें अत्यंत महत्वाचे आहेत.

कोंकणच्या इतिहासांत एतद्देशीय व फिरंगी यांच्या संबंधाच्या कागदपत्रांस वेगळें महत्व आहे; कारण पोर्तुगीझांचा हिंदुस्थानांतील इतिहास म्हणजे धार्मिक आततायीपणा व तामस क्षात्रवृत्ति यांच्या पाशवी स्वरूपाचें अनावृत प्रदर्शनच होय. एकादी सत्ता प्रबळ होत असतांना तिचें परिणामकारक आक्रमक स्वरूप दृष्टीस पडत असतें. तशा आक्रमणांत जर विधायक कार्य करणारी

प्रवृत्ति दृग्गोचर होत असली, तर ती भावी राजनैतिक इतिहासाचें प्रमुख सूत्र बनत असते व तीच इतिहासास परम उज्वल स्वरूप प्राप्त करून देण्यास समर्थ होते. पण प्रबल सत्तेच्या आक्रमणांत पाशवी विघातकपणाच सामावलेला असेल, तर घडून येणारा इतिहास स्पृहणीय कसा व्हावा? त्या विघातकतेमुळें संस्कृतिसंघर्ष वाढतो; जित आणि जेते यांचेमध्यें कायमची तेढ उत्पन्न होते आणि वारंवार छळ सोसावा लागणारे जित, दौर्बल्यामुळें नसल्यासारखे दिसले, तरी राजसत्तेचे, मनांतून कायमचे वैरी होतात. फिरंगी व एतद्देशीय यांचे संबंध अशा प्रकारचे आहेत. या पुस्तकांत फिरंगी व एतद्देशीय यांच्या संघर्षाचे सूचक असे कांहीं महत्वाच्या मजकुराचे कागद आले आहेत; त्यांत लेख १, १०, ४२ व ४६ उल्लेखनीय आहेत. त्यांतील ४६ वा युद्धविषयाच्या दृष्टीनें महत्वाचा असून बाकीचे तीन सामाजिक इतिहासाचे दृष्टीनें अभ्यसनीय आहेत.

छत्रपति संभाजीच्या कारकीर्दीत १६८३ मध्यें पोर्तुगीझ व मराठे यांचें युद्ध कोर्लई व व रेवदंडा येथें सुरूं झालें. या युद्धाची विस्तृत हकीकत उपलब्ध नाहीं; फक्त सरदेसाई स्मारक ग्रंथांत प्रो. पिसुर्लेकरांच्या लेखांत त्याचा थोडा उल्लेख असून 'आंगरेकालीन अष्टागरां'त संभाजीच्या रेवदंडकडील हालचालींचा सुगावा सांपडतो. याबाबत जास्त प्रकाश टाकणारें पत्र या पुस्तकांत ले. ४२ म्हणून छापलें जात आहे. त्याचा इत्यर्थ असा कीं, थोरल्या छत्रपतींच्या कारकीर्दीत परधर्मांत गेलेल्यांचें शुद्धीकरण अपवाद म्हणून कां होईना होऊं लागलें. तसें शुद्धीकरण होत राहणें अवश्य होतें; कारण, साष्ट–बारदेश व कोर्लई–चौलकडे फिरंग्यांनीं धार्मिक आक्रमण करून प्रजेस त्रस्त केलें. स्वधर्मांत परत यावें असें त्यांस वाटे. छत्रपति संभाजीच्या कारकीर्दींत या प्रश्नास चालना देण्याचा प्रयत्न झाला व वसई आणि रेवदंडा ताब्यांत आणण्यापूर्वी मराठ्यांनीं तसा प्रयत्न करावा, अशी या पत्रांत स्पष्ट विनंती आहे. इ. स. १७३५ मधलें हें पत्र सामाजिक इतिहासाच्या दृष्टीनें उद्‌बोधक आहे.

बाकीच्या पत्रांचा सारांश आतां विषयावर सूचित करितों.

राजकीय–(१) इ. स. १७०२ मध्यें औरंगजेबाचा कोंकणांतील अंमल नष्ट होऊं लागला व मराठ्यांच्या आरमाराचा सरसुभा कान्होजी आंगरे उत्तर कोंकणांत प्रबल होऊं लागला. जंजिऱ्याबवळील पद्मदुर्ग किल्ल्यावर यावेळीं मराठ्यांचा हवालदार सुभानजी मोहिते जागृत राहून हालचाल करीत होता व सागरगडचे आसमतात कान्होजीचा जम बसला होता. त्यांनीं बामणगांव हा पायथ्याशीं असलेला गांव जाळून उजाड केला. नंतर मोगल व मराठे यांनीं सदर गांवास कौल देऊन पुन्हा वसाहत करण्यास परवानगी दिली. (ले. १८ पहा.) (२) इ. स. १७०४ मध्यें कान्होजी मराठयांच्या आरमाराचा सरसुभा आहे (ले. १९ पहा). (३) संभाजीच्या कारकीर्दींत चौलकडे अधिकारी

पदावर असलेला मराठयांचा अमलदार रायाजी सदक प्रभु इ. स. १७०४ मध्यें साकसे (पेणजवळ) परगण्याचा अधिकारी झाला. त्याचे मार्फतीनें बहिरोपंत पिंगळे पंतप्रधान यांनीं पद्मदुर्गचा खर्च भागविण्यास दोन गांव नेमून दिले (ले. २० पहा). (४) १७०१ ते १७०८ पर्यंत कान्होजी आंगऱ्यांचें महत्व पश्चिम किनाऱ्यावर सारखें वाढत होतें. मराठे, हबशी व मोगल यांचा तितर्फा अंमल रेवदंड्याच्या खाडीपासून रेवस–धरमतरच्या खाडीपर्यंतच्या प्रदेशावर होता. या प्रदेशांत सोगांव, बहिरोळें व बेलोली हे तीन गांव मोगल व कान्होजी आंगरे यांच्या दुतर्फा अमलाखालील होते. तेथील वसूल मराठयांना फक्त मिळाला, मोगलांस मिळाला नाहीं. तेव्हां वसूल करणाऱ्या सरकारी नोकरांस मोगलांनीं कैद केलें. नंतर दंड भरून त्यांची सुटका करण्यांत आली (ले. २४ पहा). (५) इ. स. १७३३ मध्यें चौल आंगऱ्यांच्या ताब्यांत होतें. तेथें शांतता नांदत होती; पण बाजीरावानें जंजिऱ्याच्या मोहिमेस प्रारंभ केल्यानें शिद्दीच्या प्रदेशांत राजपुरीस गडबड उडाली. अशा परिस्थितींत, व्यापारी व रयत यांनीं धास्ती न बाळगतां आपला उदीमव्यवसाय जलस्थल–मार्गानें सुरळीत चालू ठेवावा, असें अभयपत्र आंगऱ्यांनीं दिलें (ले. ३९ पहा). (६) इ. स. १७३९ मध्यें मराठे व पोर्तुगीझ यांचें युद्ध अटीतटीवर आलें. पोर्तुगीझांचा कोंडमारा व्हावा म्हणून कोर्लई–रेवदंड्याकडे हालचाली सुरू झाल्या. त्याबाबत ले. ४६ चा उल्लेख पूर्वी केला आहे. वसईची मोहीम संपल्यानंतर मराठयांनीं कोर्लईस वेढा दिला तो किल्ला घेतला त्यावेळीं रेवदंडच्या प्रजेची पळापळ होऊं नये म्हणून पेशवा नानासाहेब यानें अभयपत्र दिलें (ले. ४९ पहा). (७) इ. स. १७५६ च्या फेब्रुआरींत मराठे व इंग्रज यांच्या संयुक्त आरमारानें व सैन्यानें तुळाजी आंगऱ्यांचा पराभव करून त्यांस कैद केलें व विजयदुर्ग तात्पुरता इंग्रजांच्या हातीं पडला. तो पेशव्यांना परत करण्यांत इंग्रजांनीं दिरंगाई चालविली. १७५६ च्या जून महिन्यांत मराठयांच्या हालचाली सावनूर, चित्रदुर्ग, सोंधे, हरपनहळ्ळी इत्यादि कर्नाटकच्या भागांत होत होत्या व मराठे तुंगभद्रेच्या कांठच्या प्रदेशांतून खंडणी वसूल करीत होते. त्यावेळीं, विजयदुर्ग इंग्रजांनीं परत करावा, म्हणून मुंबईचा गव्हर्नर रिचर्ड यास लिहिलेलें पत्र ले. ६५ म्हणून छापलेलें आहे. त्यावरून, मराठे जमिनीवर जबरदस्त असले, तरी इंग्रजांस त्यांचें भय वाटत नसल्याचा प्रत्यय या पत्रानें आपणांस येतो. (८) इ. स. १७५८–५९ मध्यें मराठे व हबशी यांचें युद्ध पुन्हा सुरू झालें. त्यावेळीं निरनिराळ्या किल्ल्यावरून माणसें आणून सैन्य भरती कशी करण्यांत आली, हें ले. ६८ वरून समजतें.

महत्त्वाचीं राजकीय पत्रें येथें दिग्दर्शित केलीं; पण सूक्ष्म दृष्टीनें पाहणाऱ्यास आणखी कांहीं पत्रांतून राजकीय मजकूर निस्संशय आढळेल.

सामाजिक —(क) मंदिरें–' आंगरेकालीन अष्टागर ' मध्यें मंदिरांची माहिती पुष्कळच आली आहे. तीस पोषक असा मजकूर या पुस्तकांत कांहीं लेखांतून आला आहे. (१) कनकेश्वरची यात्रा पूर्वीपासून भरे. फिरंगाण, वरघाट व अष्टागरांतून व्यापारी यात्रेस येत. उंदेरीच्या हबशी हवालदाराच्या देखरेखीखालीं असलेल्या प्रदेशांत हें मंदिर असलें, तरी येथील उत्सव यथापूर्व चाले. १७४३ मध्यें, यात्रा भरावी ह्मणून दिलेला कौल, लेख ५५ म्हणून येथें छापला आहे. (२) रामेश्वरच्या मंदिराबद्दल ले. ६६ व ७४ मध्यें मजकूर आला आहे. रामेश्वर मंदिरास अर्पण केलेली वाडी गुरवाच्या सुपूर्त व्हावी ह्मणून केलेली खटपट ले. ६६ मध्यें आढळेल. ले. ७४चें राजकीय व सामाजिक असें द्विविध महत्व आहे. मुंबई, साष्टी, वसई, कल्याण, भिवंडी, राजापूर इत्यादि दूरच्या ठिकाणांहून रामेश्वरच्या यात्रेस व्यापारी लोक येत. मंदिर आंगऱ्यांच्या प्रदेशांत असल्यानें यात्रेचा बंदोबस्त आंगरे ठेवीत. पण आंगरे व पेशवे यांचा शत्रु हबशी, याशीं युद्ध सुरू असल्यास पेशवे व आंगरे एकमेकांस सहाय्य होत. त्यावेळीं पेशवे आंगऱ्यांच्या प्रदेशांत अधिकार चालवीत व आंगरे, प्रसंग ओळखून तो चालू देत. पण शांततेच्या काळांत पूर्वीच्या अधिकारक्षेपाचे दाखले जर पेशवे दाखवूं लागले, तर ते मान्य करावयाचे नाहींत, असा आंगऱ्यांचा योग्य रिवाज होता. ले. ७४ मध्यें आंगऱ्यांची ही भूमिका स्पष्टपणें ध्यानांत येते. (३) चौलच्या चंपावती व नारायण या दोन मंदिरांच्या इनामांबद्दलचा मजकूर ले. ६७ व ७० मध्यें आला आहे.

(ख) बागायताची पाहणी–आंगऱ्यांचे प्रदेशांत ठरीव कालानंतर सरकारी रीत्या पाहणी करण्याची पद्धति होती. १७२२ मध्यें चौलच्या बागायताची पाहणी झाली. बागायत निकृष्ट स्थितींत होतें. उत्पन्न वाढावें म्हणून निरनिराळ्या पिकांबरोबरच, ताग पेरला जावा म्हणून आंगऱ्यांनीं खटपट केली आहे. (ले. २८ पहा.) इ. स. १७१८ मध्यें एकदां पाहणी होऊन गेल्याचें ले. ३२ वरून दिसतें. ले. ३३ स्पष्टपणें निर्देशित करितो कीं, १७२८ मध्यें चौल बरेंच ओसाड पडलेलें असून भरभराटीस आलेलें नव्हतें व तें भरभराटीस यावें म्हणून आंगऱ्यांचे प्रयत्न सतत चालले होते. ले. ४७ इ.स. १७३९ मधला आहे. त्या वर्षीं तपे झिराडची पाहणी झाली.

(ग) जोशी व उपाध्ये यांची वृत्ति–ले १६ वरून जोशी व उपाध्ये यांच्या वृत्तीचा बोध होतो. इ. स. १७०१ मध्यें चौलचा मुसलमान हवालदार महमदखान यानें जोशी व उपाध्ये यांस दंड केला. चैत्रशुद्ध प्रतिपदेस पंचांग सांगावयाचें व वर्षफल सांगावयाचें, ही रीत पुरातन आहे. पण प्रथम पंचांग कोणाकडे सांगावयाचें, हा प्रश्न महमदखान हवालदारानें उत्पन्न केलेला दिसतो. चौलचे जोशी व उपाध्ये यांची या बाबतची रूढी ठरून गेली होती. प्रथम

जमीनदारांकडे व नंतर सरकारी अधिकाऱ्यांकडे पंचांग सांगावयाचें, असा क्रम पूर्वापार चालत आला होता. निजामशाही व मराठेशाहींत हा क्रम पाळला गेला. महमदखानाचें म्हणणें बहुशः असें असावें कीं, आपण सरकारी अधिकारी; तेव्हां प्रथम पंचांगवाचन आपणांकडे व्हावयास पाहिजे. तें न झाल्यानें त्यानें दंड ठोठावला. अर्थात् या अन्यायाविरुद्ध दाद लावून घेणें जोशी व उपाध्ये यांस भाग पडलें व निर्णय ठरला कीं-देसाई, अधिकारी, देशपांडे व प्रमुख जमीनदार ग्रामस्थ यांजकडे पंचांग सांगणें झाल्यावर मग तें सरकारी अधिकाऱ्यांकडे सांगण्यांत यावें. दंड परत करण्यांत आला. ले. २६ वरून आगरकर जोशी व वेल्हावकर जोशी यांच्या वृत्तीच्या विस्ताराचा व तपशिलाचा फार चांगला बोध होतो. या प्रकरणीं ले. ७७ महत्वाचा आहे.

राघोजी आंगरे संस्थानाबाहेर असले म्हणजे त्यांची मुलगी बयाबाई कारभार पाही. इ. स. १७६९ मध्यें खार चऱ्ही येथील ग्रामोपाध्यांनीं स्वतः वृत्ति चालविली नाहीं. त्यांच्या गैरहजेरींत दुसऱ्या ब्राह्मणास बोलविण्यांत आलें. त्यास झालेल्या उत्पन्नांत ग्रामोपाध्याय हिस्सा सांगू लागले. त्यावरून त्यास ताकीद देण्यांत आली.

(घ) अधिकाऱ्यांचे मानपान:—चौलचे अधिकारी शिवकालांत व शिवोत्तर कालांत मोठे जमीनदार व पंचकुळवंशी माळी जातीचे मानकरी पुढारी होते. त्यांच्या मानपानाचा उल्लेख ले. १७ व २३ मध्यें आला आहे. त्यांना दत्तविधानाचा शेला देण्यांत येई. प्रायश्चित्तप्रसंगीं त्यांस शेल्याचा मान होता. लग्नादिकार्यप्रसंगीं ब्राह्मणादि जातींत सुद्धां त्यांस मानपानाचे हक्क असत. हक्क सरकारजमा झाल्यास ते सोडवून घेण्यासाठीं त्यांचा अविरत प्रयत्न असे.

(ङ) चौल शहर धामधुमीमुळें उध्वस्त झाल्यावर अनेक घराणीं देशावर गेलीं व त्यांचा चौलशीं संबंध उरला नाहीं. त्यांनीं आपल्या जमिनी नंतर विकल्या, दान केल्या, अगर त्यांवरील आपला हक्क सोडल्यामुळें त्या सरकारजमा झाल्या. इ. स. १७५६ मध्यें राघो कृष्ण पुराड या गृहस्थांनीं आपलें चौलचें बागायत दान केल्याचें पत्र ले. ६४ म्हणून छापलें आहे. अशीं दानपत्रें वहिवाटीस आणण्याची जबाबदारी ग्रामस्थ व जमीनदारांवर असे. भुतें घालण्याचा प्रकार ले. ६२ मध्यें आला आहे. अनेक प्रकारच्या कलहांत गावांच्या शिवेचें भांडण बरेंच प्रमुख दिसतें. सहाण व ढवर या दोन गावांच्या शिवेचा निकाल जमीनदारांनीं करावा म्हणून ले. ५३ मध्यें आंगऱ्यांची आज्ञा आहे.

(च) व्यापार—चौल येथील रेशमी कापड विणण्याचा व्यवसाय पुन्हा ऊर्जितावस्थेस यावा, म्हणून आंगऱ्यांनीं केलेला प्रयत्न ले. ४१ वरून समजतो. विणकरांस सरकार-देणें दर मागास सालीना तीन रुपये असे. मानाजी

आंगऱ्यांचे वेळीं अष्टागरचा व्यापार बुरतेपर्यंत चाले. ब्राह्मणहि व्यापार करीत. आंगऱ्यांचें दस्तक ही आवश्यक बाब होती. (ले. ५२ पहा.)

(छ) पांचकळशी माळी–अधिकारी घराण्याबद्दल स्वतंत्र उल्लेख वर केला आहे. हें घराणें अणजूरच्या नाईक घराण्याची एक शाखा होय. पेशवाईच्या मध्याह्नकालांत नारायण नाईक अणजूरकर हे या समाजाचे कोंकणांतील प्रमुख होते. ते जातीय वादग्रस्त प्रश्न सोडवीत व न्याय देत. रेवदंडा, चौल, साष्टी, वसई, मुंबई या भागांतील सर्वजण त्यांचे व अधिकाऱ्यांचे आज्ञेंत वर्तत. (ले. ५८ व ६० पहा.)

(ज) फिरंगाणांत बरेच दिवस राहून आलेला मनुष्य जातिबहिष्कृत मानला जाई. त्यास अपंक्त ठेवण्यांत येई. त्याचा न्यायनिवाडा होऊन मग त्यास जातींत घेतलें जाई. (ले. २५ पहा.)

(झ) कोळी–कोळी लोक दर्यांत मासळी मारीत. त्यांस सरकारांत महसूल भरावा लागे. पण त्यांच्या उपजीविकेचें साधन नष्ट झाल्यास त्यांस सूट मिळे (ले. ५७ पहा). चौल, रेवदंडा व थेरवंडा या तीनही गांवचे कोळी समुद्रांत आपला उदीम करीत. १७४० नंतर रेवदंडा पेशव्यांकडे आलें व चौलच्या कोळ्यांस स्वतंत्र समुद्र किनारा राहिला नाहीं. त्यांचा व्यवसाय मारून टाकण्याचा प्रयत्न पेशव्यांनीं केल्याचा दाखला ले. ७५ मध्यें सांपडेल.

याशिवाय, खंडो बल्लाळच्या घराण्यांतील चौलच्या सरदेशमुखीबद्दलचे उल्लेख, बामणगांव व तपे उमटे येथील देशकुळकर्णीबद्दलचा मजकूर, खंडाळ्याच्या पाटीलकीची हकीकत व आणखी अनेक विषयांचें वृत्त या पुस्तकांत प्रसिद्ध होत आहे. त्यायोगें आंगऱ्यांच्या उत्तर कोंकणांतील राजवटीबद्दल आपलें ज्ञान जास्त स्पष्ट होईल, असा विश्वास वाटतो.

'कोंकणच्या इतिहासाचीं साधनें' संशोधून खंडशः प्रसिद्ध करण्याचा माझा मनोदय आहे. आंगरेकालीन पत्रव्यवहाराचा हा खंड प्रसिद्ध करून, भारत इतिहास संशोधक मंडळानें माझें ओझें थोडें हलकें केलें याबद्दल मंडळाचा फार फार आभारी आहें. पुस्तकांत प्रसिद्ध होत असलेले कागद रुजु पाहण्याचें काम रा. शं. ना. जोशी यांनीं केलें. इतिहास संशोधनाच्या कामीं प्रा. रा. वि. ओतुरकर, डॉ. मो. गं. दीक्षित, रा. चिं. ग. कर्वे व रा. ग. ह. खरे यांचें साह्य मला नेहमींच होतें; तसेंच या पुस्तकाबाबत झालें आहे. त्या सर्वांचे आभार मानतों.

अलीबाग
१८ फेब्रु. १९४८

शांताराम विष्णु आवळसकर

आंगरेकालीन पत्रव्यवहार

ले. १ | शके १५५३ इ. स. १६३१

मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल

सुा इसने सलाशीन व अलफ (नि. अक्षर) पथत व दस्तुरात पूर्वी चेऊल आबाद असतां हकीकत वगैरा हकीकती तौ

चेऊल प्रांतास गडकोट नव्हते सागरगड उर्फ खेडेदुर्ग होता चेऊल शाहारांत हवेलीनजीक हवेलीवाडा बाबत हबसखान हुजुर बाछाई जवलोन हाकींम फौजदार चेऊल सुभेयाचा अमल चालवावयास रवाना करावा तो चेऊल प्रांतास दाखल जाहालियाउपर आंबेराई व तले मिलकत देशाई हे ठिकाणी तुर्मान चौत्रा आहे ते ठिकाणी येऊन उतरावें त्याजवर शाहारात पेगांम पाठवावा त्याजवर देशमुख व अदिकारी व देशकुलकर्णी व सेटे महाराज मोक्तासर जाऊन हकीमांची मुलाजमत घेऊन शाहारास आणून बाछाई हवेलीमधे राहावें सोबत जमावलोक सिपाई आसामी पनास साठ व येक पालकी येक घोडा हे रीतीने ठाणे येऊन बाछाई अमल करावा कलम १

तिसरे साली दुसरा मुलकाचे जमाबंदीचा दस्तुरात मुलकाचा मलिकअंबरी देणे बरकुम रकमाला गावाचे गाव व सेताचे सेत व वाडीया व खारिया रकम प्रमाणे वसूल रयेतीने जमीदारांच्या मोझ्यानें करावा साल दरसाल पाहाणी सचणी प्रयोजन नाहीं मक्ता रयेतीने भरोन दिल्हा म्हणजे रयेत आपआपले घरी सुखरूप नांदत होती ज्याज फर्मावीस वेठ बेगार कानुकैफूत अनुमात्र रयेतीस तसदिया नव्हता जमीदार व रयेत येकदिल कारभार चालत होता हे प्रमाणे दस्तुरात पूर्वीचा चालत होता १

माणीक चावडी नजिक पोखरण सैदमीरां वलि व हवेली हबसखान हे ठिकाणी माहांलोमाहालची जकात जमा होत होती ते चाहुडीस लोक कांसार शाहारात पांचसातसे कराचलि त्यांचे जमावाची होती तेही बलकुबल गनिमाई जाली तर शाहार राखांवे व चावडीस चौकी पाहारेयास पालीप्रो लोक ठेवावे त्यांचे चाकरीवर नजर देऊन त्यांस देणे माहासूल व जकात व कानुकैफूत येक जरा नांही १

---

* 'हकीम चौथे' असे तेव्हांच ओळीवर लिहिले आहे.

बाशाई हाकीम शाहार मजकुरीं आलियावर वर त्यानजीक जमीदार मुलकी मामिलेयासी रुजुवात होऊन दस्तूरमोजीब मुलकाचे आबादानीचा मुदा हासील करावा त्यास तो हाकीम जमीदाराची अर्जी कबूल न करी रयेतीस इजा द्यावा तेव्हा जमीदार येंही हाकीमास द्वाई बाछाची व द्वाहीं शेराची देऊंन मुदा हासील करावा त्यासही मानीत नांही तेव्हा जाहाली हकीकत जमीदार येही हुजुर बंदगीस वकाया लेहून पाठवावा ऐसाजे फलान हाकीम मामले मजकुरी रवाना केला तो फलान तारीखेस शाहार दाखल जाहाला त्यास आम्ही जमीदार मुलकी मामिलेयांसी रुजुवांत होऊंन पेसजीचीं कानुकैफत जकात माहासूल दस्तुर मोजीब वाकीफ केला त्यास ते बांतेस मानीत नाहीं बेदस्तुर करोन रयेतीस इजा देत आहे येण्हेकरून रयेत तजावजा जाहाली आहे म्हणौन बंदगीस वकाया अर्जदास्त ल्याहावयास जरूर जाणून लिहिले असे त्यास रयेतीचे हालावर नजर देऊंन हा हाकीम त्यागीर करोन दुसरा हाकीम रवाना करावयास हुकूम फर्मावणार साहेब आलंमपन्हा दिन दुनयाचे गौर करणार साहेब धनी माबाप आहेत वादज हे हकीम रहेसे मुळुक बेचिराख होईल ऐसा वकाया हुजूर पाठऊन हुजरून दुसरा सुभा आणऊन यास त्यागीर करावें हे दस्तूर बाछाई अमलात चालत होता

कलम १

बाशाई अमल माजी जाहाला त्याजवर सिवाजी राजे यांची काबीजात जाहाली तेव्हां सुभे सुभां नामजाद लोकां ठाणे ठाणेयास जमाव ठेविले ते समई मुलकांतून माहासूल कांहीं नकद व कांही अैनजिनस गला घेत चालले त्याजवर जजिरे खांदेरी १६०१ सवसरीं वसविली त्याजवर १६०२ सवसरी कुलाबेस पाया घातला तेच सवसरीं महाराज कैलासवासी जाहाले सके १६०१ सवसरी हबसी जजिरे राजपुरी येहीं उंदेरीस पाया घातला अमल सभाजी राजे सिवाजीचे लेक यांची कारकीर्दी जाहाली तेही नवसाले राज्यें केले तैपासोन गडकोट खादेरीं उदेरी कुलाबा राजकोट किले चेऊल प्रांती जाहाले गडकोटास जमाव लोकांस अडिसेरी असावी म्हणौन मुलकांतोन अैनजिनस पाहाणी प्रोभात वसूल करोन व ज्याज फर्मावीस छावणी घांस गवत काथलचुडी व वेठबेगार रयेतीस जाहाली जे समई जें मांगतील तें रयेतीने द्यावे १

बाछाई शाहार आबाद होतें ते समई श्रावणी पौर्णिमेस चेऊलचा नारल रेवदंडा नेऊन सागरात टाकावा त्यास पूर्व दिवसीं माहालीहून अमलदार येण्हे फिरंगीयास पेगांम पाठवावा असांजे उद्यां चेऊलचा नारल रेवदंडेयास येईल असे सांगोन पाठवावें त्याजवर फिरंगी येण्हे रयेतीस ताकीद करोन चेऊलची श्वरी नारलासोबत येईल त्यास मार्गी झाड पान खांदीखुदी तोंडून मार्ग साफ करणे कसबे चेऊल येथील मोहतर्फी कुलें याजवर पटी करून पैका चावडीस जमा करोंन त्याचा खर्च चावडीचे सिपाई व ठाणे नाईक व कलावंदीं वगैरा

व खाळुकर्णाचा ते दिवशीं आपले भूशणाशारिखा खर्च करावा व नारळाचीं झाडें बेगडी सें सवासें रेशमी गोंडे याचीं करावीं त्यापैकीं एक चेऊळचे हाकीमांस नजर करावें व येक झाड ठाणगे व महालकरी व पानसरा येहीं रेवदडा शाहारचा कपितान यास नेऊन द्यावें तेण्हे असर्फी दाहा एकूण रुो ५८ पांच इनांम देऊन पानाच्या पट्या देऊन पाठवावें व पेंठ गडगा व पेठ हुसैनाबाद व नवे नगर येथून बेगडी नारळ २ व कसबे चेऊळ नारळ २ याो च्यार नारळ माणीक चावडी येथें पूजनं करोन हकीमाची श्वारी व सेटे चोधरी व कोंत(वाल)......येखलक व घोडे असवारसमेत खाळुकर्णाची रेवदडा जाऊन नारळ सागरांत टाकावा तेथून श्वांरी फिरोन येते समई रेवदडा येथील जमाव व राशनीचे तळेयापावेतों इस्तकबाल पोहचवीत येऊंन मुकादम भडारीं यांचा याचे हातोंन पनास विडे तेंही देऊंन माघारे जावें आपली श्वारी हकीमानजिक जाऊन मजुरा करावा आण पानाच्या पट्या श्वारीस व सेटे कांसार व चोधरी पानसारे कोतवाल ठाणेनाईक यांस द्याव्या १

कसबे मजकुरीं भाद्रपदचे चौथीचीस गणपती मुहूर्तीं होत होत्या त्या देवालये पुस्करणीस कौलासावयास जात होत्या व सिवाजी राजे यांचे अमलांत माहाल मजकुरी सुभेदार होते त्यांकडील गणपती कौलासास येत होते त्यास प्रथम आरती चोधरी यांचे गणपतीस आजपरयेंत चालत आहे हें सर्वांस दखल असे १

माा चेऊल येथील पाखाडिया १५ पधरा असतां फिरगी येण्हे रेवदडा वखार घालोन उदीम व्यापार करीत असतां हिरे कंकर माणिक मोती व कपडे व इमाचीच बाछाई पसंन पडे ते वस्तु बाछाईस पाठऊन बाछा खूश करोन घेतला फिरंगीयाचें येहसान जाणून त्यास हुकूम फर्मावला ऐसाजे तुझे खातीरेस येईल ते आम्हानजिक तलब करोन मागावें दिल्हे जाईल त्याजवर तेण्हे गाईचे कातडेया बराबर जमींन बक्षीस करावी म्हणोन मागितले त्याजवर बाछा येही हास्येविनोद करोन जमींन दीधली फिरगी येण्हे त्या कातडेयाच्या सुताप्रो वाधी करोन जागा घेतला तेथे कोट बाधिला त्यामुळे तीन पाखाडिया कबज करोन ते ठिकाणी राज्य करीत असतां चेऊल येथील हाकिमाची कैद रेवदड्यास

चेऊलचा नारल बंदरांवर जात आहे ते ठिकाणीं लक्षे रुपयाचे ज्याज येऊन सिकस्ता जाहालें तर तो मालमता चेऊलचे हाकिमाने आणावा १

व नारल पडते ते ठिकाणी फिरंग्याचे राज्यात देवधर्म करावयास मनाई असे म्हणून ते ठिकाणी मान्हास्ट यातीने येऊन दानधर्म सुख(रु)प करावें रेवदडा कोण्ही खुण करोन नारलाचे ठिकाणी आला तर फिरगी याचा जोरा चेउलास नाही

या खेरीज मांडवीनजिक कोट येथे चेऊलाचा निवी (सिदगा) बाऊन ......खुटवा व जकात बाछाई अमलात चेऊलाकडे जमा होत होता त्याजवर जकात खेरीज करून गोंवियाहून आरमार सालदरसाल येत होते त्यास तनखेदार कुलाबा व राजकोट येही कारकून नेऊन खुटवा आजपरयेत घेत होते हाली रेवदडा पेसवे यांचे श्वाधीन जाहलीयापासून राहिले रेवदडा येथील मैसी चेऊलास चरगणीस प्रतेही येतात त्यास दर मैसीस सालिना रुा ।। देत होता १ खार दिवी येथील माहासूल मलिकचरी रुा १०० येकसे कुलाबा राजकोटी पावत होत्या १ आदमपीर नजिक अस्टमी मोराले येथील बाजाराचीं गलबतें भरत होतीं त्याची मोहताद देत होता पेसवे यांचे रेवदडें जालियापासोंन कैद चालत नांही

चेऊलाचा नारल रेवदडा जात होता तो राहिला १	मैची(सी)ची वण राहिली १ खार दिवी येथील मा राहिला १

कान्होजी आगरे यांचा अमल कुलाबेयास जाहालियापासोंन इस्त कबील गोवें तहद श्री द्वारका जलमार्गास सावकार लोक व कोली मछीमार व उदमी व्यापारी येही कुलाबाचा कौल घेऊन आपआपले कसब करावे कौल न घेतला त्यास धरून आणून दंड करावा १

फिरगी रेबदडा होता ते समई शाहारातील लोक यांचें लग्नटका व दत प्रायेचिताचा पैका कुलाबेस देत होते येथील शा बाछायांचा अमल माजी जाहाला त्याजवर सिवाजी राजे यांचा अमल जाहाला याजवर माहाराज रायगडचे मुकामीं अमल करावयास लागले ते समंई चेऊलचे इसम भेटीस गेले

कृस्णाजी माहादेव देशाई	बावाजी विठोजी अदिकारी
दादाजी माहादेऊ देशपांडिये	रंगाजी रूपाजी सबनीस

सदरहु जाऊंन राबदर्शन घेतलें त्याजवर भोरोपंत पेसवे येही चेऊलचे मुलकाची पुर्सीस केली तेव्हा मुलकाची जमा वसूल देशकुलकर्णी याचे हातोंन पधत पाहातां मुलकात पटी करून हाकीमांस दखल केली त्याजपैकीं कांही वसूल केला कांही बाकी राहिली त्याजवर तो हाकीम त्यागीर होऊन दुसरा हाकीम पैवस्ता जाहाला त्यास मागील बाकी साकी देशकुलकर्णी येहीं हजम केला असें कलम त्याजवर शाबूत करून अटक करोन ठेविले देसाई अदकारी याकडे काही वजा हेच कलम लागू होत नाही तेव्हा त्यास निरोप देऊन बिदा केलें ते समंई दादाजी देशकुलकर्णी येहीं उभयेतांस म्हणो लागले कीं तुम्ही आम्ही वतनभाऊ असोन मज टाकून जाऊ नका तेव्हा पुना माहाराजा दरबारीं बहुत बजाने रदबदल केली परतु आईकत नाही त्याजवर निरोप दिल्हा येतसमंई देशकुलकर्णी येही उभयतास बोलिले कीं तुम्ही मज टाकून जाल तेव्हा जीव

त्याग करीन त्याजवर हुजूर वारंवार रदबदली करितां हुजरून इतराजी फर्मावून तिघा जणास अटक करोन त्यांस खंड केला रसरी लाहारी

७५०० देशाई
७५०० अदिकारी
१५००० देशकुलकर्णि
―――――
३००००

येण्हेप्रो खंड करोन अटक केली त्याजवर नारायेण सेणवी इंगरेज मुबै याबकडून वकील होता तो किले मजकुरी आला होता तेण्हे देसकांस मुदत करोन पैकेयास जामीन होऊन सोडऊन घेऊन आला मुदतेप्रमाणे पैका वसूल केला हे हकीकत ल्याहावयास कारण जे देसकुलकरणी या निमित्ये देसाई अदकारी फसले त्याजवर कितेक (मु)दती सिवाजी कैलासवासी जाहाले सभाजी राजे येही नव सालें राज्ये केलें त्यां मागोंन पुंडावे जाहाले मुलुक वैरान जाहाला बादज बाछाई ठाणें राजकोटास आलें मुलुक बेचिराख त्याजवर सरखेल कुलाबेयास दाखल जाहालियापासोन चोरचिरिट फुड तमाम धास्तीने घांट माथा सुगम केला सरखेलसाहेब येहीं तामसपण अति उतकट राज्ये केलें जलमार्गी व खुसकी वरघाट जत्फकरितां त्यास आणून लास द्यावे सोटेयाने मार देऊन टाकावें व दावणी घालोन मनुशे मारावीं त्यावर चेऊलचे देसक दर्शन घेऊन वतन अनभवास आणावें[१] त्यास राजकोट येथील हाकीम रजा देत नाहीं वतनदारीचा पेशा आपला मुदा मतालिब मुलुकगिरीचा शराब बाछाची द्वाही देऊन मुदा हासील करावा हे बात तुमची ते दरबारीं पसंन होणार नाहीं जीव वाचतां सकट त्याजवर सुभा कल्याण भिवंडी येथील जमीदार येऊन टकातोंडपा खाऊनं दरबार रुजु केलें तेण्हेकरून आपला हक मुशारा चालता केला चेऊलचे देसक भेटीस न गेले म्हणौन इतराजी फुर्माऊन म्हणो लागले कीं मी कान्होजी आंघ्र वकरीस येक भागालीं पाणी पाजोंन जलमार्गे श्री द्वारकापर्यंत व गोमातक वगैरां व खुसकीने घाट परयेत जेरजत्फ करून तमाम जमीदार व सावकार हलाली हरांमी आमच्या दरबारीं रुजु जाहाले असतां आमचे किलेयाचे माचींचे जमीदार रुजु नाहीं तेव्हां हरामखोर जाणून त्यांस मारिले जाईल त्यास ते धास्तीने राजकोट धरून राहिले त्याजवर ताजुदीन अलीखानं यांचे अमलामधे तिघे गोविंद कृष्ण देशाई व आपाजी अदिकारी[२] व माहादाजी देशकुलकर्णी त्रिवर्ग जजिरे राजपुरीस जाऊन सिदी सुरुलखान याचे दरबारी मेईनत येक वर्षे केली त्याज-

―――――

१ [ले. १९ पहा. अधिकारी कान्होजीच्या भेटीची अपेक्षा करतात.]
२ [ले. २२ पहा. त्यांत सविस्तर पोषक हकीकत.]

वर सर्फदीन मदखान बाकेनवीस यांचे घराणे कुरत्रिव तेव्हा ताजुदीन अलीखान येही भावास इशार केली ऐसीजे हबसियांकडून जो सरजाम होईल ते मोजीव आम्हास करावा लागेल मुलकाची चौथाई हबसियाकडे व चवथाई आम्हाकडे असी इशारत केली या बादज कुरत्रित्र बुधीने देसाई व अदकारी[१] यांस निरोप दिल्हा की तुम्ही घरी जाणे फार दिवस जाहाले घरची खबरदारी करोन येणें असे बोलोन घरीं पाठविलें मागोंन माहादाजी देसकुलकर्णी यांची नवाजीस करोन जंजिरे तर्फेन भात खडी १० व राजकोट तर्फेन भात खडी १० मुकर करून सनद देऊन मुलकाची जमाबंदी करोन द्यावी त्याजवर देसाई अदकारी ज... *

. ...न विदा केले त्या उपर रा रघुनाथजी सभाजी आंगरे याकडून कुलाबेयास आले त्यांनजिक देशाई आदकारी देशकुलकर्णी येही रदबदल आपले वतनाचीं सांगोन राजश्री मानाजीबावा यास हटकावयास सांगितले त्यावरून मान्ये करोन सदरेस दिवटी ज्वाहार जाहालियावर तिथे जमीदार अर्जास उभे राहिले ते समई रघुनाथजी येहीं अर्ज केला आणि लघुच्याणाक्ष्यातील स्लोक दाखले म्हणोन अर्थ समजाविला कीं महाराज राजेलोकी आपले राज्याचें अभीष्ट व आपले औलादेचे अभीष्ट जेण्हे इछावें तेण्हे वतनदाराचें वतन मोडों नये त्याची स्थापणुक करोन ज्याचा विभाग त्यास दिल्हेयानें आपले राज्याची बृधी आहे यैसे शास्त्रार्थ आहे त्यावरून राजश्री सावाजी तुकाजी प्रभु यांस मानाजीबाबा येंही आज्ञा केली की हे गोस्टीचा अपवाद आम्हाकडेस नाहीं आजपासोन तुम्हास एकंदर हुकूम जे हे वतनदारांचा सेर मजकडे ठेऊं नका आमचा सेर यांजकडे जाऊ देव नका ये(णे)प्रो आज्ञा केली यावर वतनदाराचे हातोन पघतप्रो सेवा घ्यावी म्हणोन रयेतीस ताकीदपत्र दिल्हे असे जें आज्ञांपत्र राजश्री मानाजी आंगरे जजिरे कुलाबा ता पाटेल व मोख्तासर व रयान देहाये सुभा मामले चेऊल सुहुर सन खमस[२]

---

१ [ले. २२ पहा.]

[* येथवर क्रमानें सहा पानें झालीं पुढील एक पान नष्ट झालें आहे. पण त्या पानावरील मजकूर संदर्भानें पुढीलप्रमाणें आहे. प्रथम अधिकाऱ्यांनीं साताऱ्यास जाऊन छत्रपतींची भेट घेतली. बाजीराव, चिमाजी आपा, पिलाजी जाधव आणि जिवाजी खंडेराव यांची गांठ घेतली; कांहीं दिवस छत्रपतींची सेवा केली. नंतर छत्रपतींनीं सांगितलें कीं आपल्या सेवेची येथें अवश्यकता नाहीं. आपण परत सरखेलांकडे जावें. तेव्हां उपरिनिर्दिष्ट व्यक्तींकडून अनुकूल पत्र मिळवून अधिकारी कुलाब्यास आले. पुढें ले. ३४, ३५, ३६, ३७, पहा.] २ येथें "समान" पाहिजे.

सबासीनं मयां व अलफ राजश्री आबाजी गोविंद देशाई व बालाजी आपाजी अधिकारी[1] व बालाजी माहादेव देसकुलकर्णी मामले मजकूर यांस वतनी सेवा सांगितली आहे त्यास तुम्ही पाटेल व रयेत यानसी रुजुवात राहोन मुलकी सुती संचणी काजकारभार यांचे माळुमातीने करोन हुजुर येऊन विदित करीत जाणे आणिजे हे प्रा सनद देऊन तिघा जमीदारास वर्ते दिल्ही त्याजउपर कितेकां दिवसीं रा त्रिंबक माहादेव डबीर चेऊलकर. दिमत कुलाबा येहीं आबाजीपंत देशाई यांचे गळां पडोन म्हणो लागले की तुमचा पिता गोविदराऊ यांस आम्हास देशमुखीची मुतालकी देऊं केली होती ते हाली आम्हास देणे त्यास तेहीं उतर केलें की कैलासवासी खडो नारायेण दिघे आमचे पिते त्यांस वतनाची मुतालकी गोविदराऊ येहि दिल्ही तेव्हा मज दत येही दिल्हे असे असें असोन ते आपले लेखनपत्र तुम्हास दिल्हे असेल तें दाखऊन दावा करा लेखपत्र नाहीं तेव्हा तोंडच्या गोस्टी मसमू पडणार नाहीं त्यानंतर आबाजी देसाई यांसगे वैर करून येजमानास अनेक रीतीने गैरवाका समजाऊन सागोन यांस खांदेरीस अटक करोन ठेवावें असा इत्यार्थ केला हें वर्तमानं भगवान श्वरूप राजश्री दीक्षितबावा गोसांवी येही चेउलास आबाजीपंतास पत्र लेहून पाठविले की तुम्ही देंखतपत्र पलोन घाटावंर जाणे नाहीतर खादेरीस सकट प्राप्त होईल ते पत्र पावताच देसाई मशारनिले पलोन घाटावर गेला पुन्हा हे स्थली पाई लागत नाहीं म्हणून पेसवे यांकडे वतन विकत द्यावें म्हणौन करारी केली हे वर्तमान राजश्री कोलटकर व रामाजी बावा यांकडून कुलाबेयास मुसदी यांस इशारत जाली. परतु कोण्ही मनास आणून त्यास दिलदिलास देऊन वतनवार आणावा हे गोस्टी(चा) अनादर जाहाला तेव्हा तेण्हे निरुपाये जाणून करजदार जाहाला तेव्हा तेण्हे पेसवे यांस प्रथम तीन तक्षिमा दिल्हे आण सालिना मोईन रु॥ ५०० करोन घेतली कितेक साले जाहली त्यास कुलाबा तर्फेन वतन भोगवटीस पडत नाहीं तेव्हा मोईनही बंद जाहली त्याजउपर करजबाजारी जाहाला उदरवृत्ति न चाले यामुळे आणखी द्रव्ये घेऊन सारे वतन श्वाधीन केले

ले. २ } श्री { श. १६५४ / इ. स. १७३२

सन सलास सलासिन शके १६५४ सवसरी रा बाजीराव पेस(वे) जजिरेया(स) वेढा घालावयास आले[2] राजपुरीस तल देऊन तमाम गडकोट

---

१ [ले. ४५ संदर्भादाखल पहा.]

२ [याबाबत रा. खं. २,पृ. ७७; आंग्रेकालीन अष्टागर,पृ. ११;पे. द. ३३, ले. १३६, कु. गॅ., पृ. ४४५ पहा., का. सं. प. या., ले. २२ पहा.]

घेऊन जजिरा व पदमदुर्ग राहिला तेव्हा सुला (इ) करोन मुलकाचा तह केला

निसबत पेशवे माहाल	निसबत हबसी जजिरे राजपुरी
१ तां बिरवाडी	१ तां मांडले
१ तां घोसाले	१ तां नांदगांव
१ तां तले	१ तां मैसले
१ तां निजामपूर	१ तां दिवें
॥· तां गोंवेल	१ तां सिवर्धन
१ तां गोरेगाव	॥· तां गोरेगाऊ रुजु गोवेल
५॥	५॥

येकूण अकरा माहाल दुतर्फा जमाबंदी वसूल वासूल होऊन आखेर-साली सदरहु अकरा माहालाचे दस्त एकत्र करून यैवज मुजादला बराबरी वाटून घ्यावें.

ले. ३ } श्री {

मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल–हकीकत

पूर्वी चाळाई अमल होतां ते समईं प्रात चेऊळ हे प्रातास गांव कुल-कर्णी वतनी नव्हते आपले खासगत गांवागावास दोनच्यार गांव मिलोन हुजदार ठेऊन त्याचे हातोन लिहिणेयाचें काम घेऊन त्यास मुशारा नकद लारी मुकरर करून देऊन चाकरी घ्यावी त्यास उतरकत नाहीं अथवा त्यांचे मनास येत नाहीं त्यास दूर करोन दुसरा हुजुरदार ठ्यावें त्याजउपर मराठे यांचा अमल जाहला अैन जिनस वसूल सरकारी घेत चालले तेव्हा दर खडीस भात अदमण हुजुरास द्यावे ते फसल इगामी पाटेल रयेतीचे दारीं फिरोन भात जमा करून कुलकर्णी यास द्यावें त्याजवर सरखेल साहे-बांचा अमल जाहाला तेव्हा विसाजीपंत मुतसदी दफतर यांनजिक कुल-कर्णी येहीं फिर्याद केली ऐसी जे पाटेल गांवामधे बरोबर फिरोन मुशारेयाचे भागोला करितां कोण्ही थोटं व कोण्ही मुफलिस नादारी व याखेरी (ज) चाकर-माने लोक मुशारेयांचें भात देत नाहीं तेव्हा आपलें पोट भरत नाहीं आपणास बिन मुशारा चाकरी करून दफतरीं मोसबा देवत नाहीं आपण हुबरून कार-कून ठेवावा त्याजवर कागदपत्र कुलकर्णी घडोन देत नाहीं तेव्हा यैनदस्त त्याजवर पटी व मुशारा कुलारगावर बसऊन कोठीस वसूल घ्यावा मुशाराचा यैवज गांवी हरयेक कुलापासोन घ्यावा यैसा सिरीस्ता तो हाली चालत आहे

कुलकर्णी

मा नागांवे	मा आगसी	मा वरसवली
१	१	१
मा थळ	मा आवास	
१	१	

सदरहु माहालास कुळकर्णी काहीक मुदत वतनीप्रमाणे चालत आहेत याखेरीज माहालांचा तपसील आबाजी माहादेऊ सरसुभेदार दिमत कैलासवासी रा सिवाजी राजे सन खमस सितैन व अलफ ते साली तह करोन तपे तपेयास कुलकर्णी ठेवावयास आज्ञा केली त्याउपर रयेत निसबत हुजदार असतां

दताजी नारायेण येण्हे जमीनदारांचे अर्जाव करोन तो श्रीगाव व तो पाल कुलकर्ण चालवीत आहेत दताजीचा पुतलाजी याचा मूल बालकृस्ण पुतलाजी व त्याचा कुटुंबी निलाजी व धोंडजी १

तो उमटे व तो बाम्हणगाव येथील कुळकर्ण मल्हार नारायेण व विठल नारायेण येही वतनदाराचे आर्जव करोन त्याचा दस्त ऐवज कबज करोन त्याजवर हाली रा रामाजी मल्हार चिटनीस दिमत पेसवे येहीं येजमान श्वामीचे सामर्थे करून रा सेकोजी आगरे व मानाजी आगरे व हबसी व मोगल औरंगाबाद देखीलबाछाई संदा काढिल्या राजपत्रें व पेसवे यांकडील पत्रे काढिली

माहाल आगर येथील कुलकर्ण वतनी नव्हे ते त्या उपर सन खमस सितैन व अलफ हे साली पुतळाजी माहादेव पानसारा बंदर माडवी माहाल चेऊल येण्हे प्रबलास जाऊन रा आबाजी माहादेव सरसुभेदार

सिदी हिलाल किलेदार जजिरे उदेरी यांचा अमल जेरदस्त व रा मानाजी आगरे बजिरे कुलाबा यांचा अमल जबरदस्त यांचे आज्ञेखेरीज ज्याज फर्मावीस कारवाई अनुमात्र चालत नव्हती ते समई विसोपंत मुतसदी जजिरे कुलाबा येही हबसी याचे आर्जव करोन कुलकर्ण मागीतले तो झिराड मा १ तो परहूर १ मा केहीम १ मा सासवने १

हरदू माहालास हुजदार रयेतीचे निसबतीने चालत होते त्याजवर किलेदार उदेरी येही जजिरेयास हुजूर लेहून पाठविले कीं विसाजीपंत मुतसदी कारकर्दा दफतर व मुळुकगिरी त्याच्या श्वाधीन आण खावदाचा कुल येख्तीयार त्यांजकडेस आहे खावद पसन आहेत त्यास सदरहु माहाळाचे कुलकर्णपणाची सनद मन्हामत जाहाली तर आपले दुतर्फा मुलकांत सरकारतर्फेचे संदी व ऐवज मुबादला व कितेक जमाबंदीची कामे खलखल पडतांत याकरितां मशारनिलेस कुलकर्ण वतन दिल्हेयाने

माहालानिहाये तळ कोकण दिमत रा सिवाजी राजे छेत्रपति यांचे आर्जव करोन आगरचे कुलकर्णपणाची सनद घेतली

कलम १

माहाल कसबा येथील कुलकर्णी बतनी नाहीं ताफे ताफे यास कारकून ठेवावा आपणास न पुर्वे तर त्यास दूर करोन आणखी ठेवावा

ताफे सोनार १ ताफे कासार १
ताफे गौळी १ ता दुकानदार १
ता तेली वगैरा १ जिरायेती हुजदार १
ता कोली १

आपला अमल सुत सचणी सुरलीत चालेल पंत मजकूर आपला येहसानवंद होऊन जे काम पडेल ते उगऊन देईल हे वजा हुजूर आर्जव करून दरबारखर्च व दिवाणखर्च देऊन जजिरे राजपुरीन सनद व त्यामोजीब जजिरे कुलाबा येथील सनद हरदू माहालांची घेतली

कलम १

येण्हे प्रो चाल(त) होते हाली जिरायेतास व बागाईतास व मोहतर्फा यास कुलाबा तर्फेन स्वचत्र कुलकर्णी त्यास मुशारा सरकारचा देऊॅन जमा वसूल चालत होतां व राबकोट दिमत मोगल यांतर्फेन

कसबे यास आगरास
बाबाजी दामाजी आगराचा कुलकर्णी

हरदुजणास सरकारचा मुशारा देऊन जमा वसूल चालत होता राबकोट कुलाबा तर्फेस आला येकतर्फा जमाबंदी जाहाली त्यास हाली रा त्रिंबक माहादेव डबीर व भावजी जनार्दन यांचे इस्टत्वामुळे डबीर येही रा मानाजी बावा यांनजिक अर्ज करून त्रिंबक गोविंद हबासखानी यांस कसबेयाची जिरायेत बागाईत लिहिणे करोन हक मुशारा द्यावा म्हणौन सनद काडिली आहे

कलम १

सदरहु कुलकर्ण शेके १६९५ सन खमस सबैन मयां व अलफ राजश्री राघोजी आगरे सरखेल यांचे अमलात सिवाजी बाबजी इब्न बाबजी दामाजी वसैस लकड काम सोटे यावर दिा रा प्रधान आहे त्यास पेसवे यांकडील सागवानी सोटे कुलाबाकरास अरमारचे कामास साल दरसाल देतात त्यामधे अमलदार कारकून उतम प्रतीने देईल त्याजवर दृष्ट देऊ(न) सालमजकुरापासोन कसबे याचें कुलकर्ण सरकार तर्फेन दिल्हे

कलम १

———

ले. ४ } श्री {

मामले बादशा (बाद) उर्फ चेऊल हकीकत.

अदिकारी प्रांत चेऊल यांचे घराण्यांतून राजशवा केली तों.

प्रतापजी वलद सोनांजी अदिकारी येहीं सिवाजी राजे छेत्रपति यांजकडेस सुभेयाची सेवा केली १

कृष्णाजी मांणकाजी अदकारी दिा ताजुदीन अलीखांन मोगल दिा बाछा निविसिंदगी ज्याहाजाईत व इमारत वगैरा कारखाना दफतरीं सेवा केली १

विठल आपाजी अदिकारी प्रथम चाकरीं राजकोट दिा मानाजी आंगरे वजारतमाब व किले राजकोट पेशवे यांहीं सिकस्त केला त्याजमागोन जंजिरे कुलाबेयास दरवाज्यास चाकरी सरनोंबतगी केली १

बालाजी आपाजी अदिकारी मांमले मजकूर

प्रथम चाकरी दिा कान्होजी आंगरे सरखेल जंजिरे कुलाबा याचे दिमतीने सदर बारगीर सेवा केलीं.

त्याजमागोन सेवा बारगीर दिा रा बाजीराव बलाल प्रधान याची सेवा केली

त्याजमागोन ताजुदीन अलीखान दिवाण किले राजकोट यांचा सेवा केलीं

रावजी बालाजी अदिकारी येहीं चाकरी तां

प्रथम चा दिा मानाजी आंगरे वजारतमांब जंजिरे कुलाबेयास दरवाजेयास केलीं १

त्याजउपर चा अवचितगड दिा पेसवे यांची केली १

———

ले. ५ } श्री {

चेऊल प्रांती नूतन नावें ठेविली

मौजे ताम्हंनई तों उमटें रामाजी देशाई मामले मजकूर ये येहीं गाव आपणा तर्फेस सरकारांतून घेऊन आबाद केला म्हणौन मौजें रामराज नांव ठेविले १ रकम——लारी १७०७८६॥

खार बोलाडी तों उमटें ताजुदीन अलीखान दिवाण चेऊल येहीं ते खार विकत घेतली तिचे नाव खार ताजपूर ठेविलें १ रकम——लारी ३७०

माहाल थल तों अस्टागर हे ठिंकाणीं बंदर किनारा भाट जागा होता तो मामुरा करोन नऊदर केलें त्याचे नाव नउदर रामराज सिलोत्री रामाजी देशाई मामले मार रकम—मलिकअंबर लारी ३५०॥। ११।

मौजे वांहागांव हालीं मौजें चाहिरें तों उमटे नांव कायेनिमित्य ठेविलें हे न कळे १

मौजे चेढरे तो खाडालें हे गांवचे जमीन बंदर किनारा जागा भाट माळ होतें ते ठिकाणी जदीद लावगण करून बागाईत केले जेण्हे केलें तेण्हे नांव ठेविलें नउदर अलीबाग दरसवाद मौजे चेढरे सिलोत्रीं शाहा अलावदीन

रकम—लाहारी १२५

मा नागांवे तो अस्टागर बागाईताखेरीज जमीन कोठार भाट रकम लाहारी १९८ ते जमीन कृस्णाजी सुडक ठाकूर अदकारी प्रांत चेऊल येही लावणे करोन अदकारवाडी व अदकार खारी नाव दाखला चालत असे १

खार पऱ्हा कसबे चेऊल सिलोत्री करीन इबसखान पाऊल देस फिरंगी पैकी रकम लाहारी ४०८ हाली ताजुदीन अलीखान दिवाण चेऊल येहीं चुनेगजी उघडी बांधोन मामूर केली तिचें नांव दिवाणखार म्हणौन ठेविले १

———

के. ६ } { शके १६७७ कार्तिक शु. २
इ. स. १७५५ नोव्हें. १५

मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल—हकीकत

मौजे चाविरें उर्फ वाहागांव तों उमटें मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल मौजे मजकूरचे नजिक बंदरी पंचवीस खडीचें तराडें येऊन शाकार व भात लाकूड फांटे काबाड अमदरफ्ती होती ते ठिकाणी जदीद खार बंदिस्त कर्दे राजश्री साबाजी तुकाजी व रा कृस्णाजी तुकाजी प्रभु कायेस्त कुलकर्णी मा नांगांवे व मा आगसी मामले मजकूर चिटणीस दिमत श्रीमत मानाजी आग्रे वजारतमाब जजिरे कुलाबा सु॥ सीत खमसैन मयां व अलफ छ १० रोज माहे सफर उर्फ कार्तिक मौजे मजकूरचे गावठणाचे उतरेस दर्याचे खाडीचें नस्त व समग्र गांवचा डोंगराचा पाणलोट विऱ्हा त्याचें नस्त ऐसी गोडें व खारे पाणी याची नस्त येक ठिकाणी मिळाली ते स्थली चुनेगजी बदिस्त करून बाधिलें त्याजवर गोडे पाणीयाचे बळें करूल दोन वेला बंदिस्त फुटोन गेली त्याबवर तिसरे मर्तबा बदिस्त फेर केलियानी देश जाणार नाही साहून घ्यावी ऐसा बहुताचे मते ठराव जाहाला त्याजउपर गांवाचे पूर्वेस खडक होता त्यास बेलदार व संकतरास व सुरंग लाऊन खडप फोडोन नदीचें पाणी याचा पल दक्षेणेस सांड केली बदिस्त व इमारत मिलोन खर्च रुपये १०००० दाहा हजार जाहाले हे गोस्टीची शेर्ती व नामोसी अमुलकी परमुलको मशूर जाहाली प्रांतामधे जदीद खार व नउदर वगैरा नूतन जाहालें त्याचा बयाज जमीदारी दाखलेयास लेहून ठेवावें हे दस्तुरात जाणून वेवारिसी बेरकमी दर्यातील जमीन

काढून वतनी सिलोतर केलें तें जमीदाराच्या पेशाने लेहून ठेविलें त्याची नकल पेस्तर दाखल्यास असावी म्हणून मशारनिले येहीं लेहून मागितली त्यावरून लेख हस्ताक्षेर कृस्णाजी माणकाजी अधिकारी मामले मजकूर

———

ले. ७ } श्री { शके १६६१ इ. स. १७३९–४०

मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल—हकीकती

खार कांचली दरसवा (द) तों श्री गाव मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल सिलोत्री सैद माहामद मीर सैदी हमजां सेकीन कसबे चेऊल बारकुम रकमाला रकम मलिक अबरी कदीम माहाल लाहारी १७५

सदरहु खार मजकूर बहुत मुदत खराचा दर्यागर्क व विन्हेगर्क व जंगल-गर्क असतां बेवारिसी जाणून हाली बंदिस्त कर्दे राजश्री साबाजी तुकाजी व राजश्री कृस्णाजी तुकाजी प्रभू कायेस्त कुलकर्णी माहाल नागावें मा आगसी व तो अस्टागर मामले मजकूर चिटनीस दिमत मानाजी आंगरे वजारत-माब जजिरे कुलाबा सुा [मो. जा.*] आर्बैन मयां व अलफ सदरहु बयाज हस्ताक्षेर कृस्णाजी माणकाजी अदिकारी मामले मजकूर मशारनिले येहीं आज्ञा केली ऐसीजे खार मजकूर कदीम सिलोतर कोण्हाचें व महसूल रकम काये आहे तें लेहून द्यावें त्यावरून लेहून दिल्हे

———

ले. ८ } श्री { शके १६९५ श्रावण शुा। १३ इ. स. १७७३ आगष्ट १५

हकीकत राजश्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल रा पेसवे यांचे भेटी जावयास निघाले श्रावण वद्ये त्रियोदसी रविवारी पोहनाडास मुकाम केले तेथून नागोठणेयास येऊन रा त्रिंबक विनायेक सरसुभेदार दिमत पंत प्रधान यांच्या भेटी जाहाली यांतेंही आदर करोन च्यार पांच दिवस राहाविले श्री गणेश चतुर्थी जाहालियावर रा माहादाजी विश्वनाथ मुतसदी दिमत वजारत माब यांस व रा विठोजी व दादजी अदकारी व रा पादुरग बाबजी दिमत माहादाजी देसाई यांस नागोठणेंयांस ठेऊन आज्ञा केली कीं तुम्ही येथें नागोठणेयास च्यार दिवस राहावोन चेऊल प्रांताचे देसमुखीचे कागदपत्र सरसुमे यांस दाखऊन पुणेयास येणे आज्ञेप्रो राहिले त्याजवर माहादाजी प्रभु-येही अदकारी व पादुरग रुा। १० सरकारचे देऊन सरसुभा नजर करविली

सुभेदार यांचे बोटीवर मडली बैसली होतीं तेथू(न) माहादाजी प्रभु येही सुभेदार यास येकांती नेऊ आपण व पादूरग बाबजी यांस घेऊन खलबतात जाऊन वतनी कागदपत्र सरसुभेदार यांस दखल केले त्यांस देसाई अदकारी देसकुळकर्णी येका प्रांताचे जमीदार असोंन अदकारी यांचा अनादर करोन त्यांस बाहीर बसऊन देसपाडे यांस येकाती नेऊन जाहाले वर्तमान कागदपत्राचे व भाशेणाचा अर्थ अदकारी यां अश्रुत असें न्याये नीतीने अनीत जाणून जाहालें वर्तमान लिहिले असे कलम

ले. ९ श्री { शके १६२८ माघ वा॥ १० / इ. स. १७०७ फेब्रुवारी १६ }

इकीकत खार माहाल शाहापूर तो श्री गांव मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल खार मजकूर राजक्रांतीं धामधुमीमुळे बहुत साले वैराण बेचिराख खराबा पडली होती त्याजउपर राजश्री कान्होजी आंगरे सरखेल जंजिरे कुलाबा यांच्या कारकीर्दीमधे छ २३ माहे जिलकाद सन सबा मयां व अलफ ई कौलनामे असस्वारी राजश्री कान्होजी आगरे ता गोंद पाटेल मुकादम व रयांन माहाल शाहापूर तो श्रीगांव येण्हे प्रो कौल देऊन मामुरी केली हांली कोल पाटेल वलद गोंद पाटेंल येण्हे कोटे पाटेल यास हक मुशाहिरा दस्ताप्रमाणे वाजिबी द्यावा ऐसें असोन कोण्हास मोहीन प्रो हात हुचलून द्यावे कोण्हास तोंडावर मारून बबरदस्तीने न द्यावें हस्ता प्रो सारे खारीचा हक मुशारा आपण खात असतां कोटे पाटेल जजिरे कुलाबा फिरयाद गेले तेव्हां श्रीमत रादश्री राघोजी आंगरे येहीं राजश्री साबाजी तुकाजी चिटनीस व रा गोविदसेट यांस न्यायाविसीं आज्ञा केलीं आज्ञेवरून रा कृस्णाजी व विठोजी अदकारी व रा पादुरग बाबजी कारकुन दिमत माहादाजी देशकुलकर्णी व बालाजी मल्हार कुळकर्णी खार मजकूर यांस हुजूर बोलाऊन आज्ञा केली कीं तुम्ही जमीदार खार मजकुरचा न्याई हुजूर आला असे याचे कागदपत्र दाखले आणून हुजूर रुजु करावे त्यास आज्ञे प्रो खार मजकूर येथील हक जाबिता मिरासदार मा माहाल शाहापूर तो श्री गाव मामले चेऊल सुा तिसा सितैन अलफ हक मुशारा पाटेल भांत केली मुडे

२। सेत खात नदी निसबत बेळ पाटेल गण पाटेल मुकादम
१॥ सेत डोल्हारा निसबत सोंम पाटेल मुकादम
।· सेत देवसेत निा सोम पाटेल मुकादम
१८ सेत खोंपणे निस(ब)त भांन पाटेल

१८ सेत खर नदी निसबत दाद पाटेल
१। सेत ढेरण निा गोम पाटेल
१८ सेत झाड बुजरूख निसबत पोस पाटेल
१। सेत रामथेवी निा बांग भोईर
१८ सेत लढी निा गोम पाटेल
॥। झाड खुर्द निसबत हर भगत
१॥ सेत पान्हेड निा घुवा पाटेल
१८ सेत बाहाड निा बाल पाटेल
१। सेत उदेस पोस पाटेल
८५ सेत नारंगी निा लखम पाटेल
२८ सेत भांगार निा किते २
घांग माहात्रा १ खेद भगत १

१६८५

येण्हे प्रों पेशजींचे दाखले अदकारी यांकडील या खेरी(ज) पुख्तु ! काकार कागद देशकुलकर्णी व खार मारचा कुलकर्णी रुजु जाले तेन्हा कोळ पाटेल सेत नारंगी येथील कोटे पाटेल मुकादमीस लागू नाहीं यैसे खरे जाहाले सरखेल साहेबांचा कौल आहे त्यामधे गैर मालुमात सांगोन मुकादम नांव लेह-विले यैसा ठराव होऊन माहाल मजकूर दर बिघा रुा ४ सरकारची हरखी घेऊन सदा द्याव्या अैसा करार पैका हस्फेबंदी प्रो वसूल हिल्हे सन खमस सितैन मयां व अलफ (निराळे हस्ताक्षर) पूर्वील प्रघत बाछाई अमल होता त्यामागोन सिवाजी राजे यांचा अमल जाहला त्या मागोन रा सरखेल जजिरे कुलाबा खान जजिरे राजपुरी व मोगल किले राजकोट सदरहु कारकीर्दीचे कागदपत्र न्याई मनसुबी मुळे मुलकी गावाचें दस्त पाहोन खडीस रुपया अगर कमी हरखी घेतली असे हाली शापूरचे दस्तास बिघा रुा ४ घेतले हे बेदस्तूर नादुरुस्त गोस्ट केली कलम

ले. १० } श्री {

मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल—हकीकत
फिरंगी टोपकर यांची स्थले

गोंवे १ पुर्तकाल १ वसै १ ठाणे १
बंदर दवण १ रेवदंडें १ उरण १

हे स्थली राज्ये करीत असतां माहा(रा)स्ट धर्माचा द्वेश करोन आपले राज्यांत चालचलण

इंदु येही देवालये न बांधांवी १

मुसलमान येहीं मसीद न बांधावी १

लग्नासमई त्याचे माणूस मेहरणी मडपांत आणून त्याचे साक्षीने लग्ने लावावीं १

घरी कोण्ही देवकार्ये केले तें कललियावर त्याचे घर लुटून त्यास देवकार्यांचा अमलप्रमाणे दोन वर्शे तीन वर्शे गोंवेयास पाठऊन ठेवावें १

आपल्या घरी देवदेव्हारा मुहूर्ती पूजन कार्यास न ये १

तुलसी वृंदावन पूजन मनाई १

ग्रहस्त मृत्ये पावला त्याला मूल त्यास काका चुलते नाहीं माता असता त्या मुलास बाटवावा १

तंबाखु दर सेर रा ॥। प्रो खोताजवलोन विकत घ्यावा आणखी जागां परमुलकांतून पावसर अदसेर सापडला तर त्याचे घर मालिस्त करोन नागवावें १

हे प्रमाणे त्याचे राज्यातील पघत असतां हा उपद्रव जाणून बुगाजी नाई(क) व नारण नाईक अणजूरकर याती पांचकलसे येही राजश्री बाजीराव बलाल पंतप्रधान दिमत श्रीमत राजा शाहु यांजवल येऊन त्यास(स)कल वृतांत विदित करोन त्याजवल कितेक वर्शे सेवा केली मलश्ये राज्ये मोडोन मऱ्हास्ट धर्माची वृधि करांवी त्याजवर येत्न प्रेत्नात फार मुदत असतां कोट ठाणे प्रांत सास्टी याचे पूर्वेस खाडी आहे त्या खाडीमधे नाका पाहून खबरदारीस पानबु(रु)ज बांधिले आहेत त्या खाडीचे किना(रा) पूर्वेस मुलूक पेसवे यांचा आहे त्याबवर अणजुरकर येहीं आपले स्वयाती लोक धारकरी करार करोन त्यास गरीब कुलबियाचा भेष देऊन त्या सोबत गावीचा पाटेल देऊन कोंबडीं व बकरीं व गडी गडें घेऊन ठाणे कोटास येऊन परवानगी आणून खासा कपितान कोट मजकूर याची भेट घेऊन त्यास सोगात नजर करोन अर्ज केला असाजे आम्ही रयेत आम्हास दखीनचा राजा बाजीराव यांकडील देणे मागणे वेठ बेगार फार दुख देतो तेथील अमलदार बहुतांचे साहेबीमधे आम्हास राहावत नाहीं साहेबांचे राज्यात रयेतीस कोण्हाची सता साहेबी नाहीं हे सुख जाणून गुरेढोरेसह वर्तमान साहेबांचे मुलकात येत असो त्यास खाडीचे पानबुरजास ताकीद करणे कीं आम्ही माणसें व गुरे आणून रात्रेसमंई हाक पुकारा न करावा म्हणून ताकीद करावी

———

ले. ११ } {

[वंशावळ–चौलचा मुसलमान अमलदार ताजुदीन अलीखान याची]
मौजे दिवटब प्रा वेसवीं दाभोळ येथील मुलना हुसैन १
त्याचा लेक सेख महमद मोतमनखान १

त्याचे लेके ताजुदीन अलीखान १	सर्फदीन माखान वाकेनवीस १
याचे पुत्र	याचे पुत्र
१ गाजीसाहेब	१ महमद माजुम
१ हैदरसाहेब	१ बाकरसाहेब
१ मोतमतखान	१ अजमत सा
३	३

ले. १२ } {

मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल
सुभा चेऊल इकीकत कारकीर्द रा राघोजी आगरे

[पहिला बंद दोन्ही बाजूंस लिहिलेला गहाळ झाला आहे. दुसऱ्या बंदापासून सुरुवात.]

चेऊल प्रांती लोक मराठे वाडवल व आगरी व कऱ्हाडे कुलंबी वगैरा रयेत यांकडील जातीमध्यें गोतपरत्वें न्यायें मनसुबी जाहाली तर अदकारी प्रांत मजकूर यांचे घरीं येऊन न्याये गावांतील मोक्षासर व रयेत येऊन करावी ज्यास सज्या देणे त्यास त्याचा अनाचार पाहोन गोत दंड द्यावा तो

कोण्हापासोन बद (अ)मल जाहाला त्यास दिवाण दड होऊन उपरात देवदड प्रायोस्चित व गोतदंड देऊनं त्याचा सेलामानं अदिकारी येहीं घ्यावा हालीं भोगवटा चालत आहे कलम १

कोण्हापासोन अन्नवेव्हारें करून भ्रस्ट जाहाला त्यास शास्त्रमतें व गोताचे आधारें तीर्थयात्रा अथवा दानधर्म अपराधप्रमाणे करोन उपरात गोतास जेवण करोन प्रायेस्चिताचा सेला अदकारी यांस द्यावा चालत आहे क(ल)म १

गोतामधें कोण्ही निपुत्रिक असतां वौशास दतपुत्र घेईल तेण्हे सरकारांत सेला देऊन आज्ञा घेऊंन उपरां(त) दतविधानांसमई अदिकारी यास सेला द्यावा १

ज्यापासोन चोरी जाहाली त्यास दिवाण दंड होऊन सदरहु कलमेप्रमाणे गोतदड असावा कलम १

येण्हेप्रमाणे प्रांतामधे पघत चालत असतां माहाद पाटेल व हास पाटेल व भानंजी पाटेल व बालकोजी पाटेल मौजे मालाडे तो उमटे व मुकादम गोत घरणे प्रांत चेऊल सुमे मजकूर सुा सबैन मयां व अलफ शेके १६९२ विकृति नाम सवसरे वैसाक सुघ ३ त्रितीया मंद वार छ २ माहे मोहरम दिल्हे वतनपत्र ऐसे जे तुम्ही हुजुर जजिरे कुलावेचे मुकामीं विनंती केली कीं आमची न्यात कऱ्हाडी प्रांत मजकुरी आहेत जो कार्येप्रयोजन करील तरी अगोदर मानं सरकारचें पांच विडे काढून ठेवावे उपरांत सभेस गध विडे जाहालियावर पांच विडे सरकारचे अगोदर काढिले ते जे गांवी प्रयोजन होईल ते गांवचे पाटलास द्यावे अथवा सरकारचा सिपाई किंवा मामलेदार असेल त्याच्यापुढे ठेवावे याप्रो चालले असे वतनवतनदार गोत घरणे याचा मुकादम कोण्हीं नाहीं सर्व वडिलपण सरकाराचें याजप्रो चालले आहे यामागें या वतनाचा वडिलधारा कोण्हाकडेस आहे तो हाजीर नाहीं ऐसेंही ठावकें नाहीं बहुकाळ वतन दार असोंन प्रांत मजकुरींहून फार रोज गुदरले इकडील वलवटा मोडला याजमुळे आडलत नाहीं येसे असील तरी न कले सांप्रते चाल चालली आहे ती विदित केली यावरून कृपालु होऊन लिहिले वतन आमंच्या दुमाले केल्यास भोगवटा करावयास उमेदवार आहों म्हणौन त्यावरून मनास आणितां प्रांतात ज्ञातीज्ञातीस वडिलधारा मानपान चालत आहे कराडी जातीस चालत नाहीं सरकार अमलात दाखला वडील-पणाचा मानपान आहे व येते विदित केले यात तोच अर्थ आहे यांत शौश-यात्मक नाहीं निवारीस वतन दुमालेयास लागले याविना रूढीस येत नाहीं हे जाणौन साल मजकुरांपासोन तुमचे दुमाला करून भोगवटे यास वतनपत्र सादर केले केलें असे तर तुमचे ज्ञातीन शुभाशुभ कार्ये प्रयोजन होईल तेथे माजी खाजप्रो गध विडे लग्नाचा सेला व पाटाचा घेत जांवा ज्यास सेला द्यावयाची अवकता नाहीं त्याण्हे सेलेयाचे ऐवजी नारल दिल्हा तरी बहुत मान करून सेला समजोन ध्यावा ज्या कलास अवकात आहे त्याजला त्याचें जीवन पाहून सेला घेत जावा न्याहातीत न्याये मनसुबी जाहाली तरी तुम्ही करीत जावें सरकारात विदित करावें सरकारांतून पारिपात्य अतवा खंड गुन्हे-गारी होणे ती होत जाईल याप्रो वतनाचा भोगवटा साल मजकुरापासोंन तुम्ही वडिलांचे पुत्रपौत्रीं वौशपरपरेने अवलाद अफलाद करीत जाऊंन मानपान गध विडा टिला सेला परडी ज्या कार्यास जो मान सुभाचा तो सुभाकार्यास घेत जावा यावरून समघे तुम्हाजवलोन हरखी नजर रुपये १७५ एकूण पावणे दोनसे घेऊन लिहिले प्रो वतन दिल्हें असे भोगवटा हर दरसाल करीत जाणे वतनदार संमघे म्हैस एक व घर व लग्नटका एक सदरहु प्रो साल दरसाल पडत जाईल म(ह)णौन वतनपत्र

सदरहु वतनीपत्र जदीद सरकार तर्फेने दिल्हे तेव्हां अदिकारी वतनंदार यांचा आधिकार कोठे राहिला त्यांचा उजूर रयेतीने कायेनिमत्य करावा व प्रजालोक रयेत येण्हे सेतभात करोन दिवाणाचा माहासूल देऊन वेठबेगार करोन गुजरानी भरावी हकीमास घर देणे व गांव खर्च व ताबाकुपटी द्यावी लग्न कार्यास लग्नटका देऊन कार्ये करावें हेच रयेतीस भारी गोस्ट समजत असतां हाली लग्नटका सरकारात देऊन चिटी काढावी या खेरीज नवी कानु मुकादमास सेला द्यावा हे रयेतीस सतोश किंवा न कले हा अर्थ हाकीम धनी येही विचारात आणावी मालयेत पाहातां रुा पावणे दोनसे येका याचका अथवा कलावतास येके घडीने बक्षीस देतांत.

———

ले. १३ } { शके १६९१ / इ. स. १७६१–६२

हकीकत प्रांत चेऊल सरकार खुजीस्तेबुनयाद तलकोंकण नजामनमुलकी पाा आभेपुरी

सन सबैन मयां व अलफ ते सालीं अगर चेऊल येथील सचणीस जजिरे कुलाबा कारकीर्द रा राघोजी आंगरे रा मल्हार विश्वनाथ भावजी जनार्दन सचणीस आले तेही आपले आवडीप्रमाणे वाडियांची हद्द सरकारचे रकमाले यास लिहिली वाडी

हा अदिकारी यांचें उतरेस बारकुम वाडीचें खत रामाजी गोत्र प्रभु १

सदरहु वाडीचे उतरेस सिदी अंबर १

त्या वाडीचे उतरेस वाडी. हा जनार्दन दादजी हाली फर्जदान भावजी जनार्दन

येण्णेप्रो कदीम पाहाणीस असतां सालमजकुरी समग्रवाडी भावजी येहीं आपले नांवे लेहून कौल घेतला कलम १ पाा आभेपुरी आगर चेऊल १

वाडी अघोरी हा साबाजी रगाजी सबनीस हाली फर्जदान पुतळाजी व दादाजी वाडी मामुरी करून विहीर गजीव बाधिली

१ खासगत वाडी अघोरी

१ वाडी हा बालाजी जाब

१ वाडी हा सिवजी दुभासी व गणेश दुभासी

३

वाडी नजीक श्रीमलेश्वर श्री त्रिविक्रम नारायेणाचे पछेमेस निसब(त) प्रल्हादजी बालाजी देसाई व कुलकर्णी

खासगत उतर भाग १ — हा हिराजी रगाजी प्रभु सुतार व सिरंग सुदामा सिरंग सुदामाचा वालीस हाली गोविंद त्रिंबक मुंबेस आहे १

यास देक्षेण हद मोगल हाली कोलटकर रा कृस्णाजो नाईक

वाडी तांम भाट बाबत हबसी हालीं निसबत माहादजी बालाजी देसाई गोविंद केशव व बालाजी केशव येही खरात्रा वाडी मामूर केली त्यामधे वाडकर रा॰

१ सिवभट उपाधे
१ भिकमभट भाटे उा
१ अंतभट उा
१ दादभट उा
४

ले. १४

दतपुत्र ब्राह्मण समुदायामधे जाहाले त्याचा बयाज तपसिलवार मामले चेऊल

गोविंद कृष्ण देशमुख यांते कृष्णाजी महादेव दत्त त्याचे पुत्र गोविंद कृष्ण त्याचे दत्त प्रथम पुत्र घेतला तो मृत्य पावला त्याजमागोन खंडोपंत द्रिघे यांपासोन अबाजीपंत घेतला १

बापू जोसी बेल्हावीकर येही माहादेव बाबत...दत्त घेतला १

ले. १५

श्रीगणेशायन्मां

हकीकती प्रांत तलकोंकण व वरघाट सुबे खुजीस्ते बुनयाद नि(जा)मनमुलकी सनहाये व शकहाये श्रावण पुणिमेस नारळ चेऊलचा रेवदडेयास जात होता फिरगी याणे मोगलाचा भालदार मारिला त्या दिवसापासोन चेऊलचा नारळ पीर आदम नजिक खाडीमधे टाकीत आसत राजकोट मोंगलाजवळून रा सेकोजी आगरे सरखेल याही घेतला राजकोटचा नारळ सरखेल याजकडून सरदार रघुजी सबनीस व पंचवीस बरकंमदाज सिपाई येऊन जमीदार सेटे माहाजान चोधरी रयेत मिळोन ते समई फिरंगी याजकडे पेगाम पाठवावा त्याचे बराबर दाहा आसामी सरदार भडारी व रामा लखम पाटेल कोली रेवदडा आसे येत आसत हबसी पाटेल कोली कसबे दादर यास नारल

पाच व पानाच्या पट्या पाच कोली लोकास देत असत नारलासमई रामा लखम पाटेल येणे कथला केला की हबसी पाटेल यास मान देऊ नये आम्ही पाटेल नारलाचा मान आम्ही घेत आलो रघुजी सबणीस याही दोघासी दिल्ही नाही रामा लखम पाटेल रेवदंडकर हुजूर जजिरे कुलाबेयास जाऊन सरखेल यास विदित केले त्याजवर सरखेलचा हुकूम जाहाला की जमीदार सेटे माहाजन चोधरी यास पुरसीस केली नारलाचा मान कोनास मिलत असतो ते समई जमीदाराची शाईदी गुदरली की हबसी पाो कोली चेऊलचा कदीम त्यास देतो कोली लोकात हरयेक जाती समध्ये कथला पडला···असतां चेऊ-लचा पाो प्रातातील आपली जात मेलऊन खटले तोडतात असी चाल पूरवा-पार आहे जातीत···मानपान हबसी पाो कोा दादर यास मिलतो...रामा (ल)खम पाो कोली रेवदंडकर खोटा पडला···फिरंगी याचे सरदार याजबराबर येत असतो रामा मजकूर खोटा पडला

ले. १६

शके १६२३, पौष शु॥ १
इ. स. १७०१, डिसेम्बर १९

अजदीवान व फौजदार बंदर मुर्तजाबाद उर्फ चेऊल (फार्शी
खैररव्वा जोसी व उपाध्ये कसबे चेऊल बिदानद के शिक्का.)

सुा इसने मयां व अलफ साल मजकुरी चैत्र सुध्य प्रतिपेदेस नवें सालचें पंचांग तुम्ही जोसी उपाध्ये येहीं आधी जमीदारांकडे सांगितलें मागोन माहाली अमलदारांस सांगितले म्हणून महमदखान हवालदार येंही जोसी उपाध्ये यापासोन मसाला घेतला बादजजमीदार व जोसी उपाध्ये हुजूर येऊन मलाजमतेस अर्ज केला जे पेसजीपासून कारकीर्द दरकारकीर्द बाछांई अमलांत फौजदार चेवलात येत होते बादज मराठेयाचा अमल जाहाला तेव्हाही सुभेदार मामलेदार येत होते त्यास आधीं जमीदारांकडे पंचांग सांगावे बादज सुभे मामले यांस सांगावे ऐसा दस्तुरात भोगवटा आजपरीयेत चालत आला अंसे त्यावरोन खातरेस आणिता दामोधर पिटकर व सेटे चौधरी येंही व सरकारचे नवी सिंदे मुछदी येंही शाहदी दिल्ही त्यास बाछाई जमीदार असत जे मोजीब पेसजींपासून चालत अंसे त्या मोजीब देसाई व अदिकारी व देशपांडे याजकडे पंचांग सागावयाचा रवाद आहे त्यामोजीब सांगत जाणे तुमचा मसाला दूर करून अमलदारास ताकीद फर्माविली अंसे बाणिजे रा छ २७ रजब

फा.
मोर्तब

ले. १७ } हुं { शके १६२३, पौष वद्य १३
इ. स. १७०२ जानेवारी १५

फार्शी
शिक्का

अजदीवाण सरकार किले राजकोट मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल रयां रयांन मामले मजकूर सुा इसने मियां व अलफ दरविला आपाजी माहादाजी अदिकारी मामले मजकूर हुजूर येऊन बंदगीस इलतिमास केला ऐसा जे आम्हा जमीदाराचे हक सरकारीं जमा आहेत त्यासिवाई देहाये प्रात मजकूर व रयां कसबा व्यागर रयेत निाा आपला कानुकायदा बितपा

दत पालक बेटा घेईल त्यापासून सेला कलम १

मोहतर्फी वाजेत्री यां पासून महसूल कलम १

डाकी स्थल काबलक्रिया व कुमार क्रिया याजकगे हक कलम १

प्राइश्चित घेईल त्यापासून सेला कलम १

जोसी उपाधे ब्राह्मण याती गोलक याजकडे हक कलम १

मोहतर्फी मंाा कसबा यांपासून 'सण दिपवाली व सिमगा व पाडवा जीव प्रो कायदा कलम १

येणे मोजीब सुदामत पेस्तरपासोन आपला भोगोटा व्याजकग चालत आहे त्यास ते मोजीब सरकारतर्फेन सनद सादर होये तो हुकूम फर्माविला पाहिजे त्याजवरून प्रां मजकूरचे वतनदार व रयान यांनजीक खातीरे आणोन सुदामत भोगोटा चालत आहे हालीं तेच मोजब मंाारनिलेचा हक लाजीमा देत जाणे रा छ २७ साबान (फा. मोर्तब)

ले. १८ } { शके १६२३ माघ शु. ७
इ. स. १७०२ जानेवारी २४

'राजेश्री माहादाजी दादाजी देसाई देसकुलकर्णी चेऊल गो.

दं अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्ये स्नो सुभानजी मोहिते हवालदार व कारकून बजिरे पदमदुर्ग जोहार व आशीर्वाद सुा इसने मया व अलफ उपर तुम्ही विनंतीपत्र पाठविले ते पावले साल मजकुरी बाम्हणगाव तर्फ सागरगडकरी यानी जाळून तलख केले यैसीयासि आम्ही व राजश्री मल्हार नारायण यानी रयेतेस धीर भरवसा देऊन कीर्दीस लाविली आहे त्यासी मोगलाचा कौल दिल्हा आहे त्यामोजीब साहेबी जजिराचा कौल दिले पाहिजे म्हणोन तपसिले लिहिले तरी तुम्ही मोगलाचे तर्फेने कौल पेस्तर सालीचे

दिल्हे आश त्यास दिवाणाचे दस्तकानसी जमेचा आकार पाठऊन देणे म्हणजे जजिराहूनही रयेतीस दिल्हे जातील तरी अवश्येमेव दिवाणाचे दस्त कानसी आकार पाठऊन देणे मौजे खानूचा कौल सवा खडीप्रमाणे कौल मोगलाचा घेतला आहे त्यामोजीब जजिराचा कौल दिल्हा पाहिजे म्हणोन लिा तरी सारेच दस्त तुम्हाकडून आले म्हणजे सहजेच तुमचेही गावास कौल दिल्हा जाईल व सालमजकूर बाम्हणतर्फेने पाहाणी जाली त्याचा आकार दिवाणाचे दस्तका······सत्वर पाठऊन देणे···(नि. अ.) छ ६ रमजान हे··· मोर
तबसु
(सुभानजी मोहिते याचा अस्पष्ट शिक्का.*) द

ले. १९ } श्री { शक १६२५ फाल्गुन व. १२
इ. स. १७०४ मार्च २१

राजश्री आपाजी महादाजी अदीकारी
मामले चेऊल गोसावी यासी

स्नेहांकित कानोजी आगरे नामजाद सरसुभा आरमार सुा आर्बा मया अलफ येथील क्षेम जाणोन स्वकीये कुशल लेखन करणे यानतर पत्र पाठविले पावले लिहिला अभिप्राये सविस्तरे कलो आला यैसियास तुम्ही लिहिले की भेट घ्यावी आपले वर्तमान विदित करावे यैसे मानस आहे म्हणोन लिहिले तरी बहुत बरे तुम्ही भेटीस येणे भेटी जाहालियावरी आपले वर्तमाण (सविस्त)र विदित करणे त्यावरून तुमचा सरंजाम काये......केला जाईल रा छ २५ जिलकाद (नि. अ.) मोर्तब सुद
मोरतब
सुद

ले. २० } श्री { शके १६२६ वैशाख वद्य ५
इ. स. १७०४ एप्रिल २८

स्वस्ति श्री राज्याभिषक शके ३० तारणनाम संवत्सरे वैशाख बहुल पंचेमी[1] भृगुवासरे क्षत्रिये कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति यांणी रायाजी सदक प्रभु पारपत्यागार पा सांकसें यासि आज्ञा केली ऐसीजे जंजिरे पदमदुर्गाच्या तनखियास

श्री शि वनरपति हर्षनिदान मो रेश्वर सुत नील कंठ प्रधान	श्री आई आ दि पुरुष श्रीराजा शिवस्वामीकृपानिधी तस्य परशराम त्र्य बक प्रतिनिधि

सालगुदस्ता स्वामीनी राजश्री बहिरो पंडित प्रधान याकडून देविले त्यांणी

---

१ खरे जंत्रीत पंचमीचा क्षय दिला आहे.

आउर वलित पैकीं २ दोन गांव नेमून दिल्हे आहेत ते स्वामीनी करार केले असत तरी तुम्हीं हे जाणून पंडित मशारनिलेनीं जे गांव नेमून दिल्हे आहेत ते जंजिर मजकूरच्या कारकुनाचे स्वाधीन करणें ते वसूल घेतील तुम्ही कांहीं वसूल न खाणें खलेल केलिया ताकीद होईल हे जाणून लिहिले प्रों वर्तोन गावांची कीर्दी मामुरी होये ती करणें (नि.अ.) निदेश समक्ष

मर्या दशबुर्शी मोर्तब
देयंविरा
जते

(कागदामागें*) रुजु सुरु निवीस सुरुसुद बार

———

ले. २१ हुं शके १६२६ कार्त्तिक व॥ १४
इ. स. १७०४ नोव्हेंबर १५

बजानेब अमिलानी व कारकुनानी हाल व इस्तकबील व देशमुखानी व देशपांडे यानी बंदर मामले मोर्तजाबाज उर्फ चेऊल बिदान· (फार्शी दके सुा खमस मियां व अलफ दरीविला आपाजी माहादाजी शिक्का) अदिकारी मामले मजकूर हुजूर येऊन बंदगी हजरती इलातिमास केला येसाजे पेसजीं बाछाई अमल होता ते मर्तबां जमीनदारास पचोंत्रा पावत होता दरम्याने सिवाजी राजे यांचें काबिजात जाहालीपासून पावत नाहीं हाली बाछाई अमलाची पैवस्ती जालिया बाजद इसाबतीचा हक हालफिल चालों द्यावा म्हणोन हुकूम फर्माविला असे त्यास कमीनाचे इसावती गांव

मौजे ढवर तो खडालें १ मौजे माहान तो पाल १ मौजे कुदे सो उमटे १

सदरहु तीनी गांव कमदस्त जाणून कमीनाची बेहबुधी चालणार नाही व आपले बिरादर वतनभाऊ यांसही जदीद गांव सरकार तर्फेनें इनायेत केले आहेत त्या मोजीब कसबे श्रीगांवचा इसाबतीचा हुकूम होऊन सनद मऱ्हामत केलेयाने बंदेयाची सर्फराजी होऊन येईल व हेविसी रफातपन्हा सिदी खान दंडा राजपुरी यांचें सिफारसखत रुजु केले त्यास खान मशारनिले यांचे बदल खातीर व जमेदारावर नदर देऊन पेसजीचे गाव तीन व हाली कसबे सिरगाव मिलोन च्यार गांव इसाबत मुकरर करार केले असेत सदरहु इसाबत दस्तुर मोजीब पालणूक करणे ताजे संनदेचा साल दरसाल उजूर न करणे नकल घेऊन आसल भोगोटियास देणे···छ २७ रजब (फा. मोर्तब)

———

ले. २२ } श्री { शके १६२५–६
इ. स. १७०४

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक भावजी आपाजी अदीकारी मामले चेऊल साहेबीं आज्ञा केली कीं तुमचे वतनाचा भोगवटा आजपावेतों न चालव याचा अर्थ काये त्यास मोगलाई अमल कमकुवत जाहाला चेऊल प्रांती धामधूम होऊन बहुतांची साईबी जाली खांदेरकरांचा अमल या निराला पदमदुर्गाकडील व कुलाबा व राजकोट तर्फा यैसें त्रिराज्य जाहालें येकेकडे रुजू होऊन दुसरे तर्फेस रुजू न होतां जीव वांचत नाहीं ते प्रसगीं कितेकांचे नाश जाहाले तें भये जाणून रेवदडास सुखवस्तीकारणे राहिलों त्या उपर (मो. जा.) माहाराज कैलासवासी येहीं वतनदारांस पत्र सादर केलें कीं हुजूर येणे त्या उपर भेटावयास जावें हा निश्चये केलियाउपर त्रिंबक गणेश सेणवी कुलाब तर्फेन रेवदंडेयास आले होते त्यांचे भेटीस देशक जाऊन भेट घेतली या उपर माहादाजी देश-कुलकर्णी येण्हे गोविदराऊ देशाई यांस बोलिला कीं कुलाबेयास जाल तेव्हा तेथे हक लाजीमा लेहून मागितील त्या उपर आपाजी अदीकारी आपला हक लाजीमा लेहून देईल तुम्ही आम्ही काये लेहून द्यावें असा विचार करून माहादाजी कुलकर्णी याण्हे राजकोटास दिवाणास जाहीर केलें कीं आपाजी अदिकारी त्रिंबक गणेश यांचे मतें कुलाबतर्फेस रुजू जाहाले असत आणखी कितेक गैरवाका समजाविलीयावर अदिकारी व देशाई यांस आणून नाळीसी बाधून उडवावयास आज्ञा केली यावर भया अनंदीराम ब···कसी याण्हे अर्ज केला की जे डोलेयाने पाछाईस पाहावे अण त्यांचे नावावरून पैलपार उतरावे त्यांचे नाव तुम्ही बुडविता तेव्हा दूरदेशा विचार पाहाणे···यैसी कितेक वजा रदबदल केलियावर नवमहिने पावेतो बेडी घालोन अटक केली होती असा कितेक अर्थ आपणावर गुजरला तो सेवेसी लिा पुरवत नाही साहेब जाणते असा याउपर साहेब कृपाळु होऊन आमचे हालावर नजर देऊन लक्षादि जनाचा प्रतिपाल करीत असा व बाजे वतनदारांचे उतम मधम चालवित असा त्याप्रमाणे आमची सर्फराजी करून चरणरजाचा प्रतिपाल केलेयाने हे लोकीं व परलोकीं पुण्ये आणि पराक्रम जोडून कीर्ती होऊन येईल वरकड आपला द्रुढनिस्चये असे कीं साहेबांचे हातोन आपले वतनांचे सार्थक होऊन येईल मोडले वतनदाराची स्थापना बहुतांची साहेबीं केली आहे तैसी सेवकाची स्थापना करणार साहेब धनी आहेत हे केलियाने चरणरजास खरीदी करून अजात केलें ऐसें होऊन वाराणसी यात्रा होईल हे विज्ञासी.

सन खमस [मया व अलफ]

फार्शी शिक्का

———

ले. २३ } हु { शके १६२९ आश्विन व. १४
इ. स. १७०७ ऑक्टोबर १३

······(आ) पाजी माहादाजी अदीकारी मामले चेऊल बीदानद (सुहुर)सन समान मियां व अलफ येसजी घोलाप नोकर सरकार किले राज को (ट)···न खारबादी याचे पोटीं पुत्र संतान नाही वौशास जागा असावी म्हणौन जावजी बोरगा नौकर सरकार याचा बेटा बनाम सुभाना (द)त घेणार म्हणौन हुजरून हुकूम घेतला आहे त्यास तुम्ही दस्तु(र) मोजीब दताचा आपला मान सेला घेऊन त्याचे जमातीचे देसक···लदार याचे शाहिदीने व आपले महजबमोजीब बाहाह्मणाचे हातो (न द)त घेईल त्यास घेऊ देणे जाणिजे रा छ २७ माहे रजेब

(फा. मोर्तब)

ले. २४ } हु { शके १६२९ फाल्गुन वद्य ४
इ. स. १७०८ फेब्रु. २८

फार्शी
शिक्का

मा। अनाम माणीक नाईक वलद हुल नाईक व बाबा घरत वलद करे घरत पाटेल देशई मामलें चेऊल सुा समान मयां व अलफ सरकारी किला सागरगड कुलाबकर गनिमाने घेतला त्यास मजकूराचा महसूल कुलाबकराचा वसूल करोन सरकारतर्फेचा वसूल केलात नाही अजी सबब तुम्हा हरदूजणास हुजूर आणून कित्येत दिवस कैदीत ठेविलें आण येक हजार रुपयांचा तकादा केला बादज अजम सिदी खान दंडाराजपुरी यांचा लिखाबद्दल खातीर माफ केलें रुपये ५४० बाकी करार रुपयें

मोजे सोगाव तो झिराड सा
१५० बा। माणीक नाईक
१५० बा। घरत
३००

तो परहूर (मो. जा.) रुपये
१०० मौजे बहिरोले बा। माणीक नाईक
६० मौजे बेलोली बा। माणीक नाईक व बाबा घरत.
१६०

ये॥ च्यारसे साठ रुपये मा। दामोदर भट पिटकर रसद जमा पोता असत रा छ १६ माहे जिल्हेज (फा. मोर्तब)

ले. २५ } { शके १६३७ वैशाख व. ११
इ. स. १७१५ मे १८

० श्री

राजाराम चर
नी सादर तुकोजी
सुत कानोजी आ
गर नीरतर[1]

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विस्वासनिधी राजमान्य राजश्री कान्होजी आंगरे सरखेल ताा वाडवल प्राा चेहूल सुा खमस अशर मया व अलफ भिवजी राणा याचा भाऊ गोदजी राणा हा फिरगाण प्राते बहुत दिवस होता म्हणोन तुम्ही त्यास पक्तीस घेतला नाहीं येशास गोदजी मााराने ब्राह्मणास अन्य व देवास दीप देहू केला आहे तेणे प्राा देहून जातीत घेणे (नि. अ.) छ २५ जमादिलौवल (मोर्तब सुद)

ले. २६ नकल } श्री { शके १६४८ भाद्रपद शुा १३
इ. स. १७१८ ऑगष्ट २७

कान्होजी आगरे

स्वहस्ती नृप शालिवाहन शेके १६४० विलंब सवत्सरे भाद्रपद शुध १३ बुधे तदिनी चंपावतीस समस्त जोसी आगरकर व बेल्हावकर

आगरकर जोसी	बेल्हावकर
१ रघु जोसी पुरुशोतम जोसी	१ कृस्ण जोसी नारायेण जोसी
१ दाद जोसी केंशव जोसी	१ गंगाधर जोसी श्रीपत जोसी
१ विठल जोसी बाल जोसी	२
३	

यांस माहाराजा (भो. जा.) सरखेल कुलाबियाचे मुकामीं असतां आम्हां समस्त जोसीयांस पाचारून आज्ञा केली ऐसी जे तुम्हास मामले चउलात वृत्ती काये आहे ती लेहोन देणे म्हणोन आज्ञा केली त्यावरून आमचे वृत्तीचा उपभोगप्रमाणे लेहोन दिधला तपसील नगर चेऊल पाखाडी १२ तिगाव पाखाडी ३ येकूण १५ देखील पालव व मला व बागमला व कसबा व तपे उमटे व महान व बाम्हण तप्याचे नदीचे दक्षेणेकडील गांव इतकी आमची जोतिश वृत्ती आहे त्या वृत्तीमध्ये आमचा उपभोग

---

१ कान्होजीच्या अनेक शिक्क्यांतील हा एक.

[समासांत*] सदरहू असल पत्र हस्ताक्षेर बाळु जोसी बेल्हावकर

सर्वत्र शुभा शुभा अनुस्ठानी

१ गणेशपूजन

१ पंचाग सर्वत्र व सर्व कार्यो अनुस्ठानी घटिका व अंतःपर सेला १

१ सर्वत्र लग्नमुहूर्त घटित जन्मकाळ सांगणे व लिहिणे जोसीयाचे कलम १

१ सर्वत्र पांचा ब्राम्हणाचे अनुस्ठान जप होमादिक होईल तेथे जोसी यांचे प्रयोजन १

१ क्षौर प्रायेश्चिती तिलपात्र आमचे

१ वाणियांकडील अघरणी व लग्नपत्रिका जो जोसी हजीर असेल त्याची दोघे जोसी हजीर असतां आगरकरांचे घरांस मान १

ब्राह्मण

१ देशस्त माध्यादीन कांवणव (काण्व) यांचे येथे सर्वा अनुस्ठानी गणेशपूजन आंचणी सहित आमचें

१ सर्वत्र कोळी व भोई यांकडे लग्नीं व मुहूर्तांचे उत्पन्न हात सेला सहित व आंचणी आरधे आमचे

किता कलमे

१ संवसर प्रतिपदेस आमचे बराबर समस्त ब्राह्मणांशी पंचागाची दिडी करावी

१ जेथे आगरकर व बेल्हावकर असतां प्रथम संवत्सरफल आगरकरांहीं सांगावें

१ चहुवरतें वाण व दान होईल तथें पाचवें आमचें.

१ श्रावण पौर्णिमेचा नारळाचा मान आगरकर जोसी यांमध्यें येके घरास मान आहेत नसले तर जो जोसी असेल तो टाकील

१ कोळी व भोई यांचे येथे जे आंचणी व गणेशपूजन होईल ते आरघी आमची १

१ आचणीचा तपसील

१ अदकारी

१ पाताणे प्रभु

१ गौळी

१ सास्टीकर जात सुतार नामाजी यांचे येथे आचरणीसहित गणेश पूजन आमचे

४

१ खारबंदीमधे मराठे चाकर मानेकडे जे आचणी व गणेशपूजन होईल ती आचणी आरधी आमची

लग्न मेढ मुहूर्त व वोट भरणे व पाट होईल तेथील सर्व उत्पन्न अरधे आमचे अरधे उपाध्याचे फलप्रदानी वाण परडीचें कितेका स्थली आहे याप्रमाणे आगर कसबे यांत उपभोग तो उमटे व माहान येथे उपभोग सर्वत्र शुभाशुभा अनुष्ठानीचें आचणीवर गणेशपूजन होईल ती आरधी आचणीसहित गणेशपूजन आमचे व लग्नी मेढ मूर्त वोट भरणे व पाट येथील उत्पन्न

सर्व आचणीसहित [समासांत*] इतकी आम्हा उभयेता जोसियांची मामले चेवलात वृत्ती आहे हे त्यास अनेथा झाले तर अन्याई असो.

आरधे आमचे पंचाग व घटिका सर्वत्र आमची ता॥ बाम्हणगाऊ येथील दक्षेणेचे गावी खेरीज गाव ३

देवघर १

मल्याण १

वरडे १

यां ज्येत्रिक उपभोग उमटे याप्रा॥ या वृत्तीमधे जोसी आम्ही आगरकर व बेल्हावकर उपाध्ये चेऊलकर जेथे चेऊलकर उपाध्ये नाहीं श्वतत्र आमची वृत्ती उभयेतां आगरकर व बेल्हावकर यांची तिचा तपसील

ता॥ माडले गांव देखील कोरला ३३ या तप्यामध्ये श्वतंत्र आम्ही जोसी व उपाध्ये व धर्माधिकारी व पुराणिक व पुरोहित मा॥ नागाव व आगासी व बाम्हण तप्याचे नदीचे उत्तरेचे गांव येथे यज्ञोपबीत जो धरितो त्याचे येथे जोसीपण आगरकर जोसी यांचे येके घरास वृत्ती उपाध्ये थलकर क्रमवंत ता॥ सिरगांव येथील जोसी गोळक त्याचे दतगांव ७ सात आहेत तेथील जोतिसी व उपाध्येपण व द ण व पुराण व पोरोहित्य आमचे स्वतत्र बेल्हावकर जोसी···श्री कनकेश्वरी कार्तिकीस दीपाचे गणेशपूजन···उभयेतां आगरकर बेल्हावकर यांचे असे

देउले त्यांचा तपसील

आंगरकर २ गणेश १ कुडेश्वर १

बेल्ही १ सोमेश्वर १

[समासांत*] पाताणे प्रभु यामध्ये पुरोहित पणाची

काही घरे आगरकर जोसी यांस आहेत १ देशमुखांचे

पेसवे यांकडील पौरोहित बेल्हावकर जोसी यांचे

ले. २७ }
नकल } श्री {शके १६४२ चैत्र शुद्ध १२
{इ. स. १७२० एप्रिल ९

आज्ञापत्र समस्त राजकार्ये धुरघर विश्वासनिधि राजश्री कान्होजी आंगरे सरखेल ता॥ माहाजन वर्तकान आगर चेऊल सु॥ आसरीन मयां व अलफ पुतलाजी माहादेऊ कुलकर्णी माहाल आगर मा॥ याचा भाऊ रामाजी माहादेऊ याणे हुजूर येऊन विदित केलें की आपला भाऊ पुतलाजी माहादेऊ कुलकर्ण चालवीत आला तो मृत्ये पावला या उपर आपणही चालवीत असतां हालीं दुसरा कुलकर्णी नूतन भावजी सुंदर यांसी साबाजी रगाजी दिमत

चेऊलकर याहीं ठेविलें आहे तर आपणाजवली पूर्वील पत्र राजश्री आबाजी माहादेव सरसुभेदार यांचे आहे तें साहेबीं मनास आणून आपले कुलकर्ण आपणास चालवावयास आज्ञा केली पाहिजे त्यावरून मशारनुलेचें पत्र मनास आणितां पुतलाजी माहादेव या पासोन सिरणी लाहारी ५०० पांचसे घेऊन कुलकर्ण करार केलें आहे ऐसें असतां नवदिगर दुसरा कुलकर्णी ठेवावयासी प्रयोजन काये आहे हाली रामाजी माहादेऊ याचें कुलकर्ण याचे हवाले करविलें असे आगरमारी कुलकर्णपण चालवीत जाईल याउपर कोण्ही कथला करील अगर दुसरा चालवील त्याचा मुलाहिजा होणार नाहीं शाहासन केलें जाईल ऐसें जाणून वर्तणुक करणे

———

ले. २८ }
नकल }   श्री   {शके १६४४ भाद्रपद शुा ९
{इ. स. १७२२ सप्टेंबर ८

अभयेपत्र समस्त राजकार्यधुरंधर विस्वासनिधी राजमान्ये राजश्री कान्होजी आगरे सरखेल ताा माहाजन वर्तक व रयान बागायेत चेऊल सुहुर सन सलास असरीन मया व अलफ कारणे दिल्हे अभयेपत्र यैसे जे माहाल आगर व कसब बागाईत मख्तां ई॥। सन समान ताा सन इसने पाच सालां होतां सालगुदस्तां इस्तावा पुरला साल मजकुरी पाहाणी व्हावी याबदल हुजरून राघो बलाल व सुदर जनार्दन पाठऊन पाहाणी करावयाची आज्ञा केली यैसीयास पाहणी केलियान रयेतीस उमेदवारी होत नाही म्हणोन माार-निले याही हुजूर लेहून पाठविले त्याजवरून मामुरीवर नजर देऊन बरहुकुम गुदस्तां जमाबंदीप्रमाणें मख्ता पाच साले इस्तकबिल सालमजकूर ताा सन सबा करार केले असे चोरबारीचे व राहदारीचे आगर जे आहेत तेथील नारल लाकड वाचत नाही ते आगरात भंडारमाड द्यावे म्हणोन आर्ज तुम्हीं रयेतीने केला त्याजवरून भडारमाड द्यावयाची आज्ञा केली असे— —ज्याजती झा— —खेरीज रयेतने तोडिले म्हणोन दर माडास रुा८= दोन आणे चवलप्रमाणे सालमजकुरी घेतला त्याविसी तुम्ही रयेत हुजूर येऊन अर्ज केला की माहाल मजकूर आगर जबून रयेत नातबान कृपाळू होऊन दर माडास चवल घ्यावयाचा सिरिस्ता आहे तो माफ करावा म्हणोन आर्ज केला त्यावरून मामुरीवर नजर देऊन सदरहु चवल दर माडास माफ केला असे झापाचा दरमाडास ४ च्यार प्रमाणे सिरिस्ता बाजे गावी आसे यैसीयास माहाल मजकूरचा आगर वैरान खराब माड झिटे याजकरिता बाजे गावीचे सिरिस्ते प्रमाणे झाप दिल्हे जात नाही म्हणोन अर्ज केला त्याजवरून मामुरीवर नजर देऊन सालगुदस्ता-प्रमाणे झाप करार केले असती पाच साले इस्तावा पुरे तौवर बागायेतामधे

जो वरकस होईल ते खेरीज ऊस ताग माफ असे पाच साले इस्तावा करार केला असे उमेदवारी घरून सुखरूप कस्ट मसागत करणे कोण्हे बाबे शक अदेसा न धरणे अभय असे रा छ ७ माहे जिल्हेज

———

ले. २९ नकल } हु { शके १६४६, आषाढ शु॥ ३ इ. स. १७२४ जून १२

अर्जदास्त अर्ज दर बंदगी———बंदे कमीन कमतरीन बदा [स]याजी विसाजी हवालदार व कारकून मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल बंदगीस अर्ज ताा छ १ माहे शौवाल सुा खमस आशरीन मिया व अलफ··बंदे कमीनाची व मामले मजकूरची अर्जदास्त··खैरियेत असे

बाा साहेब मेहरबान सलामत तावजी दामाजी देशकुलकर्णी मामले मजकूर यास सन सलासामधे हजुरून मामले मारीची देशकुलकर्णपनाची खिजमत फर्माऊन माहाली रा केले अैसेयास तावजी मजकुराने मामले मजकुरी लिहिणार देऊन जमेचे लिहिणे आकारास आणावे त्यास तावजी मजकुराने लिहिणार द्यावयास हैगई केली या सबब येक दोन वेळा निकडीने लिहिणाराबाबे ताकीद केली आम लिहिणार दिल्हा नाही यावरी·····मजकुराचा मजमदार माहादाजी रघुनाथ बहुत·····म्हणोन माहालीचे लिहिणे याचा मामीला व कारभार कुल·····ला होता सन सलास गुदरोन सन आर्बा सात महिने गुदरून गेले तरी तावजी मजकुराने लिहिणार दिल्हा नाहीं व मामले मजकुरी मनजबदार नाही हे हकीकत पेशजी बंदगीस लिहिली होती त्यावरून साबाजी तुकाजी यास मजमूची खिजमत फर्माऊन माहाली रा केले त्यावरून लिहिणे— याचे खबरदारी करून माहालीचे लिहिणे दफतरदार याण्हे आकारास आणिले जमेचे लिहिणे मजमदाराने करवावे त्यास तावजीचे दिमतीने लिहिणार नाहीं याकरितां तावजीस माहाली आणून बहूत निकड करून बसविला आण माहालीचे कागद हजूर रवाना करावयास तयार जाले याबद्दल तावजीस निकड [केली] ते वख्ती बाळाजी देशकुलकर्णी चेऊलास होता याबद्दल तावजी माहालीहून रजा घेऊन बाळाजी··सआला होता व साबाजी तुकाजी मजमदार माहाली ···तेही उदेरीस आले तेथे तावजीस आणून·····फजित करावयाचा तो बहुत च केला तेव्हा कबूल केले की हाली आपण लिहिणार देतो यैसे कबूल केले त्यावर बंदे कमीन माहाली आला व तावजीही माहाली आला त्यास लिहिणार दिल्हा नाही दफतरदार हजूर जाऊन दोन महिने बैसला असे याबद्दल तावजीस बंदगीस पाठविला आहे या वजाची हकीकत असे हाली आर्बाहि

गुदरून गेले येक दोघा महिनेयामधे कागद हजूर रा केले पाहिजेत आण कुलकर्णी याची हकीकत या वजाची असे मामले मजकुरी देशकुलकर्णी याचा सरंजाम होये असे करणार साहेब मावाप धनी असत बदगीस रोशन होये हे अर्जदास्त[२]

[कागदाचे टोकाशीं*] अर्जदास्त

———

ले. ३० } श्री { शके १६४७ श्रावण वद्य २ इ. स. १७२५ ऑगस्ट १४

आज्ञापत्र समस्त राजकार्येधुरंधर विश्वासनिधी राजमान्ये राजश्री कान्होजी आगरे सरखेल ता धर्मा बिन भीक पाटल मौजे बापले ता उमटे सुभा प्रात चेऊल सुा सीत अशरीन मयां व अलफ माहादा लखम पाटेल कुलबी मौजे मजकूर व तू मौजे मजकूरचे पाटेलकीचा कथला सागत हुजूर कुलाबेचे मुकामी येऊन वर्तमान विदित केले त्यावरून तो मारचे सीव झाडे पाटेल व खोत मोख्तासर हुजूर आणून पूर्वापार मनास आनीता मौजे मजकूरचे वतन बेवारीस जाहाले आहे वतनदार ,पाटेल कोण्हीं नाही अैसे खरे जाहाले असीयास बेवारीस वतने असतील ती सरकारची हाकीमा ज्यास वतन करून देतील त्याचें वतन हे जाणून मौजे मजकूरची आबादानी व्हावी याकरिता तुजवरी कृपालु होऊनं मौजे मजकूरचें पाटेलगीचें वतनं तुझे दुमाला करून सदरहु वतनाची हरकी रुा ५० पनास दुतर्फा करार करून सनद सादर केली असे तरी मौजे मजकूरीचे पाटे(ल)गीच्या वतनाचा उपभोग पेढी दरपेढी करून सुखरूप राहाणे हक रुसुम सिरिस्तेप्रमाणे घेत जाणे मौजे म(ज)कूरची पाटेलकी खेरीज सोनखार तुजला दी[१] दीघली असे गावीची आबादानी करून पेढी दर पेढी वतनाचा उपभोग करणेस

———

ले. ३१ } श्री संकर { शके १६४८ आषाढ शु॥ ९ इ. स. १७२६ जून २८

निस्चयेपत्रं शके १६४८ पराभो छवछरे माहे आखाड सुध नवमी भोमवासरे ते दिसी पत्रलेखनार्थ केला यैसा जे समस्त प्रभु पाताणे यातीं चेऊ-

१ [तुटक रेघ टाकलेली आहे तेथें मजकूर अस्पष्ट व नष्ट; कागद अगदी जीर्ण]

२ येक दी अधीक पडली आहे.

ळकर तथा रेवदडेकरीं पूर्वापासोनं आजरपयेतु प्रशगानुंशार येकरूप होते आणि जे हरयेकं विचार अथवा महदकार्ये अथवा हरयेक विचार करणे तो येक येकाचे अनुमते व शास्त्राचे आधारे व जनामधेही रुसवा. न होये व प्रशंगा अनुसार न्यायेनिष्ठ येसे आजपरयेत चालोन आले आता सांप्रत तारुण वये-करून कोण कोण्हास मानीत नाही आपलाले जागे थोरप(णे) आणून वडिलाचाही कथला करितातं व न्यातीचा कथला अजपरयेतु दिवानात गेला नाही व सर्व समदाव जाला म्हणजे वडील वडील आसतील त्याही हरयेक परसगाशारिखा निवाडा करावा अैसे होत त्यास आतां वडील आहेत त्यांचेही काही चालों देत नाही मज्यालसींचाही उबार राहिला नाही तेथे दिवान दरबा(र)च्या गोष्टी तर यामागे थोर थोर हुद्दे मामले करीत होते तेव्हां यैसा विचार होत नवता यैसे दर वर्तले आहेत यासाठी आपली नामांकित घराणी जे आहेत त्याहीं दीर्घ दृष्टीनें पाहोन येकविचाव करोन आपले संचतर पूर्व स्मरोन हरयेक स्थली येकायेकाचा उबारे करून मानमतवे त्यास ते ते···ण येक प्रसगी पद[री] पडतील की आमचा काये अपराध तो सागणे हे तुम्ही दोन थड केले काये निमित तर त्याचा विचार तो उघडा दिसोंन आला असे तो कोण कैसे

येकतर बोरलेकर प्रभु हे फिरगाण प्रांती आपगत आहेत वर्तत नाहिं त्याहीमध्ये त्यांचे सिरी दोस काये तो निस्चये जाला नाही यैसे असतां बोर-लेकर चेऊलकरास सरण आले त्यामुले त्याचा अभिमान पडला त्या निमित्य लाहानथोर मिलोन आपल्यामध्ये वर्त-वीत गेले त्यास आज दाहाबारा वरसे जाली यैसे असता सांप्रत मुंबईमधे त्याच्या कटकटी बहुतच वाढल्या आहेत दिवानामधे गेले असत त्याचा निर्वाव कलोन आला नाही येवढ्या-मधे पाचा साताही सर्वांचे मत न घेता समस्ताचे नावे पत्र मुबईकरांस त्या हावे तर न्यातीचे खावंद तेच जाले की काये येकतर हे कलम १

दुसरे तर याधव बाबाजी मुलेकर याण्हे गंधरव्याव केला तर हे आपल्यामध्ये पृथक पृथक दंडक आहे परतु त्याहीमध्ये भिंन विचार की जे त्रीस सरीरसमंध कोण्ही नाही व पर-मुलकी आणोन करावी यैसे असतां याण्हे गावाचमधे सरीरसमधी असतां केली तर यामुले लोकामधे उबार राहत नाहीं त्यास म्हणतील की यामागे जाले की नाही तर त्याची उबार ···ली ते विदित जाली म्हणोन काये बहूतच करावी तेही असो त्याण्हे दोघाचौघास विचारावे यामुले न्यातीचे वडील तेच जाले की काये १

या खेरीज दुसऱ्याही क्षुलग गोष्टी त्याचा काये हिसाब आहे तर त्याहा-वयास कारण की बोरलेकराचा कथला कोण्हे जरा थरास जाईल समया आनुसार

तर बरे अथवा वाईट सर्वांचे पदरी येईल या उपर आम्हाखेरीज हे दोन विचार केले असत तर त्याचा आंगिकार त्याहीच करावा जेथे चोरलेकर असतील व त्याचा वंश असेल तेथे आंनवेवार न करावा जैसे फिरंगाणामधे वर्तणूक होते त्याप्रमाणे आपण चालावे जवर त्या निर्वाह होऊन येईल तवर पगत पदवी नाही व यादव मुळेकर याण्हे ज्याचे मते केले त्यास त्याचा आंगिकार त्याहीच करावा यैसे दोन विचार गृहस्थाचा लोप करून थोटाई केली तर यापुढे फारच करितील यामधे काही वेचले नाही भितील ते आपलाले...... जाईल याउपर ह्या मतास जो सतबुध धरून आपले वाडावडिलाचे वर्तणुकीवर दृष्ट देऊन चालेल त्याण्हे ह्या पत्रावर साक्ष श्राली आण ते जर काही अपराध पदरी घेतील तर त्याचा विचार ते सारिखा होईल व या पत्रावर निशाणी केल्यानंतर याप्रमाणे वर्तणुक करावी यास चाला चुकला तर देवब्राम्हणांचा दोषी होईल

नावनिसी

पत्रप्रमाणे घोडजी हिराजी प्रभु कबूल १

खिमणाजी सजणाजी प्रभु १

पत्रप्रमाणे यादवजी माहादेऊ कबूल १

पत्रप्रमाणे प्राणाजी माहादेऊ १

ले. ३२ } हुं { शके १६५० भाद्रपद शु॥ ७
इ. स. १७२८ आगष्ट ३०

इजत आसार बाळाजी माहादेव देसकुळकर्णी मामले चेऊल मोथल माळुम बिदानद सुा समान इसरीन मिया व अलफ तुम्हास फर्माविले होते की चेवलचे आगरची पाहाणी सुरू होता रजा घेऊन येणे ते आलेत नाही पाहाणी आज दाहा वर्षी होत असे वाकीफगार वतनदार तर माळम अजम सिदीची रजा घेऊन येणे की वाकीफगिरीने चौकसीने पाखाडी व वाडी हदीची हद पाहाणी जाली पाहिजे दीस ग़माब्यास न करणे व सिदी अजमाचे खिा जाहीर करणे की मेढेखारीचे नख्ती बाबची चिठीची परवानगी जाली असेत व हुकूम केला आहे की इनाम सन···म्ही आसता···दिला···फिरजबा ·······कामिला माळूम असे जलदीचे काम तऱ्ही सावकासी बगैर होत नाही चिठी येईतलग तगादा न लागावा म्हणोन जाहीर करणे व तुम्ही लवकर येणे रा छ ५ सफर सन ९ जुलुस (फा. मोर्तब)

ले. ३३ } हु { शके १६५० मार्ग० शु. ६
इ. स. १७२८ नोव्हें. २५

देसमुखांनी व अदिकारीयान व देशपांडिये व बाजेजमीदार वतनदारानी कसबे चेऊल बदर मुर्तजाबाद उर्फ चेऊल सुा तिसा असरीन मिया व अलफ बापु जोसी चेऊलकर हुजूर येऊन अर्ज केला कीं कसबे चेऊल धामधुमीचे सबबेने बहुत साले खराब पाडिले आले त्याचे मामुरीचे कौलाबाबे अर्ज केला व तुमचेही बाबे अर्ज केला कीं कसबे मारचे वतनदार व कदीम लोक धाम-धुमीमुळे जागजागां गेले आहेत ते कसबे मजकुरी कदीम जागेयास आलियाने दुसरेही लोकां येऊन आमदरफ्ती होऊन मांमुरी होऊन येईल म्हणोन अर्ज केला तर तुम्ही जमीदार कदीम वतनी जागेयाचे जागां येऊन आबादानी करून लोकांचा व रयेतीचा दिलासा देऊन वसाहत करून उदीम वेवार करून कौलमोजीब मांमुरी करणें आणि तुम्हीं हुजूर येऊन रुजु होणें तुमचे मुदे मतालिब खातीरेस आणोन विल्हे केली जाईल तर कसबे मजकुरी येऊन उमेदवार होऊन वसाहत करून आबादानी करणें ताकीद समजणे पा हुा रा बाबु (?) जबानीं खुद रा छ ४ छ माहे जमादिलौवल (नि. अ.) मोर्तब सुद

बार सुद. फा. मोर्तब

(अन्यकालीन मजकूर याच कागदावर लिहून ठेविला तो*) सिदी सुरूलखान सो सेकीन दंडा राजपुरी कौल घेतले परतु सेवटास गेले नाही.

ले. ३४ } श्री { शके १६५३ ज्येष्ठ व॥ २
इ. स. १७३१ जून १०

दं मा। अनाम माणकोजी अदकारी चेऊल यांसि बाजीराऊ बलाल प्रधान सुहुर सन इसने सलासीन मया अलफ तुमचा कितेक अर्थ राजश्री रामाजी मलार यांणी विदित केला त्याजवरून कलले ऐसीयांस तुम्हां वतनदारांची वतनावरी पूर्ववत प्रोा स्थापना करावी हे अवश्यक आहे तदनुरूप केले जाईल हाली मारनिलेस रवाना केले आहे यांचा कितेक कार्यभाग जाहाला पाहिजे त्यास तुम्ही साह्य……… ते आणणे असतील ते आणून………१ मारनिले भाद्रपद मासी हुजूर येतील त्याजबा तुम्हीं दर्शनास येणें वर्तमान मनास आणून जे आज्ञा कर्तव्य ते केली जाईल (नि. अ.*) जाणिजे छ १५ जिल्हेज पा। हुजूर लेखन सीमा

(शिक्का: ० श्री - राजा शाहु नरपति हर्ष निधान बाजीराव बळाळ मुख्य प्रधा ।~)

---

१ ………तुटक तेथें फाटून नष्ट.

ले. ३५ } श्री { शके १६५४ भाद्र. शु. ६ चे पूर्वी
इ. स. १७३२ सप्टे. ६ पूर्वी

राजश्री बाळाजीराव व रामाजीराव अदीकारी
चेऊळ गो यास

दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य (मो.जा.) श्रो।। जिवाजी खंडेराव चिटणीस रामराम उपरि येथील कुशळ जाणोंन स्वकीये कुशल लिहिणे विशेष तुम्हीं पत्र पाठविले ते पावोन वर्तमान कळों आलें आपले उर्जिताचा मजकूर लिहिला येसीयास तुमच्या कामास कोणेविसीं अतरा(य) होणार नाही आपले समाधान असो दीजे (नि. अ.) बहुत काये लिहिणें हे विनंती

(मागील बाजूस बदामी शिक्का*)

श्री
लेखन
सीमा

- श्री ०
बाळाजी प्रभु पु
त्रस्य खंडराजस्यधी
मतः मुद्रा सर्व गुणो
पेतां राज सन्मान
वर्धिनी

ले. ३६
नकल. } श्री { शके १६५४ भाद्र. शु. १३
इ. स. १७३२ सप्टें. ६

स्वस्ति श्री राज्याभिषेक शकें ५९ परिधावि संवत्सरे भाद्रपद बहुल त्रयोदसी भोमवासरे क्षेत्रिये कुळावतंस श्री राजा शाहु छत्रपती स्वामी याणी समस्त राजकार्य धुरधर विश्वासनिधि राजमान्ये राजश्री सेखोजी आंगरे सरखेल यांसी आज्ञा केली ऐसी जे माणकोजी अदकारी व भावजी अदकारी मामले चेऊल याणी हुजूर येऊन विनंती केली कीं आपले वतनाचें हक सुदामत आहेत ते दिवाणांत जमा होतात आपणास पावत नाहीं यामुळे उपजीविका चालत नाहीं कुटुंबवत्सल आहों सुदामतप्रमाणें हक चालऊन योगक्षेम चाले तें करावें म्हणून त्यावरून मनास आणितां कदीम वतनदार यांचे हातें वतनी सेवा घेऊन चालवावें हें उचित ऐसें जाणोन तुम्हास हें आज्ञापत्र सादर केले आहे तरी अदकारी मजकूर याचे हातें दंडक प्रमाणे वतनाची सेवा घेऊन सुदामत सिरस्ता हकाचा असेल तर त्याप्रमाणे चालवणे येविसीं पूर्वीही तुम्हास आज्ञापत्र सादर केलेच आहे पुरातन वतनदार आहेत त्याचे हातें वतनी सेवा घ्यावी

हे स्वामीस अवश्यक आहे तरी याचे हातें सेवा घेऊन चालवावयास अंतर न करणे जाणिजे बहुत लिहिणे तरी सूज्ञ असा

ले. ३७ } श्री { शके १६५४ भाद्र. शु. १३नंतर इ. स. १७३२ सप्टेंबर ६ नंतर लगेच

पुा राजश्री माणकोजी अदकारी व भावजी अद (का)री मामले चेऊल गोसावी यासि

विनंती उपरि आम्ही राजश्री चिमाजी आपा याजसमागमे भाद्रपद मासी सातारीयांस गेलो होतों बा पिलाजी जाधवराऊही होते त्यास तुमचेविशी राजश्री (मो. जा.) छत्रपती स्वामीस विनंती कर्तव्य ते रीतीनें केंली राजश्री (मो. जा.) स्वामी कृपाळू होऊन राजश्री (जा)धवराऊ यांस कित्येक आज्ञा जा···कुटुंबाचा यौगक्षेम चालेनासा जाहाला शामलाचा पक्ष म्हणावा तर त्याचाहीं पक्ष नाहीं सिपीभर धान्यास अजीज जाहालो तेव्हां राजश्री (मो. जा.) छत्रपती स्वामींकडे चाकरीच्या उदेसे गेलों त्यांणी ठावठिकाण विचारिला तेव्हां चेऊलचे अदकारी म्हणोन सांगितले येक दोन मास सिकारी बा सदरेस श्रमही केलें चाकरीस ठेवीत नाहीं तुमचेविशी रा सरखल यांस लिहितों तुम्हीं तेथे जाणे तुमचे वतन ते चालवितील म्हणोन आस्वासन पुरस्कर राजश्री···स्वामीनी आज्ञा केली ते समई राजश्री······व पिलाजी·········राजपत्रही घेतले असे तैसेच राजश्री जिउबा चिटणीस याचा व राजश्री···सरखेल यांचा घरोबा आहे त्याचीही पत्रे घेऊन पाठविली आहेत मुजरद जासुदाबा परभारी पाठवावी तर तुम्हांस कलली नाहींत दुसरे तकडदी कारभार दिसतों यास्तव तुम्हांचकडे पाठविली आहेत बहुतसी मायावादेकरून लिहिली असे या पत्रांस जीव आणावयाचा विचार भावजीबावा येसा करणें की तुम्हास राजश्री...सरखेलीनी व राजश्री रघुनाथजीने विचारिले तर तुम्हीं त्याजवल भाषण करिता येसे करणे की आपले वतन जप्त जाहाले······सले होते त्यासही क[लोन]······[आ]ज्ञा केली त्याणीही आपले समाधान करून पत्रे दिल्हीं ते सेवेसी घेऊन येत असतां साताराच खरे वाटेनासे जाहाले दोन मांस हेरान जाहाला हाली कांहीं बरे वाटो लागलें आणि सेवेशी आलो आहो सर्वप्रकारें साहेबीं चालवावें साहेबाखेरीज गत्यंतर नाही म्हणोन नम्रभावे विनीत होऊन विनती करावी म्हणजे खामखा तुमचे कामच होईल यांच रीतीने विनती करणें याहून विशेष अथवा नूत्य न बोलणें हे विनती[1]

[१ पत्राचे चार तुकडे दप्तरांतून हुडकून काढून जोडून येथें देत आहें. त्यांत अक्षरें फाटलीं तें तुटक रेषेनें दर्शविलें आहे.]

ले. ३८

श्री

{ शके. १६५५ ज्येष्ठ शु. ४
इ. स. १७३३ मे ६

श्री शिव च
रणि सादर तुको
जी सुत कान्हो
जी आगरे नी
रतर[१]

(दशबुर्जी मुद्रा)

आज्ञापत्र राजश्री (मो.जा.) सरखेल ता कारभारी व रयान मा चेऊल सुा सलास सलासीन मया व अलफ तुम्ही धामधुमीच्या प्रसंगामुळे तजावजा जाहाले आहा म्हणून विदित जाले तर कोणे गोष्टीचा अंदेशा न धरिता गावी सुखरूप राहाणे अभये असे छ २ माहे जिल्हेज (लेखन सीमा) [अष्टदली]

ले. ३९

श्री

{ श. १६५५ अ. आषाढ शु. ११
इ. स. १७३३ जून १२

श्री
श्रीशाहु नृपति प्री
त्या तुकोजी तनुजन्म
ना ॥ कान्होजी सरखे
लस्य मुद्राजय
ति सर्वदा

अभये पत्र समस्त राजकार्ये धुरंधरं विस्वासनिधि राजमान्य राजश्री सेखोजी आगरे सरखेल ता उदमी व्यापारीयान सुा आरबा सलासीन मया अलफ तुमचेविसीं जमीदार मामले चेऊल याणी हुजूर येऊन अर्ज केला जे उदमी मजकूर चेऊलास येऊन उदीम वेवसाये करीत होते हाली राजपुरीचा दगा जाहला व राजकोट चेऊलचा साहेबी घेतला याकरिता उदमी व्यापारीयास कौल सादर जाल्याखेरीज शक दूर होऊन कोण्ही येत नाही तरी साहेबी त्यांस अभये पत्र सादर केले पाहिजे बेशक येतील म्हणून त्याजवरून अभये पत्र सादर केले असे कोणेविसी शक अंदेशा न धरितां वस्ती करणे व उदीम व्या(पा)र जलमार्ग व खुसकीने जैसा जो करील तो सुखरूप करणे कोणेविसी शक न धरणे अभये असे (नि. अ.) छ १० मोहरम (मोर्तब सुद)

---

[१] कान्होजीचा शिक्का व मोर्तब दोन्ही मेहरापींतील. कान्होजीचे अनेक शिक्के असावेत.

लें. ४०

} श्री {श. १६५५ आषाढ पौर्णिमा
इ. स. १७३३ जुलै १५

राजश्री लक्ष्मण आपाजी मो चेऊल यांसि सेखोजी आगरे सरखेल सुहुरसन आर्बा सलासीन मया अलफ विनतीपत्र पाठविले त्याची आज्ञा

कोळी पाखभाटकर याची घरे जळाली सबब साल मजकुरी निमे घरटका करार केला असे निमे वसूल करणे

खार बंदी येथील जदीद मोहतर्फी खुमास टीप होये तोपर्यंत घरटकेयाचे तोष्ट न लावावे जुनी कुळे घरे जळाली आहेत त्यासी घरटका निमे घेणे

जाणिजे छ १४ माहे सफर (मोर्तब सुद)

लें. ४१

} श्री {श. १६५६ चैत्र शु॥ ५
इ. स. १७३४ मार्च २८

श्री ०
श्री शाहु नृपति प्री
त्या तुकोजी तनुजन्म
•••कान्होजी सरखे
लस्य मुद्रा जय
ति सर्वदा

अभयेपत्र राजश्री (मो.बा.) सरखेल ता खाली जदीद का चेऊल सु॥ आर्बा सलासीन मया अलफ दिले अभयेपत्र यैसे जे आपण राजपुरी प्राताहून का मजकुरी येऊन माग घालून उदीम करावयासि उमेदवार असो म्हणोन तुम्ही व तुम्हचेविसी अदिकारी याही हुजूर येऊन विनती केली त्यावरून सालिना देखील बती महसूल दर भागास

रुपये
३ लखमाजी सातपुत्या
३ येसजी भावेकर
३ हरबाजी भडारी
३ सटवोजी मोहला
३ बालाजी भडारी
३ धोडजी काजवा
१८

येकूण अठरा रुपये सालिना करार करून अभयेपत्र सादर केले असे सदरहु पैकी साल मार हा फाल्गुन मास तीन माही दर असामीस रुा ·॥। प्रा उगवणी करणे पेस्तर सालापासून सरसाल सदरहु प्रा उगवणी करून

माग लाऊन आपला उदीम करीत जाणे कोणेविसी शक अदेशा न धरणे अभये असे छ ३ जिलकाद मोर्तब सुद

ले. ४२
नकल } श्री { श. १६५७ कार्तिक शुा ८
इ.स. १७३५ ऑक्टो. १३

श्रीमंत माहाराज राजश्री दिवाण साहेबांचे सेवेशी

आज्ञाधारक सेरीकर रयेत लोक पाठारे पांच कलसे सुभा प्रांत चेऊल सेवेसी विज्ञापना सास्ट प्रगणे यास फिरगीयाने बल···करून आपली यात आधीक व्हावी म्हणोन मऱ्हास्ट लोक याना यातीचें जन भ्रस्ट करून किरिस्तांव केलें त्या लोकांमधून आमचे यातीचे लोक च्यालीस पनास घरें बाटविलीं तीं घरें कितेक मुदत त्याचें बातींत वर्तलीं तें कलत नाहीं त्यांमधून दाहा वीस घरें तें स्थल सोडून हे स्थलीं प्रांत मजकुरीं येऊन सुखवस्तीस राहिलीं कितेक दिवसांनंतर आपले पूर्व जातीत यांवे हा हेत धरून कितेक प्रकारे घालमेल वसिला उपराला करून आमचे जातीचें पदरीं पडले कीं आम्हास यातीत घेणे जो खर्चवेंच होईल तो देऊन त्यास यातीनी अंगीकार केला नाहीं त्या उपर कितेक मुदत जालियावर कारकीर्द माहाराज (मो.जा.)छेत्रपत्री साहेबांच्या राज्यांत कितेक घालमेल करून बजीद होऊन कतीकाना जातीत घ्यावे म्हणौन सनद घेतली ते प्रसगीं आमचे वडील सर्व यात समुदाव मिलोन माहाराजाचे सेवेसी विज्ञाप्ती केली कीं, साहेबांची आज्ञा सिरसा आहे पर येत कती कोम ! यांचे मूल पुरुश प्रथम भ्रष्ट जाहाले होते ते जातीत घेतले असते तर कार्यास येतें हाली लोम प्रतिलोम पेढी दर पेढी चालत आली त्यांचे नांव व त्यांचा धर्म निराला जाहाला असतां पूर्वजातीत मिलते करून जातीस लंछेन लाऊन घ्यावें येसा अर्थ नाहीं अथपर देवधर्माचें सवरक्षेण करणार साहेब धनी आहेत त्याउपर माहाराज साहेबीं विवेक चितांत आणून हे गोस्ट अमान्ये केली त्यास कितेक वर्षे जाहालीं यानंतर माहाराज कैलासवासी (मो. जा.) आबासाहेबांचे सेवेसी विज्ञापना करून आज्ञापत्र घेऊन आम्हा समस्तांस हुजूर नेऊन बोलीचाली होऊन माहाराज साहेबीं आज्ञा केली कीं कती कोम ? यास याती घेणे त्यावरून प्रति उतर अर्ज केला कीं उत्तम बरें साहेबांची आज्ञा आम्हास मान्ये असे सिरसा आहे पर येत साहेब आमचे धनी परंतु शेरीस मघ गोताईमुळे साहेब आमचे जांवाई आहेत साहेबांचें आमचे गोत गंगा येक आहे कती कोम ? यांस आज्ञ करून सर्व जातीस जेवण करऊन साहेबी आपणासमवेत गोत जेवण करून जातीत वर्तावयाची आज्ञा करणे त्या उपर महाराजसाहेब ख्याल खुशालीत येऊन आम्हांसंगे विनोद करून कितेक गोस्टी केल्या आण म्हणो लागले कीं बेटे हो

आम्ही तुमचे जांवाई कैसे त्या उपर सेवेसी अर्ज केला कीं चेऊलकर अदीकारी व आम्ही शेरीसंमधी असों चेऊलकर अदकारी व गाव्हाणकर व आमचे जांवाई दिनकरराऊ हानोल्कर सेरीसंमधी आहेत साहेब दिनकरराऊ यांचे जावाई ते येसा साहेबांचा निशा करून आपल्यावर मेहरवान करून घेतलें त्या उपर कती कोम! यांचा गौरव केला कीं तुम्ही आपले मुलांमाणसें पोटीं गर्भ असेल त्यासमवेत श्रीमाहाक्षेत्र (मो.जा.) वा(रा)णसीस जाऊन तेंथील यात्रा करून तेथील मोझ्या घेऊन येणे त्याजवर जे आज्ञ करणे ते केली जाईल येसें बोलोन सर्वांस विडे देऊन बिदा केलें त्यावर कतीकोम ! आपले घरीं जाऊन संवसार करू लागले त्यास कितेक वर्शे गेली त्यामागोन देवधर्म रक्षेण गौब्राह्मण प्रजापालण माहाराज साहेबीं अवतार घेऊन सकल छेत्ररथें निर्दाळून येकछेत्री राज्ये करून देव धर्मांची वृधी वाढवून आम्हा प्रजेचें सवरक्षेण करीत असा येण्हे करून सकल जन संतोसी होऊन साहेबांचें राज्ये लक्षुमी आंयुश्ये सदा सर्वदा वृद्धी होऊन साहेबांची छाया आमचे मस्तकीं निरतर असावी हे श्रीजवल सदा निरतर इछीत असों हाली किरिस्तांव कतीकोम जातीविसीं साहेबांजवल बजीद जाहाले असत हे गोस्ट आईकोन शेरीरीं कस्ट होऊन चित्त उदास जाहाले असे तें श्री (मो.जा.) साक्षे असे हे कतीकोमास कितेक मेढ्या व कितेक मुदत जाहाली हे कलत नाहीं आबासाहेबांचे अमलात देवघराहून कतीकोमाची सोइरीक गोलदाज फिरगीयास दिली होती येसें असोन ते यात आमचे यातीत येईल तेव्हां श्वदेस उतम आहे तो सांडून परदेश कदाचिद्घट असला तर तो कार्यांचा आहे हेविसी सेवेसी आधिकोतर विज्ञाप्ती करावी तों साहेब धनी खावद असत आमचे यातीचें व धर्मांचे रक्षेण करून पूर्व प्रमाणें चाले आण आम्हां प्रजेचें समाधान होये तों हुकूम करणार साहेब धनी आहेत हे विज्ञाप्ती

तेरीख ७ रोज माहे जमादिलाखर सु॥ सीत सलासीन मयां व अलफ.

ले. ४३ } श्री { श. १६५७ मार्ग. शु॥ २
इ. स. १७३५ नोहें. ५

र्द मा॥ अनाम अदीकारी ता॥ चेऊल यास मानाजी आंगरे सु॥ सीत सलासीन मया व अलफ का॥ खांडाले येथील पाटील कीची मनसु(बी) होणे असेत यास्तव तुमचे प्रयोजन असे तरी हुजूर येणे जाणिजे छ ३० माहे जमादिलाखर मोर्तब सुद

- श्री ०
श्री शाहु नृपति प्री
त्या तुकोजी तनु जन्म
ना। कान्होजी सरखे
लस्य मुद्रा जय
ति सर्वदा

ले. ४४
नकल

श्री

श. १६५८ ज्येष्ठ शु॥ ९
इ. स. १७३६ जून ६

दं मा॥ अनाम देशमुख व अधिकारी व देशपांडिये मामले चऊल यासि मानाजी आगरें सुहुर सन सबा सलासीन मयां व अलफ राजश्री जिवाजी खंडेराऊ यांचे सरदेशमुखीचें वतन मामले मजकुरीचे पुरातन आहे त्यास मारनिलेचें वतन चालवणे अवश्यक जाणोन वतनाच्या सनदा तीर्थरूप राजश्री कैलासवासी (मो.जा.) यांच्या सादर जाहाल्या आहेत त्या हाली मनास आणोन मामले मजकुरींचें सरदेशमुखीचें वतन यांचे दुमाला करून जमाबंदीस हक व इनामती बीतपसील

हक गांवगना नख्ता व गलियास देखील बागायेत व खंड वगैरे महसूल पैदास कमावीस जकायेत मोहोत तर्फा व बाजेबाब यासि दाहोत्रा प्रमाणे दिवाणांत वसूल होत होता तो रयेतनिसबत देविला असे बा॥ सनंद रुजुवात तीर्थस्वरूप कैलासवासी

इनामती कुलबा (व) कुलकानु हालीं पटी व पेस्तरपटी खेरीज हकदार इनाम दिल्हे असे—

इनामगांव
१ मौजें वरडें — बाग राउलवाडी
तों ब्राम्हणगाव — माहाल आगसी
२ तों श्रीगांव — १
१ कुरकुंडी
३ १ कालटेंबी
२

येणेप्रमाणे हक व इनामती सरकारांत जमा होत होता तो याजकडेस द्यावयाची आज्ञा करून हें पत्र सादर केलें असे तरी तुम्ही यांस रुजु होऊन सदरहुप्रमाणे चालवीत जाणे वतनाचा भोगवटा मारनिले पुत्रपौत्रादि वंष परंपरेने करितील दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणे पत्राची नकल घेऊन असल पत्र भोगवटीयासि फिरोन देणे जाणिजे रा॥ छ ७ माहे सफर.

ले. ४५

श्री

श. १६६० वैशाख शु॥ ९
इ.स. १७३८ एप्रिल १७

दं मा॥ अनाम बाळाजी आगाजी अदकारी मा॥ मुर्तजाबाद उर्फ चेऊल यांसी मानाजी आंगरे सुहुर सन समान सलासीन मयां व अलफ तुमचा हक सरकारी जमा आहे या मुळे गुजरानी चालत नाहींसी जाहाली याजकरिता हुजूर येऊन अर्ज केला की आम्ही जमीदार आहो आमचे हातोन सेवा घेऊन आमचा योगक्षेम चाले ते आज्ञा करण्हार साहेब धनी आहेत म्हणून त्याजवरून हक

(मुद्रा:)
श्री
श्री शाहुनृपति प्री
त्या तुकोजी तनुजन्म
ना कान्होजी सरखे
लस्य मुद्राजय
ति सर्वदा

टक पेशजी प्रो देऊन वतनाची सेवा तुमचे हातोन घ्यावी तरी मो मारचे सारेच जमीनदार हक सरकारी जमा आहे त्याची विल्हे होईल तेव्हां तुमची होईल प्रस्तुत योगक्षेमानिमित्य जमीन करार केली असे विघे

१४ वतन समंधे विघे
६ येकनिष्ट सेवा केलीत सबब
२०

येकूण वीस विघे पड जमीन चोखी मामले मजकूर पैकी करार केली असे जे गावी अनकूल पडल ते गांवी कीर्द करणे तुमचे निसबत कीर्द असेल व पेस्तर होईल त्यापैकी दाहाखंडी भात बारे मापे तुम्हांस इनामखर्च सालबसाल पडत जाईल तरी तुम्ही उमेदवार होऊन वतन समंधे सेवा चाकरी येकनिष्टपणे करीत जाणे जाणिजे (नि. अ.) गा छ ८ माहे मोहरम (मोर्तब सुद)

(कागदामागें*) बारसुद

लें. ४६ } हु {शके १६६१ भाद्रपद वद्य ११
इ. स. १७३९ सप्टें. १७

खान अजम ताजुदिन अलिखान दाम महबत हु

दा मुलाज मेहरबां इस्तजहर मुखलिसां......अजी बाजीराव पंडित प्रधान दुवा आकी येथील खैरखुशी जाणून मोहिबी आपली खुशवक्ती हरवक्त कलमीं करीत गेले पाहिजे दिगर मोहिबी बाबूभट याजबराबर नवीस्ता मरसूल केला तो नेकवक्त पोहचला खुशवक्ती रोयेदाद जाली हमेशा येच वजाने आपली शादमानी करीत गेले पाहिजे बादज फरगियाचा मजकूर निगार केला ......व त्याचे खत आले होते तेच बजिनस पाठविलें. त्याजवरून व मशारनिलेच्या जबानीवरून मुफसल मालूम जाहालें फिरगियाचे दिलांत गुबार फारसा आहे तें आपले करणीस अंदेशा करीत नाहीं मोहीब हरवक्त कलमे करितांत कीं फरगियाबाबें दरगुदर करून खलकुलाचें बरे होये तें करावें व इजानेबाचेही दिलांत हेच कीं आलम गरीब गुरबाचें बरें होऊन त्याची दुवा घ्यावी त्यातच फाइदा येसें समजोन दरगुदरच होत गेलीं त्यामुळें फरगी फारच वहमियास चढोन इमान आपण येक होऊन वांसी व पणवेल वगैरे बंदरकडील जागे खराब केले आहेत त्यास हालखुद ठेवावें हे जरूर आहे व त्याजकडोंन तहस मातबर येथे पाठवण सुलाचा मातबर चेउलास येणार आहेत ते येतील आपलेही मातबर येथे पाठवण सुलाचा मुकादिमा करारमदार करणे करू म्हणून कलमी केलें तरी बेहत्तर आहे त्याजकडून मातबर आलियावर कलमीं केले पाहिजे येथून मातबर पाठवणे ते पाठविले

जातील जरी याजकडून मातबर यावया दरगुदर जाली तरी इजानेवांस आणीक मोहीम आहेसी नाहीं तरतूद करणें ते केली जाईल ये बाबेंची खत मोहिबी वरचेवरी कलमे केली पाहिजे दुतर्फा तह होऊन मुलकांत आबादी जाली तर किफाईतच आहे त्याणी या बाबे नवदिगर करितील वहमियास चढलिया वहमा राहीलसा नाही पैरवी होणे हे...ये बाबे फरगीही खूबवजाने समजतच असतील व समंजतसेही केले जाईल इजानेबीं तों आपले तर्फेने आजलग तफावत केलीं नाहीं तेच तफावत करीत आले व करितांत तर काये मुजाइका आहे मोहिबांचे दिलात खललांचें वरें व्हावें अमां हे बात···चे दिलात नाही त्यास मोहिबांचा इलाज काये आहे जाणिजे रा॥ छ २४ जमादिलाखर जियादा काये लिहिणे हे किताबती

ले. ४७ } श्री {श. १६६१ मार्ग शु. १२ / इ. स. १७३९ नोव्हें. ३०

राजश्री पाहाणीदार तो झिराड यासि आज्ञा सु॥ आर्बैन मयां व अलफ बाळाजी माहादेव देशकुलकर्णी जमीदारीचे पेशाने पाहाणीचे कामावरी पाठविले आहेत तरी माहाल हाये देखील पाहाणीचे कामावरी फिरतील यांची रुजुवात घेऊन पाहाणीचे काम चालववणे (नि.अ.) रा॥ छ ९ माहे रमजान (मोर्तब सुद)

ले. ४८ } श्री {श. १६६२ आश्विन वा॥ ९ / इ. १७४० ऑक्टो. ३

श्री

श्री शाहु नृपतिप्री
त्या तुकोजी तनु जन्म
ना ॥ कान्होजी सरखे
लस्य मुद्राजय
ति सर्वदा ॥

आज्ञापत्र समस्त राजकार्ये धुरंधर विस्वासनिधी राजमान्ये राजश्री ता ज्ञात कराडे खारी··सु॥ इहिदे आर्बैनमियां व अलफ कान्होजी कुळबी कराडा बाईकोचे समधानिमित्य जाती वेगला आहे त्याविसी आज्ञापत्र सादर केले आहे तर तुम्ही ज्ञात अदकारियांकडे जाऊन का···जिची हकीकत सविस्तर आद्यंत मनास आणून हुजूर येऊन विदित करणे त्याप्रमाणे आज्ञा करणे ते केली जाईल (नि. अ.) छ २२ रजबु (मोर्तब सुद)

ले. ४९ } श्री { श. १६६२ कार्तिक शुा १२
नकल } सिका { इ. १७४० ऑक्टो. २१

अभयेपत्र समस्त राजकार्ये धुरधर विश्वासनिधी राजमान्ये राजश्री बालाजी पंडित प्रधान ता चौगुले व समस्त भडारी व बाजे उदमी खुम साकीन रेवदडा सुाा इहिदे आर्बैन मया व अलफ दिल्हे आभयेपत्र ऐसे जे फिरगियाने रेवदडे कोरला सरकारी दिल्ही आहे तुम्ही कोणेविसी शक न धरिता आपले जागा काईम राहाणे तुमचा गौर करून चालविले जाईल अभये असे जाणिजे छ १० साबान मोर्तब

———

ले. ५० } हु { शके १६६३ ज्येष्ठ
{ इ. स. १७४१ जून-जुलै

दाा इजत असार नेक अवुवार रामाजी आपाजी हवालदार ताॉ तुडिल मालुम विदानद के सुाा इसने आरबैन सियां व अलफ उकी तुम्ही अर्जदास्त पाठविलीत ते पोहोचोन हकीकत मालुम जाली गलेया पैकी जो जमेदरासोवत खा १४ चौदा पाठविलेत ते पावले व दोन खडि घाटी उडीद डाणे या बदल घेतले असत म्हणोन मालुम जाले त्यास हाली तो खिन्नाड आऊ रवाना करावयाचा हगाम राहिला नाही बैल करोन दाहा मण उडीद मैसले यास पावते करणें हर इलाज करोन डाणा पावता करणे डाणे याची हैगै कराल तर घोडा भुके राहील याजकरितां बरसात हाली सुरू जाला असे इतकेयात·········ने दाणा दाहा मण रवाना करणे व गलेयाचा व नकदीचा झाडा पाठविलात नाही हिसाब खिताब तो मालुम होत नसे हाली कुल हिसाब करोन जे बाकी निघेल ते झाडून झाडून वसूल घेणं येथे अडिसेरी बदल बहुत तसदी आहे व लोकाचे देवघेव पडून असें गयाल कुलेयाकडे बाकी राहिली असें ती कुले हाली तपे मारी आणिली असत त्यात तुम्हा दुतर्फा केली असें सरकार तर्फेन करावी म्हणोन लिहिलेंत तर हे हाली सरकारात शादी जाली त्यामुळे खर्च बहुत जाला लोकाचे देणं पैसे आहेत त्यांही तसदी केली असे व अडिसेरीही लोकास असावी सरखेललाचे सरकार थोर आहे ते चाहतील तर बाकी माफ करितील इजानेबाच्याने बाकी त्याजकडे ठेविली जात नाही बेमुलाहिजा वसूल घेण देशमुखांकडे बाकी हकाचे अैवजाखेरीज बाकी खा २५ व तीन खडी गला राहिला असे त्याचा वसूल आज उद्या करिता देत नाही म्हणोन लिा तर हनोज वसूल काये सबब ठेविला होतात हाली वसूल बेमुलाहिजा घेणं या उपर ठेविलात तर खुदनिसबत भरोन घेतला जाईल व गोवेलकोटाहून तपेयास तसदी लागतो म्हणोन लिा तर त्याचीही चिठी पासविली जाईल खातरजमेयाने

राहाणे मागाहून पाठऊन देऊन व गिरो घातले आहे त्यावर व्याज चढत असें तुमचे भरवसेयाने आजपावेतो ठेविले असे तर गलेयापैकी बाकी जे निघाली असेल ते बेमुलाहिजा वसूल घेऊन रवाना करणे ताकीद समजणे यादव हिराजी कारकून यासी पेसजी रुा सतराची वरात दिली होती त्यास आजपावेतो पावले नाही हाली गले यापैकी निमे व निमे नकदी पैकी पावते करणे व यादवजी तेथे जितके रोज राहातील तितके दिवस दरमाहा दीड मण प्रमाणे दरमाहा अडिसेरी देणं ताकीद जाणणें कारण हे साली सरकारात मुतलख नसे दोन मण काटाण मैसेल्यास रवाना करणे जाणिजे दरिविला मालुम जाले की ये साली वरताला सुदामत खडीस पाच मण घेत होते त्यास साल मारी कमी घेतला आहे म्हणोन मालुम जाले तर हे दानाईची बात केलीत नाही रयेतीवर बाकी काढोन ठेवणे व बेमुलाहिजा वसूल घेणें कोणी याबदल माने होतील तर बखेडा पडल (* कागदावर मागील बाजूस समासांत) व तुम्हास खुद निसबत भरणे पडल येकीन जाणणे व चौकी व काटाण ठिकाणे लाऊन हिसाब घेऊन हुजूर येणं ताकीद समजणे बाकीचा झाडा करणे जाणिजे (कागदावर पुढील बाजूस समासांत*) तेलाबद्दल कुपा पाठविला असे तेल गाळून कुपे यात ठेवणे व···पाईवाटे रा। करणे सिबडीस काम लागले असे

———

ले. ५२

} श्री { शके १६६३ अधिक श्रावण वद्य ६
इसवी सन १७४१ जुलै २२

श्री ०
शाहु कार्य धुरंध
तुः कान्होजी तनुज
म्नः मुद्रा वजारतमा
बस्य मानसिंह
स्य राजते[1]

दस्तक सरकार रा। (जश्री) मानाजी आंगरे वजारतमाब बनाम आरमार करीयान व ठाणेदारान व चौकींदारान व कमाविसदार बंदरहाये सुा इसने आर्बैन मिया व अलफ महागिरी बंदर थल तांडेल लखमा कोली कृष्णाजी फाटक व्यापारी बंदर मार माहागिरी भाडे भरून बंदर सुरतसं रवाना जाली असे बंदरात व मार्गी कोन्हेविसी उपद्रव व अटकाव न करितां जाऊ येऊ देणे छ १९ जालीवल (मोर्तब सुद)

———

१ हा मानाजीचा एक वेगळा शिक्का दिसतो

ले. ५३ } श्री {शके १६६३ आश्विन शु. १३
इ. स. १७४१ ऑक्टो० ११

(लंब वर्तुळाकार
मानाजी आंगऱ्यांचा संस्कृत अस्पष्ट शिक्का*)

आज्ञापत्र राजश्री मानाजी आंगरे वजारतमाब ता कारभारी व पाटेल

१ बालाजी अदकारी
१ कृष्णाजी अदकारी
१ बालाजी देसाई पा नागावें
१ सकराजी माहाजन
१ बहीर वर्तक
१ बाल म्हात्रा
१ व्हीटल म्हात्रा
१ माहाद राऊत
१ हरबाजी जोसी
१ नवर वर्तक आकसी
१ विटोबा कातरणे
१ येस घरत
१ अंत घरत
१ जीव पाटेल वेली चेऊळ
१ रऽग वर्तक
१ हीर पाटेल
१ चाबाजी वर्तक

१७

१ गण माहात्रा
१ गोप माहात्री
१ येस मा...कावीर
१ राम म्हात्रा
१ बाळ म्हात्रा ढ(व)र
१ बाबा म्हात्रा बाम्हणगावकर
१ गोंद पाा खानव
मल्याण
१ बाळ म्हात्रा....?
१ येस पाटेल वरडें
१ वेंट म्हात्रा
१ पाटेल ब्या पाले !
१ येस म्हात्रा
१ येस कवल्या नागावें

१३

प्राा चेऊळ सुाा इसने आर्बैन मया व अलफ मौ साहाण ताा बाम्हण-गाव व मौ ढवर ताा खाडालें हरदु गावकरी यांचा सिवेवरून पेसजी कलह कलह लागला होता ते समई हुजरुन चौवेजण नेमून देऊन कजिया सीव निवडऊन चुकविला असतां सांप्रत हरदु गावीचे पाटेल हुजूर येऊन सिवेचा कलह विदित केला त्यावरुन तुम्हांस आज्ञापत्र सादर केलें असें तर तुम्हीं बाऊन येथान्याये सिवेचा निवाडा करून सीवझाडा हुजूर लेहून घेऊन येणे पेसजी निवाडा जाला होता त्यास नौदिगर कोणापासून जालें व पेसजीचे निवाडे यास कोणे गावीची सीव कोणे गावाकडे गेली असेही खरे करून मनास आणून येणें सदरहू दोन्हीं गाव दो तऱ्याचें तेव्हा तऱ्याची सरहद सीव मागेच कर्ता करावयास चुकला असेल अैसें नाही तर चौकस मनास आणणें [नि. अ.]
(मोर्तब सुद)
रा छ ११ माहे शाबान

ले. ५४ } हुं { शके १६६४ माघ वद्य ७, इ.स. १७४३ फेब्रु. ४

इजत व सदाकत माब महमद इभराहीम मुरुसकर हवालदार व कारकून तो तुडल मालुम दानद सुा सलास आर्बेन मियां व अलफ आकी अर्जदास्त पाठविली ते रसीदगी होऊन लिहिली हकीकत मुफसल मालुम जाली तुम्हीं तपे मजकूरचें कौलाबाबे लिहिलेंत व महाड तपेचे वे कौलाची हकीकत लिहिलीत तें मुफसल जाहिर जाली त्यांवरून खान अलिशा खान साहेबाचे (खिज)मतींत कौलाबाबें जाहीर केलें त्यांवरूम फर्माविलें कीं दाहा···वांची राहा जालियाखेरीज कौल देत नाहीं अलबतां तुमचे···स्तीरदास्तीवर नजर देऊन तपे मजकूरचे···घट···सिकारीनें हरगाह छेंडाछेड करणार नाहिं दरमानें लिखापडें होतां त्यांची राहा जालियांवर कौलही दिला जाईल ते पावेतों रयेतीस जर रही पोचणार नाहीं हे वजाने बाब दिला आहे तर तुम्हीही रयेतीस दिलासा दिलदारी देऊ कोर्द मशागतींस लावणें कोण्हे बाबे फिकि(र)··· व कौलाचेही पैरवीमधे लागलो आहू इनशाला मुर्तजा कौलहीं घेऊन मागहून ···मजकुरास तसदी लाकली तरी त्याचा जाब आम्ही करून खातीरजमा असो देणे व पेसजी तुम्हां···रवाना केले का तें ते ! तगाफुली करून रवाना केलेत नाहीं याकरितां तुम्हास पाच रुपये मसाला केला गेला होता अमां मोरोजीनें अर्ज केला···खातीरदारीवर नजर जेऊन माफ केला असे हाली कागद रवाना केले आहेत ते भिकाजी वगैरे अदमियांजवळ देऊन रवाना करणें त्याचा खालजाब घेऊन रवाना करणें ताकीद समजणें पेस्तर ऐसी तगाफली केलियानें मसाला होईल ताकिद समजणें पेसजीचे कागद आहेत त्यापैकी तुळाजी आंगरे यांचा कागद हरणईस रवाना करून बाकी कागद हुजूर रवाना करणें व देसमुखांकडे बाकी तीन सालाची आहे त्याचा तगादा लाविला आहे अमां उजूर करितात की आपला हक आहे व ये बाबे त्याही हुजूर लिहिले आहे म्हणोन तपसिलें लिहिले मालुम जालें त्यास आजतागायेत देसमुखाकड बाकी जे असेल ते बेमुलाहिजा वसूल करणे नाही तर तुम्हास जाब करावा पडल देसमुख हकाचा मजकूर करितांत तर हक तेच वख्तीं त्यास पोहचेल की सरकार तर्फे रूजू होतील ते वख्तीं जो हक देववणे तो सरकार सिदी...इल हाली ताकीद समजोन वसूल घेणें ताकीद समजणें...ये बाबे देसमुखास ही लिहिले गेले आहे देशमुखा(नीं)लिहिलें कीं तपे मजकुरास सोड दिली आहे ते मोजीब सरकारतर्फे(नें) सोड देऊन सनद सादर करविली पाहिजे तर देसमुखा(नीं) तिकडून सनद आणिली आहे ते सनद हुजूर घेऊन येतील ते वख्ती खातिरेस आणोन जाबस्वाल केला जाईल येसें लिखेपढेनेच सनद कैसी देविली जाईल व माप वरतालेचे लिहिले की त्यांचे तर्फेने

दीड पाइली करार केली आहे ते मोजीब सरकारतर्फेने घ्यावयाचा हुकूम सादर जाला पाहिजे तर ते दीड पाइलीचे नाव करून तीन पाइली घेतात व घेतील सुदामत दोन पाइली मोजीब घेतात तेच मोजीब हालीही दोन पाइली मोजीब घेतात तेच मोजीब हालीही दोन पाइली वरतांला घेणें यास तफावत हरगाइ न करणें व अंजनवेल तर्फेनें वसुलाची निकड होती म्हणोन लिहिलेत तर ते काही तपे मजकुराचेच रयेतीस तगांदा होतो येसे नाही त्यांचा तगादा सारे मुलकास होतो अलबतां तुमचेच तपीयास तसदियां पोहचता तर त्याची राहा केली जाती हालीही त्याची जाबस्वाल करणें तो केला जाईल फिलवख्त तगादा त्यांचे तर्फेने लागणार नाहीं खातीरजमा असों देणे गला तयार केला आहे सिबड रवाना करणें म्हणोन लिहिली तरी सिबड थोडकेच रोजी येऊन पोह- चेल गला दाणा जराबेजरा कुल वसूल करून दास्तान करणें त्यापैकी...साहे- बांचा येवज तक्षिमामोजीब वेगला तेथेच करून बाकी सरकार तक्षीम रवाना करणें जरा बाकी तपे मजकुरी राहिली तरी तुमचे जवलून घेतली जाईल येबाबे ताकीद समजणें व लकडें याबदल येथें लोकाही तगादा लाविला आहे याकरिता तुम्ही खुलगे खरीदी केलें आहेत तर सिताबी करून लकडी आणोंन सिबड... रवाना करणें व सुरडाही गलबतास तयार करून ठेवणे व वि...भातावर पैसे घेतले आहेत त्यास वरीचे भात घेऊन वेगलेचे गलबतात स्वार करणे मा जाफर याची कार...आहेत...दाहा रुपये अलबता पोहचते करणे व सरकारामध्यें पैशाचा जरूर दरकार आहे तर गल्याखेरीज इर तरतूद करून दाहावीस रुपये रवाना करणे गला विकणे दरकार नसे गला झाडियानसी रवाना करणे व कडदणही कुल रवाना करणें दिगर हकीकत जबानी सेख मां जाहीर करील रयेतीस तसली देऊन कीर्द मशागतीस लावणें कौलाबाबे हरगीज अंदेशा न करणें दरीबाब ताकीद समजणें रा छ १९ जिल्हेज सन २५ जुलुस[१]

(फार्शी मोर्तब)

ले. ५५ } हु { शके १६६५ कार्तिक शुद्ध ८ / इ. स. १७४३ ऑक्टो १५

फार्शी शिक्का

कौलनामा अजदीवाण किले उदेरी ता रेवदंडेकर व प्रांत फिरंगाण व

---

१ महंमदशहाचा जुलुस

[तुटक रेघा टाकल्या तेथें कांहीं अक्षरें नष्ट; कांहीं अस्पष्ट व कांहींचें वाचन करतां आलें नाहीं.]

व वरघाट वगैरे मुलकी परमुलकी उदमी व्यापारी व यात्रेकरी यात्रा कनकेस्वर सुा आर्बा आर्बेन मया व अलफ कौल दिला येसाजे गुरव येऊन किले मजकुरी अर्ज केला कीं कनकेस्वरचे पेस यात्रेकरी यास कौल सादर जालियाने लोक यात्रेस येऊन यात्रा भरेल त्यावरून कौल सादर केला असे तरीं सुदामतप्रमाणे यात्रेस सुखरूप कार्तीके पौर्णिमेस येऊन यात्रा करून जाणे कोण्हेबाचा शक अंदेशा न न धरणे बेशक होऊन यात्रेस येणे कौल असे जाणिजे रा छ ७ माहे रमजान (नि. अ.) सन २६ जुलस* (फारसी मोर्तब)

ले. ५६ श्री शके १६६६ वैशाख वद्य ३ इ. स. १७४४ एप्रिल १८

श्रीमत् सकल तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब साहेबाचे सेवेसी.

अपत्यें येसाजी आगरें चरणांवर मस्तक ठेऊन दडवत प्राां विनंती तागाईत छ १५ माहे रबिलौवल पावेतों वडिलांचे आसीर्वादें करून मौजे कालो.स प्रा चांकण सुखरूप आसों मौजे मजकुरीं दाखल जालियावरी राजश्री पिलाजी जाधवराऊ यांजकडे पत्रे पाठविली मौजे चांडोलीस राजश्री सखोजी सावताकडे राजश्री अबाजी नाईक व संताजी चव्हाणं पाठविले राजश्री जाधवरायांकडील पत्राचें उत्तर व रा राणोजी झेडे व राघो शामराज लग्नाचे साहित्यास पाठविले आहेत आबाजी नाईक व संताजी चाडोलीहून आलें चतुर्थीची तीथ नेमिली ते देवी निघाल्या म्हणोंन राहिली आणि जेष्ट शुध प्रतिपदेस निश्चयेकरून राणोजी झेडे फिरोन जाधवरायाकडे गेले राघोपंतास ठेऊन घेतलें रा आबाजी नाईकास नारोबा नाईक दाबके याजकडे पाठऊन देतों आगोदर त्यांसि पत्र लिहिलेंच होतें परंतु कापडांची उडवाउडव लिहिली आहे सेवट कैसा करितील पाहावें कापडाचा तों खर्च भारी आहे वडिलांचे पुण्य समर्थ आसे पुण्येप्रतापे कार्य करून सेवेसी येतों लग्नांस आवकास उदंड आहे याजउपरी आपण वाघोलीस जाऊन राजश्री जोत्याबास व सुभानबास व सौभाग्यादिसपन्नें आकाबाईस व चन्हवलीहून राजश्री भवानबास व सौ बयाबाई आपले आज्ञे प्रमाणें लग्नांस आणून राजश्री बरवाजी पाटील यांसि पत्र पाठविले होते त्यांणी राऊता समागमे सांगोन पाठविले की तिथनिश्चये जालियावरी पालकी घोडें पाठऊनं देणे मुलीस पाठऊन म्हणोन राऊतासमागमे सागोन पाठविले होते सविस्तर सेवेसी श्रुत होय आडिसेरीची मोईन येकरोजा खर्च आकारून सेवेसी पाठविला असे पुढें येक मास लागेल आडिसेरीची बेगमी आसावी त्याची आज्ञा करणार वडिल आहेत पेसवियांचे लग्नास ब्राह्मणसमुदाव भारी मिळल आहे तें लग्न जालियावरी इकडे ब्राम्हण

येतील तेव्हा दक्षणेस अैवज रुपये ५०० पाचसें आसावी बेगमी करणार वडील आहेत वडिलाचे नांवाबदल भिकारी भडंग भारी मिलेल सेवेसी श्रुत होये हे विज्ञाती.

ले. ५७ } (श्रीकार फाटलें त्यांत गेला) { शके १६६७ ज्येष्ठ शु० ११ सन १७४५ मे ३०

श्री

शाहु कार्य धुरंध
तु कान्होजी तनुज
न्मना मुद्रा वजारत्मा
बस्य मानसिंव्ह
स्य राजते[1]

अभयपत्र समस्त राजकार्ये धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री मानाजी आंगरे वजारतमाव ता लखमा राऊत कोली दरेकर वस्ती चुने कोलवड का चेऊल सुा सीत आर्बैन मया व अलफ दिल्हे अभयपत्र असें जे रेवदंड्याचे कजिया मुळें गबरा कोइता याचें घर जलालें तेथें तुझी जालें जलालीं कसब चालवावयास उपाय नाही याची विल्हे करावी व म्हणून बखैर माहालींहून घेऊन येऊन तुवां अर्ज उतर चीठीविसी केलास यैशीयास तुझे कसब चालोन उपजीविकेस जागा असावा तर नवी जाळे घेऊन कसब चालतें करणे नवीन सजाकरितां तुजला येहसान असावा म्हणून बाा गुा महसूल पेरा ७॥= वजा सूट २॥= बाकी ५ पांच करार केले असेत सदरहु प्राा सरसाल उगवणी करणें पेस्तर साली पेसजी माा प्राा न पुरवे तर हुजूर बिल्हेस येणें अभय असे छ ९ जालौवल

राजते
लेखनावधि

ले. ५८ } { शके १६६८ ज्येष्ट वद्य ५, इ. स. १७४६ मे २८

कागदाचा वरचा भाग फाटला आहे.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री रामाजी महादेव नामजाद

---

१ मानाजीचा दुसरा शिक्का व दुसरें मोर्तब

प्रा साष्टी गोसांवी यांसि सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार हुजूर येऊन विदित केलें की पाचसले मुबईकर व वसई साष्टीकर सर्व आमची ज्ञात येक असतां नारायेण नाईक अणजुरकर XXX प्रा साष्टी हे मुंबईकर पाचसले यांस म्हणता(त) की चेऊल रेवदंडेकर पाचसले हे पर.आहेत याजसी तुम्ही अन्न-वेव्हार व शरीर समंध करिता म्हणोन त्यावीस दोष ठेऊन कटकट करितात तरी त्यास ताकीद करावी म्हणोन विदित केले त्याजवरून हे पत्र तुम्हांस सादर केले असे तरी तुम्ही नारायेण नाईक व मुबई व रेवदंडे चेऊल व साष्टी येथील पाचसले याची हकीकत मनास XXX सुदामत पाचसले याचा ज्ञाती वेव्हार चालत आल्या प्रो चालवणे नवीन लटका कजीया करीत असेल त्यास ताकीद करून पूर्ववत प्रो चाल XX जो तुमचे सांगितले नाइकेसा असेल त्याची हकीकत हुजूर लेहून पाठवणे हुजरून त्यास ताकीद केली जाईल (नि. अ.) जाणिजे (नि. अ.) छ १८ जमादिलोवल (नि. अ.) बहुत काये लिहिणे[1]

लेखन
सीमा

ले. ५९ }

श्री

{ शके १६६८, ज्येष्ठ व. ५
इ. स. १७४६ जून २१

श्री
राजा शाहु नरप
ति हर्षनिधानबा
ळाजी बाजीराव
मुख्य प्रधा

दं मा अनाम बाळाजी व बालकृष्ण माणकाजी अदिकारी मो चेऊल यांसि बाळाजी बाजीराव प्रधान सुा सबा आर्बेन मया व अलफ तुम्हीं आपले वतनी वाडियांवर घर बाधून राहाणार त्यास रेवदंडियाहून उपद्रव न लागें ते करावें म्हणोन तुमच्यांविसी राजश्री रामाजी मल्हार यांणी विनती केली त्याजवरून हे अभयेपत्र सादर केलें असे तरी तुम्हीं कोणेविसी शंक अदेशा न धरिता आपल्या वतनी वाडियावर घर बाधून सुखरूप राहाणे तुम्हांस सरकारतर्फेची उपद्रव लागणार नाहीं जाणीजे छ १८ जमादिलौवल (नि. अ.) आज्ञाप्रमाण

(लेखन
सीमा)

---

१ फुल्या टाकल्या येथें फाटलें. याच मजकुराचें याच तारखेचें नानासाहेब पेशव्याचें पत्र 'शंकराजी केशव' यास लिहिलेलें दप्तरीं आढळलें. तें छापणें अनवश्यक म्हणून वगळलें.

ले. ६० } श्री { शके १६६८
नकल } { इ. स. १७४६

राजश्री गणेशजी रघुजी गोविंदजी व पाढवजी मदनजी व समस्त मो वसई गो यांा

ई अंखडित लक्ष्मी आलाकृत राजन्ये श्रेहकित नारायेणजी ना अणजूरकर सरपाटील प्राा सास्टी तो आटगाव व प्राा साईवन राम राम विनंती उपरि दामुलजी तुकाजी सुतार मुबैहून चेहुलास जाऊन गोविंद माहादजी सुतार यांसी सोईरीक कली त्यास दामुलजी एकसरांस आले होते ते समई दामुलजींचा सोइरा गोविंदजी चेऊलकर हा तिल्हेरा कुलबी म्हणौन त्याजवर आरोप कोण्ही आणला त्याजवरून देशामधे व वसैस त्यास अपंगत केले होतें त्याजवरून देशामधी रा बालाजी अदकारी व गोविंदजी व आणीक भले ग्रहस्त चेउलाहून येऊन आपली कुलमालीका विदित केली ते मनास आणितां गोविदजी याजवर आरोप कोण्ही आणला हे गोस्ट लटकीसी जाहाली तरी तुम्ही पूर्व प्रो यांसी वर्तणूक करणे रा अदिकारी व चेऊल प्रांती आपले श्वयातीचे लोक दोहोचहूं गांवी यांचा शेरी सवंध गाव्हाण तर्फेस होता तो त्यांच्या अनाचार जाणोन सोरिका केलिल्या टाकून दिल्या वर्ज केल्या म्हणौन रा अदकारी यांही विदित केलें तरी याजविसी कोण्हे गोस्टीचा अंदेशा घरावासा नाहीं मागेपुढे गोस्ट कोण्हास करावयासी प्रयोजन नसे याउपरी गोताची उपाइसना कोण्ही करील तो देवाचा गोताचा अन्याई बहुत काये लिहिणे हे विनंती

सेके १६६८ क्षे सवसरे

ले. ६१ } श्री { शके १६७३ आश्विन वद्य १२
नकल } { इ. स. १७५१ ऑक्टोबर ५

आज्ञापत्र समस्त राजकार्ये धुरधर विश्वासनिधि राजश्री मानाजी आगरें वजारतमाब ता नागोजी आडनाव जोसी कराडा व समस्त कराडे सुहुरसन इसने खमसैन मयां व अलफ कारणे तुम्हास आज्ञापत्र सादर केले असें कीं तुम्ही कराडे आगरी लोकांकडे अन्न वेव्हार करीत आलेत व आगरी यांकडे क्रियेचा जग तुमचा कराडियां चालवीत होता त्यास आगरी याण्ही शंवशये घेऊन कराऱ्हाडियाणे जागक्रिया चालवावयास वर्ज केलें व कऱ्हाडे ताडे भडारीपण करून ताडी कादितात ते आगरीयाने न खावी म्हणून आशेंका घेतली त्यावरून ते व तुम्ही हुजूर येऊन हकीकत निवेदन केली मनास आणितां तुम्ही निवेदन केले कीं आम्ही कऱ्हांडाहून कोकणात आलों त्याकरितां कऱ्हाडे म्हणून नाव रूढीस पडिले इतर देसींहून आलो शोध न कळे म्हणौन आगरी आम्हाकडे अन्न वेव्हार करीत नाहीं आम्ही त्यांकडे करित आलों परयत प्राचीन

देसी आम्ही सुध कुलवी होतों सांप्रत आगरी यांही मत करून आमचें हातची माडी न खावी कऱ्हाडा जाग चालवितो तोही न चालवावा म्हणौन आम्हीही जेवांवयाचा उजूर केला आहे म्हणौन त्यावरून आज्ञा केली असे तुम्ही कऱ्हाडे आगरी याचा अन्नवेव्हार भोगवटा नाहीं तो नाहींच मनाई केली असे व कऱ्हाडा आगरी याकडील जाग चालवीत होता तोही मनाई केली असे न चालविणें सरा माडीची अशेंका त्याहीं घेतली ते घ्यावयास प्रयोजन नसे सुखरूप तुम्ही कऱ्हाडी सरा माडीचा उदीम करणें तो उदीम आगरी लोक खावील म्हणोन आज्ञा केली असे भोगवटीयाप्रो आगरी यांकडे जेवावया तुम्ही उजूर तर प्रांतात व परकी जागा राजपूर प्राती पेण पणवेल प्रांती कराडे असत तेवढे येक करून तुवा आपले जातीमधेच शोध लाऊन मोख्तासर मोख्तासर माहातारे सर्व प्रांतांतील कऱ्हाडे हुजूर येऊन जाती पूर्ववृत्तांत निवेदन करणे तो मनास आणून अंन्न वेव्हाराची आज्ञा केली जाईल सुखरूप राहून आज्ञे प्रो वर्तणुक करणे रा छ २५ रोज माहे जिलकाद

(नि. अक्षर) सदरहू नकलेचें असल पत्राचें हस्ताक्षेर रा सिवरामजी बावा मुतसदी जंजिरे कुलाबा–

———

ले. ६२ }
तालिक }

श्री

{ शके १६७४ कार्तिक शुद्ध १
{ इ. स. १७५२ नोव्हें. ६

आज्ञापत्र समत राजकार्य धुरधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री मानाजी आंगरे वजारतमाब ताहा··माहाद पो बाल पाटेल आंबोजी पाटेल राम पाटेल (पाटे) ल मौजे वाघोली ता श्रीगाव पाल प्रांत चेऊल सु(हुर स) न सलास खमसैन मयां व अलफ तुम्ही हुजूर जजिरे कुलाबेचे मुकामी विनंती केली की आम्ही आपले वडिलापा(सून) मौजे मजकूरची पाटेलकी अनभवीत असतां ग(ण) भगत वस्ती खार शाहापूर हा आम्हांसवें कजियास उ(भा) राहिला आहे की मौजे मजकूरची पाटेलकी आपली असे यामुळें द्वंद्वास प्रवर्तोन मुतेंही आम्हावर घातली (हो)ती त्याची मनसुफी दरबारी येऊन निवडिलीच आहे तथाप आमच्या अनिष्टाचे पैरवीस चुकत नाहीं तरी साहेब कृपाळु होऊन भगत मजकुरास हुजूर (आ)णून न्याये केला पाहिजे म्हणून त्यावरून भगत मजकुरास व जमीदारा व पाटलारे ता मजकूर आणून आणून मनास आणितां तुझेविसीं सरकारांत तकरीर लेहून दिलि कीं पेसजी याचेच न्यायाविसीं हकीकत मनास आणावयास माहाली आज्ञा जाहाली होती ते सम ई) आमच्या साक्षी गुदरल्याच परंतु न्यायास जमा जाहाल्यामधे व यातीत असी नवद वरुशाचे (पुरु)श आणि याचे गावांसन्निधच्चे वस्तबादकी म्हणून धर्म नाईक पाटेल मौजे कोमर व आजी तेली याची वस्ती कामारले व घाकुल

पाटेल चौघला खार बेली यास उभें करून पुरसीस केली यानंतर त्याही जबानी केली कीं जोम पाटेल याचें लेक सदरहु तिघेजण यासी गण भगत मजकूर कजीया सांगतो परंतु जोम पाटेल याचा बाप माहाद पाटेल परंपरागत पाटेलकी चालवीत असतां आम्ही पाहिला असे याप्रमाणे यांचा त्याचा परस्परें मौजे मजकूरचे पाटेलकी विशई पूर्वी कजिया पडिला होता म्हणावें तरी तोही नाहीं व भगत मजकूर दूर परागंदा होता म्हणावें तरी आजी बहुत वरसें खार चन्हींत होते सांप्रत अैलीकडे भगत मार शाहापुरी आहे अैसें असोन पूर्वी याचा त्याचा वाद मनसुबी न पडतां जोम पाटेल या···वडिलापासोन भोगवटा करीत करीत आले आहेत म्हणून लेहून दिल्हे व भगत मजकुराचा करीता पुरसीस करितां याचा भोगवटा बहुत तुटला असेल म्हणावें तरी याजवल सनद पत्र कागद असावे तेहीं नाही व भोगवटाही नाही व जमीदार पाटलारे सींव झाडे याचे तकरीरेस दाखल्यास यावा तोही अर्थ नाहीं व याचा तुमचा भुतांविसी कजिया सरकारात येऊन (गु)दरला ते समई तुम्हावर भुते याणी घातली त्याजमुळें गुरांढोरास अपाये जाहाला अैसे खरे होउन त्याणि आपली भुते म्हणून पदरीं घेतली. व तुम्ही खर्चाखाली आलेत म्हणून याजकडोन तुम्हास खर्च देविलाच होता व हाली न्याईसमई काहील होऊन खोटा जाहाला सबब त्यास गुण्हेगारी ठरा(ऊ)न तुमची पाटेलकी प्राचीन आहे श्रीमंत कैलासवासी (मो.जा.) बाबा सरखेल यांसमईही तुमचा भोगवटा आहे तोच चालत आहे अैसें दिसोन···वर तुम्हास भोगवटेयास आज्ञापत्र सा(दर) करून तुम्हास वतंन समंध्ये हरखी रुा ६०८ साठ केले असत सदरहु प्रो उगवणीं करून पुत्र पौत्रादि वौशपरंपरेने मौजे मजकूरचे पाटे(ल)कीचे वतन अनभवीत जाणे रा छ २९ जिल्हेज[१]

ले. ६३ श्री { शके १६७७ भाद्र शु॥ २ / इ. स. १७५५ सप्टें ८ }

राजश्री मुरलीधर व गोपालसेट गिरधर सेट दलाल यासी

श्रो मानाजी आग्रे वजारतमाब रामराम सुा सीत खमसैन मया व अलफ नारायणसेट तुमचे आजे याणी तीर्थरूप कैलासवासी आजोबा व सेखोजी बावासमई बहुतच सरकार कामामुळे संकटे वोढोन सेवा केली आम्हास तरी रेवदडियाचे मुकामी तीर्थरूप संभाजी बावाचे समई फारच कामास आले येविसीची पत्रे व सनदा सादर आहेत सेटीचे मागे गिरधरसेटीने अधिकच निष्ठ धरून वर्तत व सेवा व सावकारी करीत आले पालखीचा बहुमान सरका-

१ नकल पुष्कळच जुनीं; फाटलें तेथें अक्षरें कंसांत संदर्भानें आमचीं

रातोन[1] चालविला गिरधर सेटीस देव आज्ञा जाहाली त्याचे मागे तुम्हास हे वर्तमान पुत्राचे उर्जितपूर्वक चालवणे आवशक जाणोन गिरधर सेटीचे पालखीचा सरंजाम व तुम्ही उभयता कर्ते समजोन ज्याजती वेतन रुपये ३०० येकूण कदीम ३०० तीनसे मिलोन साहासे अशास मुरलीधर तुम्हांस गिरधरसेटीचे नावे करार केले आणि तुम्ही वडिल सबब रुपये ३५० साडेतीनसे व तुम्हांस व गोपालसेट तुम्हास रुपये २५० आडीचसे केल्याप्रा दर साल उभयथा पालखीचा अनभाव अनभिवत जाणे सुखरूप राहाणे निष्ठापूर्वक वर्तत जाणे जाणिजे छ १ माहे जिल्हेज[2]

मोर्तब असे

ले. ६४ } श्री नारायण { शक १६७८ आषाढ शु॥ ७
इ. स. १७५६ जून ४

राजश्री बालकृष्ण अधिकारी व समस्त जमीदार गोसावी या

॥ दं अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य श्नेहानुवर्ती राघो कृष्ण पुराड दतानेक आसीर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असीले पाहिजे विशेष आमचे आजे राघो कृष्ण याणी पेठ पाखाडींत वाडी खरीद केली त्याचा उपभोग त्यांही पंचवीस वर्षे केला त्या उपरी आमचे तीर्थरूप कृष्णाजी रघुनाथ यांणी आमरण परियंत उपभोग केला त्यामागें पाचसात वर्षे उपभोग आम्हीं केला चेऊलचे आगर राजक्रांतीने उद्वस पडिले आम्हीही रोजगारामुळे देशांतर फिरतां फिरतां हालीं कसबे भडगाव प्रांत खानदेश येथे नांदत असतां वर्तमान कळलें कीं चेऊलचे आगरांस कौल जाला आहे वसते होतात हे जाणोन आमची पेठ पाखाडींत वाडी आहे ते परम गुरुवर्य वेदमूर्ती राजश्री केशवाचार्य आश्वलायन जामदग्नी गोत्री प्रस्तुत वास्तव्य नागांवे यांसी आम्ही दान दिल्ही असे वंशपरंपरेनें त्यांही पुत्रपौत्री उपभोग करावा आमचे वंसीचा कोण्ही येईल त्यास पेठ पाखाडीचे वाडीसीं संबंध नाही हे जाणोन गोसावी यानी आचार्य स्वामीचे साध्य करून सरकारचें दानखत करऊन त्याजवर राजद्वारची मुद्रा व समस्त जमीदारांच्या साक्षी व वाडी मजकुरीचे सींवघडे असतील त्यांच्या साक्षी करून देऊन वाडी मामूर होऊन आचार्य स्वामीस उपभोग घडे तें करावयासी उचित असें बहुत लिहिणे न लगे कृपावृधी कीजे मिति शके १६७८ धाता नाम संवत्सरे आषाढ शुध सप्तमीं रविवार शुा सबा खमसैन मयां व अलफ हे विनंती

---

१ पून दिल्हे इतकें लिहून खोडलें.
२ आधुनिक नकलेची नकल
३ केशवलाल मोदी, अलीबाग यांच्या संग्रहांतून.

ले. ६५ } अलिफ { शके १६७८ ज्येष्ठ वा ३
इ. स. १७५६ जून १५

अजम रिचर्ड बोचर प्रजिदेत गोवरनदोर जनराल
बंदर मुबई दाम महबतहु

छ रफाअत अवालीपन्हा शाहामत मा आली दस्तगाहा येहतिजाद दोस्तां (मो. जा.) बादज शौक मशहुद आकी आंरफाअतपन्हाकडून अलिकडे मखतुदनामा येऊन खुशवख्ती हासील होत नाही तरी हमेशा खुशनुदी ईरकाम करीत गेले पाहिजे इज्यानेबाकडील मजकूर तरी सावनूरचा मुकदमा फैसल करून तुंगभद्रा किनारा जाऊन बिदरार व सोधे व चित्रदुर्ग हरपन्हली वगैरे मकानच्या खंडण्या विल्हे लाऊन घेऊन माघारे फिरलो मजल दरमजल मकानास येत असों विजयदुर्ग सरकारच्या सरदाराचे हवाली करावयाचा करार मदार आं शाहामतपन्हानी केला त्याप्रो किला दिल्हाच असेल तरी सरकारीं किला दाखल केल्याची खुशवख्ती तरकीम करून दोस्ती ज्यानबैनची चालत आली आहे ते दिनबदिन तरकी होये ते केले पाहिजे (नि. अ.) रा छ ३ रमजान ज्यादा काये लिहिणे हें किताबत

पैवस्तीं इंग्रजीत अस्पष्ट झालेली··· Recd. the 15 (June) 1757

ले. ६६ नकल } श्रीरामेश्वर { शके १६७९ आश्वि. शु. ७,
इ. स. १७५७ ऑक्टो. १९

आज्ञापत्र समस्त राजकार्ये धुरधर विश्वासनिधि राजमान्ये राजश्री मानाजी आगरें वजारतमाब ता कारभारी महाल आगर चेऊल सुहुर सन समान खमसैन मयां व अलफ बदल देणे धर्मादाये नंदादीप श्री (मो. जा.) वास्तव्ये स्थान महाल मजकूर श्रीचा गुरव बनाम मल्हारी वलद विसाजी भांडविलकर याणी हुजूर कुलाबांचे मुकामी विनंती केली कीं श्रीस प्राचीन सेत जमीन नैवेद्यार्थ मोहीन व नंदादीप चालावयाचा त्याप्रमाणे सरकारांतून चालतच आहे परतुं श्रीची वाडी कदीम श्री आर्पण असोन श्रीकडेस चालत नाहीं वाडीचा महसूल सरकारांत जमा होतो आणि नंदादीपास ईतलाख सरकारातून पावतो ऐशास नंदादीपाकरितां सरकारांतून इतलाख मोहीन प्रमाणे साल दरसाला पावत आहे तो मनाई करून श्रीची वाडी श्रीकडेस करार करून चालविली तर वाडीतील जुनी व नवी लावणी करून नंदादीप सरकारचा चालवावयास उमेदवार आसें वाडीचा महसूल नंदादीपार्थ सरकारांतून धर्मादाये खर्च पडत आईल वाडीचें उत्पन्नामुले सहजांतच दीपाचे सरंजामास अनकूल

होऊन मामुरीमुळे शेष राहून पाऊन त्याजमधे आपलेंही उपजीविकेस जागा होईल आपण सिवनिर्माल्याचा विभागीच असें दीपांगत्वें वाडी गुरवाचे स्वाधीन जाहालेयावर दीपाचे नियेतास गुरवापासून अंतर पडिलें तर हा विचार दिसतच आहे त्याजमध्ये अनुमात्र दीपास व्यंग नसावें श्रीचा औश्य श्रीस पाऊन उरल्यामधीच माझी इच्छा असावी अनेथा आचार घडल्यास व केल्यास इहलोकीं व परलोकीं आपला परिणाम बरा नाहीं येविसींचा आपले चितांतील अभिप्राये सरकारांत सेवेसी निवेदन होऊन श्रीचे नंदादीपाचे यैवजीं श्रीची वाडी म्हणोन गुरवाचे श्वाधीन असावी म्हणून आपला अर्ज आहे म्हणून त्यावरून हेच विषई जमीदार प्रांत मजकूर व माहाल मजकूर यांसी पुरसीस करितां मशारनिले यांही विदित केले कीं गुरव मजकुरानी विदित केलें या गोस्टी यैथार्थच आहेत सांप्रत देउलवाडी म्हणोन वाडीचें नांव वोढत आहे प्राचीन रकमालेयास म्हटलें तर नउदर सोनवाडी पाखाडी भोरसी नजिक श्री (मो. जा.) स्थान मलिक अंबरी रकम लाहारी १० दाहा सिलोत्री कृष्णाजी पदाजी खत्री म्हणून रकमालेयास आहे खत्री मजकूर यास वाडी मार असतां त्यास जन्मांतर संचितेकरून सुबुधी संभवोन वाडी श्री अर्पण करून उदक सोडिलें आहे तै पासून श्रीचे गुरवाचे श्वाधीन जाहाली होती यान-प्रमाणे हकीकत आम्हास दखल आहे म्हणून त्यावरून हरदु जबानी हकीकती-वरून तात्पर्यांथ मानस आणितां श्री आर्पण वाडी पूर्वीच पासून असेल यैसा दिसोन आल्यावरून सांप्रतवाडी श्रीमंत(मो.जा.)मातुश्री आईसाहेबांकडेस असतां हें हकीकत संपूर्ण मातुश्रीस कळतांच आज्ञा जाहाली किं पुरातन श्रीची वाडी श्रीं अंगत्वें गुरवाचे ताबे न जाहाल्याने उपद्यमान नंदादीप लागोन श्री अर्पण होईल वाडीचा महसूल धर्मादाये खर्च पडेल तेणे कडू(न) राजश्री (मो. जा.) स्वामीच्या राज्यास कल्याण असे म्हणून त्यावरून वाडी मजकूर पेड सुमार बरकुम पेढ मोजणी सन सीत खमसैन देखील नवी लावणी देखील

माड पेड सुमार	सुपारी सुमार	ताड सुमार	उंडी रोपें सुमार
४२ बारदार	२ बारदार	३ बा मक्ता	२
१० झिटे	२ गैर बारदार	३ बा पाहाणी	
२ रोपे	५ उमेदवार		
—	—	—	
५४	९	६	

यैकूण मक्त पेसजीं इा सन खमसैन तागाईत सन आर्बा पांच साला पुरल्या-नंतर त्याजप्रमाणेच हाली जमाबंदी चालत आहे सबब पेसजीचा मक्ता चालत आल्याप्रमाणे आकार देखील बाबती

नकद रुपये
१३।।।= यैन आकार
१२।।। नारळ
१८= पानवेली
१३।।।=
८८।।।· ज्याजती चड
२१।।।=।।।
३८ ताड ६ पो
२४।।।=।।
तपसील
बा मख्ता बा पाहाणी
२१।।।=।।। येन सालदरसाल
१।। ताड ३ पाहणीवर ताड ३
——— —रुा
२३।=।।।· १।।
काथा [काथल ?] देऊळ सबब माफ
०

नवे लावणीचें पेढ सुपारी व उंडी मख्ते यांतील लावणीपैकी सबब अब्दा-हिदा महसूल ०
झांप पेढ सुमार ५२ येकूण खेरीज रोपे झांप सुमार
१५६ महसुली दर माडास ३ प्रो
० खरीदी दर २ प्रो हरदु देउल-वाडी सबब माफु
——
१५६

येकूण पावणें पंचवीस रुपये पावणेतीन आणे व झांप येकसें छपन हाली आकार व पेस्तर नवे लावणी बारदार होऊन ज्याजती जमाबंदी होईल त्या देखील खेरीज हकदार प्रतवर्षी ताजे संदेचा आक्षेप न करितां साल मजकुरा-पासून साळ दरसाल नंदादीपाचे ऐवजीं धर्मादाये खर्च लिहीत जाणे या सनदेची प्रत करून घेऊन असळ परतोन भोगवटीयास गुरव मजकुरास देणे रा छ ५ माहे सफर

ले. ६७
नकल

श्री

शके १६७९ कार्तिक शुद्ध १४
इ. इ. १७५७ नोव्हें. २४

(सिका)

र्द मा। अनाम जमीदार मामले चेऊल यासि मानांजी आंगरे वजारतमाब सु॥ समान खमसैन मयां व अलफ राजश्री रामा थळ तां अष्टागर मामले मजकूर याणी जंजिरे कुलाबेयाचे मुकामीं येऊन विनंती केली कीं श्री (मो. जा.) माहास्थान चंपावती देवाळये जीर्ण जाहाले होते त्याचा जीर्णोधार श्री (मो. जा.) च्या कृपेकडून जाहाले आहे देवालयाचे सनिध बाग बागाशाई जिरायेत व बागायेत पुस्प

वाटिका कर्तव्य आहे केली त्यास श्री (मो. जा.) च्या पूजा आर्च्यास पुस्पे आधीकरून माहामुरीमुळे उत्पन होईल तो अर्थ उपयोगी पडेल हे श्रेयेस्कार आहे कृपालु होऊन जमीन इनाम देविली पाहिजे म्हणून अैशास श्री(मो. जा.) ज्याग्रुत माहास्थान व तेथील देवालये याचा जीर्णोधार मशार- निलेनी करून काम बहुत अपुर्वात केले तेथील सर्व प्रकारे उर्जा चालली पाहिजे हे जाणोन कृपालु होऊन देवालयासनिध दक्षिण व पस्चेमेकडील जमीन बिघे ८७ सात इनाम करार करून दिल्ही आहे बागाईत व जिरायेत फुलझाडे देखील मामुरी करून वांशपरंपरेने भोगवटा करितील सदरहु जमिनीचा आकार होईल तो इनाम खर्च साल दरसाल लिहीत जाणे नूतन पत्राचा आक्षेप न करणे नकल घेऊन असल पत्र भोगवटीयास परतोन देणे (नि. अ.) रा छ ११ माहे रबिलावल (माहर्तब)

ले. ६८

} श्रीरामेश्वर {शके १६८० आश्विन शु. १४
{इ. स. १७५८ ऑक्टो. १५

राजश्री दुर्गाजी सिंदे सुभेदार जंजिरे रेवदंडा गोसावी यांसि

र्द अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य श्रो भिवजी विश्वासराव हवालदार किले मीरगड रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केलें पाो विशेष किले मारचें नामजाद लोक जंजिरें मारीं आहेत त्यांस बारीचे लोक येथून पाठविले आहेत नावानिसीवार—

९ दिा भिवजी विश्वासराव
  २ विठोजी विश्वासराव
  १ भवानजी विश्वासराव
  १ दादजी भोईर
  १ कान्होजी तुपे
  १ अंबाजी देवघरें
  १ परसोजी पारधी
  १ गोंदजी ठाकूर
  —
  ९

३ दिा खंडोजी फाटक
  १ नावजी फाटक
  १ होनाजी माणकर
  १ धावजी सांडभोर
  —
  ३

१ परसनाक पीटनाक दिा रायाजी दळवी
१ गोजनाक चावना दिा घोंडजी मोरे
२ दिा जिवाजीराव इंदुलकर
  १ येसनाक सितनाक
  १ गवरनाक हीरनाक
  —
  २

येकूण सोळा आसामी पाठविले आहेत याची हाजिरीकडील अडिसेरी शाईसि[र]स्तेयाची सिरस्तेप्रो देत जावें जुने लोक रवाना केले पा आडिसेरी दर आसामीस दरमाहा समेत डाळ ८१॥ दीढ मण व मीठ ८८।· येकसर प्रो देत जावें व विठोजी विश्वासराव यास तेल वजन पके दरमाहा ८८॥६ पाऊण सेर छटांक प्रो द्यावें माहे मारची अडिसेरी येथे पंधरवडाची पावली असे सरदारीचें काजकाम रा विठोजी विश्वासराव यांचें हातून घेत गेलें पाहिजे बहुत काये लिहिणे रा छ १२ सफर सुा तिसां खमसैन मयां व अलफ हे विनती.

ले. ६९ } श्री { शके १८६१ आश्विन व. २
इ. स. १७५९ ऑक्टोबर ९

श्री ०
शाहुकार्य धुरं
धर्तु कान्होजी तनुज
न्मनाः मुद्रा वजारत
मावस्य मानसिंह
स्य राजीते

र्द माा अनाम अधिकारी व देशकुलर्णी मामले चेऊल यांसी राघोजी आंगरे वजारतमाब सुा सितैन मयात्र अलफ चिरजीव बयाबाईस सविस्तर लिहिले असे तुम्हास किलेंयांत नेऊन आज्ञा करितील त्या प्रो कागद पत्र पायाशुध्ध जलदीने देणे म्हणजे रवानगी करितील पूर्वी कैलासवासी तीर्थरूप सातारेयासी गेले होते त्या समई हाच मजकूर अगोधर पडिला होता म्हणोन कागदापत्रानसी बाबाजी महादाजी देश कुलकर्णी यांस समांगमे नेले होते निशा केला होता तोच पसग पडिला आहे तरी चिरंजीवांस लिहिले प्रो कागदपत्र देणे उजूर न करणे यात तुमचेच उर्जित आहे रा छ १७ माहे सफर (मोर्तब सुद)

ले. ७०
नक्कल } श्री { शके १६८२ अ. श्रावण वद्य १२
इ. स. १७६० ऑगष्ट ८

आज्ञापत्र समस्त राजकार्ये धुरंधर विश्वासनिधि राजमान्येश्री राजश्री राघोजी आंगरे वजारतमाब ता कारभारी माा चेऊल ताा अष्टागर प्रांत मजकूर सुा इहिदे सितैन भयां व अलफ कृस्णाजी अदकारी प्राा मजकूर याही हुजूर जंजिरे कुलाबाचे मुकांमी येऊन विनंती केली कीं कैलासवासी आबासाईबीं श्री स्थान येथील जीर्णोधार करून नैवेद्य व दीपोत चालतीं करून ठांई ठांई नंदादीप आदी करून चालतें केले त्या पुण्येमहिमें करून पर्जन्य सुवृष्टी होऊन प्रतवर्षी सुभीकाचाही प्रवाह चालला अैशा गोष्टी होणें हे पुण्ये प्रतापावांचून नाहींच चेऊल चंपावती पूर्वील पुराणप्रसीध शाहार तीनसें

साठ देवालेयेंच होतीं व त्याचा सध्या अद्याप आहेचं भंगल्याचा जीर्णोधाराचाही प्रवाह चाललाचं जेंथील जीर्णोधार जाला तेथें सरकारांतोन नैवेद्य व दीपोत चालतींही जालींच आहे परतु श्रीनारायेण आदिस्थांन असोनं सरकारांतोन धर्मादाये चालत नाहीं यास कारण म्हटले आम्ही जमीदार येऊन सरकारांत वजीदच जालो नाहीं त्याच मुळेंच आज पावेतों सरकारांतोंन मोईन मुकरर जाला नाहीं शब्द जमीदाराचेकडे येईल साहेब कृपाळु होऊन सालमजकुरापासून दरसाल नैवद्या व दीपोतीचा करार करून सनद सादर करणार साहेब धनी मायेबाप आहेत म्हणून त्यावरून श्रीस धर्मादाये चालल्याने श्रीमंत स्वामीच्या राज्यास श्रेयस्कर जाणून सालमजकुरापासून दरसाल करार बेरीज नैवेद्यास व श्रीचे पुजेस दीपोतीस तेल दरसाल वजन ८८।· ब्राह्मण असतो त्या देखील पावसेर प्रो साळीना एकूण नख्त साळीना भात ·।।।· चाखे उसने मापे रुपये ५॥= येकून भात उसने मापे पधरा मण व नख्त साडेपांच रुपये चवल करार करून आज्ञापत्र सादर केलें असे तरी प्रतवार्षिक साल मारापासून चालवणे दर दरसाल ताजे सनंदेचा उजूर न धरितां सुभे मार खर्च लिहीत जाणें रा छ २६ माहे जिल्हेज.

ले. ७१ } श्री रामेश्वर { शके १६८२ मार्ग वद्य १२
नकल } { इ. स. १७६१ जानेवारी २

राजश्री काकाजी रायाजी व धोंडो गणेश मो चेऊल यासि सुा इहिदे सितैन मया व अलफ विनंती पत्र हुजुरून आज्ञापत्र सादर जाहल्यावरून श्री (मो. जा.)चे दीपाची हकीकत गोंदजी राऊत याचे व धुशा लव्हार याचे कजियावरून लिहिलेत की सरकारच्या दीप लाविल्यावर प्रथम ज्याची दीपमाल बाधिली असे त्याणी त्या मागोन ज्याची असेल त्याणी लावावा यैसे चालत आहे त्यास गोदजी राऊत याणी दीपमाल सेणव्यापैकी पुरातन आहे तिजवर राऊत माराचे वडिलापासून दीप लावीत आले मागोन लोहाराचा लागतो यैसे आहे म्हणोन लिहिलेत त्यास पुरातन चालत आलेप्रो दीप लाववणे आधीक आगले जो करील त्यास हुजूर पाठवणे राऊत मजकुराचा दीप अगोघर लावितात मागोन लोहार लावितो म्हणोन लिहिलेच आहे वतनदार अदकारी पाटेल ग्रामस्तायाचे विद्यमाने लेहून पाठविलत तर लिहिल्याप्रोच हरदुजणास वर्तवणे जो नवी करील त्यास हुजूर पाठवणे रा छ २४ माहे जमादिलावल[१]

---

१ (याच कागदाच्या दुसऱ्या नकलेंत बाजूस* "परवाना रा राघोजी आगरे वजीरे कुलाबा" असा जास्त मजकूर.)

ले. ७२ } श्री { शके १६८३ ज्येष्ठ वद्य ५
इ. स. १७६१ जून २२

श्री ०
शाहुकार्य धुरं
धर्तु कान्होजी तनुज
जन्मना मुद्रा वजारत
माबस्य मानसिहस्य
स्य राजीते

दं मो अदकारी प्रात चेऊल यासि राघोजी आंगरे वजारतमाब सुा इसने सितैन मया व अलफ राजश्री रामजी मल्हार याही दादाजी तावजी व लाडकी अयाल बाळाजी माहादाजी देशकुलकर्णी याणी तो (बा)म्हणगाव तो उमटे येथील देशकुलकर्णाचे वतन रास्ती किमत घेऊन फरोख्त करून दिल्हे हुजूर आणून खत मारनिलेनी रूजू केले आणि तुम्हा जमीदाराच्या शाहिदा असाव्या म्हणोन विनंती केली त्यावरून हे पत्र सादर केले असे शाहिदी करणे (नि. अ.) रा छ १८ जिलकाद (मोर्तब सुद)

ले. ७३
नकल. } श्री { शके १६८४ श्रावण वद्य ५
इ. स. १७६२ आगस्ट १०

मशहुरुल—

रघूजी ठाकूर१ शाम ठाकूर१ कृष्णांजी ठाकूर१ नारोजी (ठाकू)र१ बिन भीव ठाकूर सेकीन कसबे खांडाळे तो मजकूर मामले मुर्तजाबा(द) उर्फ चेऊल यासी कृष्णांजी माणकाजी व विठोजी आपाजी अधिकारी मामले मजकूर सुा सलास सितेन मयां व अलफ कसबे खाडाळे येथील पाटेलकी बेवारिसी जाणून कैलासवासी राजश्री (मो. जा.) सरखेल साहेब जंजिरे कुलाबा येही सरकारी अनामत ठेविली ते पाटेलकीची आस्ता धरोन तुमचा बाप भीव ठाकूर कैलासवासी (मो. जा.) सरखेल साहेबाचे अमलापासून व राजश्री (मो. जा.) सेकोजीबाबा सरखेल व राजश्री (मो. जा.) मानाजी आंगरे वजारतमाब असी परंपरागत सेवाचाकरी करोन श्वामीच्या राज्यास अभिष्ट इछून गांव निसबतकारभार व आल्या गेल्याची बरदास्त बिनमुशारा आजपर्यंत करीत असा त्यास कसबे खाडाळे राजश्री (मो.जा.) वजारतमाब येही राजश्री राघोजी आंगरे आपले चिरंजीवास गांव देखील पाटेलकी मोकासा इनाम दीधला त्याजवर तेथील पाटेलकी होणे हे निरुपाये जाणून हालीं श्रीमंत राजश्री (मो. जा.) राघोजी आंगरे वजारतमाब जंजिरे कुलाबाचे मुकामीं तुम्ही जाऊन सेवेसी विनंती केली ऐसीजे आमचे वडील परंपरागत आम्हीं राजश्री स्वामीच्या राज्यात सेतवाडी व सेवाचाकरी करीत आलो व पुढेही करावयास उमेदवार असो तर आम्हावर कृपाळु होऊन आमचे कुटुंबास रक्षणार्थ अन्नवस्त्रास जागा करून देणार साहेब धनी मायेबाप आहेत म्हणून अर्ज केला त्यावरून तुम्हीं

विदित केले विनंतीवरून तुमचे निस्ठेवर नजर देऊन तुमचे कुटुंबाचा योगक्षेम चालवयास मौजे कालोसी तो खाडाले मामले मबकूर येथील पाटेलकीचे वतन निवारीस जाणून तुम्हास करार करून वतनसमधे हरखी रुपये ४०८ च्यालीस सरकारी घेऊन छ १९ रोज माहे मोहरम सन मजकुरी तुम्हास सनद दीधली ते सनद आम्हानजीक आणुंन रुजू केली आण त्या पत्राची नकल आम्हा जवल देऊन पेस्तर आम्हा जमीदाराचा दाखला दस्त थेवज असावा म्हणून विनंती केली त्यावरून तुमचे वडीलापासून ममता जाणून तुम्हास आपले हस्ताक्षरे पत्र लेहून दिल्हे त्यास दिवाणचे संदेमोजीब वौश परंपरेने पुत्र पोत्री पाटेलकीचे वतन अनभवोन पानमान हक्क मुशाहिरा सिरिस्ते प्रमाणें घेत जाणे जाणिजे छ १९ मोहरम

ले. ७४ } श्री रामेस्वर { शके १६८४ माघ शु. १२ इ. स. १७६३ जाने. २६

श्री ०
शाहु कार्य धुर
धर्तु कान्होजी तनुज
न्मना मुद्रा वजारत
माबस्य मानसिंह
स्य राजीते

र्द मां कृष्णाजी अदकारी मा चेऊल यासि राघोजी आगरे वजारतमाब सुा सलास सितैन मया व अलफ श्री (मो.जा.) ची यात्रा माघ वद्य सिवरात्रीची सालाबाज प्रों भरावयास असावी त्यास चेऊल प्रातातील रयेत सावकार व मुंबई व साष्टी वसई कल्याण भिवडी प्रात व राजपूर प्रातांतील व वरघाटचे सावकार व यात्रेकरून येऊन यात्रा सरकार येकतर्फात भरेल त्याची रखवाली सरकारतर्फेने स्वारी जाऊन होत आल्याप्रमाणे व्हावी ते होईलच असे असता राजश्री आनंदराव सिंदे रेवदडियातोन स्वारी पाठऊन चौकी ठेऊन वलवटा पाडणार त्यास या मागचा दाखला म्हणतील तर शामलाचा दंगा होता यामुले व उदेरीस मोर्चेबंदी होती म्हणोन मेहेमान दाखल जुजवी लोक यात्रेत येऊन रखवाली जाली तोच दाखला म्हणोन म्हणतील तर शोभेत पडणार नाही व वलवटीयात येता न ये येक तर्फा प्रातात आमल मामला रखवाली खबरदारी होणे करणे ती सरकारतर्फेनेच केली जाईल तुम्हास करावयास प्रयोजन नसे यैसे गुरवासमागमे सागोन पाठविले असतां त्याकडील आशये की रेवदडकर सावकार रयेत यात्रेस जाईल त्यांची रखवाली आम्हास करावी लागते लोक पाठऊन यात्रा आहे तो करून यैसें गुरवाकडून कलोन आले त्यास ही गोष्ट सरकारात उपेगी पडत नाही रेवदंडियातील सावकार व रयेत लोक येतात त्या प्रो बाजे जागाचे येतात तेव्हा त्याकडील रखवालीस लोक स्वारी यावे हे गोष्ट चालत आले अेहात शोभेत पडत नाही जे रखवाली खबरदारी करणे ती सरकार तर्फेने होईल यैसे पष्ट

तुम्ही जाऊन त्यास कलऊन जाबस्वाल उगऊन येणे लटके गोष्टीत जीव नसे यैसे असोन करू म्हणतील तर यात्रा पडेल वरकड रेवदडकर सावकारास व रयेत चाकरमाने यांस इकडून मनाई नाही व होणार नसे त्यास संशये असला तर रेवदडकरास मनाई करावी इकडून जसे पष्ट जाऊन कलवणे जाबज्वाल करारात येईल तो येऊन सांगणे छ ११ रजबु

(मोर्तब सुद)

ले. ७५ } श्रीगज्यानन { शके १८६९ ज्येष्ठ
नकल } { इ. स. १७६७ मे नंतर

राजश्री राघोजी आमरे वजारतमाब सरखेल गोसावी यासी

र्द सकल गुणालंकरण अखडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये (मो. जा.) श्रो मोराजी सिदे मो जजिरे रेवदडा रामराम विनंति येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असीले पाहिजे विशेष पत्र पाटविले ते पावले चेऊलकर व रेवदडकर व थेरवडकर कोली बाहेर दर्यात कवीची कुटे आऊन मासली मारीत आले असता गुदस्तापासोन रेवदडकर कमला पाटेल हरकत करून चेऊलकरास मेड आऊ देत नाही रेवदडकर व थेरवडकर कोली यानी मासली मारून पोट भरावे चउलकरानी सुदामती जागियावर कुटे गाटु नये मासली मारू नये पोट भरू नये हितका अतिशेये कमल पा मार बेइनसाफे करितो रेवदडकर श्रीमताचे सरकारचे आणि चेउलकर गरीबाचे पोटाचे उदीमाची दाद सुदामतपासोन घ्यावी म्हणून विस्तारे लिहिले ते कलले अैशास चेउलकर कोली येथे येऊन वर्तमान सागितले त्यावरून रेवदडकर व थेरवडकर यास आणून वर्तमान पुसिले याचे त्यासे रुबेरुब वर्तमान मनास आणिता चेउलकर कोली यानी सुदामत जागा सोडून दुसरे जागां कुटे आविली त्यावरून त्याचा याचा कजिया पडला होता त्यास चेउलकरांस सागि(तले) की दुसरे जागा खुटे तुम्ही आविली आहेत तिकडून सुदामत जागा आविता येथे आवांवी आपणही त्यांस ताकीद करावी की सुदामत सालोसाल आविता तेथे आवावीं नाहाक कजिया करू नये येथेही कमल पाटेल यासी ताकीद केली आहे. सुदायतीस नवदिगर होणार नाहीं कलावे रा छ १७ माहे जमादिलाखर बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती

[निराळ्या अक्षरांत जागा सोडून*]

असल पत्र हुजूर जंजिरे कुलाबा दफतरीं आहे त्या पत्राची नकल सुहुर सन समान सितैन मयां व अलफ सेके १६८९ सर्वजितनाम सवसरें हे पत्राची नकल लखम पाटेल सरपाटेल जजरे कुलाबा यांनजिक आहे.

ले. ७६ } श्री { शके १६८९ पौष शु. १२, इ. स. १७६८ जाने. १

श्री
शाह कार्य धुरं
धर्तुं कान्होजी तनुज
न्मना मुद्रा वजारतमा
बस्य मानसिंह
स्य राजीते

अभयपत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री राघोजी आगरें वजारतमाब सरखल बनाम अजम सेराजुदीनखान सिलोत्री खार खानपूर कसबें चेऊल मामलें मुर्तजाबाद उर्फ चेऊल सुहुर सन समान सितैन मयां व अलफ दिल्हें अभयपत्र ऐसे जे हुजुर जंजिरे कुलाबाचे मुकामी विनती केली कीं खार मार आपलें सिलोतर असतां अलिकडस बहुत दिवस दर्या गर्क होतें त्याची नौबदिस्त सन आर्बात केली खाड्या मोडल्या उपरात उधाण होऊन खाड्याच गेल्या तेव्हा काटा जुजवारा होहून तमाम धुपोन गेला साहुकारी पैसा आगावर पडला तैपासून स्वारी खाली फारच आलों त्यात तकवा धरून साल मजकुरी फिरोन नौबदिस्त केली त्यात कुलभरणा असल्याविना पुढील मामुरी होणार नाही याजकरितां परमुलकी कुलें आणिली पाहिजेत ती खार मारी यावयास सरकारचा कौल नियेत सुधा असावा म्हणून त्यावरून मामुरीवर नजर देऊन परमुलकी कुले येतील त्यास वगैरा करार

परमुलकीं कुळे येऊन टिपेस घर लागल्या सालापासून घर देणे खोा तहकु(व) अजीपाल सालें
३ बा सिरस्ता कौली
१ जाजती रयात दाखल
—
४

येकूण चार सालें अजीपाल उपरात दोन सालें निमे देणे तदनंतर भर देणे जमा होईल व वेठबेगार बा सिरस्ता सालें ७ व जाजती १ येकूण आठ सालें अजीपाल या उंपर सिरस्ते प्रों पडत जाईल
१

खारीस पाटेल भोपी व मढवी व चौगला यास वेठ बिलकुल अजीपाल घर देणे पैकी सुदामत सिरस्ते प्रो दर आसामीस पाल अगत्वे रुा ·॥= दाहा आणे अजीपाल पडून दीड रुपया सरकारात जमा होत जाईल १

खुदचा खानाचा खार मारीं सेख इसमाईल अडसेरी मुशारे याचा घर बाधोन राहील त्याचे घर टिपेस लागल्यावर घर देणे मात्र अजीपाल दरसाल पडत जाईल कलम येक
१

(नि. अ.) येणे प्रों करार करून अभयपत्र सादर केले असे तर परमुलकी कुळे खार मारी आणून वसाहत करवणे अभय असे (नि. अ.) छ १० माहे साबान (मोर्तब सुद)

ले. ७७ } श्री {शके १६९१ भाद्र. व. १२ इ. स. १७६९ सप्टें. २६

चिरंजीव सौ बयाबाई मो जंजिरे कुलाबा यांसि राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल मो पुणें आसीर्वाद उपरि राजश्री मोरो माहादेव याचे घरींची चाल कार्य प्रयोजन जाहाल्यास कुलगुरूने चालवावें आणि उत्पन्न ल्यावे त्यास अनकूल न पड तरी ब्राम्हण पाठवितात ब्राम्हणही न आला तरी मारनिले ज्या ब्राम्हणास बोलावितात तो चालऊन उत्पन्न नेतो ग्राम उपाध्यास संमंध नाही याप्रमाणे आहे व खार चऱ्ही येथे च्यालीस पंचेतालीस वर्षे वस्ती आहे तेथेंही याप्रोच चालत आलें असतां सालमारीं खार मारचा ग्राम-उपाध्या गोवर्धन जोसी कज्या करितो म्हणोन मारनिलेनी विदित केले त्याज-वरून हें पत्र तुम्हास सादर केले असे तरी च्यालीस पंचेतालीस वर्षे खार मारी चाल चालत आल्याप्रो चालावें नवीन करावयास प्रयोजन नाही म्हणोन ग्रामउपाध्यास ताकीदपत्र देणें जाणिजे छ २५ माहे जमादिलौवल सुा सबैन मया व अलफ बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद (मोर्तब सुद)

ले. ७८ } {शके १६९१ मार्ग. शुा १० इ. स. १७६९ डिसेंबर. ८

(पत्राचा आदि अंत फाटून नष्ट)

प्रती बाजी गणेश गोखले मुा किले माणगड प्रांा राजपुरी कृतानेक साष्टांग नमस्कार विनति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशेल ताा मार्गीसर शुधे १० दसमी पावेतो किले मजकूरचे व आमचे वर्तमान येथस्वीत असे श्रीमत काका तलेयाहून स्वारीसुधा किले मतगडास गेले होत तेथे चार रोज परयेत राहून राा मदनाजी नाईक घोसालगडकरी सरदार याचे लोकाही व किलेकरी लोक सुधा हजेरी घेऊन असामी सुधा लोक ७०० पावे रोजमुरे देऊन लोकाची समजी पाडोन अजम सेख आली हवालदार याचें लोकाची हजरी घेऊन किले मजकुरी नामजाद ठेऊन बदस्तोबत करून येणार होते इकतियात जजिरेकरास बातमी लागली स्वारीसुधा काका तल्यास जाणार आहेत त्याणे खसा स्वारीस राा बाबूराव घाटगे यासी वस्त्रे देऊन लोक खसे

सरदार आजम आबदलाखान खास पतकी याजबरोबर लोक सिपाई गाडदी १००० हजार पावतो रवाणगी करून किले तले याचे मोकामी जावे या प्रा करार करून लोकास रोजमुरे देऊन गलबते बरोबर देऊन म्हसले बदरी उतोन्हून मारगिरी करू लागले इकतियात बातमी किले मजगडास कललियावर स्वारी सुधा कृष्णाजी नाईक याणी लडाई मातबर जाहाली याजवर (जं)जिरेकराचे लोक जखमी आसामी १० व ठार आसामी ४ येकून आसा चहु आसे होऊन तलकरी याणी आपली (अपूर्ण)

ले. ७९ } श्री {शके १६९२, मार्ग. व. ६ पूर्वी
{१७७० डिसें. ८ चे पूर्वी थोडे दिवस

श्रीमंत (मो. जा.) वजारतमाब सरखेल साहेबांचे सेवेसी आज्ञाधारक माहादजी बलाल देसाई व देशकुलकर्णी मामले चेऊल व अदीकारी तो अष्टागर व तो झिराड मामले मजकूर साहेबाचे सेवेसी विज्ञापना यैसीजे मातुश्री (मो.जा.) बाईने निमे वतनाचे पत्र पूर्वी साहेबांचे सेवेसी लेहून दिल्हें आहे तें त्याप्रमाणे करारच आहे मातुश्रीचे पोटीं संतान नव्हतें म्हणोन मातोश्रीने साहेबांचे सेवेसी विनंती केली कीं वतनदाराची वंशवृद्धी जाली पाहिजे तर साहेब कृपाळु होऊन दतपुत्र घ्यावयाची आज्ञा करावी त्याजवरून साहेब कृपाळु होऊन दतविधान करून मजला मातुश्रीच्या पदरीं घातलें त्यास पूर्वी मातुश्रीनें साहेबाचें सेवेसी पत्र लेहून दिल्हे आहे तें करार आहे त्या अन्वयें आज्ञेप्रमाणे वर्तणुक करीन सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

त्यास खासा स्वारीं हेट प्रांती हैदर नाइकावर होणार म्हणोन राजश्री भावजी जना(ज)र्दन व विठल सुंदर यांस मातुश्रीस बालवावयास पाठविले त्यास मातुश्रीचा पाय कापला तेणेकरोन हलाख आहेत म्हणोन यावयास अनकूल पडत नाही तरी पूर्वी मातुश्रीने साहेबांचे सेवेसी पत्र लेहून दिल्हे आहे त्याच्याच अन्वयें खासा स्वारी स्वस्थलास आल्यानंतर फरोक्त खत लेहून देऊ सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

ले. ८० } श्री {शके १६९३, आश्विन शुा १
{इ. स. १७७१ ऑक्टोबर ९

साहेबाचें सेवेसी आज्ञाधारक अधीकारी प्रांत चेऊल कृतानेक रामराम विज्ञापना रा बच्याजीपंत येहीं आम्हास पत्र पाठविलें ऐसें जे तुमचे भेटीचें प्रयोज(न) आहे तर रेवदंडेयास येणे त्याजवर आम्हीं गेलो नाहीं दुसरे दिवसी

राजश्री अनंदराव सींदे सुभेदार येही मनुश पाठऊंन बोलावून नेलें बाहेरचे सदरेस मडलीसमेत बैसले होते त्याजवर आम्हास आज्ञा केली कीं देशमुखाचा हक कानु कायदा रेवदडेंयास काये कैसा आहे तो सांगोन द्यावा त्याचें उतर केलें की चेऊल प्रांत समग्र आमचे येजमान साहेबांचे ताळुक आहे तेथील देशमुखीचा अमल अनभवास राजश्री विस्णुपंत आले आहेत त्यास येजमान साहेबांकडून पटाभिशक वतनाचा होऊन वस्त्रें देऊनं जमीदारीचा अमल तिघां जमीदारांचा करार होऊन येईल पेस्तर जो पाया असेल त्या प्रमाणे अमल चालवावयाची आज्ञा हुजरून होईल ते समई आज्ञाप्रमाणे जमीदारांची कानुकैद जे दखल असेल ते सांगितली जाईल तावत्काल कानु काइदा जमीदारांचा याचें भाशण कोण्हे येकाजवल करवत नाहिं आमर्या(दा) करून भाशण केलियाने हाकीम लोकांचा विश्वास नाहीं अपायास अंतर होणार[1] नाहीं हें भाशण आईकोन सर्वांहीं प्रमाणात आणु(न) रजा दिली सदरहु वर्तमान सेवेसी श्रृत होणे रा बच्याजीपतांचे पत्र आम्हास आलें होते ते सेवेसी पाठविलें श्रृत होणे हे विज्ञाप्ति सदरहु वर्तमान माहाली येऊन श्रृत केले हे विज्ञाप्ति

———

ले. ८१ श्री { शके १६९५ श्रावण वा १० / इ. स. १७७३ आगस्ट १३ }

श्री ०

राजाराम नृप
चरणी सादर मान
सिंहसुत राघोजी व
जारतमाब सरखे
ल निरंतर

अभयपत्र समस्त राजकार्ये धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री राघोजी आंगरे वजारत माब सरखेल बनाम सिवराम पाडुरंग जदीद वाडकर भाट जमीन माहाल थळ ता अष्टागर उर्फ सुभा प्रा चेऊल सुहूर सन आर्बा सबैन मया व अलफ दिल्हे अभयपत्र यैसें जे शके १६९५ विजयनाम सवत्सरी हुजूर जंजिरे कुलाबाचे मुकामीं येऊन विनती केली कीं आपले बाप पाडुरग रघुजी वर्तमान असतां माहाल मजकुरीं भाट जमीन पाहून प्रांतात बागायेतास कौल येहेसान होऊन कौल जाले म्हणून भाट जमीनीवर मेढा घालून लावणें बागायती केलें कौल घ्यावा तो ते समई घेतला नाहीं कृपाळू होऊन नवे लावण्याचा सिरस्ता प्रांत मजकुरीं आहे त्याप्रा कौल सादर कर-

---

१ 'होणार' हा शब्द ओळीवर तत्कालींच लिहिलेला.

णार साहेब धनी आहेत त्यावरून मनास आणिता मेढा सन इसने सितैनात घातला ते समई माड वगैरा लावणें केलें त्यावरून सन इसने पासून रुसवणी सालें ३ तीन आगराचे सिरस्तेप्रा वजा देऊन उगवणीस इा सन खमस सितैन ता सन समानीन साले १६ सोळा होऊन सतरावें साल सन इहिदे समानीन ते सालीं वाडीची पाहाणी होऊन नवे लावणें याचे सिरस्तेप्रा कौल साल दरसाल येणेप्रा करार सरकारातून घ्यावयाचा सिरस्ता यावत् जमीन तावत्काल

माड पेढ बारदार ज्या माडावर नारल १० दाहा आले असतील तो बारदार धरून बारदार पेढास देखील बाबती रुपये ।॰ येकून च्यार आणे प्रा उगवणी होत जाईल करार कलम १

पानवेली वाडीत केलीयास दरसदे खाा बाबती रुा ।॥॰ येकून निम रुपया करार कलम १

खाा जिनस काथा झाप वगैरा बिलकुल अजी माफ करार कलम १

वाडीपैकी माड भंडारीयास दिल्हे तरी दरमाडास रुा ।॥॰ निम रुपया सरकारांत उगवणी होत जाईल कलम १

झाप बारदार पेढास मात्र दर २ दोन प्रा सुटे घ्यावे त्याबाा (?) वर्तांला अजी माफ करार कलम १

वाडीत हरयेक मेवे जात जिनस केलीयास सरकारातून उपश्वर्ग लागणार नाही वाडीकरानी श्वसंतोसे सरकारात आणि त्यानंतर आणावा करार कलम १

वाडीपैकी हर जिनस नारल पानें वगैरा विकावयास मार्गी जातां व बाजारांत जकात वानगी माफ करार कलम १

पानवेली वाडींत केलियास रतीबा व इनाहज फर्मास माफ करार कलम १

सुपारी बारदार पेढास देखील बाबती रु ८= येकूण दोन आणे प्रा उगवणी होत जाईल करार कलम १

झाडदस्त बारदार होईल त्यास देखील बाबती रुपये ।॰॥। येकून पावणें पाच आणे करार केले असेत सदरहु प्रा उगवणी होत जाईल करार कलम १

माडाखालीं दरयेक जिणजित्रब उसतागऱ्ही केल्यास देणे पडणार नाही माडा खाा भाट जमिनीवर केलियास देणें सुटणार नाहीं करार कलम १

वाडीचे मामुरीस परमुलकी माली अगर चाकर ठेविल्यास करार

१ चाकर मुाा पंरके ठेविल्यास जे सालीं टिपेस लागेल त्यासाला-पासून घर देणें व तबाखु ! साले ६ सा सासालें अजीपाल पेस्तैर हर(दु) निमेप्रा दरसाल उगवणीं होईल

१ माली ठेविल्यास जे सालीं घर टिपेस लागेल त्या सालापासून ३ तीन साले घर देणें नखु (?) अजीपाल उप रांत चौथे सालापासून सिरस्तेप्रा व वेठ इस्त्रावा पुरे तो अजी माफ उपपरांत गांवीं वेढी दरमहा २ प्रां करीत जाव्या

२ येणे प्रा करार कलम १

येकूण बारा कलमे करार करून कौल सादर केला असे सदरहु प्रा उगवणी करून वाडीची मामुरी सुखरूप करणें अभय असे (नि. अ.) जाणिजे (नि. अ.) छ २३ माहे जमादिलौवल[1] (मोर्तबसुद)

ले. ८२ | श्री | शके १६९५ श्रावण वद्य ११ इ. स. १७७३ आगस्ट १४

राजश्री कृष्णाजी माणकाजी अदकारी यास सुाा आर्बा सबैन मया व अलफ खासा स्वारी रविवारी मुकाम पोईनाड सोमवारी मुकाम नागोठाणेयास होईल तर तुम्हीं निघोन नागोंठणेयास येणे रा छ २४ जौवल मोर्तब सुद

ले. ८३ | श्री | शके १६९७ वैशाख इ. स. १७७५ मे २२ नंतर

राजश्री विठोजी अधिकारी प्रो चेऊल गोसावी यांसि

र्द अखडित लक्षुमी आलंकृत राजमान्य (मो. जा.) श्रो मोरो भिकाजी रामराम विनंती उपरि येथील कुशल (जाणू)न् स्लकीये कुशल लेखन करीत असीले पाहिजे विशेष आपण पत्र पाठविले ते पावले राजश्री कृष्णाजी अदीकारी यास देव आज्ञा जाली हे यैकोन चितास बहुत श्रम जाले बर असो मृत्यु लोकीची वस्तीं तेथे उपाये नाही आपण वडील आहेत सर्वाचा परामर्ष करीत जावे आम्हीं आपले आहो ममतेस अंतर न करीत जावे कलकीचे कोंबाचे आटगे थोडे लोणच्याकरिता पाठविले आहे मागाहून दुसरेही रवाना करून बहुत काये लिहिणे कृपा करीत जावे हे विनंती

बो राजश्री दादजी अदीकारी यासि राम राम विनंती उपरि सदैव पत्री संतोषवीत जावे राजश्री विठाजी बावास लिाा आहे त्याजवरून कलो येईल थोडकेसे कोब पाठविले आहेत राजश्री आपाजी भगत यांस पत्र लिाा आहे त्यास तुम्ही त्याचे घरी जाऊन त्यास रवाना करावे बहुत काये लिहिणे हे विनती

राम राम विनंती[2]

---

१. कागदास ३ जोड. जोडांवर मोर्तब सुद. (केशवलाल मोदी यांचेकडील कागद).

२ हीं अक्षरें वाजूस, निराळ्या हस्ताक्षरांत व शाईत.

ले. ८४ | | शके १६९८ आश्विन
| | इ. स. १७७६ ऑक्टोबर

[पहिला कागद नष्ट. कागद २ रा.]

मनास आणितां येसाची बाप याच्या इतल्यात चिरंजीव नाहीत व मागील देणे म्हणोन येसाजी बाबाचे बोलणे याबकरिता मारनिल्हेचे देण्यास अैवज लाऊन द्यावयाची आज्ञा जाहाली पाहिजे १

पाद्री फेल पाद्र खैरात माजरदेव यास त्याचे देणे रुपये ३२५ पाद्री मार याजकडेस मौज कोरला गाव खोती होता ते समईची बाकी त्यास पाद्री याचे येथे कोण्ही नाही खैरात देवीस येवि(सी)...आज्ञा-

कलम १

सावकारी देणेयापौ जिनस व गला कोठीकडेस आनामत होता त्याचा फडशा करून देविला बाकी येणे रु

८९५ सन सबा सबैनात तोतयाचे वेळ्यासमई घेतले त्याजपौ हाली देणे आहे आना--? पोत्यास पुतलाजी रेडा खत्री याजबाबद आहेत ते सन सीत सबैन पो चोरी बा

४०५ सन इहिदे समानीन विा बाबूराव हरि दातार

१३००

(स) दरहूचा मजकूर

३७५ सन इहिदे विा दातार पौ मारनिल्हेकडेस नवाद जकाती-बाबद बाकी येणे ९२५ त्यास

३५० त्रिंबक वासुदेव याजपासून वेढा उठल्यावर घेतले त्यास चौकसी करिता कोलटकर याचा काही समंध लागतो परंतु कर्ज बमा आहे

२२५ लाखी रंगाबाबद.

२२०० जयरामपंत सोमण याजकडेस सन इसने जकाती पो बाकी येणे रुपये २२०० पो त्याचा तपसील—

१२०० कारकुनी बा देणे कृष्णाजी नारायेण फडणीस बा पत्र स्वामीचे

३७५ कारकुनी बा मामलेदार याही घेतले गुा बाबूराव दादाजी

६२५ येन बाकी त्यास तोख्याबा फडशा होणे असे

२२००

सदरहूप्रो सोमण याचे कारकून हिशेब दाखवितात सोमण पुण्यास आहेत तेथे फडशा व्हावा कलम

३२०३ जामदारखान्यांत यैवज आहे

१ पैदास्ती डंगीबाबद वगैरे कापड आजमासे रुा १२००

१ हातेरे पौ आजमासे २००

१ हास्तीदंत पौ २०० आजमासे

१ तोतयाचे वेळ्यासमई बक्षिसा-बाबद कडी राहिली त्याचे कारण समजण्यात येत नाहीत

मारनिल्हेचे कारभारी बाबाजी त्रिंबक याचे बोलणे पुण्यास दातार यास लेहून तोट्याबाबद बाकीचा व कर्ज येणे त्याचा फडशा करू म्हणोन बोलतात येविसीची आज्ञा

२०० लखुसेट गुजर मयेत पुतण्या गणेश सेट हजीर नाही

७२५ खत्री याचे देणे व येण्याचे लढे

१०० पुतलाजी रेडा

७० वेढ्या समई

३० आनाती १ बाबत

१००

१२५ गणपत तुकाजी वेढ्या समई

५०० त्रिंबक वासुदेव

१५० वेढया समई

३५० वेडा उठून गेल्यावर घेतले

५००

७२५

सदरहु आसामी कडेस लढे

१४२८ सोन्याची ४

वजन ८८३॥

दर १७ प्रा

१७५ रुप्याची ७

वजन ८८७

दर १ आदमासे १७५

१६०३

सदरहु अैवज सिबदीचे देण्यास द्यावा किंवा नाही येविसीची आज्ञा

तालुके मजकुरी आलियावर मनास आणिता सदरहु अन्वये लढ्याची कलमे वगैरे मजकुराची कलमे लिहिली आहेत कागदपत्र मोसन्यास पुण्यास येथे आडचण पडते सारांष राजश्री कृष्णाजी बावा फडणीस येथे आलियाविना सिबंदी वगैर कोण्हाची समजूत व्हावयाची नाही आज्ञापत्र येईल त्याप्रो फडशांत आणितो

(दुसरा कागद पूर्ण. पुढील कागद नष्ट*)

ले. ८५ नकल } श्री { शके १६९८ पौष शु॥ १३ इ. स. १७७७ जाने. २१

राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी ता झिराड सुभा प्रा चेऊल गो यांसि

र्द अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये श्रो माधवराव नारायेण प्रधान आशीर्वाद व नमस्कार सुा सबा सबैन मयां व अलफ शके १६९८ दुर्मुखी नाम संवत्सरे राजश्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल याणी निवेदन केले की श्री (मो. जा.) देव कनकेश्वर पर्वतवासी वा नजीक मापगाव ता मार याचे पूजा नैव्यद्य नंदादीप व अन्नछत्र व नगारखाना व इमारतीचे खर्चास मौजे

सोगांव ता मजकूर येथील निमे अमल आम्हीं आपले तर्फेचा हालीं नूतन इनाम दिल्हा आहे व निमे अमल सरकारांत आहे तो आपण श्रीकडे सदरहु खर्चास नूतन इनाम करार करून देऊन दरोबस्त गांवची भोगवटीयास पत्रें करून दिल्हीं पाहिजेत म्हणोन त्याजवरून मनांस आणितां श्रीदेव याचे पूजा नैव्यद्य नंदादीप व अन्नछत्र व नगारखाना व इमारतींचे खर्चास मौजे मजकूर येथील निमे अमल सरखेल यांणीं आपले तर्फेन नूतन इनाम दिल्हा आहे व निमे अमल सरकारचा आहे त्यास श्री देव महा जागृत स्थांन याची पूजा नैव्यद्य नदादीप वगैर चालविल्या राज्यास श्रेयस्कर हे जाणोन सरकार-तर्फेचा निमे अमल सरकारांतून नूतन इनाम दिल्हा येकूण मौजे मार दुतर्फा कुलबाब कुलकानु हालीपटी व पेस्तरपटी जलतरुतृणकाष्टपाषाण निधि-निपेक्षसहित खेरीज हकदार व इनामदार करून दरोबस्त श्रीकडे इनाम करार करून देऊन हें पत्र तुम्हांस सादर केले असे तरी मौजे मार आंगरे सरखेल याचे तर्फेनें श्रीचे सदरहु खर्चाच्या बंदोबस्तास येईल त्याचे दुमाला करून देऊंन श्रीकडे इनाम चालवणे प्रतिवर्षीं नवीन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊंन हे असल पत्र त्याजवल भोगवटीयास परतोन देणे जाणिजे छ ११ जिल्हेज आज्ञाप्रमाणं

ले. ८६ }
नकल }

श्री

{ शके १६९८ फाल्गुन वा १४
{ इ. स. १७७७ एप्रिल ६

राजश्री बाबूराव कृष्ण कोलटकर गोसावी यांसि

दं अखडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य (मो.जा.) श्री राघोजी आगरे वजारतमाब सरखेल रामराम उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे विशष मौजे सोगाव ता झिराड प्रांत चेऊल हा गाव निमे राजश्री (मो.जा.) पंत प्रधान याजकडोन व निमे सरकार तर्फेने येकूण दुतर्फा दरो-बस्त इनाम तुम्हाकडे होता तो हाली साल मारापासून दूर करून श्री(मो.जा.) पर्वत वासी सनिध मौजे मापगाव ता मार याच्या पूजा नैव्यद्ये नंदादीप व चौघडा वगैरे खर्चाबद्दल नूतन इनाम करार करून दिल्हा असे तरी मौजे मजकूरची देखरेख तुम्ही न करावी आकार प्रमाणे श्री (मो. जा.) कडे खर्च पडत जाईल जाणिजे छ २७ माहे सफर बहुत काये लिहिणे

(कागदावर मार्गे*) असल बमोजीब नकल हस्ताक्षरे जिवाजी करेराऊत पाटेल मौ मापगांव ता झिराड कारकून दिा राजश्री गोविंदसेट रेवादास असल पत्र सेट मशारनिलेकडे असे सुा समानीन मया व अलफ नकल.

व्यक्ति-स्थल सूचि

[दिलेले आंकडे लेखांचे आहेत]

मंडळ वृत्त

नवीन सभासद यादी आश्वीन ते पौष अखेर शक १८६९

स. क्र.	सभासद नांव	गांव	वर्ग
२४२५	श्री. विनायक विठ्ठल रानडे B.A.	पुणें २	आजीव ४
२४२६	श्री. प्रभाकर दामोदर घोसपुरकर	,,	वार्षिक ४
२४२७	श्री. शंकर गंगाधर कुलकर्णी	,,	आजीव ४
२४२८	श्री. वि. ना. थत्ते, B. Sc. B. T.	जालना	,, ४
२४२९	श्री. मधुसुदन नरहर देशपांडे	पुणें २	,, २
२४३०	श्री. बाबुराव शंभुराव खराडे	,,	वार्षिक ४

पाक्षिक सभा

शक १८६९ पौष अखेर ९ सभा झाल्या. पैकीं पहिल्या ३ सभांतील निबंधांची यादी मागील अंकांत आलीच आहे. त्या पुढील यादी येथें दिली आहे.

पा.स.	निबंधलेखक	निबंध
४	श्री. शं. ना. जोशी	१६ असलेकर जोशी घराण्यांतील दोन कागद
,,	श्री. चिं. ग. कर्वे	१७ राजाज्ञा पंताजी शिवदेव व सखाराम बापू यांचीं पत्रें
,,	श्री. ग. ह. खरे	१८ हिंगणे दफ्तरांतील पांच नवीं पत्रें
५	श्री. र. कृ. पाटणकर	१९ शिल्पशास्त्रम्
		२० स्वात्मावबोध
		२१ गीतारत्न
		२२ पदपद्धति
,,	श्री. कृ. वा. पुरंदरे	२३ पेशवाईतील सिंहगडचे मामलेदार
,,	श्री. शं. ना. जोशी	२४ जानोजी भोसले यांस परशराम नाईक अनगळ यांचें कर्ज
,,	श्री. चिं. ग. कर्वे	२५ पाटिलकीचें मानपान

पा.स.	निबंधलेखक	निबंध
६	श्री. चिं. ग. कर्वे	२६ एकबोटे घराणें (श्री. रा. आ. एकबोटे निबंध)
,,	श्री. य. रा. गुप्ते	जावळीकर मोरे
,,	श्री. वा. सि. बेंद्रे	२७ दुर्गलक्षण–आकाश भैरव कल्प
७	श्री. चिं. ग. कर्वे	२८ सदाशिवराव भाऊंचें एक पत्र
		२९ दरवेशांचा हक्क
,,	श्री. शं. ना. जोशी	३० कन्हेरीचे पाटील सैयद चांद
,,	श्री. य. रा. गुप्ते	३१ रघुनाथराव पेशव्यांचा तांडव गणपती
,,	श्री. ग. ह. खरे	३२ मोरोपंताचें एक पत्र
८	श्री. चिं. ग. कर्वे	३३ राघोबाच्या मोहिमेंतील एक पत्र
,,	,,	३४ खडर्याच्या मोहिमेंतील पत्र
,,	श्री. शं. ना. जोशी	३५ दाभोळकर संग्रहांतील पत्रें
,,	,, कृ. वा. पुरंदरे	३६ भाऊचें नानास व नानाचें आपास पत्र
,,	,, वा. सि. बेंद्रे	३७ जहांगीर पातशहाचा एक परवाना
९	,, य. रा. गुप्ते	३८ लंडन येथील आर्ट गॅलरींतील हिंदुस्थानांतील प्राचीन पुतळे व कुराणाचें हस्तलिखित
,,	,, शं. ना. जोशी	३९ संस्थान जंजिरे कुलाबा येथील दिवाणगिरी संबंधी यादी
,,	,, ग. रा. वाळिंबे	४० जंजिरा–पत्र-व्यवहार
,,	,, ग. ह. खरे	४१ वैद्य दप्तरांतील संवत् व सुहुर ह्या संबंधीं खुलासा

पुणें नगर संशोधन पाक्षिक सभा

शक १८६९ भाद्रपद ते पौष अखेर झालेल्या सभांतील वाचलेले लेख येणेप्रमाणें:—

पा.स.	लेखक	लेख
३	श्री. चिं. ग. कर्वे	८ यवत येथील ब्रह्मेंद्रस्वामींची विहीर
,,	,,	९ सुमेरसिंग, महमद युसफ यांचे वाडे

पा.स.	लेखक	लेख
४	श्री. शं. ना. जोशी	१० पुणे–राजर्षी यांचा वाडा
,,	श्री. चिं. ग. कर्वे	११ संकीर्ण—झांबरे घर वतनाची जप्ती, मांजरीचा फत्ते बुरुज, आळंदी येथील गावडे वाडा

———

मंडळ ग्रंथालय

(कार्तिक—पौष)

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणारे सद्गृहस्थ
Govt. of Bombay	Village Hand-book	
	,, -Ahmadabad Dist.	खरेदी
	,, -Ahmednagar ,,	
	,, -Belgaun ,,	
	,, -Bijapur ,,	
	,, -Broach ,,	
	,, -Dharwar ,,	
	,, -Khandesh East ,,	
	,, -Khandesh West. ,,	
	,, -Kanara Dist. ,,	
	,, -Nasik ,,	
	,, -Panch Mahal Dist ,,	
	,, -Poona Dist. ,,	
	,, -Satara ,,	
	,, -Sholapur ,,	
	,, -Surat ,,	
	,, -Thana ,,	
आठल्ये, वि. वा.	–कऱ्हाडे ब्राह्मणांचा इतिहास	देणगी
सरदेसाई, गो. स.	–मावळंकर, सरदेसाई घराण्याचा इतिहास उत्तरार्ध खंड दुसरा	खरेदी
पुरंदरे, ब. मो.	–जाळत्या ठिणग्या (दोन प्रती)	ग्रंथकार
टाकी, रामचंद्र	–श्रीकृष्णाचे सद्गुरु-श्रीदुर्वास	शं. वा. जोशी
गद्रे, ए. एस्.	–Archaeology in Baroda. 1934-1947	देणगी गद्रे
करंदीकर, ज.स.हिव.	–कौटिलीय अर्थशास्त्र	
रगांवकर, ब. रा.		खुपेरकर
सौ. मनोरमा मोडक	–The Land and people of India.	सौ. मोडक ग्रंथकार

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणारे सद्गृहस्थ
़, वि. सि.	–हिंदुस्थानचा अभिनव इतिहास	ग्रंथकार
well, H. H.	–Cambridge History of India. Vol. 4. British India. 1497-1858	खरेदी
़, ग. बा.	–नित्सुरे कुल–वृत्तान्त	ग्रंथकार
डे, वि. का.	–मराठ्यांच्या इतिहासाची साधनें खंड ३ रा	देणगी मावळंकर, ना. अ.
त आपटे स्मारक , पुणे	–दत्तोपंत आपटे स्मारक ग्रंथ इतिहास : शास्त्र व तत्त्वज्ञान	देणगी
, व. म.	–वसईचा किल्ला आणि निर्मळ देवस्थान	ग्रंथकार
महा. प. पुणे	–संयुक्त महाराष्ट्राचा नकाशा	खरेदी
aeological ey Office	–Plan of Shanwar Wada. Poona	देणगी
़र, ना. गो.	–चाफेकर	देणगी
़ई, गो. स.	–Shivaji period in Maratha history 1644-1707	ब. द. आपटे
शास्त्री डेकर	साग्निचित्सार्वपृष्ठासोर्यामयागयोजना	
Prick Van	Engelsch Handwoordenboek	ब. द. आपटे
	Decisions from Shahu and Peshwa Daftar	”
	‘ जगदीश ’ मासिक नोव्हेंबर १९४७	देणगी
स्वामी	चैतन्य–विजय	शं. वा. जोशी देणगी
	Restoration of International Oct. 1947. No. 439 Trade	राजर्षी, मा. वि. देणगी
ई, शेजवलकर वाकसकर	मराठ्यांच्या इतिहासाचें साहित्य (सहविचार त्रैमासिकांत प्रसिद्ध झालेली सूची)	गोडे, पी. के. देणगी
़, वि. का.	मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२	प्रा. मावळंणकर, ना. अ. (सांगली) ”

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणारे सद्गृहस्थ
राजवाडे, वि. का.	मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २०	प्रा. मावळणकर, ना. अ. (सांगली)
आपटे, द. वि.	चंद्रचूड दप्तर, कला पहिली	,,
सरदेसाई गो. स.	भा. इ. सं. म. पुणे त्रैमासिक, ग्रंथ आणि इतिहास आणि ऐतिहासिक, धुळे यांत प्रसिद्ध झालेल्या विषयांची सूची.	,,
	भारतवर्ष. प्रथम गुच्छ.	,,
(ग्रंथमाला)	मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें भाग ३ मधील चुकांची दुरुस्ती	
राजवाडे, वि. का.	मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १०	,,
वाड, ग. चि.	थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी भाग २ रा	,,
वाड, ग. चि.	दक्षिणेतील मराठ्यांच्या कैफियती, यादी वगैरे	,,
वासुदेवशास्त्री खरे (संपादक)	–ऐतिहासिक लेख संग्रह. भाग ३	,,
मोडक, बा. प्र.	शक, सन यांची तिथी व तारीखवार जंत्री	,,
साने, का. ना.	काव्येतिहास संग्रह. पत्रे, यादी वगैरे	,,
Vithalbhai K. Jhavari.	Freedom's Battle.	Presented by Dhirajlal Bhulabhai Desai.
Shrinivasa Varada chari and Co. Madras.	Educational Review Vol. XLII. Nos 3,4,6 and 7 Vol. XLIII. Nos. 6-12	देणगी आपटे, ब. द.

मंडळ भेट

प्रदर्शन—प्रो. श्री. नीळकंठशास्त्री--मद्रास, श्री. डी. एस्. जोशी, आय. ी. एस्.–पुणें, ल. ह. जोशी–मांडवणें, चं. द. जोशी–विजापूर, श्री. द. रा. द्य इंजीनि. विजगापट्टम्, डॉ. कोवाडकर–बेळगांव, श्री. पोपटलाल एम्. ल्. ए–पुणें, श्री. दिवाण, श्री. काळे–येवलें, ऐनतपूर, श्री. रा. गं आयरे- र– नागपूर. इत्यादि मंडळी प्रदर्शन पाहून गेली.

—ट्रे. कॉ. प्रॅ स्कूल–पुणें, ह. दे. हा०–सोलापूर; ट्रे. कॉ. फॉर वुइमेन–पुणें, हिंगणे–अध्यापिका शाळा; मिशन ट्रे. कॉ. पुणें, इं. से. पथक–स. प. कॉ. पुणें, न. स. विद्यालय–तळेगांव दाभाडे, सेंट थॉमस स्कूल–वसई, ह्या शिक्षण संस्थांतील विद्यार्थी मंडळींना श्री. शं. ना. जोशी व श्री. ग. ह. खरे ह्यांनीं मंडळांतील वस्तु दाखवून माहिती सांगितली.

प्रचार— श्री. शं. ना. जोशी हे धुळें, वरोडा, शिवपूर–(अलीपूर), पांढुर्णे, शिक्रापूर ह्या ठिकाणीं दसरा सण इत्यादि प्रसंगानें गेले असतां तेथें इतिहासविषयावर व्याख्यानें झालीं व मंडळाची माहिती दिली गेली.

दत्तोपंत आपटे स्मृतिदिन समारंभ

यंदांचा चौथा समारंभ होय. दि. ९।११।४७ ह्या प्रसंगी 'इतिहासशास्त्र व तत्त्वज्ञान' हा आपटे स्मारक ग्रंथ चित्रशाळेमार्फत प्रसिद्ध झाला; आणि 'कुळकर्णी वतन' ह्या विषयावरील निबंध श्री. शं. ना जोशी यांनीं वाचला. समारंभाचे अध्यक्ष श्रीमंत राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे होते. ह्या प्रसंगीं म. म. प्रो. पोतदार, श्री. त्र्यं. शं. देवगिरीकर, प्रो. ओतुरकर त्यांचीं भाषणें झालीं. श्रीमंत राजे फलटणकर नाईकसाहेब ह्यांनीं निबंधास रु. सवाशें बक्षिस दिले.

श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर स्मृतिदिन

कै. श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर ह्यांचा चतुर्थ स्मृतिदिन रा. ब. गो. म. वैद्य ह्यांच्या अध्यक्षतेखालीं दि. ५।११।४७ रोजीं स्मारक समितीतर्फे साजरा झाला. ह्या वेळीं स्मा. समितीनें श्रीमंतांचें तैलचित्र (चित्रकार जोशी इचलकरंजी) भा. इ. सं. मं. स दिलें व हिंगणे दफ्तर २ रा खण्ड (श्री. ग. ह. खरे) हा ग्रंथ प्रकाशित केला. ह्या प्रसंगीं, प्रि. ज. रा. घारपुरे, प्रो. म. म. पोतदार, श्री. श्री. गो. काळे इंदूर, श्री. खरे, चित्रकार जोशी, श्री. कर्वे, ह्यांचीं भाषणें झालीं.

इतिहासाचार्य राजवाडे स्मृतिदिन

कै. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे ह्यांचा स्मृतिदिन म. म. प्रो. द. वा. पोतदार ह्यांचें अध्यक्षतेखालीं दि. २।१२।४७ साजरा झाला. ह्या प्रसंगीं प्रो. श्री. म. माटे ह्यांचें 'भव्य घटनांचा सूक्ष्म आरंभ' ह्या विषयावर सुश्राव्य भाषण झालें.

I had a very great pleasure of being shown round the Bharata Itihasa Somshodhaka Mandala this morning by Prof. D. V. Potdar. The Mandala has an invaluable collection of paintings, manuscripts etc. which deserve much wider publicity than they have yet acheived. The society is doing very good work and deserves much larger financial assisistance than it seems to be getting both from government and the public. It is to be hoped that with the establishment of the Maharastra University it will begin to play a decisive part in the promotion of research into Maratha History. Prof. Potdar and the small band of workers he has gathered around himself deserves hearty congratulations for their splendid work.

20-9-47.

S. K. Nilakanthan
Retired Professor Madras University

My wife and I were kindly shown round the Mandala by Mahamahopadhyaya D. V. Potdar, Sardar G. N. Mujumdar, Mr. C. G. Karve & Prof. Oturkar.

I need hardly add any words of praise for the excellent collection of books, manuscripts and paintings in the Mandala. The Mandala has also published a number of books and papers. The commendable work by a small band of workers has now however to be followed up by the sytematic preparation of catalogues and indices so that the material collected is readily made available to scholars and research workers. I wish the Mandala all success.

21st Sept. 1947

D. S. Joshi, I. C. S.,
Secretariat, Bombay Province

During my last visit to Poona on the 28th July 1947, I had an occasion to visit the Bharata Itihasa Samshodhaka Mandala, which has been established by some well known patriotic gentlemen of Maharashtra to carry on research work in Indian history and especially in the history of

Maharashtra. In persuance of the above aim they have published a series of monographs on the sources of the history of the Mediaval Deccan and the original manuscript material on the Maratha period of Indian history. They have also published other works of literary or cultural interest such as Subanta-vichara by Prof. V. K. Rajwade and Grantharaja of Dasopanta (to name only two such) all of which are of great importance from various points of view and illustrate the catholicity of outlook, which the scholars associated with this institution bring to bear upon their work.

The art gallary of the Mandala contains some very interesting miniature paintings of the Mughal aud Maratha periods, which bring before our eyes the great figures who have left a stamp on the periods during which they moved and had their being. This collection has its unique importance not only for those who are engaged in elucidating the problems of Maharashtra history but also to the general public from the point of view of our national history.

The Mandala has also collected, besides manuscripts of political importance, a large number of Sanskrit manuscripts which has its own unique value. I was however pained to find that the arrangements for keeping them were not satisfactory. The officer incharge told me that the Mandala was very much pinched for space and unless the present building is extended there is no prospect of improving the arrangement. Altogether the Mandala is an institution of great cultural importance and deserves all the help the Goverment and the public are able to extend to it.

24—9—1947

M. D. Shastri, M. A., Ph.D.
Principal, Goverment Sanskrit College,
Benares.

I was really delighted to be shown round the institution. There is a wealth of knowledge in the old paintings and books and is a great store room of learning for the student of history. The curator as well as other members of the

institurion have taken great pains in collecting and sorting all the old paintings and manuscripts and really need all help and encouragement for the notable work they have devoted themselves to, increasing the historical and cultural wealth of the country.

24-10-1947. Nandlal Mukundlal Pitti
Mangaldas Road, Poona.

On the 3rd of November 1947, I had the opportunity and pleasure of paying, though a hurried, visit to the Bharata Itihasa Samshodhaka Mandala. I was deeply impressed with what I saw, particularly the zeal of those in charge, who told me that although much has been done, there is much more yet to do.

Every free country to be really great, must enable its people to study their past glory and traditions particularly the history and cultures of different epochs of their land; for a healthy respect for yesterday is the wisest guide for today and the best insurance for tomorrow. I feel that it is institutions like the Bharata Itihasa Samshodhaka Mandala that admirably serve this purpose, provided they have sufficient financial backing, which is only possible if the goverment extends its unstinted support. Now that India has secured her freedom and national goverment established, I have no doubt that this institution will receive real patronage and support in the national service it is rendering.

I wish the Mandala every success and greater prosperity.

4—11—1947. **V. R. Ghorpade**
Raja of Sandur,

आपटे स्मारक मडळ—सदर स्मारक निधीस श्री. ग. गो. पाध्ये बी. ए. बी. ई. एस्. पुणें यांजकडून रु. २५ आले.

महात्मा गांधी यांचे बद्दल कारभारी मंडळानें केलेला दुखवटा ठराव

ता. २१-२-४८

" दिनांक ३० जानेवारी १९४८ रोजीं महात्मा गांधी यांजवर एका माथेफिरूनें गोळी झाडून त्यांचा वध केला. या अमानुष कृत्याचा भारत इतिहास संशोधक मंडळाच्या कारभारी मंडळाची ही सभा तीव्र निषेध व्यक्त करीत आहे. महात्मा गांधी हे जगाच्या आदराला पात्र झालेले परम थोर देशभक्त आणि अखिल मानव जातीच्या कल्याणार्थ अहोरात्र दीर्घ प्रयत्न करणारे अद्वितीय विभूति होते. त्यांनीं भारताला जगांत अत्यंत उच्च पदवीला नेऊन पोंचविलें. अशा महापुरुषाचा अंत ही महान राष्ट्रीय आपत्ति होय असे या सभेला वाटते. तथापि त्यांनीं जन्मभर जो आशावाद प्रगट केला आणि सत्यानें चालण्याची जी स्फुर्ति दिली त्याचें स्मरण ठेऊन पुढें न डगमगतां व खचून न जातां पुढें चालणें हेंच आपलें सर्वांचें कर्तव्य आहे. गांधीजींच्या अमानुष वधानंतर जे अत्यंत क्षोभजनक लुटालुटीचे व जाळपोळीचे प्रकार झाले ते सर्वथा निषेधार्ह असून सर्वस्वी हानीकारक आहेत. जनतेनें आणि सरकारनें धैर्यानें आणि एकजुटीनें या अनिष्ट प्रकारांस सत्वर आळा घातला पाहिजे असें सभेचें मत आहे. "

कै. न. चिं. केळकर यांचे बद्दल कारभारी मंडळानें पास केलेला दुखवटा ठराव

ता. १०-१२-१९४७

" भारत इतिहास सं. मंडळाचें प्रमुख विश्वस्त आणि माजी अध्यक्ष साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या निधनानें मंडळाची सर्वांत मोठी हानी झाली आहे. कै. तात्यासाहेब मंडळाच्या स्थापनेपासून मंडळाच्या सर्व कार्यांत सर्व प्रकारें आपलेपणानें लक्ष घालीत असत. मंडळाची जागा आणि इमारत मिळवून देण्याच्या कामीं तर त्यांचे कितीतरी सहकार्य लाभले. मंडळाच्या--संशोधन-प्रकाशन कार्यांनाहीं त्यांचा मोठा हातभार असे; इतिहास हा त्यांचा अत्यंत आवडीचा विषय असून त्यांनीं त्यावर बरेच लेखन वाचन केले होतें. मराठ्यांच्या राजवटीचा त्यांना फार अभिमान असें. मंडळांतील संशोधन कार्यकर्त्यांना लागेल ते सहाय्य देण्यास ते नेहमी तत्पर असत. त्यांच्या निधनानें मंडळाचा एक मोठा आधारस्तंभ नाहींसा झाला यांत संशय नाहीं. या झालेल्या मोठ्या हानीबद्दल मंडळास अतिशय हळहळ वाटत आहे. "

भारत इतिहास संशोधक मंडळ

शक १८७० तील कार्यक्रमाची दिनदर्शिका

खालीं शक १८७० मधील पाक्षिक सभा, पुणें नगर पाक्षिक सभा, संमेलन, वाद–दिवस आणि इतर सभा यांचें महिनेवारी पत्रक तयार करून दिलें आहे. प्रतिमासीं कारभारी मंडळाची सभा भरत असते. या कारभारी सभांची नोंद येथें केली आहे. शिवाय सुट्यांचे दिवसही नोंदले आहेत. दर आठवड्यास मंडळ शुक्रवारी बंद असतें. हे शुक्रवार खालीं नोंदले नाहींत. पाक्षिक सभा, नगर पाक्षिक, सभा, व कारभारी सभा यांचा नियतवार हा बुधवारच असल्यामुळें वाराचें नांव उध्दृत केलें नाही.

पाक्षिक सभांची वेळ सायंकाळीं ६ ते ७॥ किंवा ६॥ ते ८ अशी दिवसमाना प्रमाणें असते. पाक्षिक सभांची सूचना स्थानिक वृत्तपत्रांकडे दिली जाते. सभासदांस प्रत्येक पाक्षिक सभेची स्वतंत्र सूचना दिली जात नाही. म्हणूनच हा तक्ता प्रसिद्ध केला आहे.

कारभारी सभांची वेळ सायंकाळीं ७ ची केलेली आहे. पाक्षिक सभा, संमेलन व वाददिवस इत्यादि सभारंभांतील संशोधकीय कार्यक्रमास सभासदांनीं इष्टमित्रास अवश्य घेऊन यावें.

चैत्र १ शक १८७०

चिं. ग. कर्वे
रा. वि. ओतुरकर
मो. गं. दीक्षित
चिटणीस भा. इ. सं. मंडळ पुणें

शक १८७० ची दिनदर्शिका

दिनांक ११ मार्च १९४८ ते २९ मार्च १९४९

चैत्र १८७०

(दि. ११ मार्च ४८ ते ९ एप्रिल ४८)

मिति	दिनांक	महिना	वार	सभा व सुट्टी	क्रमांक
शु. १	११	मार्च	गुरु	वर्षप्रतिपदा	१
,, ६	१७	,,	बुध	नगरपाक्षिक	१
,, १४	२४	,,	,,	मंडळपाक्षिक	१
,, १५	२५	,,	गुरु	मोरोपंत पुण्यतिथी	

मिति		दिनांक	महिना	वार	सभा व सुट्टी	क्रमांक
व.	७	३१	,,	बुध	नगर पाक्षिक	२
,,	१३	७	एप्रील	,,	कारभारी मंडळ	१

अधिक वैशाख १८७०

(१० एप्रिल ते ९ मे ४८)

मिति		दिनांक	महिना	वार	सभा व सुट्टी	क्रमांक
शु.	५	१४	एप्रील	बुध	मंडळ पाक्षिक	२
,,	१३	२१	,,	,,	नगर ,,	३
वद्य	५	२८	,,	,,	मंडळ पाक्षिक	३
,,	१२	५	मे	,,	कारभारी मंडळ	२

वैशाख १८७०

(ता. १० मे ४८ ते ७ जून ४८)

मिति		दिनांक	महिना	वार	सभा व सुट्टी	क्रमांक
शु.	३	११	मे	मंगळ	अक्षयतृतीया	२
,,	४	१२	,,	बुध	नगरपाक्षिक	४
,,	११	१९	,,	,,	मंडळ पाक्षिक	४
व.	३	२६	,,	,,	नगर पाक्षिक	५
,,	६	२९	,,	शनि	मंडळ संमेलन ३५ वें.	
,,	७	३०	,,	रवि		
,,	८	३१	,,	सोम		
,,	१०	२	जून	बुध	कारभारी मंडळ	३

ज्येष्ठ १८७०

(ता. ८ जून ते ६ जुलै ४८)

मिति		दिनांक	महिना	वार	सभा व सुट्टी	क्रमांक
शु.	२	९	जून	बुध	मंडळ पाक्षिक	५
,,	१०	१६	,,	,,	नगर पाक्षिक	६
व.	२	२३	,,	,,	मंडळ पाक्षिक	६
,,	८	३०	,,	,,	कारभारी मंडळ	४

आषाढ १८७०

(ता. ७ जुलै १९४८ ते ५ आगष्ट ४८)

मिति		दिनांक	महिना	वार	सभा व सुट्टी	क्रमांक
शु.	१	७	जुलै	बुध	वाढदिवस ३८ वा	
,,	२	८	,,	गुरु	वाढदिवस सुट्टी	३
,,	९	१४	,,	बुध	नगर पाक्षिक	७

मिति		दिनांक	महिना	वार	सभा व सुट्टी	क्रमांक
,,	११	१६	,,	शुक्र	आषाढी एकादशी	
,,	१५	२१	,,	बुध	मंडळ पाक्षिक	७
वद्य	७	२८	,,	,,	नगर पाक्षिक	८
,,	१४	४	आगष्ट	,,	कारभारी मंडळ	५

श्रावण १८७०

(ता. ६ आगष्ट ३ ते सप्टेंबर ४८)

मिति		दिनांक	महिना	वार	सभा व सुट्टी	क्रमांक
शु.	५	९	आगष्ट	सोम	नागपंचमी	४
,,	७	११	,,	बुध	मंडळ पाक्षिक	८
,,	१४	१८	,,	,,	नगर पाक्षिक	९
,,	१५	१९	,,	गुरु	नारळी पौर्णीमा	५
वद्य	५	२५	,,	बुध	मंडळ पाक्षिक	९
,,	८	२८	,,	शनि	कृष्ण जन्म	६
,,	१३	१	सप्टेंबर	बुध	कारभारी मंडळ	६

भाद्रपद १८७०

(ता. ४ सप्टेंबर ४८ ते २ आक्टोबर ४८)

मिति		दिनांक	महिना	वार	सभा व सुट्टी	क्रमांक
शु	४	६	सप्टेंबर	सोम	गणेशचतुर्थी	७
,,	६	८	,,	बुध	नगरपाक्षिक	१०
,,	१२	१५	,,	,,	मंडळ पाक्षिक	१०
,,	१४	१७	,,	शुक्र	अनंतचतुदर्शी	
वद्य	४	२२	,,	बुध	नगर पाक्षिक	११
,,	११	२९	,,	,,	कारभारीमंडळ	७

आश्वीन १८७०

(३ आक्टोंबर ते १ नोंहेबर १९४८)

मिति		दिनांक	महिना	वार	सभा व सुट्टी	क्रमांक
शु.	४	६	अक्टोबर	बुध	मंडळ पाक्षिक	११
,,	१०	१२	,,	मंगळ	दसरा	८
,,	१२	१३	,,	बुध	नगर पाक्षिक	१२
वद्य	२	२०	,,	बुध	मंडळ पाक्षिक	११
,,	८	२५	,,	सोम	कै. इचलकरंजीकर स्मृति	
,,	१०	२७	,,	,,	कारभारी मंडळ	८
,,	१४	३१	,,	रवि	नरक १४	९

मिति	दिनांक	महिना	वार	सभा व सुट्टी	क्रमांक
३०	१	नोव्हेंबर	सोम	लक्ष्मीपूजन	१०

कार्तिक १८७०

(२ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर ४८)

१	२	नोव्हेंबर	मंगळ	भाऊबीज	११
२	३	,,	बुध	नगर पाक्षिक	१३
९	१०	,,	बुध	मंडळ पाक्षिक	१२
११	१२	,,	शुक्र	कार्तिक ११	
१	१७	,,	बुध	नगर पाक्षिक	१४
८	२४	,,	,,	कारभारी मंडळ	९
११	२७	,,	शनि	कार्तिक ११	१२

मार्गशीर्ष १८७०

(१ डिसेंबर ४८ ते ३० डिसेंबर ४८)

१	१	डिसेंबर	बुध	मंडळपाक्षिक	१३
८	८	,,	,,	नगरपाक्षिक	१५
१४	१५	,,	,,	मंडळपाक्षिक	१४
७	२२	,,	,,	नगरपाक्षिक	१६
१२	२७	,,	सोम	राजवाडे स्मृति दिन	१३
१४	२९	,,	बुध	कारभारी मंडळ	१०

पौष १८७०

(३१ डिसेंबर ४८ ते २९ जाने. १९४९)

६	५	जानेवारी	बुध	मंडळ पाक्षिक	१६
१०	१०	,,	सोम	मकरसंक्रात	१४
१२	१२	,,	बुध	नगरपाक्षिक	१७
५	१९	,,	,,	मंडळ पाक्षिक	१७
१३	२६	,,	,,	कारभारी मंडळ	११

माघ १८७०

(३० जानेवारी ते २७ फेब्रुवारी १९४९)

४	२	फेब्रुवारी	बुध	नगर पाक्षिक	१८
११	९	,,	,,	मंडळ पाक्षिक	१८

मिति		दिनांक	महिना	वार	सभा	सुट्टी क्रमांक
व.	४	१६	,,	,,	नगर पाक्षिक	१९
,,	९	२१	,,	सोम	रामदास ९	१५
,,	११	२३	,,	बुध	कारभारी मंडळ	१२
,,	१३	२५	,,	शुक्र	महाशिवरात्र	

फाल्गुन १८७०
(२८ फेब्रूवारी ते २९ मार्च १९४९)

शु.	२	२	मार्च	बुध	मंडळपाक्षिक	१९
,,	९	९	,,	,,	नगरपाक्षिक	२०
,,	१५	१४	,,	सोम	हुताशनी	१६
व.	२	१६	,,	बुध	मंडळपाक्षिक	२०
,,	३	१७	,,	गुरु	शिवजयंति	१७
,,	५	१९	,,	शनि	रंगपंचमी	१८
,,	९	२३	,,	बुध	कारभारी	१३

—